
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ७०७

यांची प्रवासवृत्तमाला
पुष्प १०वें

नं. ९६०
ता. ३१-१११३८

# वर्णन व वृत्तांत



REFBK-0005416

त्रिवेन्द्रम् : पद्मनाभाचें देऊळ

गो. चि. भाटे

सं १९०३५

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत १८०
सं. मु. नं.
ता.
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५७८६
ठाणे.

नों. क्र.
५४१५

प्रि. भाटे यांची प्रवासवृत्तमाला

पुष्प दहावें

# केरलाचें वर्णन व वृत्तांत

REFBK-0005416

गोविंद चिमणाजी भाटे

पुणें, डे. ए. सोसायटीचे सेवानिवृत्त आजीव सभासद

आवृत्ति १ ली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ४१४५

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत )

किंमत १। रुपाया

मुद्रक :
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.,
आर्यभूषण प्रेस, भांबुर्डा पेठ, घर नं. ९३६।३
पुणें, नं. ४

प्रकाशक :
गोविंद चिमणाजी भाटे,
महाड, जिल्हा कुलाबा.



श्रीमंत सौभाग्यवती गंगाबाई माईसाहेब घोरपडे
राणीसाहेब संस्थान इचलकरंजी

श्रीमंत सकल सौभाग्यवती
गंगाबाई माईसाहेब घोरपडे
राणीसाहेब संस्थान इचलकरंजी

यांचे सेवेसी

त्यांच्या सत्काराचा, सौजन्याचा व समता-
वृत्तीचा सदा आस्वाद घेणाऱ्या लेखकानें
आदरपूर्वक व भक्तिभावानें अर्पण
केलें आहे.

गोविंद चिमणाजी भाटे

# प्रस्तावना

सन १९३० च्या मे महिन्यामध्यें विलायतेहून परत येत असतांना **ब्रिंडिसी** बंदरामध्यें एक हिंदी गृहस्थ आमच्या बोटीवर चढले. त्यांची खोली माझ्या खोलीनजीक होती. त्यांनीं माझी चवकशी केली व माझें नांव कळल्याबरोबर त्यांनीं कांहींसें आश्चर्यानें व आनंदानें मला विचारलें "तुमचा मुलगा सन १९२८ च्या सप्टेंबर महिन्यांत विलायतेंत गेला होता काय?" मी होय म्हणतांच ते गृहस्थ म्हणाले "तुमचा मुलगा व मी एकाच बोटीनें विलायतेस गेलों होतों. मी आपला युरोपांतील विशेष वैद्यकीचा अभ्यास संपवून देशीं परत जात आहें." अशा तऱ्हेनें परिचय झालेले गृहस्थ डॉक्टर मॅथ्यूज हे केरल प्रांतांतील त्रावणकोर संस्थानांतील मूळचे रहिवाशी असून, ते सीरियन ख्रिश्चन आहेत. ते मद्रास इलाख्याच्या मेडिकल खात्यांत डॉक्टर आहेत. आगबोटीमध्यें त्यांची माझी चांगली दोस्ती जमली होती. ते आपल्या जन्मभूमीबद्दल नेहमीं मोठ्या अभिमानानें बोलत असत. "सर्व लोक एकंदर युरोपची व विशेषतः केरल [illegible] निसर्गरमणीयतेबद्दल फार स्तुति करतात खरें. पण हिरव्यागार खुल्या [illegible] ाखेरीज व पांढऱ्या शुभ्र बर्फाच्छादित पर्वताखेरीज या प्रदेशांत विशेष प्रेक्षणीय तें काय आहे? पण आमचा केरल प्रांत म्हणजे हिंदुस्थानचा बगीचा आहे. तेथें ओसाड, निर्वृक्ष व नापीक जमीन पाहूं गेल्यास दिसावयाची नाहीं, सर्व भूमिभाग उंच उंच वृक्षांनीं, हिरव्यागार भातशेतांनीं आणि नानारंगी फळझाडांनीं व फुलझाडांनीं मंडित असा दिसेल. आमच्या प्रांतांतील जंगल सुद्धां खुजें, भुरटें असें नाहीं. तर गगनचुंबी प्रचंड वृक्षांनीं भरलेलें असें तुम्हांला दिसेल, तसेंच आमच्या प्रांतांत जिकडे तिकडे तलाव व पाण्याचे कालवेच कालवे दृष्टीस पडतील. तेव्हां असा निसर्गरमणीय प्रांत तुम्हीं अवश्य पहा. म्हणजे तुम्हांला माझ्या म्हणण्यांची सत्यता पटेल." अशा तऱ्हेने डॉक्टर मॅथ्यूज हे आपल्या केरल प्रांताची थोरवी गात असत. तेव्हांपासून केरल प्रांत पाहण्याची मला उत्कंठा लागली होती. हा माझी उत्कंठा लकाबट प्रवासाच्या अनुषंगानें मला सहज तृप्त करतां येईल असें माझ्या देवास येथील केरलप्रांतीय मित्रानें सांगितलें व मला त्रिचूर व कोचीन या

दोन गांवांतील आपल्या नातेवाईकांना परिचयपत्रें दिलीं. मी लंकेस नवंबर सन १९३३ मध्यें गेलों व जानेवारी सन १९३४ मध्यें केरळ प्रांत पाहून परत लंकेला गेलों.

वर्णनाच्या पहिल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें प्रथम मी केरळ प्रांतांत पालघाट खिंडींतून प्रवेश केला व नंतर केरळाच्या उत्तर प्रवेशद्वारांतून दुसऱ्यांदा प्रवेश केला. या जोडप्रवासाची हकीकत व संभाषणद्वारां व ग्रंथवाचनद्वारां मिळविलेली केरळ प्रांताची पूर्वपीठिका अशी दुहेरी माहिती या माझ्या प्रवासवृत्तमालेंतील पुस्तकांत दिली आहे. माझ्या प्रवासवृत्तमालेंतील इतर पुष्पांप्रमाणें हें पुष्पही लोकादरास पात्र होवो, अशी इच्छा करून मी लेखणी खालीं ठेवतों.

महाड, जिल्हा कुलाबा
४ एप्रिल सन १९३५
चैत्र पाडवा.

गोविंद चिमणाजी भावे.


मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..........
ठाणे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | | पानें. |
|---|---|---|---|
| १ | लें | केरलाचें नाकें : मंगलोर शहर ... ... | १-२३ |
| २ | रें | झामोरिनच्या राजधानीचें शहर : कालिकत बंदर... | २४-३५ |
| ३ | रें | कॅनॅनूर बंदर व तेलीचेरी व माहे यांचें ओझरतें दर्शन | ३६ ४१ |
| ४ | थें | कोचीन संस्थानच्या जुन्या व नव्या राजधान्यांचीं शहरें | ४२-४९ |
| ५ | वें | केरल प्रांतांतील तीन देवळें ... ... | ५०-५७ |
| ६ | वें | दक्षिण केरल प्रांतांतील तीन प्रख्यात बंदरें ... | ५८-७६ |
| ७ | वें | त्रिवेंद्रम व कन्याकुमारी ... ... ... | ७७-१०४ |
| ८ | वें | केरल प्रांताची पुरातन पूर्वपीठिका ... ... | १०५-११३ |
| ९ | वें | केरल प्रांतांत पोर्तुगीजांचा प्रवेश व व्यापारी वर्चस्व | ११४-१२० |
| १० | वें | केरलांत डच लोकांचा प्रवेश व व्यापारी वर्चस्व ... | १२१-१२८ |
| ११ | वें | केरलांत फ्रेंच व इंग्रज अंमल ... ... | १२९-१३० |
| १२ | वें | केरल प्रांतांतील त्रावणकोर संस्थान ... ... | १३१-१३९ |
| १३ | वें | केरल प्रांतांतील कोचीन संस्थान ... ... | १४०-१४३अ |
| १४ | वें | केरलांतील लोकस्थिति व रीतीभाती... ... | १४०-१५ |

# चित्रांची अनुक्रमणिका.


| नंबर | | पान |
|---|---|---|
| | श्रीमंत सौभाग्यवती गंगाबाई माईसाहेब घोरपडे राणीसाहेब संस्थान इचलकरंजी. | |
| | केरळाचा नकाशा | १ |
| १ | कारकलः गोमतेश्वराचा पुतळा | ६ |
| २ | पुत्तूर : नदीकांठचा देखावा | ११ |
| ३ | मंगलोर : सेंट अॅलॉयसीस कॉलेज | १३ |
| ४ | मंगलोर : कुद्रेमुख शिखर | १५ |
| ५ | मंगलोर : कौलाचा कारखाना | २० |
| ६ | मंगलोर : न्याय कचेऱ्यांची टेकडी | १५ |
| ७ | मंगलोर : रोझेरिओ प्रार्थनामंदिर | १३ |
| ८ | केरळाचा किनारा | २७ |
| ८ अ | अर्नाक्युलम : सार्वजनिक कचेऱ्या | ४९ |
| ९ | वरकाला : जनार्दनाच्या देवळानजिकचा किनारा | ५५ |
| १० | कोचीन : मासे धरण्याचें चिनी जाळें | ६४ |
| ११ | कोचीन : सेंट फ्रॅन्सिसचें प्रार्थनामंदिर | ६४ |
| १२ | अलेप्पे : जॉली बोटी व होड्या लागण्याचा धक्का | ६९ |
| १३ | त्रिवेंद्रम : सार्वजनिक कचेऱ्या | ८४ |
| १४ | त्रिवेंद्रम : कालव्यांतील होड्या लागण्याचा धक्का | ९१ |
| १५ | कन्याकुमारी : किनाऱ्याचा देखावा | ९८ |
| १६ | कन्याकुमारी येथील देवळाचा प्राकार | १०० |




# केरल प्रांताचा नकाशा.

Balodyan Press, Poona 2

# केरलाचें वर्णन व वृत्तांत

## प्रकरण १ लें

### केरलाचें नांवें : मंगलोर शहर

ज्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत गंगा-यमुना नद्यांच्या पाण्यानें सुपीक बनलेल्या सखल व सपाट प्रांतांत फार पुरातनकाळीं आर्यांनीं वसाहत करून मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं व आर्यसंस्कृति सर्वत्र प्रसृत केली, त्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत कावेरी-ताम्रपर्णी नद्यांच्या पाण्यानें सुपीक बनलेल्या सखल व सपाट प्रांतांत द्राविडांनीं वसाहत करून मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं व द्राविड संस्कृति सर्वत्र प्रसृत केली असें अर्वाचीन शोधावरून दिसून येतें. या दक्षिण हिंदुस्थानांत तीन राजघराणीं व तीन राज्यें प्राचीन काळापासून प्रख्यातीस आलीं होतीं. कालिदासानें रघुवंशामध्यें रघूच्या दिग्विजयाच्या हकीकतींत या तीन राज्यांचा उल्लेख आणलेला आहे. तसेंच बुद्धधर्माचा प्रचारक प्रख्यात अशोक राजा याच्या शिलालेखांत या तीन राजघराण्यांचा स्पष्ट निर्देश आलेला आहे. दक्षिण हिंदुस्थानचे भौगोलिक दृष्टीनें स्वाभाविक तीन भाग पडतात. या तीन भागांत तीन राजघराणीं उदयास आलीं व त्यांच्या नांवावरूनच त्या प्रांतांचा नेहमीं निर्देश होत असे. दक्षिण हिंदुस्थानचा पूर्वघाट नांवाच्या पर्वतराजीनें व बंगालच्या उपसागरानें मर्यादित प्रदेश हा चोल राजघराण्याच्या नांवानें उल्लेखिला

जात असे. दक्षिण हिंदुस्थानचा **पूर्वघाट** पर्वतराजींनीं व **सह्याद्रि** व **मलय** नांवाच्या पर्वतराजींनीं मर्यादित असा मध्यदेश **पांड्य** राजघराण्याच्या नांवानें उल्लेखिला जात असे व दक्षिण हिंदुस्थानचा **सह्याद्रि** व **मलय** या पर्वतराजींनीं व आरबी समुद्रानें मर्यादित प्रांत **चेर** राजघराण्याच्या नांवानें उल्लेखिला जात असे. **चेर** या जुन्या संस्कृत नांवापासून **केरल** हें नवें व तद्देशीय लोकांना अत्यंत प्रिय नांव निघालें आहे. ज्याप्रमाणें आमच्या देशाच्या जुन्या **भारतवर्ष** किंवा **आर्यावर्त** या नांवापेक्षां पर्शियन लोकांनीं या देशाला दिलेलें **हिंदुस्थान** हें परकीय नांव अर्वाचीन काळीं जास्त रूढ झालें आहे त्याचप्रमाणें जुन्या व लोकप्रिय **केरल** नांवापेक्षां पश्चिमेकडील दक्षिण हिंदुस्थानच्या भागाला **मलबार** हें आरबी लोकांनीं या प्रांताला दिलेलें नांव जास्त रूढ झालेलें आहे. **मलबार** हा गंगाजमनी शब्द आहे. मल्याळी भाषेंत **मल** म्हणजे टेकडी किंवा डोंगर असा अर्थ होतो व **बार** हा आरबी शब्द प्रांत वाचक आहे. तेव्हां मलबार म्हणजे "डोंगरानीं व्याप्त किंवा मर्यादित प्रांत' असा अर्थ होतो. परंतु **मलबार** व **केरल** हे समानार्थी शब्द नाहींत. मलबार हा शब्द हल्लीं एकदां फार विस्तृत अर्थानें व दुसऱ्यांदा फार संकुचित अर्थानें वापरतात. **मलबार किनारा** म्हटलें म्हणजे हल्लीं **सुरतेपासून कन्याकुमारीपर्यंत** आरबी समुद्राच्या कांठचा सर्व प्रांत असा अर्थ करण्यांत येतो; व **मलबार प्रांत** म्हटला म्हणजे मद्रास इलाख्यांत मोडणारा **मलबार** हा जिल्हा येवढाच संकुचित अर्थ मनांत येतो. कारण मलबारचा दक्षिण भाग **कोचीन** व **त्रावणकोर** या संस्थानांचे ताब्यांत आहे तर मलबारचा उत्तर भाग **दक्षिण कानडा** नांवानें मद्रास इलाख्यांतील एक जिल्हा म्हणून संबोधिला जातो. राज्यविभाग व प्रांतविभाग या अर्वाचीन काळच्या कारणांनीं जुन्या **केरल** प्रांताचे निरनिराळे व अलग अलग तुकडे बनले असले व त्या तुकड्यांना निरनिराळीं नांवें मिळालीं असलीं तरी निसर्गदेवीनें या प्रांताभोंवतीं स्वाभाविक व न बदलणाऱ्या मर्यादा

निर्माण केल्या आहेत व सृष्टिसौंदर्य, जमीन व हवापाणी या बाबतींत त्या प्रांताला एकजीव करून ठेविलें आहे. **केरलाच्या** पश्चिमेस सारखा आरबीसमुद्र लागून राहिलेला आहे; तर त्याचे दक्षिणेस **कन्याकुमारीच्या** टोकाशीं हिंदीमहासागर व बंगालचा उपसागर येऊन भिडलेले आहेत; या प्रांताची पूर्व बाजू नाशिकापासून निलगिरीपर्यंत दाक्षिणोत्तर पसरलेल्या **सह्याद्रीच्या** प्रचंड पर्वतराजीनें व **पालनीपासून कन्याकुमारीपर्यंत** पसरलेल्या **मलय** नांवाच्या तितक्याच प्रचंड पर्वतराजींनीं मर्यादित आहे. हे दोन पर्वत केरल प्रांताचे जणूं कांहीं दुर्भेद्य तटच आहेत. या तटांमध्यें फक्त एकच भलें मोठें खिंडार आहे. त्याला **पालघाट** खिंडार म्हणतात. हें तीस पसतीस मैल रुंदीचें समुद्रसपाट असें खिंडार होय. हेंच **केरल** प्रांताचें पूर्वप्रवेशद्वार होय. या सोप्या व सहज प्रवेशद्वारांतूनच **केरल** प्रांताच्या दक्षिणोत्तर भागाला रेल्वे रस्ता नेलेला आहे. याप्रमाणें **केरल** प्रांताच्या तीन दिशांच्या मर्यादा अत्यंत निश्चित व न बदलणाऱ्या अशा आहेत. या प्रांताची उत्तरमर्यादा मात्र कांहींशी अनिश्चित आहे असें दिसतें. कारण **केरलोत्पत्ति** नांवाच्या जुन्या संस्कृत ग्रंथांतील या प्रांताच्या उत्पत्तीची कथा कोंकणप्रांताच्या उत्पत्तिकथेचीच दुसरी आवृत्ति आहे. ती दंतकथा अशी: **परशुरामानें** एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केल्यावर त्यानें सर्व पृथ्वीचें दान केलें; व समुद्राचा स्वामी **वरुण** देव याचेजवळ त्यानें स्वतःकरितां थोडी जमीन मागितली. **वरुणानें** "तुझा परशु समुद्राकडे फेंक व तो जेथें पडेल तितकी जमीन तुला मी देतों." असें सांगितलें. त्याप्रमाणें **परशुरामानें गोकर्ण-महाबळेश्वरच्या** डोंगरावरून आपला परशु फेंकला; तो **कन्याकुमारीशीं** जाऊन पडला. याप्रमाणें **गोकर्ण-महाबळेश्वरपासून कन्याकुमारीपर्यंत** जमिनीची लांबच लांब पट्टी **वरुणानें** कोरडी केली व ती **परशुरामास** दिली, तोच **केरल** प्रांत होय. या दंतकथेप्रमाणें **केरलाची** उत्तर मर्यादा फारच दूरवर जाते. पण **केरल** प्रांताचें प्रत्यक्ष अवलोकन केलें असतां **केरल** प्रांताची स्वाभाविक मर्यादा म्हणजे **नेत्रावती नदी** व **मंगलोर बंदर** हीं होत असें वाटल्या-

खेरीज रहात नाहीं. फार पुरातन काळापासून **अरबस्थानाहून** मलबारला व्यापारी लोक समुद्रमार्गानें येत असत. मलबार प्रांताची न चुकणारी व दुरून दिसणारी खूण म्हणजे **देली डोंगर** ( Mount Delli ) ही होय. हें डोंगराचें शिखर जवळ जवळ हजार फूट उंच असून तें अगदीं समुद्रकिनाऱ्यावर आहे व सपाट व सखल **केरळ** प्रांतांत येवढाच डोंगर समुद्राच्या कांठाला आलेला आहे. हा डोंगर **मंगलोरच्या** दक्षिणेस वीस पंचवीस मैलांवरच आहे. तेव्हां **मंगलोर** शहर हेंच **केरळ** प्रांताचें उत्तरप्रवेशद्वार किंवा नाकें होय यांत शंका नाहीं.


केरळ प्रांत मीं दोन हप्त्यांनीं पाहिला. पहिल्यांदा मी **पालघाटच्या** पूर्वद्वारानें प्रांतांत प्रवेश करून थेट **कन्याकुमारी**पर्यंत गेलों; हा प्रवास मी **लंका**बेटाच्या प्रवासाच अनुषंगानें केला. **केरळ** प्रांताचा उत्तरभाग मी गेल्या नाताळांत मद्रास सदर्न मराठा रेल्वेनें अत्यंत सवलतीचीं व अत्यंत स्वस्ताईचीं अमर्याद प्रवासाचीं जीं दहा रुपयांचीं नाताळ सणाकरितां तिसऱ्या वर्गाचीं तिकीटें काढलीं होतीं त्या निमित्तानें पाहिला. तेव्हां मी **केरळ** प्रांताचें उत्तरद्वार व नाकें जें **मंगलोर** शहर तें प्रथम पाहिलें. तेव्हां माझ्या **केरळ** प्रवासवर्णनास मी या माझ्या नाताळांतील प्रवासापासूनच सुरवात करतों.

आगगाड्या व आगबोटी होण्यापूर्वी पुण्यामुंबईहून मंगलोरास जावयाचें म्हणजे तो एक अत्यंत त्रासाचा, धोक्याचा व आठवडेच्या आठवडे लागणारा प्रवास होता. आगबोटीची रहदारी सुरू झाल्यावर पूर्वीचा त्रासाचा व धोक्याचा गलबताचा प्रवास जाऊन सुखसोयीचा व जलद असा सुमारें चारशें मैल लांबीचा आगबोटीचा जलप्रवास शक्य झाला. हल्लीं बॉंबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या ( किलिक निक्सन ) आगबोटी आठवड्यांतून दोनदां ( मंगळवारीं व शुक्रवारीं ) निघतात व दोन दिवसांनीं मंगलोरास पोंचतात. आगगाडीपेक्षां हाच प्रवास कमी खर्चाचा व सुलभ आहे. प्रथमत: माझा बेत बोटीनेंच मंगलोरला जाण्याचा होता. मोटारची

ता. भू. भवारी १९२०

रहदारी सुरू होण्यापूर्वी मंगलोरला आगगाडीनें जातां येत असें खरें; पण तो खुष्कीचा प्रवास द्राविडी प्राणायामाप्रमाणें फार लांबीचा व फार खर्चाचा असे. कारण पुण्याहून बंगलोरास जाऊन तेथून जालरपेठपर्यंत एम्. एस. एम्. रेल्वेनें जावें लागे व मग जालरपेठपासून साऊथ इंडियन रेल्वेनें मंगलोरास जावें लागे. या मार्गानें पुणें ते मंगलोर आकराशें छत्तीस मैल पडे. पण आतां मोटारची रहदारी सुरू झाल्यापासून निरनिराळ्या घाटांच्या सडकांनीं मंगलोरास मोटारीनें जातां येतें. मंगलोर जिल्ह्याच्या उत्तरेस व पूर्वेस म्हैसूर व कुर्ग प्रांत लागतात. या दोन प्रांतांमधून सात सडका व घाट मंगलोरकडे जातात. पुण्याहून मंगलोरास जाण्यास सर्वांत जवळचा रस्ता म्हणजे कडूर किंवा **बिरूर** स्टेशनावरून **चारमडी** घाटानें थेट मंगलोरला जावयाचें. पुण्याहून कडूर पांचशें मैल आहे व कडूरपासून मंगलोर सुमारें शंभर मैल आहे. पण या रस्त्यानें थेट मोटारीची रहदारी नाहीं. मोटारीच्या थेट रहदारीच्या दृष्टीनें मंगलोरास जाण्यास सोयीचा मार्ग म्हणजे **बिरूर** ते **शिमोगा** व **अनंतपुर** या म्हैसूर रेल्वेरस्त्यानें जावें. बिरूर ते अनंतपुर ६४ मैल व पुणें ते बिरूर ४९५ मैल आहे. म्हणजे रेल्वेनें सुमारें ५६० मैल जातां येतें. तेथून सागर वीस मैल असून तेथून **गिरसप्पा** अवघें आठरा मैल आहे. म्हणजे या रस्त्यानें गेलें असतां वाटेनें गिरसप्पाचा धबधबा पाहतां येतो. सागर ते मंगलोर अशी थेट मोटार रहदारी आहे. ती अनंतपुराहून जाते. अनंतपुराहून **तीर्थहळ्ळी** म्हणून एक म्हैसूर संस्थानांतील मोठें गांव लागतें. तेथून घाटमाथ्यावर असलेलें टुमदार छोटेसें शीतल निवासस्थान असें **अगुंबे** गांव लागतें. तेथून अगुंबे घाट सुरू होतो. हा घाट मात्र फारच वाकणावाकणाचा व उभ्या चढाचा आहे व रस्ताही बैलगाड्यांचा आहे. यामुळें या रस्त्यानें मोठ्या मोटार लॉरी जाऊं शकत नाहींत. म्हणून अगुंबेपासून घाटाच्या पायथ्याशीं असलेल्या **सोमेश्वर** गांवापर्यंत ६।७ माणसांच्या छोट्या मोटारगाड्या


ठेविल्या आहेत. त्या प्रवाशांची खालून वर व वरून खालीं अशी नेआण करतात व मग सोमेश्वरापासून मंगलोरापर्यंत उत्तम सडक असून मोटार लॉरी जातात. अगुंबेघाट मंगलोरपासून सुमारें ५६।५७ मैल आहे. अर्ध्या घाटापर्यंत म्हैसूरची हद्द आहे व मग साऊथ कॅनरा जिल्ह्याची हद्द लागते. म्हैसूरची व ब्रिटिश जिल्ह्याची मैलमोजणी निरनिराळी होते. यामुळें प्रथम प्रवाशाचा मोठा घोटाळा उडतो. सोमेश्वरापासून पंचवीस मैलांवर **कारकल** म्हणून एक जैन देवळाकरितां प्रख्यात असलेलें मोठें गांव लागतें. याच गांवीं **गोमतेश्वराचा** एकसंधी दगडाचा एकेचाळीस फूट उंचीचा भव्य व जैन मूर्तिकलेचा कळस असा पुतळा आहे. येथून दहा मैल अलीकडे **मुडबिद्री** नांवाचें कारकलपेक्षां जास्त प्रख्यात व जास्त मोठें जैन कलाकौशल्याचें आगर असें गांव आहे. या गांवाला जैन **दक्षिण काशी** समजतात. इतकें हें मोठें पवित्र यात्रास्थान गणलेलें आहे. हा सर्व प्रांत पूर्वीं जैन राजांच्या अंमलाखालीं असून या प्रांतीं जैन धर्माचा पूर्वकाळीं फार फैलाव झालेला होता. मुडबिद्रीपासून मंगलोर अवघें वीस बावीस मैल आहे. अनंतपुरपासून मंगलोर सुमारें शंभर सवाशें मैल पडतें. हा सर्व मार्ग सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून व डोंगरांच्या ओळींतून गेल्यामुळें सर्वत्र हिरवें हिरवेंगार दाट दाट व उंच उंच रान याखेरीज कांहीं एक दिसत नाहीं. या सर्व भागांत गांवेंही दूर दूर असून तुरळक तुरळक पिकांची व फळांची लागवड दृष्टीस पडते. बाकी पहावें तिकडे सारखें गर्द जंगल! इतकें एकसारखें मैलच्या मैल रान आपल्या इकडल्या प्रांतांत क्वचित् बघावयाला सांपडतें. यामुळें या मार्गानें मनुष्यानें प्रवास केला म्हणजे तो आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घालील यांत संशय नाहीं. शहरांतील माणसांनीं व घरांनीं गजबजलेल्या वस्तींत राहणाराला या मार्गानें जातांना भय वाटावयाचें पण माझ्यासारख्या निसर्गप्रिय प्रवाशास असले भूमिभाग म्हणजे वनदेवीचें माहेरघर वाटतें व यामुळें अशा मार्गानें जातांना मला आनंदाचें भरतें येतें. पण आम्ही या मार्गानें मंगलोरास गेलों नाहीं; तर परत येतांना घाईघाईनें व



नं. १ ] कारकल : गोमतेश्वराचा पुतळा [ पान ६


स्थळ प्रत
ले. नं.
ता.

ठेविल्या आहेत. त्या प्रवाशांची खालून वर व वरून खालीं अशी नेआण करतात व मग सोमेश्वरापासून मंगलोरापर्यंत उत्तम सडक असून मोटार लॉरी जातात. अगुंबेघाट मंगलोरपासून सुमारें ५६।५७ मैल आहे. अर्ध्या घाटापर्यंत म्हैसूरची हद्द आहे व मग साऊथ कॅनरा जिल्ह्याची हद्द लागते. म्हैसूरची व ब्रिटिश जिल्ह्याची मैलमोजणी निरनिराळी होते. यामुळें प्रथम प्रवाशाचा मोठा घोटाळा उडतो. सोमेश्वरापासून पंचवीस मैलांवर **कारकल** म्हणून एक जैन देवळाकरितां प्रख्यात असलेलें मोठें गांव लागतें. याच गांवीं **गोमतेश्वराचा** एकसंधी दगडाचा एकेचाळीस फूट उंचीचा भव्य व जैन मूर्तिकलेचा कळस असा पुतळा आहे. येथून दहा मैल अलीकडे **मुडबिद्री** नांवाचें कारकलपेक्षां जास्त प्रख्यात व जास्त मोठें जैन कलाकौशल्याचें आगर असें गांव आहे. या गांवाला जैन **दक्षिण काशी** समजतात. इतकें हें मोठें पवित्र यात्रास्थान गणलेलें आहे. हा सर्व प्रांत पूर्वी जैन राजांच्या अंमलाखालीं असून या प्रांतीं जैन धर्माचा पूर्वकाळीं फार फैलाव झालेला होता. मुडबिद्रीपासून मंगलोर अवघें वीस बावीस मैल आहे. अनंतपुरपासून मंगलोर सुमारें शंभर सवाशें मैल पडतें. हा सर्व मार्ग सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून व डोंगरांच्या ओळींतून गेल्यामुळें सर्वत्र हिरवें हिरवेंगार दाट दाट व उंच उंच रान याखेरीज कांहीं एक दिसत नाहीं. या सर्व भागांत गांवेंही दूर दूर असून तुरळक तुरळक पिकांची व फळांची लागवड दृष्टीस पडते. बाकी पहावें तिकडे सारखें गर्द जंगल! इतकें एकसारखें मैलच्या मैल रान आपल्या इकडल्या प्रांतांत क्वचित् बघावयाला सांपडतें. यामुळें या मार्गानें मनुष्यानें प्रवास केला म्हणजे तो आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घालील यांत संशय नाहीं. शहरांतील माणसांनीं व घरांनीं गजबजलेल्या वस्तींत राहणाराला या मार्गानें जातांना भय वाटावयाचें पण माझ्यासारख्या निसर्गप्रिय प्रवाशास असले भूमिभाग म्हणजे वनदेवीचें माहेरघर वाटतें व यामुळें अशा मार्गानें जातांना मला आनंदाचें भरतें येतें. पण आम्ही या मार्गानें मंगलोरास गेलों नाहीं; तर परत येतांना घाईघाईनें व



नं. १ ] कारकल : गोमतेश्वराचा पुतळा [ पान ६

ग्रंथालय



नं. २ ] पुत्तूर : नदीकांठचा देखावा [ पान ११

ओझरतें असेंच या भागाचें माझें दृश्य दर्शन झालें. आम्ही मंगलोरास जरा दूरच्या मार्गानें गेलो.

प्रोफेसर शिंत्रे, देवधर व मी अशा तिघांनीं दहा रुपयांचीं सवलतीचीं तिकीटें घेतलीं. पुण्याहून आम्ही तिघेजण ता. २० दिसेंबर सन १९३४ रोजीं दिवसा बारा वाजतां निघालों. सवलतीच्या सुरवातीचा तो दिवस असल्यामुळें व नाताळची सुट्टी सुरू होण्यास दोन दिवसांचा अवकाश असल्यामुळें गाडीमध्यें फारशी गर्दी नव्हती. अर्थात् नेहेमींपेक्षां पुष्कळ अधिक प्रवासी त्या सवलतीच्या तिकीटांचा फायदा घेऊन निघाले होते हें खरें. सायंकाळीं मिरजेस माझा मुलगा मनोहर आम्हांला येऊन मिळाला व आम्हां प्रवाशांची चवकडी जमली. आम्ही ता. २१ रोजीं संध्याकाळीं साडेसहा वाजतां म्हणजे पुण्याहून निघाल्यापासून बरोबर तीस तासांत **बंगलोरास** पोहोंचलों. यंदा म्हैसूर प्रांतांत पावसाचें जवळ जवळ अवर्षणच होतें. यामुळें मागें म्हैसूर प्रांताचा प्रत्यक्ष प्रवास करतांना जो हिरवाहिरवा धान्य-पिकांनीं व फळपिकांनीं शोभायमान असा भूमिभाग दिसला तसा या खेपेला दिसला नाहीं. जिकडे तिकडे पिकुट वाळलेलीं अशींच पिकें दिसलीं. वाटोवाट लागणारे तलावही शुष्क व जलहीन दिसले. बंगलोराहून आम्ही आगगाडीनें म्हैसूरास गेलों. तेथें आम्हांला खुद्द मंगलोरचे राव-बहादूर नेलीकाई व्यंकटराव नांवाचे गृहस्थ भेटले. त्यांनीं सांगितलें कीं म्हैसूरहून थेट मंगलोरास मोटारी जातात व तो रस्ताही उत्तम असून कुर्ग प्रांताची प्रख्यात राजधानी **मरकारा** या शहरांतून तो रस्ता जातो व वाटेनें कुर्गचें जंगल व विशेषत: कॉफीचे मळे पहाण्यास सांपडतात. तेव्हां आम्हीं त्या वाटेनेंच जाण्याचें ठरवून ता. २५ डिसेंबर सन १९३४ रोजीं सकाळीं साडेसात वाजतां मोटारींत बसलों. मंगलोरपर्यंत भाडें दरमाणशीं साडेचार रुपये पडलें.

म्हैसूरपासून मरकरा हें सुमारें पंचाऐंशी मैल आहे. रस्ता म्हैसूर-हद्दीपर्यंत थेट पश्चिमेकडे जातो. **हनसूर** गांवापर्यंत प्रांत साधारण उंचसखल माळरानी असून तो बराच ओसाड आहे. म्हैसूर ते

बंगलूर हा भूमिभाग जसा पुष्कळ शेतीबागायतीचा व विपुल पाटपाण्याचा प्रांत असून तो फार सुपीक व म्हणून नयनमनोहर दिसतो तसा हा म्हैसूरचा भाग सुपीक व नयनमनोहर दिसत नाहीं. हनसूरपासून **फ्रेजर-पेठ** ( म्हैसूरच्या हद्दीला लागून असलेलें कुर्ग प्रांतांतील गांव ) येथपर्यंतचा भूमिभाग भुरट्या रानानें व्याप्त असून मधूनमधून भातशेती व थोडीं फार बागाईती पिकें दृष्टीस पडतात. तंबाखूचें पीक या भागांत बरेंच होत असावें असें वाटलें. फ्रेजरपेठच्या जरा अलीकडील भागांत **कावेरी** ही नदी दक्षिणोत्तर वाहिनी असून कुर्ग व म्हैसूर या प्रांतांची सरहद्द आहे. कावेरी नदी या ठिकाणीं फारशी मोठी नाहीं. ही मरकाराच्या दक्षिणेस **तलेकावेरी** येथून उगम पावून प्रथम आग्नेय दिशेनें वहात जाऊन मग उत्तरवाहिनी बनते. म्हैसूर प्रांताला या नदीनें आपल्या प्रचंड पाण्यानें केवढी संपत्ति मिळवून दिली आहे हें ध्यानांत घेतां येथें लहान दिसणाऱ्या या नदीचें आश्चर्य वाटलें. कुर्ग प्रांतांत पाऊल टाकल्याबरोबर नाटकामध्यें एकदम सीन बदलावा त्याप्रमाणें सृष्टीचा सर्व देखावा पार बदलून जातो. जिकडे जिकडे नजर फेकावी तिकडे तिकडे हिरव्या हिरव्यागार व गर्द रानानें व्यापलेले डोंगरच डोंगर दिसूं लागतात. आतां इंचभर जागाही ओसाड, नापीक किंवा निर्वृक्ष दिसत नाहीं. लवकरच आपल्या प्रांताला अगदीं अपरिचित अशी काफीची लागवड दृष्टीस पडून प्रवाशाचें मन आश्चर्यानें थक्क होतें. कुर्ग प्रांतांत मैलच्या मैल हे कॉफीचे मळे लागतात !

काफीचा मळा व चहाचा मळा यांमध्यें विलक्षण साम्य आहे. दोन्ही पिकांच्या जागेस **मळा** हें नांव लागू पडत नाहीं. कारण आपल्या इकडल्या मळ्याप्रमाणें हे नेहेमीं पाटाचें किंवा विहीरीचें पाणी मागणारे सपाट जमिनीवरील मळे नसतात. चहाचीं काय किंवा कॉफीचीं काय — हीं झाडें झुडुपवजा असतात. तीं फार झालें तर कमरभर किंवा छातीभर उंच वाढतात; पण त्यांना खूब खांद्या असतात; हीं झाडें आपल्या इकडल्या करवंदीच्या जाळ्यासारखीं उंच सखल मुरबाड व खडकाळ

सं. ता.

जागेंत सुद्धां वाढतात; त्यांना सरळ, सपाट, काळी मऊ जमीनच पाहिजे असें नाहीं; त्यांना नेहेमीं पाणी द्यावें लागत नाहीं; मात्र या झुडपांना थोड्याशा सावलीची व थंडाव्याची जरूर असते. म्हणून चहाच्या किंवा कॉफीच्या मळ्यांत मधून मधून सावलीकरितां उंच वाढणारीं **सिल्हर ओकाचीं** झाडें व जाड पानाच्या भेंडीच्या झाडासारख्या पानांचीं झाडें हरीनें सर्व मळाभर लावलेलीं असतात. या उंच उंच झाडांच्या रांगाच रांगा व मध्यें छोटीं वाढणारीं पण खूब पानाचीं व सर्व भूमिभाग हिरवा हिरवागार करून सोडणारीं छोटीं झुडपें हा देखावा फार बहारीचा वाटतो यांत शंका नाहीं. आम्हांला मैलच्या मैल असे कॉफीचे मळे मरकारा शहराच्या आगेंमागें सारखे लागत होते. कॉफीच्या बारीक व तांबूस फळांचे घोसचे घोस त्या झुडुपांना लटकलेले दिसत होते. असा हा सर्वत्र सुंदर देखावा पहात असतांना वेळ कसा गेला हें ध्यानांत सुद्धां आलें नाहीं व आम्ही बारा वाजण्याचे सुमारास **मरकारा** राजधानीस येऊन पोहोंचलों. येथें मंगलोराकडून मोटार यावयाची होती व मग आमच्या मोटारीची अदलाबदल व्हावयाची होती. तेव्हां येथें आम्हांला अर्धा पाऊण तास थांबावयाचें होतें. सकाळची न्याहारी करून आम्हीं निघालों होतों खरे, पण चार तासांच्या मोटारींतील शरीर हादरविणाऱ्या प्रवासानें आम्हांला चांगलीच भूक लागली होती. तेव्हां आम्हीं मोटारींतून उतरल्याबरोबर आणलेल्या पुऱ्यालाडूंवर ताव मारला व मग त्यावर गरम गरम चहाचे पेले झोकले हें सांगावयास नकोच.

**मरकारा** हें कुर्ग प्रांताचें राजधानीचें ठिकाण असून शिवाय तें एक शीतल निवासस्थानही आहे. हें शहर सह्याद्रि पर्वताच्या शिखरांवर वसलेलें आहे. येथें महाबळेश्वरप्रमाणें पठार वगैरे कांहीं नाहीं. तर पर्वताच्या उंच सखल भागांत साधतील तशीं घरें व बंगले बांधलेले आहेत. यामुळें एका घराचें छप्पर दुसऱ्या घराच्या जोत्याच्या सपाटीला आहे असें दिसतें. बाजार पेठेंतील घरें व दुकानेंसुद्धां एकाचें

डोक्यावर दुसरें अशीं बांधलेलीं ! अशी मोठी विलक्षण व आश्चर्यकारक येथली वस्ती आहे. आमच्या मोटारस्टँडनजीक जुन्या किल्ल्याचा तट एका टेकडीच्या माथ्यावर दिसत होता. झालें. आमचें खाणेंपिणें व मरकारा शहराचें ओझरतें दर्शन होत आहे तोंच आमच्या मोटारींतील सामानाची अदलाबदल होऊन मंगलोराहून आलेली मोटार परत प्रवासास सज्ज झाली व आम्हीं चवघांनीं आपलें वाक पकडलें व लगेच मोटार चालू झाली. येथून मंगलोर पंचाहत्तर मैल राहिलें होतें व आम्ही दोन प्रहरीं एकाच्या सुमारास आमच्या उद्दिष्ट स्थळाकडे जाण्यास मोठ्या मजेंत निघालों. मरकारापासून सह्याद्रीचा उतार-घाट सुरू होतो. या घाटाचें नांव **संपाजे** घाट. कारण संपाजे नांवाचें गांव पर्वताच्या पायथ्याशीं आहे. हा घाट तब्बल वीस मैलांचा असून तो सारख्या उताराचा आहे. **महाड महाबळेश्वर** घाटाप्रमाणें दोन टप्पेही त्याला नाहींत. यामुळें मोटार भराभर खालीं खालीं जाते व आपण काय पाताळांत जात आहों असा क्षणोक्षणीं भास होतो. कारण घाट संपतां संपत नाहीं. काश्मीराहून परत येतांना **मरी**कडून उतरतांना जसा देखावा दिसतो तसा या घाटानें उतरतांना देखावा दिसतो. मरकारा टाकून जरा खालीं आलें कीं **पैसवनी** नदी एकसारखी आपल्या उजव्या हाताला खालीं खोल दिसते. हा घाट या नदीच्या दरींतून गेला आहे. यामुळें एकीकडे उंच कडे व दुसरीकडे खोल दरी असा हा देखावा सर्व घाटभर दृष्टीस पडत राहतो. शेवटीं एकदांची आमची मोटार पर्वतांच्या पायथ्याशीं पोहोंचली. येथेंच **संपाजे** गांव लागतें व कुर्ग प्रांताची हद्द येथें संपते व आपण मलबार प्रांतांत खरोखरीं प्रवेश करतों. पण ब्रिटिश अमदानींत या जिल्ह्याला **दक्षिण कॅनरा** म्हणतात. संपाजे गांव टाकल्यावर लवकर **पैसवनी** नदीवरील छोटा पूल लागतो व मग ती नदी आपल्या डाव्या हाताला येते. **सुलिया** गांवापासून पैसवनी नदी पश्चिम वाहिनी होऊन व **चन्द्रगिरी** हें नवें नांव धारण करून **कासरगोडा** या मोठ्या शहरानजीक मोठा क्षार तलाव करून मग आरबीं


समुद्राला मिळते. मंगलोरची सडक वायव्य दिशेनें जाते. आतां सर्व भूमिभाग साधारण सपाटीचा असून धान्य व फळें असा दुहेरी पिकांनीं व्यापलेला आहे असें कळून येतें व मनाला फार आनंद वाटतो. जिकडे तिकडे हिरवागार देखावा दृष्टीस पडतो. नारळी, पोफळी, केळीं, आंबे, फणस इत्यादि सुंदर झाडांची लागवड जिकडे तिकडे दृग्गोचर होते. पुढें **पुत्तूर** हें मोठं गांव लागतें. हें गांव किती निसर्गरमणीय आहे हें सोबत छापलेल्या छायाचित्रावरून दिसून येईल. पुढें **पाणेमंगलूर**पर्यंत रस्ता वायव्य दिशेनें जातो. हें गांवही मोठें सुंदर गांव असावें असें वाटेनें जाताजातांच दिसून येतें. हें गांव टाकल्याबरोबर मंगलोरची नव्हे–सव मलबार प्रांतांतील एक प्रमुख नदी–**नेत्रावती** इच्यावरील सुंदर लोखंडी पूल लागतो. ही नदी उलटल्यावर रस्ता थेट पश्चिम दिशेनें व नदीच्या उत्तर कांठाकांठानें मंगलोरापर्यंत जातो. आम्ही **मंगलोरास** सायंकाळीं सहा साडेसहाच्या सुमारास पोहोंचलों. दीडशें मैलांच्यावर मोटारचा प्रवास आम्हीं अकरा तासांत केला व तो प्रवासही बिनत्रासाचा व मोठ्या मजेंत झाला.म्हणून आम्हांला फार आनंद वाटला. मोटारस्टँडशीं येऊन मोटारींतून खालीं उतरतों तोंच ज्या गृहस्थांकडे आम्ही उतरणार होतों त्यांचे बंधु आम्हांला बिऱ्हाडीं नेण्याकरितां आले यामुळें आम्हांला दुधांत साखर पडल्याप्रमाणें वाटून आमचा आनंद द्विगुणित झाला व मोठ्या प्रमुदित मनानें आम्ही बिऱ्हाडीं आलों.

फर्ग्युसन कॉलेजमधील इतिहासाचे प्रोफेसर **शर्मा** यांचेमार्फत त्यांचे स्नेहीं **एकांबरराव** ( गणपति हायस्कूलचे हेडमास्तर ) यांचे घरीं आमची उतरण्याची व्यवस्था झाली होती. हेडमास्तरसाहेब हे दुय्यम शिक्षकांच्या परिषदेकरितां बंगलोरास गेले होते. पण **मिसेस एकांबरराव** यांनीं आमचें उत्तम आदरातिथ्य केलें व आमचा मंगलोर येथील दोन दिवसांचा निवास मोठ्या मजेचा व गडबडीचा झाला.

**मंगलोर** हें मलबारांतील पहिलेंच मोठें बंदर व शहर आहे. त्याची सध्यांची लोकवस्ती सुमारें ७० हजार आहे. हें शहर **नेत्रावती** व

**गुरपुर** या दोन नद्यांच्या संगमावर पूर्वांगास वसलेलें आहे. नेत्रावती ही मोठी नदी मलबारांतील सह्याद्रि पर्वतांतील सहा हजार फुटांचे वर उंच असलेलें सर्वांत मोठें शिखर **कुद्रेमुख** याचे पूर्वेस निघून उपन्नगडी गांवांपर्यंत दक्षिण दिशेनें वहात जाते. येथें तिला वायव्य दिशेकडे वहात येणारी **कुमारधारी** नांवाची नदी येऊन मिळते. तेथून नेत्रावती मोठी नदी बनून पश्चिम दिशेनें थेट आरबी समुद्रा-नजीकपर्यंत वहात येते व मग उत्तरवाहिनी बनते. **गुरुपुर** ही नदी कुद्रेमुख शिखराच्या उत्तरेस उगम पावून नैऋत्य दिशेनें वाहात जाऊन असनाजे गांवानजीकच्या भागीं एकदम पश्चिमवाहिनी बनून कुलुर गांवाशीं दक्षिणवाहिनी होते. या दक्षिणवाहिनी गुरुपुर नदीचा व उत्तर-वाहिनी नेत्रावती नदीचा मनोहर **प्रीतिसंगम** होतो व तेथें लांबच लांब असें क्षार सरोवर बनतें व मग दोन्ही नद्यांचा संगत प्रवाह आरबी समुद्राला मिळतो. या दोन नद्यांच्या प्रीतिसंगमानें बनलेलें लांबट क्षार सरोवर (बॅक वॉटर ) व आरबी समुद्र यांमध्यें वाळवंटी जमिनीची अरुंद पट्टी पांच सात मैल सारखी पसरलेली आहे. दोन नद्यांच्या दुवेळक्यांत व क्षार सरोवराच्या पूर्व अंगास मंगलोर शहर वसलेलें आहे व मंगलोर बंदराचें आरबी समुद्राच्या लाटा व त्यावरून येणारा वारा यापासून वाळवंटी जमिनीच्या पट्टीनें उत्तम संरक्षण केलेलें आहे. यामुळें या क्षार सरोवरांतून दोन्ही नद्यांच्या पात्रांमध्यें पंधरावीस मैलपर्यंत नावा व गलबतें यांची वाहतुक बाराही महिने चालू राहते. अशा सुरक्षित जल मार्गाच्या योगानें मंगलोर हें फार पुरातन काळापासूनचें एक प्रख्यात बंदर व व्यापाराचें केन्द्र बनलेलें आहे.

बंदराप्रमाणें मंगलोर शहराची रचना ही मोठी चमत्कृतिजनक आहे. शहराच्या उत्तर, पूर्व व दक्षिण या दिशांना दीड दोन मैलांचे अंतरावर गर्दच्छाय झाडांनीं व झुडुपांनीं व नारळ, पोफळ, काजू, आंबे, फणस इत्यादि पिकाऊ वृक्षांनीं गच्च भरलेल्या सुंदर टेकड्या आहेत इतकेंच नाहीं तर खद्द मंगलोर शहरांत किती तरी लहानलहान टेकड्या आहेत व सर्व



नं. ३ ] मंगलोर : संट ॲलॉयसीस कॉलिज [ पान १३



नं. ८ ] मंगलोर : कुद्रेमुख शिखर [ पान १५

गांवांत गर्द झाडी आहे. यामुळें मंगलोर शहर बेळगांव धारवाडप्रमाणें मोठें नयनमनोहर शहर दिसतें. ती हिरवी हिरवीगार व गर्द झाडी; ती तांबड्या लाल मातीची जमीन; ते तांबड्या पांढऱ्या खडीचे सुंदर व गुळगुळीत रस्ते व तीं तांबड्या दगडांचीं व मंगलोरी कौलांचीं घरें हा सर्व देखावा चित्तवेधक आहे यांत शंका नाहीं. यामळें मंगलोर शहराचा प्रवाशाच्या मनावर मोठा अनुकूल परिणाम होतो यांत नवल नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील जिल्ह्याच्या शहरांप्रमाणें गेल्या दहावीस वर्षांमध्यें मंगलोर शहराची पुष्कळ वाढ झाली आहे व ती वाढ सारखी चालू आहे. इतकें मंगलोरचें सामान्य स्वरूप वर्णन पुरें आहे. आतां प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळवर्णनाकडे वळणें बरें.

प्रथमत: आम्ही येथलें सर्वांत जुनें कॉलेज—सेंट ॲलॉयसीस— पाहण्यास गेलों. हें कॉलेज जेसुईट लोकांनीं चालविलेलें असून त्याच्या स्थापनेस शंभरावर वर्षें होऊन गेलीं आहेत असें कळलें. या कॉलेजला मिळालेलें ठिकाण हें मंगलोर गांवचें सर्वांत उंच ठिकाण आहे. ही एक गांवांतील तांबड्या खडकाची व तांबड्या मातीची टेकडीच आहे. त्याचे माथ्यावर कॉलेजच्या विस्तीर्ण इमारती पसरलेल्या आहेत. कॉलेजच्या इमारती बांधकलेच्या दृष्टीनें मोठ्या कलाकौशल्याच्या व नक्षीकामाच्या आहेत अशांतला भाग नाहीं. पण त्या इमारतींची विस्तीर्णता मन थक्क करणारी आहे यांत शंका नाहीं. कारण हें कॉलेज म्हणजे एकटी संस्था नाहीं; तर इंग्रजी शिक्षणाच्या प्रारंभापासून बी. ए., बी. एससी. पर्यंत शिकविणाऱ्या शाळा व कॉलेज अशा जोड संस्था आहेत. शिवाय शाळा-कॉलेजांना जोडून वसतीगृहें आहेत. खेरीज जेसुईट पंथाचे सर्व भिक्षु (फादर्स), राहण्याची याच ठिकाणीं सोय आहे. अर्थात् ख्रिश्चन धर्माचें खिस्ती प्रार्थना-मंदिरही येथें आहे. या सर्व इमारती एकाच टेकडीवर — थोड्या वर खालीं--असल्यामुळें या कॉलेजच्या इमारतींचा विस्तार विलक्षण वाटतो. तेथल्या एका भिक्षूनें आम्हांला कॉलेजचे वर्ग, कॉलेजच्या निरनिराळ्या शास्त्रांचीं प्रयोगालयें, कॉलेजचें पदार्थ-संग्रहालय, कॉलेजचें प्रशस्त

सभागृह, कॉलेजचें ग्रंथ-संग्रहालय वगैरे सर्व शिक्षण-साधनें दाखविलीं. जुन्या व मोठ्या संस्थेला शोभेशीं हीं सर्व साधनें पाहून आम्हांला आनंद वाटला. विशेषतः कॉलेजच्या पदार्थ–संग्रहालयांत भूगर्भशास्त्रविषयक पदार्थांचा चांगला संग्रह दिसला; तसेंच नाना देशांतील, नाना काळच्या नाण्यांचा मोठा संग्रह तेथें करण्यांत आला आहे. तसेंच वाळलेल्या वनस्पतींच्या पानाफुलांचे हजारों नमुने यांचा मोठा संग्रह केलेला आहे. भूकंप दर्शविणारें फार नाजूक यंत्र प्रयोगशाळेच्या एका शाखेंत बसविलेलें आहे. सारांश, या कॉलेजांत आधिभौतिक शास्त्रें शिकविण्याची उत्तम सोय केलेली आहे असें उपकरणांवरून व संग्रहावरून दिसून आलें. नंतर आम्हीं येथलें बरेंच जुनें प्रार्थना-मंदिरही पाहिलें. प्रार्थना-मंदिर नुसतें भव्य विस्तीर्ण आहे इतकेंच नाहीं तर तें बांधकलेच्या व कलाकौशल्याच्या दृष्टीनें फार वाखाणण्यासारखें आहे. विशेषत: भिंतीवर काढलेलीं तेल्या रंगांतील चित्रें व देखावे चित्रकलेचे उत्तम मासले आहेत असें आम्हांस वाटलें. या कॉलेजांतील विस्तीर्ण व भव्य इमारतीमधील सर्वांत सुंदर असें हें प्रार्थनामंदिर आहे यांत शंका नाहीं. नंतर आम्ही जेसुईट भिक्षूंच्या राहण्याच्या खोल्या, त्यांचें वाचनालय व एकत्र बसण्याचा दिवाणखाना पाहिला. येथल्या खोल्यांवर आम्ही ‘ आहे ’ ‘ नाहीं ’ इतकेंच दर्शवितां येणाऱ्या पितळी पाट्यापेक्षां निराळीच व मजेची व्यवस्था पाहिली. या कॉलेजचा विस्तार येवढा प्रचंड आहे कीं एखादा प्रोफेसर किंवा भिक्षु कोणत्या ठिकाणीं आहे हें शोधून काढणें कठीण आहे. म्हणून येथल्या खोल्यांवर अशी व्यवस्था केली आहे कीं, दहा पंधरा ठिकाणांचे नांव-नंबरांची पितळेची लांब पाटी केलेली आहे व ज्या नांवाच्या व नंबराच्या ठिकाणीं खोलींतला प्रोफेसर किंवा भिक्षु जाणार असेल त्या नांवावर व नंबरावर काटा आणून ठेवून त्यानें खोलीबाहेर जावें अशी तजवीज केलेली आहे. ही व्यवस्था मोठी सोयीची आहे असें मला वाटलें. मात्र प्रोफेसरांनीं न विसरतां आपण कोठें व कोणत्या नंबरच्या ठिकाणीं जात आहों हें बरोबर ध्यानांत ठेवून

कांटा त्या नंबरावर आणून ठेविला पाहिजे; नाहीं तर या सोयीपासून फायदा न होतां गोंधळच जास्त उडावयाचा. भिक्षूंच्या [illegible] व्हरांड्यांतून मंगलोर शहराच्या बंदराकडचा मोठा सुंदर देखावा दिसतो. पण या कॉलेजच्या इमारतींचा एक विशेष म्हणजे येथला उंच उंच **मनोरा.** आम्ही या मनोऱ्याच्या माथ्यावर गेलों तेव्हां मंगलोर शहर व बंदर, मंगलोरचा क्षार तलाव व त्या शहरांतील कौलांच्या गिरण्याच गिरण्या यांचा एकसमयावच्छेदेंकरून मनोहर देखावा दिसला इतकेंच नाहीं तर मंगलोरच्या आसपासचा पंचवीस मैलांचा उंचसखल व गर्द झाडींनें व रानानें व्याप्त असा भूमिभाग दृग्गोचर झाला व या प्रांताचें चित्ताकर्षक रूप पाहून आनंद व आश्चर्य असे मनोविकार आमच्या मनांत एकदम उभे राहिले; येथून पश्चिम दिशेला पाहिलें तों नीळसर, हिरवट रंगाच्या पाण्याचा अफाट आरबी समुद्र दृष्टीस पडला ! पूर्वेस नील रंगाची सह्याद्रि पर्वताची रांगच रांग दृग्गोचर झाली. या पर्वतामधील उंच उंच शिखरें मधून मधून आपलीं डोकीं वर काढीत होतीं. त्यापैकीं **कुद्रेमुख** नांवाचें सहा हजार फूट उंच असलेलें शिखर तर आमच्यासमोर स्पष्टपणें दिसत होतें. त्याचें दक्षिण टोंक तर भिंतीसारखें उभें तुटलेलें दिसत होतें. मंगलोरच्या आसपासचा भूमिभाग फार डोंगराळ आहे. मात्र तो भाग झाडाझुडपांनीं व हिरव्यागार पिकांनीं व्याप्त असल्यामुळें नयनमनोहर दिसतो. या मनोऱ्यावरून तो सुंदर देखावा आम्ही किती वेळ तरी पहात होतों.* शेवटीं उशीर फार झाला असें पाहून आम्हीं भिक्षूचे आभार मानून कॉलेजच्या आवाराबाहेर आलों.

या टेकडीला लागूनच दुसरी **दीपगृह** टेंकडी आहे. हें दीपगृह हल्लीं बंद असून ( कारण बंदरावरच किनाऱ्यालगत छोटें नवें दीपगृह

---

* नुकतेंच वर्तमानपत्रांत वाचलें कीं गेल्या नाताळांत पाहिलेला तो मनोरा भंगल्यामुळें तावडतोब पाडण्यांत आला. पण तेथें समाधानाची बातमी दिली होती कीं तो मनोरा पूर्वीप्रमाणें पुनः बांधण्यांत येणार आहे.

बांधलें आहे ) त्याची इमारत नगरसंस्थेला दिली आहे. तिनें तेथें छोटेसें वाचनालय काढलें आहे. त्यावर सहज नजर टाकून व त्या टेकडीवरून दिसणारा बंदराचा देखावा पाहून आम्ही खालीं एका सपाट मैदानावर आलों. त्या मैदानाच्या एका बाजूस असलेला कॉफी कारखाना पाहिला. मंगलोरास कुर्ग व म्हैसूर प्रांतांतून पुष्कळच कॉफीचें बीं येतें. तें बीं वाळवून त्याच्या उत्तम मध्यम अशा प्रती लावून त्याचीं पोतीं भरून तीं युरोपला पाठविण्याचे पुष्कळच कारखाने येथें आहेत. त्यांना 'कॉफी क्युअरिंग वर्क्स' म्हणतात. व्होलकार्ट कंपनीचा येथें मोठा कारखाना आहे तोच आम्हीं पाहिला. मळ्यांतून पिकलेलीं कॉफीचीं फळें ( बुंद ) कारखान्यांत येतात. येथें सिमेंट कांक्रीटचीं सपाट गुळगुळीत आंगणीं केलेलीं असतात. त्यावर मळ्यांतून आलेलें बीं सारखें पसरतात. किती उन्हें दिलीं म्हणजे बुंद टिकाऊ व स्वादिष्ट झालें हें समजणें मोठें अनुभवाचें व कुशलतेचें काम आहे. कॉफी काळी व पांढरी अशा दोन प्रकारची तयार करतात. पांढऱ्या काफीवरील टरफल काढून मग बीं वाळविलें जातें. काळी कॉफी तशीच वाळवितात. वाळवल्यावर दुसरें महत्त्वाचें काम म्हणजे कॉफीबियांपैकीं किडक्या, अर्धकच्च्या किंवा खोड किंवा दोष असलेल्या बिया काढून टाकून बियांच्या प्रती लावण्याचें काम होय. हें सर्व काम बायका करतात. यामुळें व्होलकार्टच्या कारखान्यांत किती तरी बायका काम करीत असतांना आम्हीं पाहिल्या. नंतर पोतीं भरून त्यांवर बीं काढल्याची व तयार केल्याची तारीख घालून व बीं मापून पोतीं बंद करतात. म्हणजे निर्गतीला माल तयार झाला. चहाप्रमाणें कॉफी तेथल्या तेथें तयार होत नाहीं. कारण कॉफी भाजल्यावर व दळल्यावर तिचा स्वाद लवकर नाहींसा होतो. पण बीं वर्षानुवर्ष तसेंच राहतें. म्हणून कॉफीच्या बियांचीं पोतींच्या पोतींच युरोपास पाठविलीं जातात. मग तेथें त्यांची सवडीप्रमाणें व मागणीप्रमाणें भाजलेली व दळलेली कॉफी तयार करतात.

हा कारखाना पाहून झाल्यावर आम्ही ज्या देवीच्या नांवावरून गांवाला नांव मिळालें आहे त्या कसब्यांतील मंगळाईच्या देवळास गेलों. वाटेनें खोलगट भागांत हिरवींहिरवींगार भाताचीं शेतें लागलीं. येथला देखावा बेळगांवाहून शहापुराकडे जातांना दिसणाऱ्या देखाव्यासारखा दिसला. हें जुनें कसबें उंचवटयावर वसलेलें आहे. गांवाचे मध्येंच मंगलाईचें देऊळ आहे. या देवळाची बांधणी अगदीं साधी एकाद्या लाकडी वाड्यासारखी आहे. देवळापुढें एक दीपमाळ व पिंपळाचा पार आहे. देवळांत विशेष पाहण्यासारखें कांहीं एक वाटलें नहीं. पण हें फार जुनें देवालय आहे असें कळलें. तेव्हां आम्हीं देवीचें दर्शन घेऊन देवीपुढें 'किंचित् व्यावहारिक द्रव्य' ठेवून बारा वाजून गेले म्हणून तडक बिऱ्हाडीं आलों.


दोन प्रहरीं आम्ही मंगलोरचें बंदर व बंदरापलीकडील वाळवंट व अफाट आरबी समुद्र पाहण्यास गेलों. बंदराकडे जाणारा रस्ता प्रशस्त असून त्याचे दोन्ही बाजूस कॅज्वेरिना वृक्षांची सुंदर रांग लावलेली आहे. मंगलोरच्या आसपासच्या मोकळ्या जागेंत या झाडांची पुष्कळ दाट लागवड केलेली जागोजाग दिसली. बंदरांत पुष्कळ लहान मोठीं गलबतें नांगरलेलीं होतीं. या किनाऱ्यावर छोटेसें नवेंच दीपगृह बांधलें आहे. नदीच्या किनाऱ्यावर मंगलोरी कौलांच्या कारखान्यांच्या चिमण्या सारख्या दिसत होत्या. यामुळें येथें कांहींसा मुंबई शहराचा भास होतो. मात्र इकडे नारळांची झाडी अतोनात आहे. बंदराच्या सर्व बाजू नारळाच्या वृक्षांनीं हिरव्या हिरव्यागार दिसतात. क्षार सरोवराचें निळें पाणी, किनाऱ्यावरील ती पांढरी वाळू व त्या हिरव्या हिरव्या गर्द राया हा तिरंगी देखावा नयनमनोहर दिसतो. आम्हीं जातांयेतांचें भाडें ठरवून एका होडींत बसलों व त्या शांत क्षार सरोवराची शोभा पहात पहात पलीकडच्या वाळंवटावर जाऊन उतरलों. मग चालतच आम्ही तें वाळवंट तुडवीत समुद्रकांठाला आलों. मऊमऊ वाळूंत चालावयाची मोठी मौज वाटते. पण अशा वेळीं जोडेबुटांचाच जास्त त्रास होतो.

कारण वाळू त्यांत शिरून पायाला बोचतें. अशा स्वच्छ गुळगुळीत वाळूंतून अनवाणी चालणें बरें असें वाटतें. सुमारें एक मैल ती वाळू तुडवून आम्ही समुद्राशीं आलों. एकसारखें पांढरट, पिवळसर, बारिक वाळूचें तें वाळवंट फार सुंदर दिसतें. मंगलोरचें हें वाळवंट ( बीच ) खूब लांबपर्यंत एकसारखें पसरलेलें आहे. नेत्रावती नदीचें मुख आमचे डावीकडे दक्षिणेच्या अंगास दिसत होतें. समुद्राला सारख्या लाटा येत होत्या! वाळूमध्यें उभें राहून आपल्या पायाखालीं लाटा आल्या म्हणजे मोठी मौज वाटते. मात्र आपल्या पायाखालची वाळू भराभर सरत जाते व मनुष्य न कळत समुद्राकडे लोटला जातोसा वाटतो; तोंच धाडकन दुसरी मोठी लाट येते व आपल्या सभोंवतीं ढोपरभर पाणी होतें. समुद्राच्या लाटांचें हें विलक्षण तांडव फार आश्चर्यकारक वाटतें. दोनचार लाटा लहान लहान येतात तर पुढची फार प्रचंड असून ती मोठी मेघगर्जना करून किनाऱ्यावर फुटते व क्षणांत वाळवंटभर पाणीच पाणी करून टाकते;पाणी ओसरल्यावर जिकडे तिकडे फेसाचे बुडबुडे पटापट नाहींसे होतात न हातात तोंच दुसरी मोठी लाट पुन्हां येऊन आपल्या पायाशीं लोटांगण घेते. आम्ही किती वेळ तरी ही लाटांची व त्यांत उभे राहून समोरच्या समुद्राची शोभा पहात होतों. याच वेळीं सूर्यनारायण समुद्रांत जणूं कांहीं बुडी मारून अस्तास गेला. मग संध्याकाळ होत चालली म्हणून आम्ही परत फिरलों व क्षार सरोवराच्या तीराला आलों व मग होडींतून बंदरावर उतरून तडक बिऱ्हाडीं परतलों.

दुसरे दिवशीं आम्ही सकाळीं सहा वाजतां निघून दोन मैलांवर असलेलें **कद्री** नांवाचें प्रेक्षणीय स्थळ– मागें उल्लेख केलेल्या तीन टेकड्यांपैकीं उत्तरेची टेकडी–पाहण्यास गेलों. टेकडीपर्यंत उंचसखल पण गर्दछाय अशी पाऊलवाटेसारखी साधारण सडक आहे; टेकडी चढावयास लागलें म्हणजे ओबडधोबड पायऱ्या लागतात; कांहीं ठिकाणीं चढ अगदीं उभाच आहे. येथें **श्रीमंजूनाथ** नांवाचें शंकराचें देऊळ व त्याचे नजीक मोठा सुंदर तलाव आहे पण तो आम्हीं मागा-

हून पहावयाचा व शेवटीं नजीकच्या धबधब्यावर स्नान करून मग परत जावयाचें असा बेत केला होता. म्हणून आम्ही टेंकडीच्या माथ्यावर असलेल्या देवळाकडे व मठाकडे गेलों. ही टेकडी तांबड्या मुरमाड मातीची असून त्यावर काजूचीं झाडें अतोनात आहेत. टेकडी बरीच उंच आहे, पण शेवटीं आम्ही देवळाशीं आलों, येथें बैराग्यांस राहाण्याकरितां ओवऱ्या व सोपे आहेत. या ठिकाणीं स्नान करण्याकरितां पुष्कळ बैरागी येतात असें कळलें. देऊळ पाहून झाल्यावर आम्हीं टेकडीच्या पठारावर आलों तों सर्व **मंगलोर** शहर आमच्या एकदम दृष्टीस पडलें. शहरांत किती तरी उंचवट्याचीं ठिकाणें असून त्यावर मोठमोठ्या इमारती दिसत होत्या. येथून कॉलेजची टेकडी तर फार बहारीची दिसत होती. मंगळोर शहर व बंदर हें दोन डोंगराच्या रांगांनीं बनलेल्या प्रचंड दरीमध्यें आहे व त्या दरीमध्यें नानाविध झाडांच्या घनदाट रांगाच रांगा लागून राहिल्या आहेत असें दिसे. मधूनमधून **कॅझॅरिना** झाडांच्या उंचउंच व दाटदाट अशा राईही दिसत होत्या. खरोखरीं या टेकडीवरून दिसणारा देखावा अद्वितीय आहे यांत शंका नाहीं. नंतर आम्हीं त्या सपाट पठारावर इकडे तिकडे जरासें फिरलों व मग खालीं उतरून देवळाशीं आलों. देऊळ मलबारांतील लाकडी वाड्याच्या पद्धतीचें व साध्या बांधणीचें होतें. येथें शेजारींच दगडी फरसबंदी तलाव व कुंडें पुष्कळच आहेत. येथला देखावा कांहींसा नसरापुरानजीकच्या श्रीमंत भोरकरांच्या हद्दीमध्यें असलेल्या **बनेश्वर** स्थानासारखा आहे. येथलीं कुंडें मात्र मोठीं व पुष्कळच आहेत. बनेश्वरप्रमाणें येथेंही गायमुखांतून सारखें पाणी पडत होतें. येथें पुष्कळ स्त्रीपुरुष स्नानें करीत होते. हें एक पवित्र तीर्थ गणल्यामुळें येथें पुष्कळ यात्रेकरू स्नानाकरितां येतात व एक दोन दिवस राहून मग परत जातात. येथें यात्रेकरूंची राहण्याची सोय आहे असें कळलें. आम्ही या तलावांत स्नान न करतां या डोंगराच्या एका बाजूस असलेल्या धबधब्याखालीं स्नान केलें. येथला देखावाही मोठा

रमणीय आहे. हा धबधबा एका मोठ्या कालव्यानें झालेला आहे. कालव्याचें पाणी आसपासच्या बागाईतीला दिलें असल्यामुळें धबधब्याचा प्रवाह फार लहान होता. तरी पण साधारण दोन अडीच इंच नळांतून पाणी पडावें इतकें धबधब्याचें पाणी बारा पंधरा फूट एकदम खालीं पडत होतें. त्या झोताखालीं उभें राहून स्नान करण्याची मोठी मजा वाटली. **शॉवर बाथ** घ्यावा त्याप्रमाणें अनुकूल संवेदना स्नान करतांना होत होत्या. या धबधब्याच्या खालीं नारळी, पोफळी, केळीं यांचीं खूब लागवड केलेली होती. टेंकडीच्या उतरत्या बाजूवर सारखीं काजूचीं झाडेंच झाडें होतीं. यामुळें येथला देखावा हिरवा हिरवागार दिसत होता व येथली हवाही गांवापेक्षां थंड वाटली. कद्री हें प्रेक्षणीय स्थळ मंगलोर शहराचा एक अपूर्व अलंकार होय असें आम्हांला वाटलें. स्नान करून त्या सुंदर स्थळाची "साधु साधु" अशा उद्गारांनीं वाहवा करीत करीत आम्ही बिऱ्हाडीं परतलों. दोन प्रहरीं आम्हीं मंगलोर शहराचें नांव ज्या कारखान्यांनीं व ज्या कौलांनीं जगजाहीर केलें आहे ते कारखाने पहाण्यास गेलों. मंगलोरास हल्लीं **मंगलोरी कौलें** करण्याचे लहान मोठे वीस पंचवीस कारखाने आहेत. ते नेत्रावती व गुरपुर या दोन्ही नद्यांच्या तीराला घातलेले आहेत. या नदीकांठच्या मातीचा विशेष गुण आहे. ही माती आणून ती कमावून मग साच्यामध्यें कौलें पाडलीं जातात. साच्यांतून तयार मातीचे पाट दाबून काढून कच्चीं कौलें बनविण्याचें काम पुरुष करतात; तर साच्यांतून निघालेल्या कौलांना कमजास्त लागलेली माती काढून तीं नीटनेटकीं करण्याचें नाजूक व थोड्या कौशल्याचें काम बायका करतात व मग तीं कच्चीं कौलें भट्टीकडे नेण्याचें काम यंत्रानें आपोआप होतें. एक भला लांबचलांब लोखंडी साखळदंड कप्प्यांवरून सारखा सरकत असतो. या साखळदंडाला तागडी-सारखे जाड तवे सारखे लोंबत असतात व त्यावर दोन दोन कौलें बायका ठेवीत असतात व मग तीं कौलें साखळीबरोबर सारखीं सरकत



नं. ५ ] मंगलोर : कौलाचा कारखाना [ पान ३०

ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत



नं. ६ ] मंगलोर : न्यायकचेऱ्यांची टेकडी [ पान १५

सरकत भट्टीशीं जातात. प्रथमच पहाणाराला या सारख्या फिरत्या साखळदंडाची व त्याला लोंबणाऱ्या तव्यांची मोठी गम्मत वाटते. भट्टी-मध्यें हजारों कौलें राहून त्यांना सारखी आच लागावी अशी तजवीज केलेली असते.

या कारखान्यांतून लाखों कौलें तयार होतात व तीं गलबतांनीं दूर-दूर प्रांताला पाठविलीं जातात. या कारखान्याच्या प्रदर्शनी खोलीमध्यें आम्हीं मातीच्या नानाविध वस्तू तयार केलेल्या पाहिल्या. हा कारखाना पाहून परत येतांना आम्हीं बासल मिशनचा औद्योगिक कारखाना पाहिला व त्यांचा प्रख्यात छापखानाही पाहिला. मंगलोर हें शहर बासल मिशनच्या उद्योगधंद्याच्या कारखान्यांचें, शिक्षणसंस्थांचें मोठें केंद्र आहे. या मिशनच्या प्रयत्नांनीं व खटपटीनें कौलें करण्याची कला, विणण्याची कला, छपाईची कला इत्यादि कलांचें ज्ञान मंगलोरच्या लोकांना झालें व हें शहर अर्वाचीन उद्योगांचें आगर बनलें. बासल मिशनची ही कामगिरी कौतुकास्पद आहे यांत शंका नाहीं. मंगलोरास कॉफी वाळविण्याचे ज्याप्रमाणें कारखाने झाले आहेत त्याप्रमाणें काजू फोडून भाजून, ते आखबंद डब्यांत भरून परदेशीं निर्गत करण्याचे पुष्कळ लहानमोठे कारखाने आहेत. आसपास पिकणारे काजूच येथें येऊन भाजले जातात असें नाहीं तर मौजेची व आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, आफ्रिकेंतून काजू या बंदरीं येतात व येथें ते भाजून तयार करून मग परदेशीं पाठविले जातात.

माझ्या मंगलोर निवासाचे शेवटल्या दिवशीं मीं सहासात मैलांची सहल करून मंगलोर शहराचा नवा विस्तार पाहिला. ही नवी वस्ती उत्तरेकडे होत आहे व बंगले मोठे सुबक बांधलेले आहेत. या रस्त्यानें दूरवर जाऊन मग आम्हीं पश्चिमेकडे जाणाऱ्या रस्त्यानें नदीच्या संगमाशीं आलों. हा नद्यांचा प्रीतिसंगम इतका उत्तम साधला आहे कीं येथें दोन नद्या एकत्र झाल्या आहेत असें वाटत नाहीं. इतक्या समोरासमोर या नद्या येऊन एकमेकीला मिळाल्या आहेत कीं, नदी एकच आहे असा

भास होतो. येथेंच **टिपु सुलताननें** एक वाटोळा बुरूज अगदीं पाण्याला लागून बांधलेला आहे. त्याला हल्लीं **सुलतानची बॅटरी** म्हणतात. शत्रूच्या येणाऱ्या गलबतावर हल्ला करतां यावा व शहराचें व बंदराचें संरक्षण करतां यावें म्हणून हा बुरूज बांधून तेथें तोफा ठेवण्यांत आल्या होत्या. हें ठिकाण प्रेक्षणीय असून त्यावरून टिपु सुलतानचें आरमारी सामर्थ्य व धोरण दिसून येतें.

आमचें मंगलोरचें प्रत्यक्ष केलेलें दृश्यदर्शन येवढेंच. मंगलोरच्या आसपास जैन धर्माचीं व जैन राजवटींतील किती तरी प्रेक्षणीय स्थळें आहेत. पण तीं पाहण्यास आम्हांस सवड कोठें होती, तेव्हां पाहिलें तेवढ्यांतच समाधान मानून घेणें आम्हाला प्राप्त होतें.

आतां मंगलोरच्या पूर्वपीठिकेकडे थोडें लक्ष देऊन हें मंगलोर पुराण आटपूं या.

मंगलोर हें फार पुरातन कालापासून बंदर व व्यापाराचें केन्द्र म्हणून प्रख्यात होतें यांत शंका नाहीं. पण एका प्रांताची राजधानी म्हणून त्याचा उल्लेख आठव्या शतकांत सांपडतो. या प्रांतांचें जुनें नांव **तुलुव** असें होतें व या भागांत जरी हल्लीं कानडी भाषेचा प्रचार जास्त असला तरी अजून सुद्धां **तुलु** भाषा लोकांच्या बोलण्यांत चालू आहे. मात्र त्या भाषेमध्यें वाङ्मय नाहीं किंवा तिची निराळी लिपी नाहीं. तेराव्या शतकांत हा प्रांत **विजयानगर** साम्राज्यांत समाविष्ट झाला व **हरिहर** राजानें सन १३२६ मध्यें वाडीयार घराण्यांतील एक अंमलदार मंगलोरास पाठविला. विजयानगर साम्राज्य नष्ट झाल्यावर इकडील प्रांतांत जैन राजे स्वतंत्र झाले. पुढें **बेडनूरच्या** नाईकांच्या ताब्यांत हा प्रांत गेला. **वास्कोडिगामानें** १५२४ मध्यें मंगलोर शहराला वेढा दिला व सन १५२६ मध्यें त्यानें मंगलोर काबीज केलें व तेथें **फॅक्टरी** बांधली. पण बेदनूरचे नाईक व पोर्तुगीज यांच्या मंगलोरच्या ताब्याबद्दल सारख्या झटापटी चालत. पण म्हैसूरच्या हैदरअलीनें बेदनूरचा पराभव

करून सन १७६२ मध्यें मंगलोर काबीज केलें व लागलीच तेथें हैदरानें आपलें आरमारी ठाणें वसविलें. सन १७६७ मध्यें इंग्रजानीं तें बंदर काबीज केलें. पण लवकरच तें त्यांना सोडावें लागलें. हैदराच्या मरणानंतर सन १७९१ मध्यें इंग्रजानीं तें पुन्हां काबीज केलें. पण टिपूनें सन सन १७९३मध्यें मंगलोरला वेढा दिला व त्याची नाकेबंदी केली. तेव्हां सन १७९४मध्यें कर्नल कॅंबेल टिपूला शरण जाऊन इंग्रजांना मंगलोर सोडावें लागलें. टिपूनें त्यावेळीं मंगलोर किल्ला जमीनदोस्त केला व बंदराच्या संरक्षणाकरितां बॅटरी बांधली. पण सन १७९९मध्यें श्रीरंगपट्टणच्या वेढ्यामध्यें टिपू मरण पावला व मंगलोर इंग्रजांना कायमचें मिळालें. तेव्हांपासून या शहराची व बंदराची सारखी वाढ होत आली आहे.

# प्रकरण २ रें

## झामोरिनच्या राजधानीचें शहर : कालिकत बंदर

मराठी शाळेंत हिंदुस्थानचा इतिहास शिकतांना कालिकतचा झामोरिन हें विलक्षण नांव वाचून नवल वाटे. पण हिंदुस्थानचा सबंध व सलग जलमार्ग शोधून कालिकत बंदराला प्रथम पोहोंचणारा पोर्तुगीज वास्कोडिगामा याच्या विलक्षण वाटणाऱ्या नांवाप्रमाणें झामोरिन हें नांव पोर्तुगीज भाषेंतील असेल अशी त्या वयांत मी आपल्या मनाची समजूत करीत असें. पुढें मलबारांतील झामोरिनचें राज्य नष्ट झाल्यामुळें व मंगलोर व कालिकत हीं बंदरें मद्रास इलाख्यांत मोडूं लागल्यामुळें झामोरिन नांवाची कोणी व्यक्ती अजून आहे हें सुद्धां स्मरणांतून नाहींसें झाल्यासारखें होतें. पण अलीकडील महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या चळवळीपासून व विशेषतः मलबारांतील गुरुवायुर देवळासंबंधीं सत्याग्रहाच्या चळवळीपासून झामोरिनचें राज्य नष्ट झालें तरी त्या घराण्याच्या वंशापैकीं झामोरिन म्हणून एक व्यक्ति हयात असून ते गुरुवायुर देवळाचे मुख्य सरपंच आहेत हें वर्तमानपत्रांवरून कळून आलें.


मी केरलाचें वर्णन व वृत्तांत लिहिण्याचा बेत केल्यापासून मलबार व केरलाची माहिती मिळवूं लागलों तेव्हां मला कळलें कीं झामोरिन हें परकीय पोर्तुगीज नांव नसून ‘ सामुद्रिन ’ ( समुद्राधिपति ) या मूळ संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे व ज्याप्रमाणें सातारचें राज्य नष्ट झालें तरी सातारचें राजघराणें अद्यापपर्यंत चालू असून सातारचे राजे म्हणून खासगी इनामदारीचें उत्पन्न उपभोगणारे पुरुष आहेत त्याप्रमाणें झामोरिनचें उत्तर केरलांतील राज्य नष्ट झालें तरी जमीनदार म्हणून झामोरिनचें घराणें चालू असून सध्यांचे वयोवृद्ध झामोरिन

कालिकतनजीक आपल्या राजवाड्यांत राहतात. तेव्हां कालिकतला गेल्यावर साधल्यास त्या वयोवृद्ध झामोरिनना भेटावयाचें व त्यांचेकडून त्यांच्या घराण्याची प्रत्यक्ष माहिती मिळवावयाची असा मीं बेत केला होता.

मंगलोर शहर व बंदर पाहून झाल्यावर मीं कालिकतला जाण्याची गोष्ट काढली. तेव्हां तेथल्या माझ्या नव्या मित्रांनीं माझ्या बेतांत मोडता घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले "मंगलोर पाहिल्यावर कालिकतला जास्त पाहण्यासारखें कांहीं एक नाहीं. तें एक सपाटीवर वसलेलें बकाली शहर आहे. तेथें व्यापारपेठ मोठी आहे खरी; पण तेथलें बंदर हें खुलें समुद्रावरील आठमाही बंदर आहे व तेथें ऐतिहासिक महत्त्वाचीं प्रेक्षणीय स्थळें मुळींच नाहींत व झामोरिन हे फारच वृद्ध गृहस्थ आहेत; तेव्हां ते भेटून त्यांच्याकडून तुम्हांला उपयोगी माहिती मिळण्याची वानवाच आहे. तरी कालिकतला जाण्याची दगदग कशाकरितां घेतां ?" मीं मनांत म्हटलें हा 'अतिपरिचयात् अवज्ञेचा' सल्ला आहे. उघडपणें मी माझ्या मित्रांना म्हटलें " मला माहिती मिळो अथवा न मिळो. कालिकतला जाण्याचा माझा बेत कायम आहे. निदान मंगलोरपासून कालिकतपर्यंतच्या शंभर सवाशें मैलांच्या भागांतील लोकवस्तीचें व गांवांचें धांवतें व ओझरतें दर्शन तरी घेण्याची मला संधि मिळेल." तेव्हां माझ्या मित्रांनीं आपल्या कालिकतच्या एका मित्राला माझी एक दिवस राहण्याची व साधल्यास झामोरिनची भेट करविण्याची व्यवस्था करावी अशाबद्दल पत्र लिहिलें व त्यांत माझी नक्की निघण्याची वेळही कळविली.

ता. २७ दिसेंबर सन १९३४ रोजीं मी दिवसां पावणेदहा वाजतां मंगलोर स्टेशनाहून कालिकत येथें जाण्यास निघालों. मंगलोर ते कालिकत अंतर १३७ मैल आहे. नाताळच्या सवलतीमुळें जातां येतांच्या तिसऱ्या वर्गाच्या तिकिटाला सुमारें साडेचार रुपये पडले. मंगलोर स्टेशन व शहर टाकलें कीं लगेच **नेत्रावती** नदीवरील भला मोठा

लोखंडी पूल लागतो. मंगलोरच्या आसपास खूब बागाईत व झाडी आहे. **कॅझॅरिना** या विलायती वृक्षांच्या दाट राई जागोजाग दृष्टीस पडत होत्या. केरळ प्रांतांतील समुद्रकांठच्या विशिष्ट झाडें नारळी, पोफळी, केळी यांच्या बागाही मधूनमधून लागत होत्या हें सांगावयास नकोच. मंगलोरच्या आसपास डोंगराळ मुलुख आहे खरा; पण **कासरगोड** नांवाच्या वीसबावीस मैलांवर असलेल्या मोठ्या तालुक्याच्या गांवाचे पुष्कळच आधींपासून अगदीं सपाट प्रदेश लागला व तेथली जमीन तांबडी नसून पांढरट काळसर रंगाची असून त्यांत अत्यंत बारिक वाळू असावी असें वाटलें. या भागांत तंबाखूची लागवड खूब दिसली. जिकडे पहावें तिकडे तीं सरळ सुतांत सारख्या सारख्या अंतरावर लावलेली मोठमोठ्या पानांचीं हिरवींहिरवींगार तंबाखूचीं पिकेंच पिकें ! हा मोठा नयन-मनोहर देखावा दिसतो खरा. कासरगोड हें गांव **चंद्रगिरी** नांवाच्या मोठ्या नदीचें कांठीं आहे. यामुळें कासरगोड हें बंदर व शहर मंगलोरची छोटेखानी सुबक आवृत्तिच आहे असें वाटतें. **कासरगोड** स्टेशन टाकलें कीं लवकरच पश्चिम दिशेला समुद्राच्या कांठाला लागून असलेली एक हिरवीगार टेकड्यांची रांग दृष्टीस पडूं लागते तोंच **नीलेश्वर** नांवाचें स्टेशन येतें. येथेंही एक नदी आहेच. हें स्टेशन टाकलें कीं लागलींच टेकड्यांची रांग व त्यामधील सर्वांत उंच शिखर **मौंट देली** ( देली शिखर ) स्पष्टपणें दिसूं लागलें. हें टोंक जवळ जवळ हजार फूट उंच आहे. आरबी समुद्राकडून येणाऱ्या दूर देशाच्या गलबतांना फार पुरातन कालापासून हें डोंगराचें टोक अर्वाचीन दीपगृह-स्तंभाप्रमाणें मलबार प्रांताचा किनारा दुरून बिनचूक दाखवीत आलें आहे. वास्को–डि–गामा केप ऑफ गुडहोप ओलांडून आफ्रिकेचा किनारा सोडून हिंदुस्थानच्या दिशेनें आपलीं गलबतें हाकारीत आला त्याच्या दृष्टीस हेंच देलीटोंक प्रथम पडलें व मग तो कालिकत बंदरास येऊन पोहोंचला. या देलीटोंकाशीं एक नदी येऊन मिळाली आहे. अर्वाचीन



नं. ७ ] मंगलोर : रोझेरिओ प्रार्थनामंदिर [ पान १६

स्थळ प्रत
क्र.
ता.



नं. ८ ] केरलाचा किनारा [ पान २७



नं. ८ अ ] अर्नाक्युलम् : सार्वजनिक कचेऱ्या [ पान ४९

राजकीय विभागाप्रमाणें येथें मद्रास इलाख्यांतील दक्षिण कानडा जिल्हा संपतो व मलबार जिल्ह्याची हद्द सुरू होते. हा जिल्हा दक्षिणेकडे कोचीन संस्थानच्या हद्दीला भिडला आहे.

मौंट देल्लीची टेंकड्यांची रांग टाकून पुढें आलें म्हणजे पुन्हां केरळाचे विशिष्ट वृक्ष— नारळी, पोफळी, केळी, काजू वगैरे—सारखे दिसूं लागतात व नद्या व क्षार सरोवरें सारखीं लागत राहतात; त्यावरून या प्रांतांत पाण्याची विपुलता असून स्वस्त व सुलभ निसर्गकृत जलमार्ग कसे सारखे प्रांतभर पसरलेले आहेत हें दिसून येतें. या भागांत वस्तीही खूप दाट असावी हें ताबडतोब ध्यानांत येतें. कारण स्टेशनें व गांवें लवकर लवकर लागतात. मात्र मी ज्या आगगाडीनें गेलों ती जलद जाणारी मद्रास एक्स्प्रेस असल्यामुळें गाडी सर्व स्टेशनांवर उभी रहात नव्हती. केरळाच्या या भागांतून प्रवास करतांना मला लंकेच्या पश्चिम किनाऱ्याच्या माझ्या प्रवासाची सारखी आठवण होत होती. लंकेच्या पश्चिम किनाऱ्याच्या भागामध्यें व केरळ प्रांताच्या या किनाऱ्याच्या भागामध्यें विलक्षण साम्य आहे. हवा पाणी, जमीन व सृष्टिरचना, लोकवस्ती व शेती बागायती या सर्व बाबतींत हे दोन्ही भाग अगदीं सारखे आहेत असें दोन्ही प्रांतांचा प्रवास केलेल्या माणसाला वाटल्याखेरीज रहात नाहीं. यामुळें नवी नवलाई व पूर्वपरिचय असा परस्परविरोधी पण मिश्र अनुभव मला आला. हा प्रवास फार आश्चर्यचकित करणारा पण अत्यानंद देणारा वाटला व वेळ कसा जात होता हें कळलें सुद्धां नाहीं. पुढें तर इतिहासप्रसिद्ध व म्हणून लहानपणापासून श्रुतिपरिचित अशीं ठिकाणें **कॅननोर** बंदर, इंग्रजांच्या वखारीचें ठिकाण **तेलीचरी**, फ्रेंचांच्या वखारीचें व अजूनही फ्रेंच सरकारच्या ताब्यांत असलेलें **माहे** हीं चलच्चित्रपटाप्रमाणें भराभर दृष्टिपथांतून जात होतीं. पूर्वकाळीं हीं बंदरें व ठिकाणें आपल्या ताब्यांत आणण्यासंबंधीं युरोपीय राष्ट्रांच्या व्यापारी कंपन्यांमध्यें मोठी चढाओढ असे; याचें कारण मसाल्याच्या मालाच्या व

विशेषत: मिऱ्यांच्या पैदाशीचीं हीं ठिकाणें केरल प्रांतांतील केन्द्रें होतीं. शिवाय जलपूर्ण नदीनाल्यांच्या व क्षार सरोवरांच्या व कालव्यांच्या विपुलतेमुळें केरल प्रांतांतील मलय पर्वताच्या लगतच्या भागांतील मसाल्याचा माल जलमार्गानें आणण्याला हीं ठिकाणें विशेष सोयीचीं होतीं. अजूनसुद्धां या भागांत मिरीं किती अतोनात पिकतात याचें निदर्शन या भागांतील प्रत्येक नारळी-पोफळीचें झाड करीत होतें. कारण आपल्या कोकण प्रांतांत सुपारीच्या झाडावर पानवेली चढवितात त्याप्रमाणें येथल्या प्रत्येक झाडावर मिऱ्यांच्या वेली चढविलेल्या दिसत होत्या. तीं हारीनें लावलेलीं व सरळसोट वाढणारीं व माथ्यावरच पानें फळें येणारीं नारळी-पोफळीचीं झाडें व त्यांना वेष्टणाऱ्या मिऱ्यांच्या काळसर हिरवट दाट पानाच्या वेलीच वेली ! हा देखावा विलक्षण आकर्षक व आल्हाददायक वाटला. या प्रत्येक ठिकाणीं एक एक नदी आलेली असून हीं तीन्हीहि ठिकाणें पूर्वकाळापासून उत्तम व सुराक्षित बंदरें म्हणून प्रख्यात आहेत. हीं इतिहासप्रसिद्ध ठिकाणें टाकतों तोंच अपरिचित पण मोठें असें बॅडागारा नांवाचें स्टेशन व गांव लागलें. तेथून आगगाडी निघाली ती थेट कालिकत स्टेशनला आली. सुमारें साडेतीन वाजतां व मंगलोराहून निघाल्यापासून अजमासें पांच तासांनीं मी कालिकतला पोहोंचलों. सर्व वाटभर सृष्टिसुंदरीचीं नानाविध रूपें पहात इतका वेळ केव्हां गेला हें कळलें नाहीं.

स्टेशनवर उतरल्यावर ज्या गृहस्थाना पत्र लिहिलें होतें त्यांची किंवा त्यांचेकडून आलेल्या माणसाची थोडा वेळ वाट पाहून मी स्टेशनबाहेर आलों व झटका करून त्या गृहस्थाचे बिऱ्हाडीं येण्यास निघालों. झटकेवाल्यानें प्रथम दुसऱ्याच गृहस्थाकडे नेलें. पण तेथें त्या गृहस्थांच्या मोठ्या दुकानचा पत्ता कळला व ते गृहस्थ दुकानांत भेटतील असें कळल्यावरून प्रथम त्यांचे दुकानींच गेलों. ते गृहस्थ माझी वाटच पहात होते. ते म्हणाले " तुम्हांला येथें राहण्यास फार वेळ नाहीं हें पत्रावरून कळल्यामुळें मी

झामोरिनना आधींच पत्र लिहून चार साडेचारच्या दरम्यान भेटीची वेळ मुक्रर केली आहे. तेव्हां ताबडतोब निघाच." मी बरें म्हणतांच त्यांनीं जातांयेतांचें भाडें ठरवून एक झटका आणविला व आपल्या इंग्रजी शाळेंत शिकत असलेल्या मुलाला बरोबर दिलें. तेव्हां मी ताबडतोब झामोरिनला भेटण्यास निघालों. आमचा झटका थेट बाजारपेठेंतून दक्षिण दिशेनें जांत होता. बऱ्याच वेळ वाटेनें सारखीं दुतर्फा दुकानेंच लागत होतीं. सर्व दुकानें आपल्या इकडल्या शहरांतील दुकानासारखीं बैठी एक मजली क्वचित् दुमजली दिसलीं. बाजारपेठ संपल्यावर बागा व बंगले लागूं लागले व रस्त्याच्या मैलावरील नांवावरून हा थेट मद्रासला जाणारा रस्ता आहे असें कळून किंचित् आश्चर्य वाटलें. मुंबईहून मोटारीनें पेण-पुण्याकडे येतांना ठाण्याचे गांवानजिक 'आग्रा-रोड' अशी पाटी आपण नेहेमीं वाचतों व हा बॉंबे आग्रा रोड आहे असें आपण समजतों त्याप्रमाणें ज्या रस्त्यानें मी चाललों होतों तो कालिकत-मद्रास रस्ता असून तो चारशें मैलांचे वरच लांबीचा आहे असें मला समजून आलें. कालिकत गांव अगदीं सपाटीवर असल्यामुळें रस्ता अगदीं सरळ सपाट होता. रुंद व तांबडा लाल व दोन्हीं बाजूंस गर्द छाया व हिरव्यागार वृक्षराजींनीं मंडित असा तो रस्ता मोठा चित्ताकर्षक होता यांत शंका नाहीं. गांव टाकल्यावर लागलीच **कलायी** नांवाची नदी व खाडी व तीवरील लोखंडी पूल लागला. उजव्या बाजूस रेलवेचें स्टेशन व त्याचें मोठें आवार लागलें व त्यांत मोठमोठ्या लांकडाचे ढीगचे ढीग दृष्टीस पडले. बिऱ्हाडीं परत आल्यावर साऊथ इंडियन रेलवेचें मार्गदर्शक पुस्तक पाहतां कळलें कीं, तीं लांकडें **निलांबर** नांवाच्या मलबारांतील प्रख्यात जंगलांतील असून लांकडें बिनखर्चानें बंदरापर्यंत आणण्याकरितां व एकंदर मालाची ने आण करण्याकरितां **कलयी** नदी व **एलातुर** नदी ह्या कालव्यानें जोडल्या असून त्यायोगें बेपूरपासून बॅडागरापर्यंत म्हणजे कालिकतच्या दक्षिणेस व उत्तरेस असलेल्या दोन बंदरांपर्यंत सारखा सलग व सुलभ जलमार्ग करण्यांत आला आहे. हा कालवा सन

१८४८ मध्यें तयार करण्यांत आला व सन १८५५ मध्यें मोपल्यांनीं ठार मारलेल्या कोलोनी नांवाच्या मलबारच्या कलेक्टरचें नांव त्या कालव्याला देण्यांत आलें. पूल टाकल्यावर दोन्ही बाजूंस बागाच बागा लागल्या. आणखी मैल दीडमैल गेल्यावर आमचा झटका एका साध्या लोखंडी फाटकाजवळ थांबला. आंत बरेंच मोठें खुलें आवार होतें. पुढें एक देवडी-सारखा अगदीं लहान सोपा होता. तेथें एक शिपाई उभा होता. माझ्या-बरोबर आलेल्या मुलानें त्या शिपायास मल्याळी भाषेंत माझ्याबद्दल सांगितलें असेल तेव्हां त्यानें आम्हांला आंत जाऊं दिलें. आंत तरी काय! मोठा राजवाडा वगैरे कांहीं एक दृष्टीस पडलें नाहीं! एक लांबलचक बराकी सारखी दुमजली इमारत दिसली. तिला पुढें खुला व्हरांडा होता व इमारतीच्यामध्यें एक साधें मंगलोरी कवलाचें पोर्च होतें! झामोरिनसारख्या राजघराण्यांतील पुरुषाचें राहण्याचें ठिकाण कांहीं तरी राजवाड्यासारखें भव्य व पुरातन असेल अशी माझी कल्पना. पण येथें पाहतों तों सर्वच प्रकार निराळा! हें पाहून मला विलक्षण आश्चर्य वाटलें व मंगलोरास माझ्या मित्रानें काढलेले 'कालिकत या बकाली शहरांत पहाण्यासारखें व इतिहासप्रसिद्ध असें कांहींएक नाहीं' हे उद्गार माझ्या कानांत गुणगुणूं लागले. मी आपल्या नांवाची चिठ्ठी पोर्चजवळ असलेल्या एका गोऱ्यापान तरुण गृहस्थांना दिली व इंग्रजींत त्यांना माझ्या येण्याचा उद्देश कळविला. ते झामो-रिनचे सेक्रेटरी होते. ते म्हणाले 'आपल्याबद्दल आम्हांला चिठ्ठी आलीच होती. पण झामोरिन साहेब फार वृद्ध असून, ते आजारीच असल्या-मुळें त्यांना फार बोलवत नाहीं. तरी पण ते आपल्याला भेट देतील." नंतर ते गृहस्थ वर माडीवर गेले व थोड्या वेळांत परत येऊन त्यांनीं मला वर जाण्यास सांगितलें. जिना चढून मी एका प्रशस्त पण अगदीं साध्या अशा दिवाणखान्यांत गेलों तों एक श्यामवर्ण रंगाचे बरेच वयातीत असे विजार कोट घातलेले गृहस्थ एका खुर्चीवर बसले होते. त्यांचे जवळ जाऊन मी त्यांना नमस्कार करून शेजारच्या खुर्चीवर बसलों. गृहस्थ

खरोखरींच फार थकलेले दिसले. त्यांना इंग्रजी येत असल्यामुळें संभाषणाची अडचण नव्हती. त्यानीं माझें स्वागत केलें व मलबारबद्दल मीं पुस्तक लिहीत असल्याबद्दल आनंद व आभार प्रदर्शित केले; पण पुढें ते म्हणाले, "आमच्या घराण्याचे सर्व कागदपत्र जळाल्यामुळें आमचे जवळ जुने कागदपत्र कांहीं एक नाहींत. पण आमच्या घराण्याची व मलबारची बरीच माहिती झामोरिन कॉलेजांतील इतिहासाचे प्रोफेसर आपल्याला देतील." इतकें ते गृहस्थ बोलले तेवढ्यानें ते थकल्यासारखे दिसले. भेट दिल्याबद्दल झामोरिन साहेबांचे आभार मानून मी खालीं आलों व मग सेक्रेटरी साहेबांचा निरोप घेऊन आल्या वाटेनें आम्ही परत गांवांत आलों व तसेंच प्रो. आयर (झामोरिन कॉलेजांतील इतिहासाचे प्रोफेसर) यांचे बिऱ्हाडीं गेलों. प्रोफेसरसाहेबांकडे नांवाची चिठी पाठविली व आम्ही व्हरांड्यांत वाट पहात उभे राहिलों. कांहीं वेळानें एक तरुण मुलगा एक कागदाचें चिटोरें घेऊन आला. त्यांत प्रोफेसरसाहेबांनीं लिहिलें होतें कीं "मी सात दिवसांचें धार्मिक व्रत करीत असून त्या दिवसामध्यें मी कोणाशींही बोलत नाहीं; तरी सात दिवसांनंतर भेटावें किंवा विशेषच जरूरीचें कांहीं विचारावयाचें असल्यास लिहून कळवावें म्हणजे मी लिहून उत्तर देईन." अर्थात् मला दोन्ही विकल्प शक्य नसल्यामुळें मी परत दुकानांत आलों. मात्र इंग्लिश शिकणाऱ्या कॉलेजांतील प्रोफेसराच्या देवभक्तपणाबद्दल मला राहून राहून आश्चर्य वाटत होतें. मला वाटलें हे प्रोफेसर सवाई नव्हे सातपट गांधी दिसतात. कारण गांधी एकच दिवस बोलत नाहींत तर हे गृहस्थ सात दिवस बोलत नाहींत !

झालें. याप्रमाणें कालिकतमध्यें पाऊल टाकल्यापासून दोन अडीच तासांत मनांत योजना केलेलें अर्धें अधिक काम सफळ झालें—नव्हे संपलें. कारण येथें इतिहासप्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळें नाहींतच असें कळलें व झामोरिनची भेट झाली पण त्यांचेकडून घराण्याची माहिती मिळाली नाहीं व ती देण्यासारख्या माणसाचें तोंड बंद ! तेव्हां

कालिकतचें बंदर तेवढें पहावयाचें राहिलें. तें बाजार पेठेपासून फार दूर नसल्यामुळें जो मोठा मुलगा माझ्याबरोबर झामोरिनकडे आला होता त्यालाच मार्गदर्शक म्हणून बरोबर घेऊन मी बाजारांतून बंदराकडे जाण्यास निघालों. मागें सांगितल्याप्रमाणें येथली बाजार पेठ बरीच मोठी आहे व येथें मुंबईच्याप्रमाणें नानाधर्मांचे, नानाजातींचे व नानादेशचे व्यापारी आहेत. राजापुरी कोकणांतील गोरे नांवाच्या कोकणस्थ गृहस्थाचें मोठें दुकान कालिकत येथें आहे असें मला माहीत असल्यामुळें व मुलांपाशीं चवकशी करतां तें बाजारपेठेंत वाटेवरच आहे असें कळल्यामुळें क्षणभर त्यांच्या दुकानांत मी शिरलों. परदेशीं आपली भाषा बोलणारा भेटला म्हणजे एक प्रकारचा विशेष आनंद वाटतो त्याप्रमाणें गोऱ्यांशीं मराठींत संभाषण करतांना मला आनंद झाला. नंतर आम्ही थेट कालिकतच्या बंदराला गेलों. कालिकत बंदर हें मार्मगोवा किंवा कोलंबो येथील बंदराप्रमाणें खुल्या समुद्रावरील बंदर आहे. बंदरामध्यें पुष्कळ लहान मोठीं गलबतें नांगरलेलीं दिसत होतीं. कालिकत बंदराचा तो सायंकाळचा देखावा मोठा मनोहर होता खरा. मालाची गलबतांतून नेआण करणाऱ्या याऱ्यांनीं युक्त असे समुद्रांत घुसलेले दोन लोखंडी धक्के परस्परांपासून बऱ्याच दूर अंतरावर आहेत. एक सरकारी धक्का आहे तर दुसरा अलीकडेच कालिकतच्या व्यापाऱ्यांनीं संघशक्तीनें बांधला आहे असें कळलें. आम्हीं जरा दूर असलेला सरकारी धक्का पहावयास बंदरकांठच्या कॅझॅरिना वृक्षराजीनीं मंडित अशा सुंदर पांढऱ्या शुभ्र रस्त्यानें गेलों व धक्क्याशीं जाऊन तेथें क्षणभर सभोंवारची शोभा पहात उभें राहिलों. समुद्रांत घुसलेले व एकमेकांपासून बरेच दूर पण समांतर असलेले ते लांबचलांब लोखंडी धक्के, मधल्या सबंद अंतरभर असलेलें तें पांढऱ्या शुभ्र मऊ व बारीक वाळूचें वाळवंट, तो वृक्षराजिमंडित सरळ रस्ता, बंदरामधील तीं शेंकडों गलबतें, रस्त्याच्या पलीकडे सारख्या लागलेल्या त्या लहानमोठ्या इमारती व वखारी, पश्चिम दिशेस तो अफाट समुद्र

व मावळलेल्या सूर्यबिंबानें सर्व आकाशभर पसरलेला तो तांबडालाल प्रकाश हा सर्व कालिकत बंदराचा देखावा मला फारच चित्ताकर्षक वाटला व मीं मनांत म्हटलें " कालिकत येथें इतिहासप्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळें नसलीं तरी– तशीं तीं नाहींत खरीं– कालिकतचा हा निसर्गरमणीय देखावा मला पहावयास सांपडला येवढ्यानें माझ्या येथें जाण्यायेण्याचें सार्थक झालें. " अगदीं काळोख पडल्यावर आम्ही परत फिरलों व आमच्या मित्राच्या दुकानीं आलों. ते दुकान बंद करण्याच्या तयारींत होते. ते म्हणाले "माझें स्वतःचेंच एक बोलक्या चित्रपटाचें गृह आहे. तेथें एक पौराणिक बोलपट चालू आहे. जरी आपल्याला आमची भाषा समजत नसली तरी चित्रपट पाहण्यास चला " अशा तऱ्हेनें दिलेल्या आमंत्रणाला नकार देणें अशक्य होतें. म्हणून मी मालकाबरोबर दुकानचे मागच्या बाजूस असलेल्या सिनेमाला गेलों. अर्थात् सोंगें व सिनरी पाहणें तेवढेंच मला शक्य होतें. कारण संभाषणांतील एक अक्षरही मला समजलें नाहीं. मात्र कथा महाभारतांतील कथाभागावर असून त्यांत कृष्ण व अर्जुन हीं पात्रें आहेत हें मला ताबडतोब कळलें. विशेषतः कृष्णाच्या बोलण्यांत रेकत काढलेला 'अर्जुना' हा संबोधनवाचक शब्द वारंवार येई तेवढा मला चांगला कळे. साडेनऊ वाजतां तो खेळ संपला. सर्व लोक बाहेर पडले नाहींत तोंच शेवटल्या दहा वाजतांच्या खेळाची गर्दी बोलपट गृहांत जमूं लागली. तेव्हां मालकाबरोबर मी त्यांचें घरीं गेलों. कालिकतमध्यें पाय ठेवल्यापासून सुरू झालेलें माझे कालिकत दृश्यदर्शन याप्रमाणें रात्रीं दहा वाजतां संपलें व दुसरे दिवशीं सकाळींच वाटेंत कन्ननोर बंदर पाहून मंगलोरास परत जाण्यास निघालों. त्याचें वर्णनास पुढील प्रकरणांत लागण्यापूर्वी झामोरिनच्या राजघराण्याची संक्षिप्त हकीकत याच प्रकरणांत देणें योग्य होईल. कारण दक्षिण केरल प्रांतांत ज्याप्रमाणें कोचीन व त्रावणकोर हीं संस्थानें आजतागाईत हयात असून त्यांची स्वतंत्र राज्यव्यवस्था चालू आहे तशी उत्तर केरलाची व झामोरिन घराण्याची स्थिति नाहीं. झामोरिनचें संस्थान ब्रिटिश मुलखांत सामील झालें आहे व झामोरिनचें

घराणें म्हणजे आतां एका खासगी जमीनदाराचें घराणें झालें आहे. तें कां व कसें झालें हें थोडक्यांत येथें निवेदन करणें रास्त आहे.

**झामोरिन** हें विलक्षण नांव मागें सांगितल्याप्रमाणें सामुद्रिन् या संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे. इसवी सनाचे नवव्या शतकाच्या सुमारास सर्व केरल प्रांतांवर ताबा चालविणारा **चेरामन पेरुमल** मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन मक्केस गेला. तेव्हां त्यानें झामोरिन घराण्याच्या मूळ पुरुषास-तो पेरुमलचा शूद्र स्त्रीपासून झालेला मुलगा असो किंवा दुसऱ्या हकीकती-प्रमाणें केवळ आश्रित असो —आपली ढाल तरवार दिली व तरवारीचे जोरावर राज्य कमावण्यास फर्माविलें. तद्नुरूप त्यानें कालिकत येथें आपली राजधानी केली व आसपासचा मुलूख आपल्या ताब्यांत आणला. झामोरिनची महत्त्वाकांक्षा सर्व केरलप्रांतावर वर्चस्व मिळविण्याची होती; तर कोचीनचा मूळ पुरुष–जो **चेरामन पेरूमलच्या** बहिणीचा मुलगा असून क्षत्रिय होता व केरलाच्या रूढीप्रमाणें जो पेरूमलचा कायदे-शीर वारस होता—याचीही तीच महत्त्वाकांक्षा होती. यामुळें कोचीनचा राजा व कालिकतचा राजा यांच्यामध्यें नेहमीं कटकटी चालत. पण पंधराव्या शतकांत झामोरिन अधिक सामर्थ्यवान् होता. वास्को डि गामा हिंदुस्थानास येण्यास निघाला तेव्हां तो प्रथम कालिकत बंदरास आला व तेथल्या झामोरिनकडून व्यापारी सवलती मिळण्याची आशा दिसली नाहीं म्हणून तो कोचीनच्या राजाकडे गेला व तेथें त्याचें लागलेंच बस्तान बसलें. कारण या नव्या व्यापारी व धाडसी लोकांच्या मदतीनें आपल्याला मलबारांत वर्चस्व मिळेल अशी कोचीनच्या राजास वेडी आशा वाटली. पण ती व्यर्थ गेली व कोचीन मात्र परावलंबी बनलें. कालिकतचा झामो-रिन हा पोर्तुगीज व डच लोकांच्या कारकीर्दीमध्यें मोठा सामर्थ्यवान् राजा होता. पण म्हैसूरचे हैदर व टिपू या दोघांचा डोळा झामोरिनच्या राज्यावर होता. म्हणून प्रथम हैदरनें सन १७६२ मध्यें उत्तर मलबार प्रांतावर स्वारी केली व झमोरिनला त्राही त्राही करून सोडलें. पुढें टिपूनें सर्व उत्तर मलबार प्रांत काबीज करून तो कालिकत शहराला वेढा देऊन

बसला. कालिकत शहर टिपूच्या ताब्यांत जाणार असा रंग दिसतांच राजवाड्यांत कोंडला गेलेला झामोरिन यानें आपण जीवंत सांपडल्यास टिपू आपल्यास मुसलमान करील या भीतीनें राजवाड्याला आग लावून त्यांत आपली प्राणाहुति दिली ! अर्थात् ही गोष्ट टिपूला इष्ट अशीच झाली व त्यानें उत्तर मलबार प्रांत आपल्या राज्यांत सामील करून टाकला ! पण या गोष्टीला सातआठ वर्षें लोटलीं नाहींत तोंच सन १७९९ मध्यें इंग्रजांनीं टिपूच्या श्रीरंगपट्टणाला वेढा दिला. टिपू लढाईंत मारला गेल्यामुळें टिपूचें सर्व राज्य इंग्रजांनीं खालसा केलें. पण इंग्रजांना कोठून सुबुद्धि झाली म्हणा; पण त्यांनीं म्हैसूरचें मूळचें राज्य हिंदु राजाला परत दिलें खरें. पण टिपूनें आपल्या राज्यांत सामील केलेलें झामोरिनचें राज्य मात्र झामोरिन घराण्यांतील पुरुषाला परत केलें नाहीं ! म्हणून हुतात्मा झामोरिनच्या दूरच्या नातेवाईकाचें घराणें खासगीं घराणें बनलें व त्याची थोडीशी खासगी स्थावर मिळकत जहागिरीसारखी सध्यां या घराण्यांतील पुरुषांकडे चालू आहे. तेव्हां झामोरिनच्या संस्थानचा व राजघराण्याचा हैदर-टिपूच्या उत्तर मलबारवरील स्वाऱ्यांमुळें व त्या वेळच्या झामोरिनच्या आततायी वर्तनामुळें नायनाट झाला. या प्रख्यात राजघराण्याची अशी मोठी दुर्दैवी कहाणी आहे. यामुळें हल्लींच्या झामोरिन घराण्यापाशीं जुने कागदपत्र नाहींत किंवा कालिकतमध्यें इतिहास-प्रसिद्ध राजवाडे किंवा दुसरीं प्रेक्षणीय स्थळें नाहींत. झालें येथेंच माझें कालिकत आख्यान संपलें.

घराणें म्हणजे आतां एका खासगी जमीनदाराचें घराणें झालें आहे. तें कां व कसें झालें हें थोडक्यांत येथें निवेदन करणें रास्त आहे.

**झामोरिन** हें विलक्षण नांव मागें सांगितल्याप्रमाणें सामुद्रिन् या संस्कृत नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे. इसवी सनाचे नवव्या शतकाच्या सुमारास सर्व केरल प्रांतांवर ताबा चालविणारा **चेरामन पेरुमल** मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन मक्केस गेला. तेव्हां त्यानें झामोरिन घराण्याच्या मूळ पुरुषास-तो पेरुमलचा शूद्र स्त्रीपासून झालेला मुलगा असो किंवा दुसऱ्या हकीकती-प्रमाणें केवळ आश्रित असो —आपली ढाल तरवार दिली व तरवारीचे जोरावर राज्य कमावण्यास फर्माविलें. तदनुरूप त्यानें कालिकत येथें आपली राजधानी केली व आसपासचा मुलूख आपल्या ताब्यांत आणला. झामोरिनची महत्त्वाकांक्षा सर्व केरलप्रांतावर वर्चस्व मिळविण्याची होती; तर कोचीनचा मूळ पुरुष–जो **चेरामन पेरूमलच्या** बहिणीचा मुलगा असून क्षत्रिय होता व केरलाच्या रूढीप्रमाणें जो पेरूमलचा कायदे-शीर वारस होता–याचीही तीच महत्त्वाकांक्षा होती. यामुळें कोचीनचा राजा व कालिकतचा राजा यांच्यामध्यें नेहमीं कटकटी चालत. पण पंधराव्या शतकांत झामोरिन अधिक सामर्थ्यवान् होता. वास्को डि गामा हिंदुस्थानास येण्यास निघाला तेव्हां तो प्रथम कालिकत बंदरास आला व तेथल्या झामोरिनकडून व्यापारी सवलती मिळण्याची आशा दिसली नाहीं म्हणून तो कोचीनच्या राजाकडे गेला व तेथें त्याचें लागलेंच बस्तान बसलें. कारण या नव्या व्यापारी व धाडसी लोकांच्या मदतीनें आपल्याला मलबारांत वर्चस्व मिळेल अशी कोचीनच्या राजास वेडी आशा वाटली. पण ती व्यर्थ गेली व कोचीन मात्र परावलंबी बनलें. कालिकतचा झामो-रिन हा पोर्तुगीज व डच लोकांच्या कारकीर्दीमध्यें मोठा सामर्थ्यवान् राजा होता. पण म्हैसूरचे हैदर व टिपू या दोघांचा डोळा झामोरिनच्या राज्यावर होता. म्हणून प्रथम हैदरनें सन १७६२ मध्यें उत्तर मलबार प्रांतावर स्वारी केली व झमोरिनला त्राही त्राही करून सोडलें. पुढें टिपूनें सर्व उत्तर मलबार प्रांत काबीज करून तो कालिकत शहराला वेढा देऊन

बसला. कालिकत शहर टिपूच्या ताब्यांत जाणार असा रंग दिसतांच राजवाड्यांत कोंडला गेलेला झामोरिन यानें आपण जीवंत सांपडल्यास टिपू आपल्यास मुसलमान करील या भीतीनें राजवाड्याला आग लावून त्यांत आपली प्राणाहुति दिली ! अर्थात् ही गोष्ट टिपूला इष्ट अशीच झाली व त्यानें उत्तर मलबार प्रांत आपल्या राज्यांत सामील करून टाकला ! पण या गोष्टीला सातआठ वर्षें लोटलीं नाहींत तोंच सन १७९९ मध्यें इंग्रजांनीं टिपूच्या श्रीरंगपट्टणाला वेढा दिला. टिपू लढाईंत मारला गेल्यामुळें टिपूचें सर्व राज्य इंग्रजांनीं खालसा केलें. पण इंग्रजांना कोठून सुबुद्धि झाली म्हणा; पण त्यांनीं म्हैसूरचें मूळचें राज्य हिंदु राजाला परत दिलें खरें. पण टिपूनें आपल्या राज्यांत सामील केलेलें झामोरिनचें राज्य मात्र झामोरिन घराण्यांतील पुरुषाला परत केलें नाहीं ! म्हणून हुतात्मा झामोरिनच्या दूरच्या नातेवाईकाचें घराणें खासगी घराणें बनलें व त्याची थोडीशी खासगी स्थावर मिळकत जहागिरीसारखी सध्यां या घराण्यांतील पुरुषांकडे चालू आहे. तेव्हां झामोरिनच्या संस्थानचा व राजघराण्याचा हैदर-टिपूच्या उत्तर मलबारवरील स्वाऱ्यांमुळें व त्या वेळच्या झामोरिनच्या आततायी वर्तनामुळें नायनाट झाला. या प्रख्यात राजघराण्याची अशी मोठी दुर्दैवी कहाणी आहे. यामुळें हल्लींच्या झामोरिन घराण्यापाशीं जुने कागदपत्र नाहींत किंवा कालिकतमध्यें इतिहास-प्रसिद्ध राजवाडे किंवा दुसरीं प्रेक्षणीय स्थळें नाहींत. झालें येथेंच माझें कालिकत आख्यान संपलें.

# प्रकरण ३ रें

## कॅनॅनूर बंदर व तेलीचेरी व माहे यांचें ओझरतें दर्शन

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मी दुसरे दिवशीं सकाळीं कालिकतहून सात वाजतांच्या पार्सल गाडीनें निघालों. ही गाडी सर्व स्टेशनें घेणारी व सावकाश चालणारी होती. पण माझ्या धावत्या किंवा ओझरत्या दर्शनाला ती इष्टापत्तिच होती. कालिकत स्टेशन टाक-ल्यावर लवकरच **वेस्टहिल** म्हणून एक छोटें पण सुबक स्टेशन लागलें. हें कालिकत शहराचें लष्कराच्या छावणीचें ठिकाण असून येथें एक ब्रिटिश पलटणीची तुकडी बहुधां असते. त्यामुळें या स्टेशनवर टापटीप व स्वच्छता जास्त दिसून आली. यानंतर आणखी चार स्टेशनें थोडथोड्या अंतरावर आहेत असें दिसून आलें. प्रत्येक स्टेशनवर माणसांची जा ये सारखी चालू होती. यावरून या प्रांताच्या दाट वस्तीची चांगली कल्पना आली. बरोबर सव्वा तासानें जातांना पाहिलेलें **बॅडागारा** हें मोठें स्टेशन आलें. येथें गाडी दहा मिनिटें थांबली. सव्वा तासांत आमचा प्रवास अवघा २९ मैल झाला. येथून फ्रेंच सरकारच्या ताब्यांत असलेलें **माहे** गांव ८ मैल दूर होतें. हें गांव **माहे** नांवाच्या नदीच्या कांठावर असून त्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग आहेत. मार्गदर्शक पस्तक पाहतां कळून आलें कीं, हें मिऱ्याच्या पैदाशीचें केंद्र असल्यामुळें फ्रेंच कंपनीनें सन १७२२ मध्यें त्याची मालकी मिळविली. या छोट्या वसाहतीची इंग्रज व फ्रेंच कंपन्यां-कडे पुष्कळ वेळां अदलाबदल झाली. कारण ही छोटीशी वसाहत फ्रेंचांना आपल्या सदोदित ताब्यांत ठेवणें दुरापास्त होतें. पण सन १७९३ पासून तें कायमचें फ्रेंच सरकारचे ताब्यांत गेलें. हें ठिकाण पांदेचरीच्या फ्रेंच गव्हर्नराचे अंमलाखालीं असून तेथें एक ॲडमिनिस्ट्रेटर नेमलेला आहे.

माहे या ठिकाणाचा दुरून देखावा मोठा मनोहर आहे. तो तांबडा लाल भूमिभाग, त्यावरील हिरव्यागार बागा व बागांतील झाडांवर लावलेल्या मिऱ्यांच्या वेली; तीं तांबड्या लाल विटांचीं लहान मोठीं घरें व बंगले ! हा देखावा चित्ताकर्षक आहे यांत शंका नाहीं. येथें उतरून शहरांतून फेरफटका करून यावें असें मनांत आलें. पण ठरलेल्या कार्यक्रमामध्यें असें करण्यास वेळ कोठें होता ? म्हणून जें काय दुरून दृश्य दिसलें तेवढ्यावरच मनाची समजूत करणें भाग पडलें. माहे पासून तेलीचरी ( इंग्रज वसाहतीचें व वखारीचें एक ठिकाण ) पांच मैल दूर आहे. व त्या स्टेशनला गाडी लवकरच आली. येथेंही एक नदी असून पूर्व काळापासून हें बंदर मिऱ्यांच्या व्यापाराकरितां प्रख्यात होतें. हल्लीं हें मलबार जिल्ह्यांतील एक मोठें भरभराटीचें शहर आहे. त्याची लोकवस्ती सुमारें २८००० असून ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन व एशिआटिक स्टीम नॅव्हिगेशन या दोन्ही कंपन्याच्या बोटी या बंदराला नियमितपणें लागतात. हें ठिकाण ईस्ट इंडिया कंपनीला सन १६८३ मध्यें मिळालें व तेव्हांपासून या ठिकाणावर व आसपासच्या भागावर ब्रिटिश अंमल सारखा चालू आहे. हें मोठें गजबजलेलें गांव दिसलें. येथें गाडी पांच मिनिटें थांबली. येथला देखावा **माहेच्या** सारखाच दिसला. पुढचीं दोनतीन स्टेशनें टाकल्यावर **कॅनॅनूर** हें प्राचीन प्रख्यात बंदर आलें. तें **तेलीचरी**पासून तेराच मैल दूर आहे. येथें मी पावणे दहा वाजतां पोहोंचलों व गाडींतून खालीं उतरलों. मागून येणारी मलबार एक्सप्रेस गाडी एक वाजून पंचवीस मिनिटांनीं सुटावयाची होती. म्हणजे कॅनॅनूर शहर व बंदर पाहण्यास मला तब्बल साडेतीन तास सवड होती.

आजच्या माझ्या प्रवासाचा व दृश्यदर्शनाचा कार्यक्रम माझ्या युरोपांतील एका दिवसाच्या थेट कार्यक्रमासारखा होता. मी जीनीव्हा शहराहून सकाळीं निघून वाटेंत **बर्न** राजधानी पाहून सायंकाळला **लुसर्न** सरोवराच्या शहराला जाणार होतों. यामुळें कॅनॅनूर येथें उतरल्यापासून त्या माझ्या प्रवासाची व तिकडील सुलभ व सुखकर प्रवाससाधनांची मला सारखी

# प्रकरण ३ रें

## कॅनॅनूर बंदर व तेलीचेरी व माहे यांचें ओझरतें दर्शन

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मी दुसरे दिवशीं सकाळीं कालिकतहून सात वाजतांच्या पार्सल गाडीनें निघालों. ही गाडी सर्व स्टेशनें घेणारी व सावकाश चालणारी होती. पण माझ्या धावत्या किंवा ओझरत्या दर्शनाला ती इष्टापत्तिच होती. कालिकत स्टेशन टाकल्यावर लवकरच **वेस्टहिल** म्हणून एक छोटें पण सुबक स्टेशन लागलें. हें कालिकत शहराचें लष्कराच्या छावणीचें ठिकाण असून येथें एक ब्रिटिश पलटणीची तुकडी बहुधां असते. त्यामुळें या स्टेशनवर टापटीप व स्वच्छता जास्त दिसून आली. यानंतर आणखी चार स्टेशनें थोडथोड्या अंतरावर आहेत असें दिसून आलें. प्रत्येक स्टेशनवर माणसांची जा ये सारखी चालू होती. यावरून या प्रांताच्या दाट वस्तीची चांगली कल्पना आली. बरोबर सव्वा तासानें जातांना पाहिलेलें **बॅडागारा** हें मोठें स्टेशन आलें. येथें गाडी दहा मिनिटें थांबली. सव्वा तासांत आमचा प्रवास अवघा २९ मैल झाला. येथून फ्रेंच सरकारच्या ताब्यांत असलेलें **माहे** गांव ८ मैल दूर होतें. हें गांव **माहे** नांवाच्या नदीच्या कांठावर असून त्याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग आहेत. मार्गदर्शक पस्तक पाहतां कळून आलें कीं, हें मिऱ्याच्या पैदाशीचें केंद्र असल्यामुळें फ्रेंच कंपनीनें सन १७२२ मध्यें त्याची मालकी मिळविली. या छोट्या वसाहतीची इंग्रज व फ्रेंच कंपन्यांकडे पुष्कळ वेळां अदलाबदल झाली. कारण ही छोटीशी वसाहत फ्रेंचांना आपल्या सदोदित ताब्यांत ठेवणें दुरापास्त होतें. पण सन १७९३ पासून तें कायमचें फ्रेंच सरकारचे ताब्यांत गेलें. हें ठिकाण पांदेचरीच्या फ्रेंच गव्हर्नराचे अंमलाखालीं असून तेथें एक ॲडमिनिस्ट्रेटर नेमलेला आहे.

**माहे** या ठिकाणाचा दुरून देखावा मोठा मनोहर आहे. तो तांबडा लाल भूमिभाग, त्यावरील हिरव्यागार बागा व बागांतील झाडांवर लावलेल्या मिऱ्यांच्या वेली; तीं तांबड्या लाल विटांचीं लहान मोठीं घरें व बंगले ! हा देखावा चित्ताकर्षक आहे यांत शंका नाहीं. येथें उतरून शहरांतून फेरफटका करून यावें असें मनांत आलें. पण ठरलेल्या कार्यक्रमामध्यें असें करण्यास वेळ कोठें होता ? म्हणून जें काय दुरून दृश्य दिसलें तेवढ्यावरच मनाची समजूत करणें भाग पडलें. **माहे** पासून **तेलीचरी** ( इंग्रज वसाहतीचें व वखारीचें एक ठिकाण ) पांच मैल दूर आहे. व त्या स्टेशनला गाडी लवकरच आली. येथेंही एक नदी असून पूर्व काळापासून हें बंदर मिऱ्यांच्या व्यापाराकरितां प्रख्यात होतें. हल्लीं हें मलबार जिल्ह्यांतील एक मोठें भरभराटीचें शहर आहे. त्याची लोकवस्ती सुमारें २८००० असून ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन व एशिआटिक स्टीम नॅव्हिगेशन या दोन्ही कंपन्यांच्या बोटी या बंदराला नियमितपणें लागतात. हें ठिकाण ईस्ट इंडिया कंपनीला सन १६८३ मध्यें मिळालें व तेव्हांपासून या ठिकाणावर व आसपासच्या भागावर ब्रिटिश अंमल सारखा चालू आहे. हें मोठें गजबजलेलें गांव दिसलें. येथें गाडी पांच मिनिटें थांबली. येथला देखावा **माहेच्या** सारखाच दिसला. पुढचीं दोनतीन स्टेशनें टाकल्यावर **कॅनॅनूर** हें प्राचीन प्रख्यात बंदर आलें. तें **तेलीचरी**पासून तेराच मैल दूर आहे. येथें मी पावणे दहा वाजतां पोहोंचलों व गाडींतून खालीं उतरलों. मागून येणारी मलबार एक्सप्रेस गाडी एक वाजून पंचवीस मिनिटांनीं सुटावयाची होती. म्हणजे कॅनॅनूर शहर व बंदर पाहण्यास मला तब्बल साडेतीन तास सवड होती.

आजच्या माझ्या प्रवासाचा व दृश्यदर्शनाचा कार्यक्रम माझ्या युरोपांतील एका दिवसाच्या थेट कार्यक्रमासारखा होता. मी जीनीव्हा शहराहून सकाळीं निघून वाटेंत **बर्न** राजधानी पाहून सायंकाळला **लुसर्न** सरोवराच्या शहराला जाणार होतों. यामुळें कॅनॅनूर येथें उतरल्यापासून त्या माझ्या प्रवासाची व तिकडील सुलभ व सुखकर प्रवाससाधनांची मला सारखी

आटवण होत होती व आपल्या इकडील स्थितीचा व तिकडील स्थितीचा विरोध सारखा मनापुढें येत होता. तिकडील प्रवासामध्यें मुख्य सोयीची गोष्ट म्हणजे प्रत्येक प्रांताचे व प्रख्यात शहराचे स्वस्त नकाशे व मार्ग-दर्शक पुस्तकें मिळतात ही होय. तशी आपल्या इकडे मुळींच सोय नाहीं. यामुळें मोठी अडचण भासते. मी कॅनॅनूरच्या स्टेशनला उतरलों खरा. पण प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास गावचा नकाशा कोठें होता ? तरी पण येथला किल्ला व बंदर येवढ्याच गोष्टी मला पहावयाच्या होत्या व चालत त्या तीन तासांत पाहून होतील असें मनाशीं ठरवून मी स्टेशनांतून बाहेर पडलों तो थेट गांवांतून पश्चिम दिशेकडे जाणाऱ्या रस्त्यानें चालूं लागलों. ( कारण माझ्याजवळ छोट्या हँडबॅगखेरीज कांहीं एक सामान नव्हतें. ) येथें दुकानासमोर झापाचे मंडप घालण्याची रीत दिसली व ते दोन्ही बाजूचे मंडप एकमेकांना भिडलेले दिसले. यामुळें सर्व रस्त्याभर सारखी सावली होती ! गांवांतील घरांसभोंवतीं नारळी, पोफळी, केळी, आंबे, फणस इत्यादि केरल व कोंकण प्रांतांचीं विशिष्ट झाडें होतीं हें सांगावयास नको. याप्रमाणें सगळा गांव पालथा घातला तरी बंदराचा पत्ता नाहीं. गांव टाकल्यावर मात्र फारच विस्तीर्ण व अगदीं सपाट व सर्वस्वीं खुलें असें मैदानच मैदान लागलें व त्याच्या एका कडेला बऱ्याचशा बराकी दृष्टीस पडल्या. तेव्हां कॅनॅनूरच्या लष्करी छाव-णीच्या या इमारती असून हें खुलें मैदान रोजच्या कवायतीची जागा होय हें दुसऱ्यानें न सांगतां समजून आलें. तेव्हां याचे पलीकडेच किल्ला व बंदर असलें पाहिजे असा मी मनाशीं तर्क करून तसाच सरळ व गर्दछाय सडकेनें पुढें गेलों. तों शेवटीं रस्ता संपला, समुद्रकिनारा आला व एक बंगलवजा मोठी इमारत दिसली. तेव्हां मी आंत शिरलों तों तेथें एक पार्शी गृहस्थ भेटले. त्यांचे जवळ चवकशीकरितां कळलें कीं "हें एक हॉटेल असून समुद्र-किनाऱ्याच्या बाजूनें बंदराकडे जाण्यास वाट नाहीं; पण हॉटेलाला वळसा घालून पुढें गेलें म्हणजे किल्ला व बंदर येईल व तिकडून गांवांत परत जाण्यास वाट आहे." या माहितीनें माझ्या जीवांत जीव आला.

कारण या हॉटेलाशीं चालत येईपर्यंत मला दीड तास लागला होता व आणखी दीड तासांत स्टेशनवर परत पोहोंचणें आवश्यक होतें तर पुढची मद्रास एक्सप्रेस मिळणार होती. पार्शी गृहस्थानें सांगितलेल्या माहितीनें मला चालण्यास हुरूप आला व पुन्हा मी जोरानें चालूं लागलों. थोड्याच वेळांत कॅनॅनूरचा किल्ला दिसूं लागला व समुद्र व बंदर हीं दृग्गोचर झालीं. कॅनॅनूरच्या किल्ल्यानजीक मी आलों. हा भुईकोट किल्ला तांबड्या जांभ्या दगडाचा बांधलेला असून तो समुद्रांत घुसलेल्या खडकाच्या टोंकांवर बांधलेला दिसला. किल्ल्याचे बाजूला कॅनॅनूरचा लंब वर्तुळाकार बे (मुंबईच्या बॅक बेसारखा) दिसत होता. येथेंच कॅनॅनूरचें बंदर होतें. त्यांत लहान मोठीं गलबतें नांगरलेलीं दिसत होतीं. मी उभा होतों इतक्यांत एक आगबोटही बंदरांत येऊन थांबतांना दृष्टीस पडली. किल्ला आंत जाऊन पहाण्यास वेळ नव्हता. पण किल्ला फार मोठा नसल्यामुळें व किल्ल्याचा तटही फार उंच नसल्यामुळें किल्ल्यांतील दोन तीन इमारती व उंच असलेलें दीपगृह मला स्पष्ट दिसलें. कॅनॅनूर किल्ल्याचा, बंदराचा व बेचा देखावा फार निसर्गरमणीय आहे यांत शंका नाहीं. त्या लंब वर्तुळाकार बेच्या दोन्ही लांबड्या बाजूंवर नारळीचे वृक्षच वृक्ष दिसत होते. समुद्राचें तें नीळसर पाणी, वाळवंटावरील ती पांढरट वाळू, त्याचे पलीकडील ती हिरवी हिरवी दाट झाडी व तांबडेंलाल तें कवायतीचें मैदान हा चतुरंग देखावा विलक्षण आश्चर्यकारक वाटला. कालिकतपेक्षां कॅनॅनूर किती तरी अधिक सुंदर व निसर्गरमणीय ठिकाण आहे असें मला वाटलें. अर्थात् हा सुंदर व चित्ताकर्षक देखावा पहात मी या ठिकाणीं बराच वेळ उभा राहिलों. जरी भर दुपार होत आली होती तरी समुद्रावरून गार वाऱ्याची झुळूक सारखी येत असल्यामुळें ऊष्मा भासला नाहीं व थोडा वेळ तो निसर्गरमणीय देखावा पाहिल्यानें दोन तास सारखें चालण्याच्या श्रमाचा परिहार झाला. उशीर झाला म्हणून मी मैदानामधून गेलेल्या सरळ रस्त्यानें परत गांवांत आलों व गांवांतील स्टेशनानजीकची बाजार पेठ पाहून स्टेशनामध्यें तीन साडेतीन तासांनीं

परत आलों तों मद्रास एक्स्प्रेस येण्याची वेळ झाली. तीन साडेतीन तास सारखें चालल्यामुळें तहानभूक लागली होती तेव्हां स्टेशनावरील हिंदी उपाहारगृहामध्यें मीं चहाफराळ केला हें सांगावयास नकोच. इतक्यांत आगगाडी प्लॅटफार्मवर आली व मी डब्यांत जाऊन बसलों तोंच शीट करून आगगाडी पुढें चालू झाली.

कॅनॅनूर हें हल्लीं सुमारें सत्तावीस हजार वस्तीचें मलबार जिल्ह्यांतील तालुक्याचें ठिकाण आहे. हें फार पुरातन काळापासून केरलाचें एक बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. येथें अरब व्यापारी व एतद्देशीय स्त्रिया यांच्यापासून झालेल्या मोपला नांवाच्या मिश्र लोकांची वस्ती पुष्कळ आहे. पोर्तुगीज-सरदार वास्को डि गामा हा कॅनॅनूरला सन १४९८ मध्यें प्रथम आला व पुनः सन १५०२ मध्येंही तो या बंदरीं आला होता. तेव्हां पोर्तुगी-जांनीं येथें आपली वखार बांधली. कॅनॅनूरचा किल्ला डॉन फ्रॅन्सिस्को डी-आलमीडा या हिंदुस्थानच्या पहिल्या पोर्तुगीज व्हाइसरॉयानें सन १५०५ मध्यें बांधला. पण हें बंदर पोर्तुगीजांकडून पुढें डच लोकांचे ताब्यांत गेलें व नंतर हैदर-टिपूंनीं उत्तर मलबार प्रांत काबीज केला तेव्हां तें त्यांचे ताब्यांत आलें. पण सन १७९९ मध्यें केरलाचा सर्व उत्तर भाग इंग्रजांकडे आला व तेव्हांपासून या शहराची व बंदराची साधारण भरभराट झाली.

कॅनॅनूर पासून तीन तासांत आमची गाडी मंगलोर स्टेशनला आली. दुसरे दिवशीं सकाळींच मोटारनें निघून पहिल्या प्रकरणांत वर्णन केलेल्या **सोमेश्वर** घाटानें मी सायंकाळीं **सागर** गांवास आलों. मी कालिकतला जाण्यास निघालों त्याच दिवशीं माझे त्रिवर्ग सहप्रवासी गिरसप्पा धबधबा पाहण्यास पुढें गेले होते. ते सायंकाळीं सागरास परत यावयाचे होते. मी सागरास पोहोंचल्यावर त्यांची मोटारच्या अड्ड्यावर चवकशी केली. पण त्यांची कांहीं एक वार्ता कळली नाहीं व मी मोठ्या विवंचनेंत पडून गिरसप्पाकडून येणाऱ्या रस्त्यावर येरझारा घालीत होतों; तोंच आमच्या मित्र-मंडळींची मोटार रस्त्यावर येऊन थबकली व

ठरल्याप्रमाणें व ठरल्यावेळीं आमची सागर गांवीं गांठ पडल्यामुळें आम्हां सर्वांना फार आनंद वाटला. मग आम्ही त्याच मोटारींतून शिमोग्यास आलों व तेथें रात्रभर राहून दुसरे दिवशीं दोन प्रहरीं बिरूर स्टेशनला आलों व लागलींच पूना-बंगलोर गाडीनें परत पुण्यास आलों. या प्रवासास आम्हांला माणशीं अवघे आडतीस रुपये लागले. याप्रमाणें दिसेंबर सन १९३४ च्या नाताळामध्यें केलेल्या माझ्या केरळ प्रांत-प्रवासाचा पहिला हप्ता व त्याचें वर्णन संपलें. या खेपेला माझा केरळाचा ब्रिटिश अंमलांतील भाग पाहून झाला. पहिल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें केरळ प्रांताचा मुख्य व जास्त मोठा भाग कोचीन व त्रावणकोर या देशी संस्थानांच्या ताब्यांत आहे. तो सर्व भाग मीं सन १९३४ च्या जानेवारी मध्यें **पालघाट** खिंडीच्या प्रवेशद्वारानें केरळांत शिरून पाहिला. तेव्हां पुढील प्रकरणापासून त्या माझ्या प्रवासाचें व त्यांत पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांचे वर्णनास लागूं या.

# प्रकरण ४ थें

---

## कोचीन संस्थानच्या जुन्या व नव्या राजधान्यांचीं शहरें

मी पालघाटहून **त्रिचूर**—कोचीनची जुनी राजधानी—शहराला जाण्यास २ जानेवारी सन १९३४ रोजीं दिवसा अकरा वाजतां निघालों. **पालघाट** ते **ओलव्हकोट** तीनच मैल आहे. पण येथें आगगाडी बदलावी लागते, व लागलीच **शोरानूर**ला जाणाऱ्या आगगाडींत बसावें लागतें. तेथें दोन तास थांबून **अर्नाक्युलम**ला जाणाऱ्या आगगाडींत बसावें लागतें; खरोखरीं **पालघाट**पासून **त्रिचूर** आगगाडीनें सारें एकावन मैल आहे. पण या एकावन मैलांत दोनदां आगगाडी बदलावी लागते व मध्यें थांबावें लागतें. म्हणून दिवसां ११ वाजतां **पालघाट**हून मी निघालों तो **त्रिचुर**ला सायंकाळच्या साडेपांच वाजतां पोहोंचलों.

**ओलव्हकोट**पासून रेल्वेरस्ता **पोनानी** नदीचे उत्तर किनाऱ्यानें जातो. हीं नदी बरीच मोठी आहे. हल्लीं हीच नदी ब्रिटिश **मलबार** व **कोचीन** संस्थान यांची हद्द आहे. **ओलव्हकोट** ते **शोरानूर**पर्यंत रस्ता थेट पश्चिमेस जातो. हा सर्व भाग तांबडमातीचा असून भात, नारळ, सुपारी व केळीं हींच येथील मुख्य पिकें आहेत. काजू, जांभूळ, फणस, आंबे वगैरे फळझाडेंही वाटोवाट लागतात. **शोरानूर** स्टेशन टाकल्यावर लागलीच **पोनानी** नदीवरील मोठा पूल लागतो. ही नदी फार उथळ पण बरीच रुंद आहे; हिच्यामध्यें पांढरी वाळू आहे. दगड किंवा माती नाहीं. यामुळें नदींत चिखल नाहीं व पाणी स्फटिकासारखें चमकतें. **शोरानूर**पासून **त्रिचूर**ला जाणारा आगगाडीचा रस्ता थेट दक्षिणेस जातो. भूमिभाग रत्नागिरी कोंकणासारखा आहे. मी **त्रिचूर**च्या अलीकडे दीड

दोन मैलच असलेल्या **पुंकुनम्** स्टेशनला उतरलों. आगगाडींत एक नांबुद्रि ब्राह्मण तरुण भेटला. त्यानें म्युनिसिपल छत्र त्रिचूरपेक्षां **पुंकुनम्** स्टेशनपासून जवळ आहे असें सांगितलें म्हणून मी अलिकडच्या स्टेशनवर उतरून म्युनिसिपल छत्राला आलों व सामान खोलींत ठेवून रा. रामस्वामी अय्यर ( ज्यांना मी देवासहून घेतलेलें परिचयपत्र आधीं पोस्टानें पाठविलें होतें ) यांना भेटलों. या गृहस्थाच्या साहाय्यानें मला **त्रिचूर** व **अर्नाक्युलम्** हीं राजधान्यांचीं शहरें चांगलीं पाहतां आलीं; तसेंच **गुरुवायुर** देऊळ व श्रीशंकराचार्यांचें जन्मग्राम **कालदी** गांव ( याचें वर्णन पुढील प्रकरणांत येईल ) हीं ठिकाणें मी त्यांचे समवेतच पाहिलीं.

**त्रिचूर** हें सुमारें तीस हजार वस्तीचें गांव असून एका काळीं कोचीनचें राजधानीचें शहर होतें. अजूनही हें शहर कोचीन संस्थानांतील दुसरें मोठें शहर आहे. याची रचना मोठी मनोहर आहे. या शहराचे मधोमध एका उंचवटयाच्या ठिकाणावर या शहरांतील नव्हे मलबारांतील एक प्रमुख असें **वडकुनाथम्** नांवाचें देवालय आहे. या देवळाला मदुरेच्या **मीनाक्षी** देवळाप्रमाणें चारी दिशांना प्रवेशद्वारें आहेत. मात्र मीनाक्षी देवळाप्रमाणें या प्रवेशद्वारावर मोठालीं गोपुरें नसून तीन मजली देवडी-वजा इमारती आहेत. त्यांतील तीन ग्यालऱ्यांवर एकावर एक अशीं कौलारू छपरें आहेत. हीं मागाहूनचीं आहेत किंवा पहिल्यापासूनचीं आहेत हें कळलें नाहीं. पण या प्रांतांत पाऊस फार असल्यामुळें खुलीं गोपुरें फार दिवस टिकणें शक्य नाहीं म्हणून हीं कंगोऱ्यासारखीं दिसणारीं छपरें बांधण्याची पद्धति निघाली असावी असें वाटलें. देवळास मोठा थोरला प्राकार असून पुढें रस्त्यापर्यंत उतरती खुली जागा आहे. हा रस्ता वाटोळा देवळासभोंवतीं गेला असून त्याचे पलीकडे सारखी बाजार पेठ लागली आहे. या देवळाचें मुख्य द्वार मोठें भव्य दिसतें यांत शंका नाहीं. या मुख्य प्रवेशद्वाराचे दरवाजाला लागून मोठ्या दिव्याच्या दोन शिड्या ठेवलेल्या आहेत. समोरच दोन मोठे पिंपळाचे वृक्ष असून

त्यांना कमरभर उंचीचे दगडी पार बांधलेले आहेत; देवळाच्या उजव्या हातास कमानदार अशी मोठी इमारत असून त्याचेपुढें पार बांधलेलें एक पिंपळाचें मोठें झाड आहे. हा सर्व चढता रस्ता फरसबंदी आहे. याखेरीज देवळाचे समोरून प्रथम उतरता झालेला व मागाहून किंचित् चढता असा सरळ सुतांत असलेला तांबूस रंगाचा दुसरा एक रस्ता गेलेला आहे. देवळासभोंवारच्या उतरत्या वाटोळया खुल्या जागेवर हिरवें गवत उगवलेलें आहे. असा देवळाच्या आसपासचा मोठा मनोहर देखावा आहे खरा. पण मलबारांतल्या काय किंवा दक्षिण हिंदुस्थानांतल्या काय सर्व देवळांची पठाडीगोम म्हणजे ही कीं त्यांच्या पहिल्या प्रवेशद्वारांतून देवदर्शन घडत नाहीं, व शिवाय कपडे काढून स्नान करून धोतरउपरण्याखेरीज कांहीं कपडा अंगावर न घालतां अनवाणी पायानें देवळांत प्रवेश करावा लागतो. यामुळें उत्तर हिंदुस्थानाप्रमाणें केव्हांही प्रेक्षणीय स्थळ म्हणून हीं देवळें पहातां येत नाहींत. देव दर्शन घेण्याकरितां बिऱ्हाडाहूनच धोतर व उपरणें पांघरून निघावयाचें व देवदर्शन घेतल्यावर मग बिऱ्हाडीं परत जाऊन नेहमींचा पोषाख करावयाचा, असा हा द्राविडी प्राणायाम येथें आहे. **गुरुवायुर** व इतर मलबारांतील देवळें पहातांना तशी तयारी करूनच मी गेल्यामुळें तीं देवळें मला पहाण्यास मिळालीं. परंतु **त्रिचूरचें** देऊळ तशा तयारीनें न गेल्यामुळें पहातां आलें नाहीं. पण मला या देवळाचा बाह्य देखावाच जास्त सुंदर वाटल्यामुळें हा देखावा पाहूनच मीं मनाचें समाधान केलें. दक्षिण हिंदुस्थानांतील देवळें व मलबारांतील त्रिचूरचें हें देऊळ हीं सर्व मोठीं श्रीमंत देवळें आहेत व त्यांचें वार्षिक मोठें उत्पन्न आहे. या सर्व देवळांचे पुजारी **नांबुद्री** ब्राह्मण आहेत. या देवळांत नांबुद्रि उपाध्याय व पुजारी तयार करण्याचें मोठें विद्यालय आहे.

**त्रिचूर** हें गांव किंचित् नालाच्या आकाराचें आहे. वर लिहिल्याप्रमाणें नालाचे मध्यभागीं सर्वांत उंचवटयाच्या ठिकाणीं देऊळ आहे. नालाच्या एका बाजूस म्युनिसिपालिटीचें छत्र आहे व त्याच्या बाजूनें

एक सरळ रस्ता नालाच्या दुसऱ्या टोंकास जातो. हा रस्ता उंचावरून खालीं शेतापर्यंत उतरत जातो व मग राजवाड्याकडे चढता होतो. हा रस्ता प्रशस्त, सरळ व तांबड्या खडीचा असल्यामुळें मोठा मनोहर दिसतो. या रस्त्याला आलें कीं राजवाड्याच्या मागल्या फाटकाची भव्य कमान दृष्टीस पडते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस भातशेत जमीन असून भाताचें हिरवेंगार पीक उभें होतें. राजवाडा फारसा मोठा नाहीं. कोचीनचे महाराज त्रिचूरला आले म्हणजे या वाड्यांत राहतात; सध्यां तो राहता राजवाडा नसल्यामुळें सर्वत्र सामसूम दिसलें. बागेवरही विशेषसें लक्ष दिलें जातें असें वाटलें नाहीं. राजवाड्याची इमारत विटांची व आंतून बाहेरून गिलावा केलेली आहे. या राजवाड्याच्या बाजूनें आम्ही पुढल्या प्रवेशद्वारीं आलो. प्रवेश द्वारापुढें मागच्या द्वारापेक्षां मोठा व प्रशस्त रस्ता आहे. याचे एका बाजूस व्हिक्टोरिया पार्क व सरकारी कोर्टें कचेऱ्या आहेत; तर दुसरे बाजूस मोठमोठे बंगले आहेत. बरेंच अंतर चालून गेल्यावर उजव्या हातास कोचीन संस्थानचें पदार्थ-संग्रहालय, प्राणी-संग्रहालय व बाग हीं सर्व लागतात. तीं सर्व एके ठिकाणींच आहेत. पण शुक्रवार हा पदार्थ-संग्रहालयाचा सुटीचा दिवस असल्यामुळें व आम्ही पहावयास गेलों तो दुर्दैवानें शुक्रवारच असल्यामुळें पदार्थसंग्रहालय पहाण्यास सांपडलें नाहीं; तसेंच तेथलें मोठें सर्पगृह पहाण्यास सांपडलें नाहीं. मात्र बाकीची सर्व बाग आम्ही हिंडलों व पशुपक्षी, जलचर आणि स्थलचर प्राणी पाहिले. बंगालच्या पट्ट्या वाघाची एक मोठी जोडी येथें आहे. सिंह, सिंहीण व त्यांचे बच्चे मिळून सहा सात सिंहांचें कुटुंबच दृष्टीस पडलें! मूळची या बागेची रचना व एकंदर पशुसंग्रह चांगला असावा; पण हल्लीं त्याची फारशी काळजी घेतली जात नसावी असें वाटलें व त्याचें कारणही **रामस्वामी**कडून कळलें. कोचीनच्या एका युरोपियन दिवाणांच्या कारकीर्दींत हें तिहेरी संग्रहालय संस्थानचें मुख्य प्रेक्षणीय स्थळ म्हणून स्थापन करण्यांत आलें. त्यांच्या हौशी व उत्साही नजरेखालीं या स्थळांची रचना व उभारणी झाली व ते दिवाणगिरीवर असेपर्यंत

त्रिचूरमधलें हें संग्रहालय फार चांगल्या स्थितींत होतें. पण मागाहूनच्या दिवाणांचें तितकें लक्ष या संस्थेकडे राहिलें नाहीं. व म्हणून हें संग्रहालय चांगलें असून त्याचा मनावर जितका परिणाम व्हावा तितका होत नाहीं. त्रावणकोर संस्थानांत त्रिवेंद्रम येथें असेंच तिऊरी संग्रहालय आहे. त्याचा मनावर विशेष परिणाम होतो; पण हें विषयांतर होत चाललें तेव्हां, हात नव्हे, लेखणी आंखडती घेतली पाहिजे. प्राणिसंग्रहालय पाहून आम्ही डाव्या हातच्या रस्त्यानें शहरांत आलों व शहराचा बाजार पाहिला. म्युनिसिपालिटीच्या कचेरीची नवी कोरी करकरीत इमारत प्रेक्षणीय आहे. तिला छोटासा टॉवर असून त्यावर घड्याळ बसविलें आहे. इमारतीसमोर छोटी फुलबाग आहे. झालें. त्रिचूरचें दृश्य दर्शन संपलें.

**त्रिचूरपासून अर्नाक्युलम्** — कोचीनची हल्लींची राजधानी — चवेचाळीस मैल आहे. त्रिचूरहून रेलवेलाईन थेट दक्षिणेस जाते. हा भूमिभाग रत्नागिरी कोंकणासारखा पण कमी उंच सखल व कमी डोंगराळ आहे. नारळ, पोफळ, केळीं व भात हीं पिकें एका मागून एक लागतात; जरा सखल भागांत भात शेती; जरा उंचवट्याच्या गांवठणानजीकच्या भागांत नारळ, पोफळ व केळीं यांच्या बागा; असा सारखा क्रम लागतो. नापीक भुरट्या रानाचा व विन लागवडीचा भाग दृष्टीस पडतच नाहीं. **अर्नाक्युलम्** स्टेशनला आम्हीं तीन वाजतां पोहोंचलों. माझ्याबरोबर रामस्वामी होते; त्यांचे मेहुणे रा. **व्यंकटेश्वरम्** हे मद्रास सरकारच्या कोचीन बंदर खात्यांत एंजिनीयर होते. त्यांचे येथें आम्हांला उतरावयास जावयाचें होतें. स्टेशनपासून एंजिनीयरसाहेबांचें बिऱ्हाड चांगलें दोन मैलांचे वरच होतें. स्टेशनांत तर रिकशा खेरीज दुसरें वाहन नाहीं. **रामस्वामींनीं** दोन रिकशा करून भरदिशीं जाऊं या म्हणून मला पुष्कळ आग्रह केला; पण मनुष्यांना बैलाप्रमाणें न राबविण्याचा माझा निश्चय पाहून तेही भर दोन प्रहरीं दोन अडीच मैल चालण्यास तयार झाले. मग माझ्या सामानाकरितां एक रिकशा करून आम्हीं चालत **व्यंकटेश्वराच्या** बिऱ्हाडीं

अर्ध्या पाऊण तासाच्या भर दोन प्रहरच्या पायपिटीनंतर पोहोंचलों. व्यंकटेश्वरम् हे अर्थात् कचेरीला कोचीनास गेले होते.—ते येईपर्यंत मी माडीवर बसूनच वेळ कंठला. रामस्वामी—अर्थात् आपल्या वहिणीशीं बोलण्यांत व आपल्या भाचीला खेळविण्यांत गुंतले. एंजिनियरसाहेब सहाचे सुमारास आले व त्यांचें चहापाणी–नव्हे कॉफीपाणी झाल्यावर ( कारण आम्हीं आल्याबरोबरच कॉफी घेतली होती ) साधारण काळोख पडल्यावरच आम्हीं कोचीनचा अपूर्व अलंकार—तेथलें **क्षारसरोवर** किंवा अन्तःसरोवर व त्याचे कांठीं असलेला पार्क पाहण्यास गेलों. सुमारें दोन मैल रुंदीचें व कोचीन संस्थानच्या लांबीभर पसरलेलें तें हिरवट रंगाच्या पाण्याचें निसर्गरमणीय सुंदर सरोवर; त्याचे पूर्व कांठावर नवाच कॉंक्रीटचा बांधलेला एकसारखा धक्का; धक्क्याला लागून नानाविध रंगांच्या फुलझाडांचे ताटवे; हिरव्यागार हरळीनें आच्छादलेला भूमिभाग व मधून मधून पांढऱ्या शुभ्र रेतीचे रस्ते; पार्कच्या दुसऱ्या बाजूस उंचच उंच लोखंडी कठडा; कठड्याला लागून तांबूस बारीक वाळूची सहल पायवाट; पायवाटेच्या बाजूस हारीनें बसविलेले विजेचे खांब व चन्द्रप्रकाशी मोठे वाटोळे विजेचे आर्क दिवे; मोठ्या प्रशस्त रस्त्याचे पलीकडे सरकारी मोठमोठ्या सुंदर इमारती; हा सर्व देखावा मला विलक्षण आश्चर्यकारक वाटला यांत शंका नाहीं. मला तर यावेळीं जीनीव्हा शहरांतील **विल्सन धक्याची** आठवण झाली. विजेच्या प्रकाशांत, सरोवराच्या सांनिध्यांत या पार्कची शोभा अद्वितीय दिसली; खुद्द युरोपांतील रमणीय स्थळांच्या वरचढ स्थळें हिंदुस्थानांत महाराष्ट्राच्या दक्षिणेस मलबारच्या किनाऱ्यावर असतील अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. आपल्याच देशाची आपल्याला अजून किती कमी माहिती आहे असें तेव्हां माझ्या मनांत आलें. हा पार्क पाहिल्यावर आम्हीं **अर्नाक्युलम**च्या बाजार पेठेंत आलों. **अर्नाक्युलम**चे रस्ते रुंद व गुळगुळीत दिसले. नुकतेच **लॉर्ड विलिंग्डन**साहेब येऊन गेल्यामुळें रस्त्याची चांगली दुरुस्ती झाली होती; दुकानेंसुद्धां शंगारलेलीं व सुबक रोषनाईचीं दिसलीं. अर्ना-

त्रिचूरमधलें हें संग्रहालय फार चांगल्या स्थितींत होतें. पण मागाहूनच्या दिवाणांचं तितकें लक्ष या संस्थेकडे राहिलें नाहीं. व म्हणून हें संग्रहालय चांगलें असून त्याचा मनावर जितका परिणाम व्हावा तितका होत नाहीं. त्रावणकोर संस्थानांत **त्रिवेंद्रम** येथें असेंच तिहेरी संग्रहालय आहे. त्याचा मनावर विशेष परिणाम होतो; पण हें विषयांतर होत चाललें तेव्हां, हात नव्हे, लेखणी आंखडती घेतली पाहिजे. प्राणिसंग्रहालय पाहून आम्ही डाव्या हातच्या रस्त्यानें शहरांत आलों व शहराचा बाजार पाहिला. म्युनिसिपालिटीच्या कचेरीची नवी कोरी करकरीत इमारत प्रेक्षणीय आहे. तिला छोटासा टॉवर असून त्यावर घड्याळ बसविलें आहे. इमारतीसमोर छोटी फुलबाग आहे. झालें. त्रिचूरचें दृश्य दर्शन संपलें.

**त्रिचूरपासून अर्नाक्युलम्** – कोचीनची हल्लींची राजधानी – चवेचाळीस मैल आहे. त्रिचूरहून रेल्वेलाईन थेट दक्षिणेस जाते. हा भूमिभाग रत्नागिरी कोंकणासारखा पण कमी उंच सखल व कमी डोंगराळ आहे. नारळ, पोफळ, केळीं व भात हीं पिकें एका मागून एक लागतात; जरा सखल भागांत भात शेती; जरा उंचवट्याच्या गांवठणानजीकच्या भागांत नारळ, पोफळ व केळीं यांच्या बागा; असा सारखा क्रम लागतो. नापीक भुरट्या रानाचा व विन लागवडीचा भाग दृष्टीस पडतच नाहीं. **अर्नाक्युलम्** स्टेशनला आम्हीं तीन वाजतां पोहोंचलों. माझ्याबरोबर रामस्वामी होते; त्यांचे मेहुणे रा. **व्यंकटेश्वरम्** हे मद्रास सरकारच्या कोचीन बंदर खात्यांत एंजिनीयर होते. त्यांचे येथें आम्हांला उतरावयास जावयाचें होतें. स्टेशनपासून एंजिनीयरसाहेबांचें बिऱ्हाड चांगलें दोन मैलांचे वरच होतें. स्टेशनांत तर रिकशा खेरीज दुसरें वाहन नाहीं. **रामस्वामींनीं** दोन रिकशा करून भरदिशीं जाऊं या म्हणून मला पुष्कळ आग्रह केला; पण मनुष्यांना बैलाप्रमाणें न राबविण्याचा माझा निश्चय पाहून तेही भर दोन प्रहरीं दोन अडीच मैल चालण्यास तयार झाले. मग माझ्या सामानाकरितां एक रिकशा करून आम्हीं चालत **व्यंकटेश्वराच्या** बिऱ्हाडीं

अर्ध्या पाऊण तासाच्या भर दोन प्रहरच्या पायपिटीनंतर पोहोंचलों. व्यंकटेश्वरम् हे अर्थात् कचेरीला कोचीनास गेले होते.—ते येईपर्यंत मी माडीवर बसूनच वेळ कंठला. रामस्वामी—अर्थात् आपल्या वहिणीशीं बोलण्यांत व आपल्या भाचीला खेळविण्यांत गुंतले. एंजिनियरसाहेब सहाचे सुमारास आले व त्यांचें चहापाणी—नव्हे कॉफीपाणी झाल्यावर ( कारण आम्हीं आल्याबरोबरच कॉफी घेतली होती ) साधारण काळोख पडल्यावरच आम्हीं कोचीनचा अपूर्व अलंकार—तेथलें **क्षारसरोवर** किंवा अन्तःसरोवर व त्याचे कांठीं असलेला पार्क पाहण्यास गेलों. सुमारें दोन मैल रुंदीचें व कोचीन संस्थानच्या लांबीभर पसरलेलें तें हिरवट रंगाच्या पाण्याचें निसर्गरमणीय सुंदर सरोवर; त्याचे पूर्व कांठावर नवाच कॉंक्रीटचा बांधलेला एकसारखा धक्का; धक्क्याला लागून नानाविध रंगांच्या फुलझाडांचे ताटवे; हिरव्यागार हरळीनें आच्छादलेला भूमिभाग व मधून मधून पांढऱ्या शुभ्र रेतीचे रस्ते; पार्कच्या दुसऱ्या बाजूस उंचच उंच लोखंडी कठडा; कठड्याला लागून तांबूस बारीक वाळूची सहल पायवाट; पायवाटेच्या बाजूस हारीनें बसविलेले विजेचे खांब व चन्द्रप्रकाशी मोठे वाटोळे विजेचे आर्क दिवे; मोठ्या प्रशस्त रस्त्याचे पलीकडे सरकारी मोठमोठ्या सुंदर इमारती; हा सर्व देखावा मला विलक्षण आश्चर्यकारक वाटला यांत शंका नाहीं. मला तर यावेळीं जीनीव्हा शहरांतील **विल्सन धक्याची** आठवण झाली. विजेच्या प्रकाशांत, सरोवराच्या सांनिध्यांत या पार्कची शोभा अद्वितीय दिसली; खुद्द युरोपांतील रमणीय स्थळांच्या वरचढ स्थळें हिंदुस्थानांत महाराष्ट्राच्या दक्षिणेस मलबारच्या किनाऱ्यावर असतील अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. आपल्याच देशाची आपल्याला अजून किती कमी माहिती आहे असें तेव्हां माझ्या मनांत आलें. हा पार्क पाहिल्यावर आम्हीं **अर्नाक्युलम**च्या बाजार पेठेंत आलों. **अर्नाक्युलम**चे रस्ते रुंद व गुळगुळीत दिसले. नुकतेच **लॉर्ड विलिंग्डन**साहेब येऊन गेल्यामुळें रस्त्याची चांगली दुरुस्ती झाली होती; दुकानेंसुद्धां शृंगारलेलीं व सुबक रोषनाईचीं दिसलीं. अर्ना-

क्युलमचा बाजार मोठा असून त्याची रात्रीं अशी नेहमीं रोषनाई करतात असें एंजिनीयरसाहेबांनीं सांगितलें.

दुसरे दिवशीं सकाळीं कॉफीपान झाल्यावर आठाचे सुमारास आम्हीं सहा मैलांवर असलेल्या **त्रिपणीथुरई** गांवीं कोचीनच्या महाराजांचा राजवाडा पाहण्यास गेलों. मोटारबसनें आम्हीं चार मैल गेलों. तेथून आम्हांला दोन मैल चालत जावें लागलें. हा सर्व भाग जलमय आहे असा भास होतो. कारण सर्व शेतांत पाणीच पाणी दिसतें; सरोवर व कालवे हेच सर्वत्र दिसतात. नारळाचीं झाडें तर पाण्यांत उगवलीं आहेत कीं काय असें वाटतें. येथल्या सर्व घरांना सुबक झापांनीं आच्छादिलेल्या कुंपणी केलेल्या असतात. लहान बोळ सुद्धां सरळ व नीटनेटके दिसले. मध्यें सखल भागांत भाताचीं शेतें दिसलीं. शेवटीं एकदांचा राजवाडा आला. हा राजवाडा एका टेकडी-वर बांधलेला आहे. खालून वर चढण्यास पांढऱ्या शुभ्र कॉंक्रीटच्या पायऱ्या केल्या आहेत. मधून मधून खुली सपाट जागा सोडली आहे व त्यामध्यें फुलझाडांचे ताटवे केले आहेत. बागेची रचना मजगीवर मजगी अशा तऱ्हेनें मोठी रमणीय केली आहे. यामुळें या राजवाड्याच्या आवारांत शिरल्याबरोबर मनावर मोठा अनुकूल परिणाम होतो यांत शंका नाहीं. राजवाड्याच्या या ठिकाणानें मला पॅरीस येथील सेक्रेड हार्ट नांवाच्या टेकडीवर असलेल्या प्रार्थनामंदिराची आठवण झाली. अर्थात् त्या टेकडीवरील इमारत फार भव्य व संगमरवरी दगडाची आहे. त्या मानानें हा राजवाडा अगदीं साधा, विटांचा व आंत बाहेर गिलाव्याचा आहे. तो फारसा भव्य नाहीं. पण राजवाड्याचें उंच ठिकाण फार रमणीय आहे यांत शंका नाहीं. राजवाडा दुमजलीच आहे. आम्हीं राजवाड्यांतील दरबार दिवाणखाना, महाराजांचा बैठकखाना व इतर दिवाणखाने पाहिले. दिवाणखान्याच्या जमीनी निरनिराळ्या रंगांच्या कृत्रिम संगमरवरी विटांच्या आहेत. दिवाणखान्यांतील लांकडी सामान उत्तम नक्षीचें असून एकंदर थाट साधा व सदभिरुचियुक्त दिसला.

दरबार दिवाणखान्याच्या दाराशीं शिसवी लाकडाचा व खऱ्या हस्तीदंती दांताचा हुबेहुब आकाराचा हत्ती ठेवलेला आहे त्याचें काम वाखाणण्यालायक आहे. दरबार दिवाणखान्यापुढल्या खुल्या गच्चीवरून सभोंवारचा सुंदर देखावा दिसतो. हा सर्व प्रांत अगदीं सपाट असून कसा गर्द वृक्षांनीं गच्च भरलेला आहे हें चांगलें दिसून येतें. येथून जिकडे पहावें तिकडे हिरवी हिरवी गार झाडीच झाडी दिसते; ही निव्वळ रानाची झाडी नव्हे तर उपयुक्त पिकांच्या झाडांची झाडी आहे असें कळलें म्हणजे या प्रांताच्या सुपीकतेची चांगली कल्पना मनांत येते. राजवाड्याच्या दोन्ही बाजूंच्या टेंकड्यांवर आंब्यांची व इतर फळझाडांची खूप लागवड केलेली आहे. त्या फळबागेंतून आम्ही खालीं आलों. आमच्या सुदैवानें आम्हांला दोन मैल परत चालत जावें लागलें नाहीं. राजवाड्यापुढचा रस्ता टाकतों तोंच एक बस आम्हांला मिळाली व बाराचे सुमारास आम्ही बिऱ्हाडीं आलों. अशा रीतीनें **अर्नाक्युलम्** राजधानीचें माझें दृश्यदर्शन संपलें. सरकारी कचेऱ्या व कोर्टें, महाराजा कॉलेज व हॉस्पिटल या सार्वजनिक इमारती पार्क रस्त्याला लागूनच असल्यामुळें त्या आम्हीं आंत जाऊन पाहिल्या नाहींत. पण या राजधानीबद्दल माझा बराच अनुकूल ग्रह झाला हें खरें. अन्तःसरोवराच्या कांठीं असल्यामुळें या राजधानीच्या शहराला निसर्गरमणीयता आली आहे. पण या राजधानीपेक्षां या संस्थानचें बंदर कोचीन हें अधिक मोठें शहर व जास्त वस्तीचें व व्यापाराचें स्थळ आहे. केरळ प्रांताच्या या प्रख्यात बंदराचें वर्णन दुसऱ्या बंदराबरोबर एका स्वतंत्र प्रकरणांत करणें बरें.

---

# प्रकरण ५ वें

## केरल प्रांतांतील तीन देवळें

केरल प्रांतांतील प्रख्यात बंदराच्या वर्णनाचे आधीं या लहानशा प्रकरणांत बंदराचे अगोदर पाहिलेल्या देवळांचें वर्णन करणें वावगें होणार नाहीं. केरल प्रांतांतील देवळें दक्षिण हिंदुस्थानांतील देवळां-प्रमाणें सर्व हिंदूंचीं यात्रास्थानें बनलेलीं नाहींत किंवा शिल्पकलेच्या दृष्टीनेंही त्यांचें मोठें महत्त्व नाहीं. त्यांपैकीं एका देवळाचें नांवही चार पांच वर्षांखालीं कोणास ठाऊक असेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. पण **महात्मा गांधी** व केलापन् यांच्या मंदिरप्रवेशाच्या बाबतींतील चळवळीपासून सर्वतोमुखीं झालेलें देऊळ **गुरुवायूर** हें मी त्रिचूरास दोन अडीच दिवस राहिलों तितक्यांत पाहून घेतलें; दुसरें नवें देऊळ श्रीमत् आद्यशंकराचार्यांचें जन्मठिकाणचें देऊळ अर्नाक्युलमला जातांना वाटेंत थोडा वेळ थांबून पाहिलें. तिसरें **जनार्दनाचें** देऊळ क्किलॉनहून त्रिवेंद्रमला जातांना पाहिलें. याप्रमाणें हीं तिन्ही प्रेक्षणीय स्थळें मुख्य प्रवासस्थानांच्या जरा बाजूस असल्यामुळें थोडासा वेळांत वेळ काढून पाहिलीं. तेव्हां जरी हीं निरनिराळ्या वेळीं पाहिलीं तरी त्यांचें एकत्र व एका प्रकरणांत वर्णन करणें सोयीचें आहे.

पहिलें अगदीं अलीकडे प्रख्यातीस आलेलें गुरुवायूर देऊळ. हें त्रिचूरच्या पश्चिमेस आरबी समुद्रापासून दीड दोन मैल आंत ब्रिटिश मलबारामध्यें त्याच नांवाच्या गांवीं आहे. तेथें नेहमीं मोटार बसेस जातात. पण मी त्रिचूरला गेलों त्यावेळीं ब्रिटिश मलबारमध्यें मोटार बसेसचा संप झाला आहे असें कळलें हें एक कारण; शिवाय मला गुरुवायूर देऊळ पाहण्यांत अर्ध्या दिवसापेक्षां जास्त वेळ खर्चावयाचा नव्हता हें दुसरें कारण, म्हणून आम्हीं जातांयेतांची स्वतंत्र मोटारकार भाड्यानें ठरविली. जातां-

स्थळ प्रत
सं. नं. ५१
ता.

येतांचें वीस मैलांचें भाडें ७ रुपये पडलें. सुदैवानें आम्हांला फोर्डच्या नव्या मॉडेलची नवीच मोटारकार मिळाली. आम्ही सकाळीं सात वाजतां गुरुवायूरला जाण्यास त्रिचूरहून निघालों. पहिल्या पंधरा मैलांचा रस्ता कोचीन संस्थानामधून आहे; शेवटचा पांच मैलांचा रस्ता ब्रिटिश मुलखांतून आहे. हा सर्व भाग सावंतवाडी ते शिरोडें या भागासारखा आहे. दोन्ही ठिकाणचें अंतरही जवळजवळ सारखें आहे. हा प्रदेश सारखा उंचसखल व वरखालीं असा आहे. उंच भागांत नारळी, पोफळी व केळीच्या बागा आहेत; तर सखल भाग अगदीं सपाट असून त्यांत हिरवीं हिरवीं गार भातशेतें आहेत; येथें नदीच्या कालव्यानें पाणी-पुरवठा केला असल्यानें वर्षांत भाताचीं तीनतीन पिकें काढतात. दर मैलीं बऱ्याच दाट वस्तीचा हा भाग आहे तरी वस्ती बागांत व शेतांत पांगलेली आहे. यामुळें येथें एक खेडें संपून दुसरें खेडें आलें असें मुळींच सांगतां येत नाहीं; तुटक तुटक पण सारखी वस्तीच लागत राहते. येथली सर्व जमीन तांबडसर आहे. भातशेतीची जमीन मात्र पांढुरकी काळवट आहे. आम्ही दीड एक तासानें गुरुवायूर गांवीं येऊन पोहोंचलों. रामस्वामींच्या नातेवाईकाचे घरीं सर्व कपडे ठेवून आम्हीं देवळानजीकच्या चारी बाजूंस पायऱ्या असलेल्या तलावावर गेलों. तेथें स्नान करून धूतवस्त्र नेसून व अंगावर उपरणें घेऊन देवळांत शिरलों. देवळाला मागचें व पुढचें अशीं दोन दारें आहेत. आंत गेल्यावर पितळी पत्र्यानें मढविलेले उंच खांब असून त्यांना पितळेचे लामणदिवेच दिवे लोंबत ठेवलेले आहेत. देवळाच्या सभोंवार पितळेचे शेकडों दिवे कायमच्या हुकांवर बसविलेले आहेत. देवळाच्या प्रवेशद्वारावर द्राविडी पद्धतीचीं गोपुरें मुळींच नाहींत; तर पेल्याच्या आकाराच्या कौलारु छपराच्या देवडीवजा इमारती आहेत; देवळांत प्रदक्षिणामार्ग व त्याचे प्राकार आहेत; पण द्राविडी पद्धतीचें मोठ्या नक्षीचें किंवा मूर्तिकलेचें काम नाहीं; देऊळ साध्या दगडी बांधणीचें आहे. हें देऊळ बालस्वरूप कृष्णाचें आहे. या देवळाचे पुजारी **नांबुद्री** ब्राह्मण आहेत; या देवळाचें

वार्षिक उत्पन्न पन्नास हजारांचे वर आहे. मलबारमध्यें या बालकृष्णाच्या देवळाला फार मान देतात; सब मलबार प्रांतांतून यात्रेकरू या देवाचे दर्शनास येतात. अस्पृश्यांना या देवळाचे रस्त्यापासून बऱ्याच दूर अंतरावर एक धर्मशाळेसारखी खुली बांधलेली जागा आहे तेथपर्यंतच जाण्याचा अधिकार आहे. एकंदरींत दक्षिण हिंदुस्थानांत व मलबारांत देवाचें दर्शन घेण्याबाबत स्पृश्य जातींवरसुद्धां फार कडक निर्बंध आहेत. मग अस्पृश्य जातींची गोष्ट बोलावयासच नको. तेव्हां एका दृष्टीनें गुरुवायूर देवळाचे बाबतींत सत्याग्रहाच्या द्वारें मंदिरप्रवेशाचा बालेकिल्लाच प्रथम सर करण्याची कल्पना सुचली ती वावगी नाहीं असें मला वाटलें. या मंदिरप्रवेशाच्या कडक निर्बंधांत शिथिलता येऊन सर्व हिंदूमात्रास देवदर्शन घेतां यावें अशी व्यवस्था होणें हिंदुधर्माच्या दृष्टीनेंही आवश्यक आहे हें उघड आहे. आम्ही गुरुवायूर गांवीं गेलों तेव्हां महात्मा गांधींच्या आगामी भेटीचा विषय सर्वतोमुखीं होता. सनातनी लोक काळया निशाणांनीं महात्मा गांधींची संभावना करणार अशी वदंता होती. उलट महात्मा गांधींचा योग्य सत्कार करण्यासाठीं व त्यांचीं सार्वजनिक व्याख्यानें करविण्याकारितां गुरुवायूर गांवांत तरुणांची एक स्वागत कमिटी स्थापन झाली होती. त्या कमिटीच्या कचेरींत आम्ही गेलों व त्यांचें स्वागतकार्य यशस्वी रीतीनें पार पडो अशी इच्छा प्रदर्शित करून मी त्या स्वागत-कमिटीला एक रुपयाची वर्गणी दिली. मग लागलींच आम्ही परत येण्यास निघालों. परत येतांना आम्ही **चौडा गांवावरून** आलों. तेथें कालिकतहून आलेला खाऱ्या पाण्याचा होड्यांच्या रहदारीचा कालवा पाहिला. पूर्वकाळीं कालिकतपासून त्रिवेंद्रमपर्यंत दोन अडीचशें मैल मालाच्या वाहतुकीचा जलमार्ग होता. पण आगगाडी झाल्यापासून हा मार्ग तितका वाहता राहिला नाहीं असें कळलें.

दुसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे श्रीमत् आद्यशंकराचार्य यांचें जन्म-स्थान **कालदी** हें गांव व तेथील नवें देऊळ व घाट. शंकराचार्यांच्या

जन्मग्रामाबद्दल बरेंच दिवस वाद चालू होता. पण शृंगेरीमठाच्या विद्यमान शंकराचार्यांनीं पंधरा वीस वर्षांखालीं पूर्ण शोधाअंतीं कालदी हेंच शंकराचार्यांचें जन्मग्राम असें ठरवून तेथें शंकराचार्यांचें व शारदांबा देवीचें अशीं दोन छोटीं देवळें व नदीला घाट बांधला. हें गांव त्रिचूर ते अर्नाक्युलम् या रेल्वेरस्त्यावरील कालदी स्टेशनपासून पांच मैल दूर आहे. आम्हीं सकाळच्या सहा वाजतांच्या गाडीनें त्रिचूरहून निघालों, ते कालदी स्टेशनला साडेआठ वाजतां पोहोंचलों. त्रिचूरहून कालदी अवघें २८ मैल आहे. पण शोरानूर ते अर्नाक्युलम् या मीटर गेज रेल्वेचा ब्रॉड गेज रेल्वे रस्ता करण्याचें काम चालू असल्यामुळें वाटोवाट खोळंबा होत होता. रस्ता रुंद करण्याकरितां वाटोवाट भरावाचें काम चालू होतें; तसेंच मोऱ्या व पूल बांधण्याचें व वाढविण्याचें काम चालूं होतें. त्यांत नेलायी स्टेशनजवळ मोठा पूल चालू असून पुण्याच्या रानडे कॉंट्रॅक्टरांची मोठी पाटी पाहून एक प्रकारें समाधान वाटलें. एक महाराष्ट्रीयन कॉंट्रॅक्टर इतक्या दूरवर येऊन मोठमोठीं रेल्वेचीं कामें हातीं घेतात हें अभिमानास्पद आहे असें मला वाटलें. हा सर्व भाग बराच उंचसखल आहे. नदीनाले व पाटबंधारे वाटोवाट लागले. हा भाग सुपीकही दिसला. कालदी स्टेशनपासून कालदी गांव पांच मैल लांब आहे हें वर दिग्दर्शित केलेंच आहे. मोटारबस माणशीं तीन आणे भाडें घेते. या गांवांत नारळीचीं, पोफळीचीं, फणसाचीं व आंब्याचीं झाडें खूप आहेत. गांवांत अगदीं सामसूम दिसलें. शंकराचार्यांचें देऊळ गांवानजीक पण अलवाई नदीच्या कांठीं आहे. येथल्या सर्व इमारती अर्थात् अर्वाचीन व अर्वाचीन तऱ्हेच्या आहेत. शारदांबा देवी व शंकराचार्य यांचीं चालुक्य पद्धतीचीं कंगोऱ्या कंगोऱ्याचें छोटें शंकूसारखें शिखर असलेलीं दोन देवळें समोरासमोर आहेत. शारदांबा देवळाच्या जवळ अगदीं लहानशी स्मारक समाधी आहे. ती शंकराचार्यांच्या आईची आहे असें कळलें. दोन देवळांच्या मधोमध नदीला मोठा घाट बांधला आहे. आलवाई नदी बरीच मोठी असून


नदीला पाणीही पुष्कळ दिसलें. याच नदीचें पाणी अर्नाक्युलमला नेलें असून तें फार पाचक व स्वच्छ आहे असें कळलें. आलवाई नांवाचें अर्नाक्युलम्चे अलीकडे एक स्टेशन आहे. तें कोचीन संस्थानचें शीतल-निवासस्थान आहे. इतकें या नदीकांठचें हवापाणी उत्तम आहे. घाटा-वरून आम्हीं नदीच्या प्रवाहाशीं जाऊन पाणी चाखून पाहिलें. तों खरो-खरींच पाणी फार गोड व स्वच्छ होतें. नदी बरीच रुंद व खोल असून तींत पांढरी वाळू आहे. येथला सर्व देखावा आकर्षक आहे. शृंगेरीमठानें येथें एक वेदशाळा व एक वेदांतशाळा ठेविली आहे; विद्यार्थ्यांना दर-महा पंचवीस रुपयांची शिष्यवृत्ति देण्यांत येते. व त्यांची राहण्याची सोय केली जाते. जेवणाखाणाची व्यवस्था विद्यार्थ्यानें आपली आपण करावयाची असते. एकंदर दहा बारा विद्यार्थी शिकत असलेले दिसले. ज्या शंकराचार्यांनीं आपल्या अल्प आयुष्यांत सर्व हिंदुस्थान हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनानें हालवून सोडलें; ज्याच्या तत्त्वज्ञानाचा डंका सर्व जगभर पसरलेला आहे त्या अलौकिक पुरुषाचा जन्म या लहानशा गांवांत झाला हा किती विलक्षण चमत्कार ! पण जास्त चमत्काराची गोष्ट म्हणजे ज्या **नांबुद्री** ब्राह्मण जातींत शंकराचार्यांचा जन्म झाला त्या जातींत पुढें एकही पुरुष नांव लौकिकाचा कसा झाला नाहीं ! पण म्हणतात ना अलौकिक साधूचें चरित्र सर्वत्र अलौकिक असतें. त्यांतलेंच शंकरा-चार्यांचें चरित्र होय. अशा प्रकारचे विचार मनांत येत असतांना त्या शांत व गंभीर ठिकाणाहून आम्ही परत स्टेशनवर आलों व पुढें अर्नाक्युलमला गेलों.

तिसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे **जनार्दनाचें** देऊळ. हें सुंदर व निसर्ग-रमणीय ठिकाण क्विलॉनपासून त्रिवेंद्रमला जातांना वाटेंत पाहिलें. क्विलॉनपासून पंधरा मैलांवर **वरकाला** म्हणून स्टेशन आहे. तेथून जना-र्दनाचें देऊळ दोन मैल दूर आहे. मी सकाळीं सात वाजतां क्विलॉनहून आगगाडीनें निघालों. क्विलॉन सोडलें कीं जलमय, सफेत, सपाट भूमि-भाग संपून उंचवटयाचा तांबडया मातीचा प्रदेश लागतो. या भागांत



नं. ९ ] वरकाला : जनार्दनाचे देवळानजीकचा किनारा [ पान ५५

स्थळ प्रत



नं.१० ] कोचीन : मासे धरण्याचें चिनी जाळें [ पान ६४

मलबारांतील नेहेमींच्या नारळी, पोफळी, केळीच्या बागा तर आहेतच; पण **तापीओका** नांवाच्या पिकाची खूप लागवड केलेली दृष्टोत्पत्तीस आली. मोठ्या झाडांमधल्या उंचसखल तांवड्या जमिनीवर सारखीं तापीओकाचीं रोपें केलेलीं दिसलीं. **वरकाला** स्टेशननजीक बराच रुंदीचा भाग उंच व डोंगराळ असल्यामुळें ह्या स्टेशननजीक क्विलॉनच्या क्षार सरोवरांतून त्रिवेंद्रम्‌कडे गेलेल्या जलमार्गाचा कालवा एका मोठ्या बोगद्यांतून नेला आहे असें मला मागाहून कळलें. बाकी आधीं कळलें असतें तरी मला तें ठिकाण पहाण्यास वेळ नव्हता. तेव्हां या अपूर्व कालव्याचा एक फोटो मात्र मीं त्रिवेंद्रम्‌मध्यें विकत घेतला. **वरकाला** स्टेशनवर बैलांच्या गाड्या तयार असतात; जनार्दन देवळास जाऊन येण्यास साहा आणे घेतात. मी सामान हॉटेलमध्यें ठेवून बैलगाडीनें गेलों. बाकी चालतसुद्धां जाऊन येतां आलें असतें असें मला परत आल्यावर वाटलें. **वरकाला** हें गांव बरेंच मोठें दिसलें. हें ठिकाण सभोंवारच्या सपाट भूमिभागापेक्षां उंच असल्यामुळें व समुद्रकांठींच असल्यामुळें येथें उन्हाळ्यांत पुष्कळ लोक राहण्यास येतात. त्रावणकोरमधील हें एक निसर्गरमणीय शीतल निवासस्थानच आहे म्हणाना. जनार्दनाचें देऊळ गांवाचे शेवटीं एका टेंकडीवर आहे. टेंकडीचे पायथ्याशीं मोठा थोरला चारी बाजूंस घाट असलेला उत्तम तलाव आहे. त्यांत गायमुखांतून धो धो पाणी तलावांत पडत होतें. तलाव पुण्यानजीकच्या बनेश्वराच्या कुंडासारखा आहे. पण हा तलाव त्या कुंडापेक्षां फारच मोठा आहे.

मीं धर्मशाळेंत कपडे काढून ठेवले, व धोतर उपरणें पांघरून पायऱ्या चढून वर गेलों व देवदर्शन घेतलें. देऊळ मलबारांतील देवळांच्या पद्धतीचें आहे. देऊळ साध्या बांधणीचें पण प्रशस्त आहे. प्रदक्षिणा मार्ग खुलाच आहे. येथें **ब्रह्मदेवाची** मूर्ति आहे.

पण या देवळापेक्षां या जनार्दनाच्या समुद्रकिनाऱ्याचें मला विशेष नवल वाटलें व तो पाहून फार आनंद झाला. देवळाच्या टेंकडीसारखी

दुसरी एक टेंकडी नजीकच असून दोन टेंकड्यांच्यामध्यें अरुंद अशी सखल दरी आहे. या दोन टेंकड्यांच्या मधील सखल सपाटीवरच उत्तम तलाव बांधला असून त्यांतील झऱ्याच्या जीवंत पाण्याचा छोटा नाला खालीं समुद्राला जाऊन मिळाला आहे. देवळाच्या टेंकडीच्या बाजूनें लहानसा रस्ता गेला आहे. त्याचे उजवे बाजूस नारळीचीं झाडें आहेत व डाव्या बाजूस तांबडीलाल टेंकडी व त्यावर गर्द झाडी आहे. समोरच्या टेंकडीवर बंगला असून ती टेंकडी लाल रंगाच्या मातीची आहे. त्यावर लहान मोठीं झाडें आहेत. तलावाच्या खालच्या सखल भागांत एकाखालीं एक अशीं हिरवीगार भातशेतें आहेत. त्या तांबड्या लाल टेंकड्या त्यावरील लाल कौलांच्या इमारती, मधोमध हिरवीगार झाडें झुडपें, दरींत ती हिरवीगार भातशेती व पाटासारखा झुळुझुळू वाहणारा ओढा, त्याकडेची नारळाची रांग व त्याच्या शेजारून जाणारा तांबडा लाल शीतल छायेचा रस्ता हा देखावा पाहून कोणाचें मन प्रसन्न होणार नाहीं? हा रस्ता कांहीं फार लांब नाहीं. थोड्या वेळांत आरबी समुद्र आपल्या दृष्टीस पडतो; व तांबड्या भडक बारिक वाळूचें छोटें वाळवंट दिसतें. किती ती वाळू गुळगुळीत व नयनमनोहर आहे! दोन टेंकड्यांमधील दरीनें व ओढ्यानें बनलेलें हें वाळवंट आहे, पण दोन्ही बाजूंस शंभर दीडशें फूट उंचीच्या टेंकड्या भिंतीसारख्या उभ्या कापल्याप्रमाणें दृष्टीस पडतात. व निसर्गदेवीनें ठिकठिकाणीं किती आश्चर्यकारक प्रेक्षणीय स्थानें करून ठेविलीं आहेत हें पाहून मन थक्क होतें. या टेंकड्या नाना रंगी खडकांच्या थराच्या बनलेल्या आहेत; त्यांत खडकांना तांबड्या, पांढऱ्या, पिंवळया अशा रंगांच्या छटा चिटाप्रमाणें जणूं कांहीं दिल्या आहेत असा भास होतो; भूगर्भशास्त्रज्ञाला हे जनार्दनाचे खडक मोठे मौजेचे पण भूमातेच्या अन्तःस्वरूपाची माहिती देणारे वाटतील यांत शंका नाहीं. या ठिकाणावरून मला ब्रायटनच्या प्रख्यात चॉकक्लिफसची आठवण झाली. याप्रमाणें येथला भूमातेचा देखावा आश्चर्यकारक आहे; तर आरबी समुद्राचा देखावाही भव्य पण

मनोहारी आहे. केवढाल्या प्रचंड लाटा समुद्राकडून येत होत्या व मेघगर्जनेसारखा आवाज करून खडकांवर आपटत होत्या. मी त्या गुळगुळीत तांबड्या वाळवंटावरून एक फूट दीड फूट उंच असलेल्या खडकावर उभा राहून लाटांचा तो भव्य, भीषण, पण तितकाच आकर्षक देखावा पहातां पहातां एक मोठी प्रचंड लाट येऊन मी ज्या खडकावर उभा होतों त्यावर आदळून माझ्या पावलांवर पाणी आलें व खडकाचें क्षणिक बेट बनलें. यामुळें मी जरा घाबरलोंच; येथें उभें राहणें सुरक्षित नाहीं म्हणून लाट मागें गेल्याबरोबर खडकावरून ओढ्या शेजारच्या वाळवंटाशीं आलों. यावेळीं मला इंग्रजी इतिहासांतील **कॅन्यूट** व समुद्राच्या लाटा या गोष्टींची आठवण झाली व सृष्टिदेवीची शक्ति किती अचाट आहे हें पुनः एकदां प्रत्यक्ष अनुभवानें कळून आलें. हें निसर्गमनोहर ठिकाण किती वेळ पहात बसलें तरी समाधान होत नाहीं; पण परत जायचा व विशेषतः गाडीवाल्याचा लकडा मागें असल्यामुळें मी तेथून परत येऊन गाडींत बसून स्टेशनवर आलों व मग त्रिवेंद्रमच्या आगगाडींतून पुढें मार्गस्थ झालों. केरलांतील रेल्वेरस्त्यापासून कमी अधिक दूर असलेल्या तीन देवळांच्या वर्णनाचा अध्याय येथें पुरा झाला.

# प्रकरण ६ वें

## दक्षिण केरल प्रांतांतील तीन प्रख्यात बंदरें

केरल प्रांताच्या आतांपर्यंतच्या वर्णनावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, निसर्गदेवीची या प्रांतावर बहाल मर्जी असून तिनें या प्रांताला विपुल पाऊसपाणी दिलें आहे; इतकेंच नाहीं तर त्या विपुल पाऊसपाण्याचा पुरा उपयोग करून घेतां येण्यासारखी सुपीकच नव्हे तर **बहुविधपीक** जमीनही या प्रांताला बहाल केली आहे. पण इतक्या-वरच निसर्गदेवीची दानेच्छा पुरी झाली नाहीं, तर या मुबलक पाण्यानें सुपीक जमिनींत होणाऱ्या धान्यपिकांची, फळपिकांची व इतर रानांतील लाकूडफाट्यासारख्या व भूगर्भांतील दगडमातीसारख्या अवजड मालाची नेआण सुलभतेनें स्वस्तपणें व सदासर्वदा करतां यावी म्हणून स्वाभाविक जलमार्गांची देणगीही निसर्गदेवीनें या प्रांताला नजर केली आहे. ती देणगी म्हणजे केरळ प्रांतांतील **क्षारसरोवरें** ( इकडील इंग्रजी नांव 'बॅक वॉटर्स' किंवा युरोपांतील नांव 'लॅगून्स') हीं होत. या देणगीचा जास्त चांगला, जास्त प्रमाणावर व जास्त लांबवर उपयोग व्हावा म्हणून पूर्वकाळांतील केरलाधिपतींनीं सृष्टिदेवीनें दिलेलीं निरनिराळीं सरोवरें एकत्र जोडणारे व सरोवरांच्या पलीकडील शहरांस पोहोंचविणारे कालवे काढले व एकंदर केरल प्रांताच्या उत्तरेकडील **कॅलिकत** बंदरा-पासून जवळ जवळ **कन्याकुमारी**पर्यंत पसरलेल्या तीनशें मैलांच्या केरल प्रांताला सलग, सरळ, सुरक्षित व बारमाही जलमार्ग करून दिला. हे कृत्रिम कालवे काढतांना त्या राजवटींतील बांधकलाभिज्ञांना डोंगर कापावे लागले; व त्यांत बोगदे करावे लागले. व केव्हां केव्हां पाणी उंच करण्याकरितां 'जलकुलुपें' करावीं लागलीं. तेव्हां निसर्गदेवीची ही देणगी व पूर्वीच्या राजवटींतील कृत्रिम कालव्यांचें काम हीं दोन्हीही आश्चर्य-

कारक नाहींत काय? **सुएझचा** शंभर मैलांचा कालवा हें जगांतील आठवें आश्चर्य असें मानतात. या कालव्याच्या योगानें **लेसेप्सनें** दोन मोठे समुद्र कालव्यानें जोडून हिंदुस्थानचा लांबच्या पल्ल्याचा जलमार्ग हजारों मैलानें कमी केला म्हणून **लेसेप्सच्या** कृतीचें आपण मोठें कौतुक करतों. पण **लेसेप्सनें** तरी शंभर मैलांच्या हद्दींत स्वाभाविक असलेलीं दोन चार सरोवरें कालव्यानें जोडलीं व शेवटीं कालवा दोन्ही बाजूंस वाढवून दोन समुद्र सलग करून टाकले. याखेरीज त्यानें ज्यास्त काय केलें? केरलच्या जुन्या राजवटींत लेसेप्सच्यासारखेंच निरनिराळीं सरोवरें जोडण्याचें काम कालव्यांच्या योगें केलेलें होतें व उत्तर व दक्षिण केरलांतील मोठमोठीं शहरें जलमार्गानें जोडलीं गेलीं होतीं. तेव्हां या केरलाधिपतींच्या कृतीचें लेसेप्सच्या कृतीइतकें कौतुक केलें पाहिजे. सुएझ कालव्याइतकेच केरलांतील कालवे व जुने जलमार्ग आश्चर्यकारक आहेत यांत शंका नाहीं. मला तरी केरल प्रांतांतील कालव्यांचें व जलमार्गांचें सुएझ कालव्याइतकेंच आश्चर्य वाटलें हें कबूल करणें भाग आहे. इतकी पूर्व प्रस्तावना करून दक्षिण केरल प्रांतांतील बंदरांच्या व जलमार्गांच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या दृश्याकडे वळूं या.

मागच्या एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हल्लींची कोचीन संस्थानची राजधानी **अर्नाक्युलम्** ही कोचीन क्षार सरोवराच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. त्या क्षार सरोवराचे पश्चिमेस दक्षिण केरल प्रांताचें माझ्या प्रत्यक्ष अवलोकनांत आलेलें पाहिलें बंदर **कोचीन** होय. कोचीन शहराच्या काय, पण सर्वच केरल प्रांताच्या पश्चिमेस आरबी समुद्र आहे व त्या दृष्टीनें महाराष्ट्रांतल्याप्रमाणें केरल प्रांतांत खुल्या समुद्रावरील बंदरें जागोजाग आहेत. पण कोचीन बंदराचा विशेष हा कीं, मुंबई बंदराप्रमाणें हें बंदर वारा व लाटा यांपासून अलिप्त व सदा सुरक्षित असें बनलें आहे व त्याचें कारण कोचीनचें क्षार सरोवर हें होय. या क्षार सरोवराचें मुख कोचीनच्या उत्तरेस आहे.

या रुंद व खोल मुखांतून खारें पाणी सरोवरांत येऊन तें सरोवर कोचीनच्या उत्तरेस व दक्षिणेस लांबच लांब सारखें पसरलेलें आहे. त्यांतल्या त्यांत या सरोवराचा विशेष हा आहे कीं, येथें पाणी साठ फूट खोल आहे. तेव्हां मोठमोठीं गलबतें व आगबोटी आंत बंदरांत खुशाल येऊं शकतात. म्हणूनच कोचीन हें फार पुरातन काळापासून प्रख्यात बंदर म्हणून नांवाजलेलें आहे. हल्लीं तर हिंदुस्थान सरकार, त्रावणकोर संस्थान व कोचीन संस्थान या तिघांच्या संगनमतानें, सहकार्यानें व समाईक भांडवलानें कोचीन बंदर वाढवून पहिल्या प्रतीचें करण्यांत येत आहे. खेरीज या बंदराचा व्यापार व उपयुक्तता वाढविण्याकरितां शोरानूरपासून अर्नाक्युलमपर्यंत सध्यांच्या मीटर गेजच्या रेल्वे रस्त्याचें ब्रॉड गेजमध्यें रूपांतर करण्याचें काम चालू आहे. क्षार सरोवरावर सर्वांत अरुंद ठिकाणीं मोठा उंच पूल बांधून रेल्वे रस्ता खुद्द कोचीन शहरांत व बंदरच्या धक्क्यापर्यंत आणण्याची योजना चालूं आहे. ही आगगाडी झाल्यावर कोचीन बंदर हें पहिल्या प्रतीचें बंदर होईल यांत शंका नाहीं. मग कालें करून कोचीन बंदराला **मुंबई, कराची** व **कोलंबो** यासारखें महत्त्व येईल असा सुमार दिसतो. पण हें घडून येण्यास सर्व योजना पूर्ण अंमलांत आली पाहिजे हें उघड आहे. आम्ही अर्नाक्युलमहून कोचीन बंदर पाहण्यास अर्नाक्युलमला आल्याचे दुसरें दिवशीं दोन प्रहरीं निघालों. अर्नाक्युलम्‌पासून कोचीनपर्यंत सरोवरांतील अंतर दोन मैल आहे. तेथें अर्ध्या अर्ध्या तासानें मोटार बोटी जातात येतात. मोटार बोटी लागण्याचे धक्के साधे लांकडी आहेत. नारळाच्या उभ्या व जवळ जवळ पुरलेल्या सोटांवर लाकडी जाड फळ्या टाकल्या आहेत. पण मोटार बोटी धक्क्याला लवकर लागतात, वेळ फार मोडत नाहीं; इतकें या सरोवराचें पाणी खोल आहे. अर्नाक्युलम्‌हून कोचीनला पोहोंचण्यास अर्धा तास लागतो. तें विस्तीर्ण क्षार सरोवर अगदीं संथ व शांत असल्यामुळें मोटार बोट मुळींच हालत नाहीं व या छोट्या जलवाहनाची मोठी मौज वाटते.


या विस्तीर्ण क्षार सरोवरांत अनार्क्युलम् व कोचीन शहर यांचे आसपास दोन तीन बेटें आहेत. अर्नाक्युलम् शहर सरोवराच्या बाजूस अर्ध वर्तुळाकार पसरलेलें आहे व या अर्ध वर्तुळाचे मधोमध एक छोटें सुंदर सरोवर आहे. त्याचें नांव **बोलघाटी** असें आहे. हें छोटें सरोवर गर्द हिरव्यागार झाडींनें सुशोभित झालेलें आहे. सरोवराला लागून पांढऱ्या शुभ्र रंगाची आवार भिंत दुरून दिसत असून आवाराचे आंतील बंगलाही चांगला स्पष्ट दिसतो. हेंच कोचीन दरबारीं असलेल्या रेसिडें-टाचें वसतीचें ठिकाण होय. येथें गव्हर्नर व व्हाईसरॉय अशा मोठ्या नामांकित पाहुण्यांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था करण्यांत येते; नुकतेच व्हाईसरॉय लॉर्ड विलिंगडन कोचीनला भेट देऊन गेले ते याच सुंदर बेटावर उतरले होते असें कळलें. अर्नाक्युलम्चा धक्का टाकला म्हणजे मोटारबोट प्रथम समोरच्या एका बेटानजीक जाते. कोचीन शहर व अर्नाक्युलम् शहर यांना जोडणाऱ्या सरोवरांत हें बरेंच लांब व अगदीं अरुंद असें बेट आहे. हें बेट म्हणजे जणूं कांहीं सृष्टि-देवीनें कोचीन बंदराकरितां मुद्दाम तयार केलेला नैसर्गिक लांबलचक धक्काच होय. कारण या बेटाचे दोन्ही बाजूंस साठ साठ फूट खोल पाणी आहे. कोचीनच्या आरबी समुद्रावरील तोंडाला वाळूचा व मातीचा बाणकोटच्या बाऱ्याप्रमाणें बारा सांचतो व बंदराचें तोंड अरुंद व उथळ होत जातें. जेव्हां कोचीन बंदर वाढवून मोठमोठ्या बोटींची जा ये होण्यासारखें पहिल्या प्रतीचें बंदर करण्याची योजना निघाली तेव्हां हा बारा खणून काढून तो रुंद व खोल करण्याचें ठरलें. लॉर्ड विलिंग्डन नांवाच्या ड्रेजरच्या साहाय्यानें (या बंदराच्या वाढीची व सुधारणेची योजना लॉर्ड विलिंगडन हे मद्रासचे गव्हर्नर असतांना त्यांच्या प्रोत्साहनानें सुरू झाली म्हणून त्या कामाकरितां आणलेल्या ड्रेजरला त्यांचेंच नांव देण्यांत आलें) बाऱ्यांतील सर्व गाळ व दगड माती या बेटाच्या सखल व खाजणाच्या भागांत टाकण्यांत येऊन हें बेट आतां सपाट व सरोवराच्या पाण्यापेक्षां किंचित् उंच असें कर-

पर्यंत आलें आहे. समुद्राच्या मुखापासून बंदराच्या दुसऱ्या टोंकापर्यंत सारखा साठ फूट खोलीचा मार्ग सदा खुला राहावा व पुन्हा बारा बनूं नये म्हणून बंदरांतला गाळ सारखा बाहेर काढून टाकण्याची कायमची व्यवस्था करण्यांत आली आहे. याच बेटावर नवीन कस्टम कचेरी, बंदर एंजिनीयरची कचेरी इत्यादि नव्या सुंदर इमारती बांधण्यांत आल्या आहेत. याच बेटाच्या दोन्ही बाजूंस आगबोटी थेट धक्क्याला लागतील अशा तऱ्हेचा दुहेरी धक्का बांधण्यांत यावयाचा आहे; ब्रॉडगेज रेल्वे झाली म्हणजे या धक्क्याचें काम हातांत घेण्यांत येईल असा अंदाज आहे. या बंदराचें सर्व काम पुरें झालें म्हणजे बेटाच्या दोन्ही बाजूंना बारा बारा **बर्थस्** ( आगबोट बंदरांत थांबण्याकरितां तिला लागणारी पाण्यांतील जागा ) होतील इतकें हें बंदर मोठें आहे. ही सर्व माहिती बंदर खात्यांत असलेले श्री. **व्यंकटेश्वरम्** हे एंजिनीयर आमचे बरोबर असल्यामुळें मोटार बोटींतून जातांनाच व बंदरबेटाला वळसा घालतांनाच मला मिळाली. या बेटाला वळसा घातला म्हणजे कोचीनचें हल्लींचें गलबतें, जहाजें, फत्तेमाऱ्या होड्या व मोटार बोटी लागण्याचें बंदर येतें. आम्ही बोटींतून धक्यावर उतरलो व लागलीच कोचीन शहर पहाण्यास निघालों.

सध्यांचें कोचीन शहर व बंदर हें तीन नांवाच्या शहराचें त्रिकूट आहे. डाव्या हातच्या भागास **ज्यूटाऊन**-व्हाईट व ब्लॅक (पांढरे व काळे) म्हणतात; मधल्या भागास **मटनचेरी** म्हणतात व उजव्या हातच्या व बंदराचे दक्षिणोत्तर टोकांचे भागास **ब्रिटिश कोचीन** म्हणतात. यांपैकीं ब्रिटिश कोचीन हा अवघा ८०० एकर जमीनीचा तुकडा आहे; त्यापैकीं फक्त वीस एकर काय ते बंदराच्या मुखाच्या उत्तरेस आहेत; पण या छोट्या जमीनीच्या तुकड्यामुळें कोचीन बंदराचें व केरल प्रांतांतील क्षार सरोवराच्या जलमार्गाचें नाकच ब्रिटिशांच्या हातीं असल्याप्रमाणें आहे असें मला वाटलें व जिब्राल्टरच्या ब्रिटिश सामुद्रधुनीची मला आठवण झाली. या कोचीन बंदराला वास्कोडि गामा सन १४९८ मध्यें केप ऑफ गुड होपच्या मार्गानें आला

व त्यानें हा जमिनीचा तुकडा व कोचीन बंदराचें नाक पोर्तुगाल देशाच्या अंमलाखालीं आणलें. येथें पोर्तुगीझ लोकांनीं लागलीच किल्ला व कॅथिड्रल बांधलें. या जमिनीच्या तुकड्याचा ताबा पोर्तुगीझ लोकांकडून डच लोकांकडे सन १६६३ मध्यें गेला. पुढें सन १७९५ मध्यें या तुकड्याचा ताबा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडे आला. त्याच जमीनीच्या तुकड्यावर ब्रिटिश कोचीन शहर वसलेलें आहे. आम्हीं प्रथमतः डाव्या हाताकडे असलेल्या पांढऱ्या ज्यूटाऊनकडे गेलों. आम्ही गेलों ते एका मागच्या गल्लीनें शहरांत गेलों. म्हणून त्या शहराबद्दल माझा फारसा अनुकूल ग्रह झाला नाहीं. आम्हीं थेट पांढऱ्या सिनेगॉगपर्यंत म्हणजे ज्यू लोकांच्या देवळापर्यंत गेलों. तें बंदच होतें; पण साडेसहाच्या नंतर उघडेल असें आम्हांला कळलें. इतका वेळ थांबण्यास आम्हांला सवड नसल्यामुळें दिसला तेवढाच सिनेगॉगचा बाह्य देखावा पाहून आम्हीं पुढच्या मुख्य रस्त्यानें परत फिरलों. सिनेगॉगच्या आवारांत थेट पांढऱ्या शुभ्र युरोपियन वर्णाचीं व सुवर्णरंगी केसांचीं मुलें मुली खेळतांना पाहून मला विलक्षण आश्चर्य वाटलें. ही पांढऱ्या ज्यू लोकांची संख्या केवळ शेंकड्यांनीं मोजण्याइतकी लहान आहे. पण ही छोटीशी पांढऱ्या ज्यू लोकांची टोळी मलबारांत इसवी सन चारशेंच्या सुमारास आली असून त्यांचेजवळ मलबारच्या राजाचा ताम्रपट आहे असें कळलें. सभोंवार लाखांनीं मोजणाऱ्या काळ्या वर्णाच्या लोकांमध्यें येवढ्याशा छोट्या शुभ्रवर्णी टोळीनें आपलें स्वतंत्र अस्तित्व व आपला शुभ्रवर्ण इतकीं शतकें कसा कायम ठेवला हें एक मोठें सामाजिक गूढ कोडेंच आहे असें मला वाटलें. पण यावरून हिंदुस्थानांत जातींचा टिकाऊपणा किती आश्चर्यकारक आहे हें दिसून येतें यांत शंका नाहीं. मागच्या गल्लीपेक्षां मुख्य रस्ता अर्थात् चांगला आहे व त्याच्या दोन्ही बाजूंस या पांढऱ्या ज्यू लोकांचीं दुकानें आहेत; या पांढऱ्या ज्यू टाऊननंतर काळ्या ज्यू लोकांची वस्ती सुरू होते; त्यांचें एक काळें सिनेगॉग आहे. पण पांढरें सिनेगॉग पाहिलें नाहीं; तेव्हां

काळें पहाण्याच्या भानगडींत आम्ही पडलों नाहीं. मग मधल्या मटनचेरी शहराच्या बाजारांतून आम्ही ब्रिटिश कोचीनकडे तडक गेलों. कोचीन शहर व बंदर हें केवढें मोठें व्यापाराचें ठिकाण आहे, हें या मटनचेरींतील लांबच लांब बाजारपेठेवरून दिसून आलें. या बाजारांत नाना भाषा बोलणारे, नाना जातींचे व नाना धर्मांचे व्यापारी दृष्टीस पडले. तेव्हां मोठमोठ्या व्यापारी शहरांप्रमाणें कोचीन शहर हें जातिनिरपेक्ष सार्ववर्णिक असें शहर आहे असें वाटलें. मटनचेरीचा मोठा लांब बाजार टाकल्यावर आम्ही ब्रिटिश कोचीनमध्यें शिरलों व लवकरच कोचीनच्या पांढऱ्या वाळूच्या सुंदर वाळवंटावर आलों. येथून कोचीन बंदराचें आरबी समुद्राचें मुख व त्या मुखाशीं असलेलें वायपेन बेट दिसत होतें. या वाळवंटाचे एका टोकास कोचीनचें दीपगृह आहे. कोचीनचें वाळवंट सुंदर आहे. याचे डाव्या हातास सरोवराचे कांठीं विलक्षण आकाराचीं वाकड्या-तिकड्या दांडावर बांधलेलीं जाळीं फारच आश्चर्यकारक आहेत. यांना मासे धरण्याचीं चिनी जाळीं म्हणतात. प्रथमतः डच लोकांनीं हीं जाळीं या कोचीन बंदरांत आणिलीं. अशा तऱ्हेचीं मासे धरण्याचीं जाळीं जागोजाग या सरोवरांत पुढें मला दिसलीं. पण कोचीन वाळवंटावर प्रथमतः हें जाळें पाहिलें तेव्हां हें विचित्र व विलक्षण कोळ्याच्या जाळ्यासारखें यंत्र काय आहे याचें मला मोठें नवल व गूढ वाटलें यांत शंका नाहीं. याची कल्पना शब्दांनीं देणें शक्य नाहीं; कांहींशी कल्पना फोटोवरून येईल. नंतर साडेसाताची मोटार बोट गांठावी म्हणून आम्ही ब्रिटिश कोचीनच्या प्रिन्सेसरोड या प्रसिद्ध व प्रशस्त रस्त्यानें मोठ्या झपाट्यानें चालत चाललों; डच काळच्या कॅथीड्रलवर ओझरती नजर टाकली. तें साध्याच पण सुबक बांधणीचें दिसलें. जुनें कस्टम हौऊस, एंजीनीयरांची कचेरी व इतर ब्रिटिश इमारती तशाच ओझरत्या पाहिल्या. या वाटेनें येतांना माल सांठवावयाच्या मोठमोठ्या इमारतीच इमारती व मोठमोठ्या आग-बोटी व गलबतें चालविणाऱ्या कंपन्यांच्या कचेऱ्या लागतात. कालवा



नं. ११ ] कोचीन : सेंट फ्रॅन्सीसचें प्रार्थनामंदिर [ पान ६४



नं १२ ] आलेप्पे : जॉली बोटी व होड्या लागण्याचा धक्का [ पान ६९

ओलांडला तोंच आम्ही संस्थानच्या कोचीनमध्यें आलों व पुन्हां एकदां मटनचेरीच्या बाजारांतूनच गेलों. आतां बाजारांत जिकडे तिकडे दिव्यांचा लकलकाट दिसत होता. धापा टाकीत टाकीत आम्हीं धक्क्याशीं आलों व मोटारबोटींत चढलों, तोंच बोट चालू झाली. मोठ्या घाईनें धावपळ करीत आल्यासारखी साडेसातची बोट गांठली म्हणून आम्हांला आनंद झाला व त्या आनंदांत आम्ही आमचे चालण्याचे श्रम पार विसरून गेलों. रात्रीच्या वेळीं कोचीनच्या या क्षार पण शांत सरोवरांतून बोटीनें जाण्याची फारच मौज वाटते. तें सरोवराचें हिरवट नीळसर पण चकाकणारें पाणी, जिकडे तिकडे दिसणारे दिवे व मधलें बेट ओलांडून अर्नाक्युलम्‌च्या बाजूच्या सरोवर-भागामध्यें आल्यावर **अर्विन**पार्कच्या बाजूस लावलेल्या पौर्णिमेच्या चंद्र-प्रकाशाप्रमाणें पांढरा चकचकीत प्रकाश पाडणाऱ्या विजेच्या आर्क दिव्यांची ती लांबच लांब रांग, व त्या रांगेचेंच पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब हा देखावा विलक्षण आकर्षक व आनंददायी वाटला. या विलक्षण दृश्यदर्शनाचा लाभ झाल्यामुळें घाईघाईनें व काळोख पडल्यावर कोचीन बंदर पाहिल्याबद्दल मनाला वाईट न वाटतां उलट दिवसा बंदर पाहिलें असतें तर रात्रीच्या या अद्वितीय देखाव्यास मी मुकलों असतों असें मला वाटलें. झालें, माझा अर्नाक्युलम् येथला निवास व केरलच्या कोचीन बंदराचें वर्णनही संपलें. दुसरे दिवशीं साडेदहाच्या मोटार बोटीनें मी सरोवराच्या जलमार्गानें **आलेप्पे** या केरल प्रांताच्या दुसऱ्या प्रख्यात व प्राचीन बंदराकडे जाण्यास निघालों.

अर्नाक्युलम् धक्क्यावरून मोटार-बोट निघून आदल्या दिवसाप्रमाणें कोचीन धक्क्याला अर्ध्या तासांत आली. येथें बोट अर्धा तास थांबली. सेकंड क्लासचें भाडें आलेप्पेपर्यंत १० आणे पडलें; कोचीनहून तर फारच कमी भाडें पडतें असें मला कळलें. येथें तास दीड तासाच्या अंतरानें आलेप्पेस जाण्यास बोटी निघतात; व लोकल गाड्यांप्रमाणें येथें मोटार बोटींची रहदारी रात्रंदिवस चालते. थर्ड क्लासचें भाडें तर चारसहा

आणेच पडतें. इतका हा जलमार्ग स्वस्ताईचा आहे. मात्र खुष्कीच्या मोटारीच्या मार्गापेक्षां या जलमार्गानें जाण्यास जास्त वेळ लागतो. कोचीनपासून आलेप्पे सुमारें चाळीस बेचाळीस मैल आहे; पण आम्हांला आलेप्पेस पोहोंचण्यास सायंकाळचे साडे सहा म्हणजे कोचीनहून निघाल्यापासून सात तास लागले. पण हा जलप्रवास मोठ्या मजेचा व सुखाचा होतो यांत शंका नाहीं. नेहेमीं जाणारे लोक तर रात्रीं सुखानें झोपून हा प्रवास करतात व सकाळीं आलेप्पेला जातात असें मला कळलें. तेव्हां मला कोंकणांतील जुन्या काळच्या रोहें ते रेवदंडा या गलबतांतील रात्रीच्या सुखकर जलप्रवासाची आठवण झाली. पण मला आलेप्पेचा जलप्रवास पहिल्यांदा व एकदांच करावयाचा होता व सरोवराच्या सभोंवारची निसर्ग रमणीयता पहावयाची होती. म्हणून मी दिवसां साडे-दहाच्या मोटार बोटीनें गेलों.

कोचीनहून आमची बोट सरोवराच्या पश्चिम किनाऱ्यानें गेली. त्यामुळें कोचीन बंदराचा पुरातनपणा व प्रचंडपणा माझ्या आपोआप दृष्टीस पडला. लंडनच्या टेम्स नदींतून प्रवास करतांना ज्याप्रमाणें मैलच्या मैल नदीला धक्केच धक्के असलेले दिसतात व गलबतांतून मालाची काढघाल सारखी चालू असते तशा तऱ्हेचाच देखावा कोचीन बंदराचा व एकंदर या जलमार्गाचा दिसून आला. जांभ्या दगडांनीं बहुतेक सर्व किनारा बांधून काढलेला दिसला. जवळजवळ प्रत्येक घरापुढें व दुकानापुढें — कारण घरांचीं व दुकानांचीं तोंडें सरोवराकडे आहेत — लहानसा पुढें आलेला धक्का बांधलेला पाहून मला तर आश्चर्यच वाटलें. मात्र हे धक्के दगडी किंवा मोठ्या खर्चाचे आहेत असें मुळींच नाहीं. नारळाच्या सोटाचे तुकडे जवळ जवळ पाण्यांत दुरांगा खोल पुरतात व त्याला वरून नारळाच्या किंवा दुसऱ्या कसल्या पाणीखाऊ झाडांच्या तक्त्यांची तक्तपोशी करतात कीं झाला सुंदर, सोपा व स्वस्त धक्का तयार ! अशा तऱ्हेचे धक्के सारखे लागत होते. यामुळें कोचीन बंदर केव्हां संपलें व दुसरीं खेडीं केव्हां लागलीं हें सुद्धां कळलें

नाहीं. केरल प्रांताचें हें सरोवर कांहीं ठिकाणीं बरेंच रुंद आहे; पण सामान्यतः त्याची दीड दोन मैल रुंदी असावी. सुमारें १ वाजतां म्हणजे कोचीनहून निघाल्यापासून दीड तासानें **आरुकुटी** गांवाला बोट आली. येथें कोचीन संस्थानची हद्द संपून त्रावणकोर संस्थानची हद्द लागते. यामुळें जकातीकरितां येथें सामानाची तपासणी होते. मी देश पाहण्याकरितां आलेला प्रवासी आहें असें पाहून जकात अंमलदारानें माझी ट्रंक पाहिल्यासारखें केलें व त्यावर परवानगीची खडूची खूण केली; इकडे काय किंवा लंकेंत काय तपासणीची हीच तऱ्हा व परवानगीची अशीच खडूच्या खुणेची रीत दिसली. आमच्या बोटीचें पुढचें थांबतें बंदर **वायकोम** हें होतें. हें सरोवराच्या पूर्व बाजूस असून मोठें शहरवजा गांव दिसलें. चांगल्या चांगल्या इमारती, मोठ्या बागा व नारळाच्या सोटाचेच का होईना पण पुष्कळच धक्के दिसले. बंदरांत गलबतें, होड्या वगैरेही पुष्कळ दिसल्या, यावरून हें त्रावणकोर संस्थानातलें एक मोठें गांव आहे असें तत्काळ कळलें; शिवाय मार्गदर्शक पुस्तकावरून येथें एक प्रसिद्ध शिवालय असून त्याच्या दर्शनाकरितां दर मार्च व दिजंबर महिन्यांत दूरदूरचे यात्रेकरू येतात हेंही समजलें. या **वायकोमला** आम्ही साडेतीन वाजतां पोहोंचलों. कोचीन व आलेप्पे यांचे साधारण मध्यावर हें गांव आहे. आणखी एका तासानें आमची बोट **थेनुरामकम** या गांवीं थोडा वेळ थांबली. हें गांव सरोवराच्या पश्चिमेस आहे. तें गांव टाकल्यावर मात्र सरोवर फारच रुंद होत चाललें व पूर्वेकडचीं गांवें व किनारा फार दूरवर गेला असें वाटलें. त्रावणकोरच्या नकाशांत पाहतां माझें हें वाटणें वस्तुस्थितिसूचक होतें असें दिसलें. कारण येथें खरोखरीं सरोवर मोठेंच झालेलें असून त्याचे पूर्व किनाऱ्यावर **कोटायम** नांवाचें **वायकोमप्रमाणें** मोठें गांव आहे; अर्थात् तें आम्हांला दिसणें शक्य नव्हतें; इतकें येथें सरोवर रुंदावलें आहे. आम्ही अर्थात् सरोवराच्या पाश्चिम किनाऱ्यानें चाललों होतों. जसजसें आम्ही आलेप्पे बंदरानजीक येऊं लागलों तसा तसा हा

सर्व देखावा एकदम बदलल्यासारखा झाला. प्रथमतः जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसूं लागलें.बारिक बारिक जमिनीच्या पट्ट्या जणूं कांहीं सरोवरांत घुसल्या आहेत असें वाटलें. पण मौज ही कीं या सर्व पट्ट्यांवर नारळांचीं झाडेंच झाडें होतीं व मधून मधून बागवानांच्या झोंपड्या होत्या; कांहीं कांहीं जमिनीच्या पट्ट्या इतक्या लहान होत्या कीं नारळांचीं चारच झाडें जमिनीच्या पट्टीच्या रुंद भागांत लावणें शक्य होतें. आपला सार्वत्रिक अनुभव म्हणजे जमिनीवर खोल किंवा उथळ पाणी असावयाचें; पण येथें मला विलक्षण देखावा दिसला तो असा कीं, येथें पाण्यावर जणूं कांहीं जमीन व जमीनीच्या पट्ट्या तरंगत आहेत; इतकी विलक्षण आलेप्पेनजीकची निसर्गरचना आहे. दुसरी चमत्काराची गोष्ट म्हणजे या क्षार सरोवरावर व जमिनीच्या पट्ट्यांच्या मधल्या कालव्यांसारख्या पाण्यावर कमलाच्या वेलींचे गुच्छच्या गुच्छ सर्वत्र पसरलेले होते. त्या वेलगुच्छांवर निळीं, पांढरीं, तांबूस कमळें व विलायती लिलीसारखीं फुलें फुललेलीं होतीं. हा देखावा तर अद्वितीय व विलक्षण आश्चर्यकारक वाटला. आलेप्पेच्या या सरोवरावरून मला श्रीनगरच्या **डाल** सरोवराची आठवण झाली. डाल सरोवराचें पाणी नीळसर पण अत्यंत निर्मळ होतें; या सरोवराचें पाणी खारें असल्यामुळें अर्थात् हिरवट काळसर व गढूळ होतें. सरोवर संपतें तोंच दिसणारा अति आश्चर्यकारक देखावा म्हणजे कृत्रिम कालव्याचा होय. कारण नकाशावरून मागाहून पहातां मला समजून आलें कीं आलेप्पे हें कोचीनप्रमाणें किंवा क्विलॉनप्रमाणें प्रत्यक्ष सरोवरावर असलेलें बंदर नाहीं. येथें सरोवर समुद्रापासून जरा पूर्वेकडेस सरकलें आहे व आलेप्पे हें अरबी समुद्रापासून दोनच मैल आंत आहे. म्हणजे आलेप्पे हें आरबी समुद्रावरील बंदरांप्रमाणें मुख्य समुद्रावरील खुलें बंदर असून कृत्रिम कालव्याच्या योगानें त्याला क्षार सरोवरावरील बंदरही बनविलें आहे. अशा तऱ्हेनें आलेप्पे हें केरळ प्रांताचें दुहेरी बंदर आहे. एडनच्या आखातामधून सुएझ कालव्यांतज्या प्रमाणें हल्लीं आगबोटी शिरतात त्याप्रमाणेंच आलेप्पे बंदरांत जातांना

थेट देखावा दिसतो. हा कृत्रिम कालवा आलेप्पे बंदरापर्यंत कमींत कमी तीन चार मैल तरी असावा. हा दोन्ही बाजूनें बांधलेला जांभ्या दगडांच्या साध्या रचईचा आहे. कालव्याच्या पाण्यांत कमलवेलींची व पाणवेलींच्या गुच्छांची रेलचेल आहे. कालव्याच्या दोन्ही बाजूंस सारखी नारळी पोफळीची दाट झाडी लावलेली आहे. कोठें तो सुएझ कालव्याचा रुक्ष व केवळ वालुकामय असा किनारा व कोठें या आलेप्पे कालव्याचा सुंदर बगीचा वजा असणारा गर्द छायेचा किनारा! या कालव्यांतून जातांना मला विलक्षण आश्चर्य व आनंद वाटला. सुएझसारखें कांहींसें काम आपल्या देशांत पूर्वकाळीं झालेलें पाहून आनंद वाटला; व असें आपल्या नजीकचें ठिकाण मीं आजपर्यंत पाहिलें नाहीं याबद्दल आश्चर्य वाटलें. असे मिश्र मनोविकार माझ्या मनांत यावेळीं उद्भूत झाले. लवकरच आमची बोट आलेप्पेच्या कोचीनकडील कालव्याच्या धक्क्याला लागली. येथें कालव्याच्या दोन्ही बाजूंस बोटीच बोटी उभ्या होत्या. छोट्या व उथळ नदीच्या दोन्ही तीरांला सारखे लांबच लांब घाट बांधलेले असावे त्याप्रमाणें आलेप्पेचा कालवा व त्याच्या बाजूचे पायऱ्या पायऱ्यांचे धक्के सारखे लांबपर्यंत पसरलेले दिसले. कालव्याच्या दोन्ही बाजूंस तांबडे लाल व रुंद असे रस्ते होते व त्यांच्या पलीकडे मोठमोठ्या इमारती दिसत होत्या. असा मोठा अद्वितीय देखावा आलेप्पे बंदरांत पहिलें पाऊल टाकल्याबरोबर माझ्या दृष्टीस पडला व मी आश्चर्यानें थक्क झालों. बंदरावर खूप गर्दी होती व माणसांची जाये चालू होती. कारण मागें सांगितल्याप्रमाणें या जलमार्गानें रात्रंदिवस बोटींची रहदारी चालू असते; त्यावेळीं कोचीनला जाणारी मोटार-बोट निघण्याच्या तयारींत होती. आलेप्पे हें प्रथम दर्शनींच मोठें गजबजलेलें बंदर व शहर वाटलें. असो.

मी आलेप्पे येथील म्युनिसिपालिटीच्या छत्रामध्यें रात्रीचा उतरण्यास गेलों. छत्र कालव्याच्या पुलावरून पलीकडे गेल्यावर लवकरच लागलें. छत्राच्या खोल्या प्रशस्त व स्वच्छ होत्या. मी पहांटेस साडेपांचला

उठून कॉफीपाणी करून आलेप्पेचें खुलें बंदर व आलेप्पेचें वाळवंट पाहण्यास गेलों. बंदर व वाळवंट शहराच्या पश्चिमेस दोन मैल दूर आहे. त्याला जाणारा रस्ता थेट बंदराच्या पिअरपर्यंत माल पोहोंचविण्याकरितां केलेल्या कालव्याच्या बाजूनेंच आहे. कालव्याचे दोन्ही बाजूनें खरोखरीं दोन समांतर रस्ते गेलेले आहेत. ते तांबड्या खडीचे व तांबड्या मातीचे लाल, प्रशस्त रस्ते दोन्ही बाजूंस होते; दोन्ही रस्त्यांच्या पलीकडे लागलेल्या मोठमोठ्या कारखान्यांच्या, दुकानांच्या व माल सांठविण्याच्या इमारती, वखारी व इतर राहतीं घरें सारखीं दुतर्फा होतीं. मध्यें तो कालवा बराच खोल पण सारखा बांधून काढलेला होता व जेथें बांधून काढलेला नव्हता तेथें गवतांनीं व झुडपांनीं त्याच्या बाजू झाकलेल्या होत्या. कालव्यामध्यें जागोजाग व केव्हां तर दोन दोन तीन तीन अशा छपरांनीं शाकारलेल्या होड्या नांगरलेल्या दिसत होत्या. असा मोठा विलक्षण देखावा सारखा दिसत होता. मी कालव्याचे उजव्या बाजूनें जात होतों. जातां जातां टुमदार व घंटेकरितां प्रवेशद्वारावरच उंच मनोरा असलेलें एक प्रार्थनामंदिर पाहिलें. म्हणून मी आंत शिरलों तों कांहीं ख्रिश्चन मंडळी गुडघे टेकून प्रार्थना करीत होती. हें प्रार्थनामंदिर कोणत्या पंथाचें आहे असें मी एका तरुण मनुष्यास विचारलें. त्यानें उत्तर दिलें कीं हें सीरियन ख्रिश्चन लोकांचें प्रार्थनामंदिर आहे. थोड्या वेळानें मी बाहेर आलों. तो तरुण गृहस्थही बाहेर आला. त्यालाही बंदराकडेच जावयाचें होतें. तेव्हां आम्ही बोलत बोलत बंदरापर्यंत गेलों. आलेप्पेचें बंदर बरेंच मोठें आहे. ब्रायटनप्रमाणें समुद्रांत बराच आंत गेलेला असा लोखंडी तुळयांचा व लाकडी फळ्यांचा धक्का अगर पिअर केलेला आहे. तो पिअर सुमारें पावणेआठशें फूट समुद्रांत घुसला आहे व त्याची रुंदी २१ फूट आहे. धक्क्यावरून मालाची गलबतांत चढउतार करण्याकरितां दोन हातयाऱ्या व दोन वाफेनें चालणाऱ्या याऱ्या धक्क्यावर बसविलेल्या आहेत. आलेप्पेचें वाळवंट अगदीं सरळ, सुतांत असून पांढऱ्या बारिक वाळूचें आहे व तें बरेंच रुंदही

आहे. आलेप्पे बंदरापासून समुद्र मागें हटत आहे असें मला त्या तरुण गृहस्थानें सांगितलें व वाळवंटाच्या विस्तीर्णतेवरून तें खरें असावें असें वाटलें. आरबी समुद्राचें स्वरूप कोठेंही पहा! माझ्या या केरळच्या प्रवासांत कितीतरी निरनिराळ्या बंदरीं व समुद्र किनाऱ्यानजीकच्या प्रेक्षणीय स्थळीं मी आरबी समुद्र पाहिला. पण त्याचें स्वरूप आपलें सदा भव्य व भीषण! समुद्राला सारख्या प्रचंड लाटा यावयाच्या व त्यांनीं मोठी गर्जना करावयाची! समुद्र दांत ओठ खाऊन व रागानें हिरवा पिवळा होऊन तोंडाला फेस येऊन जबडा पसरून जसा कांहीं भूमिमातेला खायलाच येत आहे; पण प्रत्येक ठिकाणीं आमची भूमाताही मोठी खंबीर मनाची दिसते; ती त्या समुद्राच्या भीषण स्वरूपाला केव्हांही न भितां उलट त्या रागावलेल्या समुद्राला रेतीरूपी धूळच सारखी खायला लावते! येथें अर्थात् दीपगृह आहेच; तें १२५ फूट उंच आहे असें त्या तरुण गृहस्थानें सांगितलें. याप्रमाणें बंदर व वाळवंट पाहून झाल्यावर मी कालव्याच्या डाव्या बाजूच्या रस्त्यानें परतलों. तो तरुण गृहस्थ जवळच्याच घरांत शिरला. पण त्यानें परत या रस्त्यानें दगडीपूल येईपर्यंत सारखे जा व मग दगडी पुलावरून समोरच्या रस्त्यानें जा म्हणजे नेमकें छत्राला पोहोंचाल असें सांगितलें. त्याचे आभार मानून मी त्यानें सांगितल्याप्रमाणें दगडी पुलापर्यंत आलों. या कालव्याला इकडून तिकडे जाण्याकरितां वाटोवाट लोखंडी तुळयांचे पूल केले आहेत; शेवटीं एक दगडी कमानीचा जुना पूल लागला; तेव्हां मी पुलावरून समोर गेलों.

हें आलेप्पे शहर पाहतांना मला राहून राहून **व्हेनीस** शहराची आठवण होत होती. व्हेनीसप्रमाणें श्रीनगर शहर आहे असें नेहेमीं म्हणण्यांत येतें व मीं श्रीनगर शहर पाहिलें तेव्हां मलाही तसेंच वाटलें. पण हें आलेप्पे शहर व बंदर पाहिल्यावर श्रीनगरापेक्षां सुद्धां आलेप्पे शहराला व्हेनीसची उपमा जास्त समर्पक होईल असें मला वाटलें. कारण या

शहरांत चार पांच मैलांवर दूर असलेल्या सरोवरापासून दोन समांतर कालवे काढलेले आहेत व ते थेट खुल्या बंदराचे धक्क्यानजीक नेलेले आहेत. त्यामुळें सरोवराच्या दोन्ही तीरांनीं माल आलेप्पेच्या खुल्या बंदरांत आणून परदेशाला किंवा हिंदुस्थानच्या दूर भागाला पाठवितां येतो. शिवाय या दोन समांतर कालव्यांना जोडणारे आडवे दोन कालवे आहेत; त्यामुळें शहराच्या कोणत्याही भागांतून दुसऱ्या भागांत मालाची नेआण सहज, सुलभतेनें व स्वस्ताईनें करतां येते. तसेंच या बंदरीं हजारों छप्पर घातलेल्या होड्या मालाची कारखान्यांतून नेआण करण्याला व बाहेरचा माल शहराला पुरविण्यास व या बंदराहून आंतल्या गांवांना पोहोंचविण्यास तयार आहेत. तसेंच मागें सांगितल्याप्रमाणें माणसांच्या रहदारी करतांही किती तरी मोटार बोटी व साध्या चौकोनी शिडाच्या छोट्या होड्या सदा सज्ज असतात. शिवाय आलेप्पे येथें काथ्याच्या निरनिराळ्या जिनसा करण्याचे व यांत्रिक दाबानें काथ्याचे घट्ट गठ्ठे बांधण्याचे किती तरी कारखाने आहेत; तसेंच खोबरेल तेल यत्रानें काढण्याचे कारखाने आहेत. सारांश व्हेनीसप्रमाणें आलेप्पे हे मोठें बंदर व्यापाराचें ठिकाण व कारखान्यांचें आगर असें शहर असून व्हेनीसप्रमाणें येथें मुख्य दळणवळणाचें साधन म्हणजे कालवे व त्यांत चालणाऱ्या होड्या व मोटार बोटी होत. तेव्हां अन्वर्थक रीतीनें आलेप्पेस हिंदुस्थानचें व्हेनीस म्हणतां येईल असें आलेप्पे बंदर व शहर पाहून मला वाटलें. हें आश्चर्यकारक व पुरातन काळापासून प्रख्यात असें केरल प्रांतांतील बंदर पाहून मला माझ्या या प्रवासाचें सार्थक झालें असें वाटलें. इतकें हें ठिकाण मला मनोहर व आश्चर्यकारक वाटलें मी आलेप्पेहून क्विलॉन बंदरास जलमार्गानें न जातां मोटारीनें गेलों. जलमार्गानें जाण्याची माझी फार इच्छा होती पण जलमार्गानें क्विलॉनला जाण्यास आठ तासांच्या वर लागतात; कारण आलेप्पेपासून बहुतेक जलमार्ग कृत्रिम कालव्यांतूनच आहे व म्हणून मोटार बोट सरोवरांतल्यापेक्षां पुष्कळच सावकाश न्यावी लागते. या जलमार्गानें जाण्यांत मला

स्थळ प्रत

दोन दिवस मोडावे लागत होते; पण इतका वेळ मजजवळ नव्हता. म्हणून मी आलेप्पेहून दहा वाजतां मोटार रस्त्यानें निघालों. आलेप्पेपासून **क्विलॉन** खुष्कीच्या मार्गानें त्रेपन मैल आहे. मी क्विलॉनला दोन प्रहरीं दीड वाजतां पोहोंचलों.

आलेप्पेपासून रस्त्याच्या प्रारंभींच्या कांहीं भागापर्यंत कॅझॅरिना झाडांची दुतर्फा रांग लागते. हा कॅझॅरिनाचा ॲव्हेन्यु– कॅझॅरिना झाड व्यक्तिशः जरी विशेष सुंदर नाहीं तरी– फार सुंदर वाटला. हा सर्व भाग सपाट पांढऱ्या शुभ्र वाळूचा असून त्यांत नारळीच्या झाडांची नवी लागवड चालू होती. पुढें हा रस्ता अगदीं समुद्रकांठानें जातो; डाव्या हाताला तो **सदालाटी** व किंचित् हिरवट नीळसर दिसणारा अफाट समुद्र, त्याचे किनाऱ्याला लागून एखादंदुसरी नारळीच्या झाडांची रांग व उजव्या बाजूस नाना प्रकारची गर्द झाडी असा हा रस्ता मोठा मनोहर वाटतो.

सुमारें अर्ध्यापेक्षां कांहींसा कमी मार्ग चालल्यावर आमच्या मोटारीला तरीच्या साहाय्यानें कालवा ओलांडावा लागला; येथें एक रेलवे स्टेशनला पूल असतो तसा पूल प्रवाशांच्या व माणसांच्या रहदारीकरितां केला आहे. पूल उंच करण्याचें कारण कालव्यांतून शिडासकट होड्या व जहाजें जातां यावीं हें होय. पण मला सर्वांत आश्चर्य वाटलें तें हें कीं येथें लंडनमधील टेम्स नदीप्रमाणें कालव्याच्या प्रवाहाचें पाणी वर खालीं करण्याकरितां एक जलकुलुप ( वॉटर–लॉक् ) ही केलेलें आहे. हें कुलुप अर्वाचीन आहे कीं पुरातन काळापासूनचें आहे तें कळण्यास मात्र तेथें साधन किंवा चिन्ह नव्हतें. तेथून मोटार रस्ता कालव्यापासून व समुद्रापासून पूर्वेकडे वळतो. येथला भूमिभाग बराच उंचसखल व कांहींसा डोंगराळ आहे. पण नारळी, पोफळी व केळी यांच्या बागा व मधून मधून सपाट व सखल भागांत हिरवींगार भातशेतें आहेत; यामुळें सर्व प्रांताला उपवनशोभा येते यांत शंका नाहीं. क्विलॉनच्या नजीक आलें म्हणजे कालवा ओलांडून--येथें काल-

ऱ्यावर पूल आहे—रस्ता अगदीं समुद्रकिनाऱ्याजवळून जातो. मग डाव्या हातास आरबी समुद्र व उजव्या हातास अष्टकमलदल सरोवर लागतें. ( हें सरोवर इतकें सुंदर आहे कीं याला केरळचें सरोवरोत्तम किंवा त्रावणकोरचे लेक लॉमंड म्हणतात हें मागाहून मार्गदर्शक पुस्तकावरून कळलें. ) पण या सरोवराचा विलक्षण आकार व त्याचें पूर्ण स्वरूप मोटार मार्गानें दृष्टीस पडत नाहीं. या सरोवरास समुद्राकडे कोचीनप्रमाणें एक मुख असून त्यांतून सरोवराला थोडीशी भरती येते; पण पाण्याचा मुख्य पुरवठा सरोवरास मिळणाऱ्या मोठ्या नदीचा आहे असें नकाशावरून कळतें. या मुखाला मोठा लोखंडी पूल आहे. त्यावरून मोटार क्विलॉन शहराच्या रेलवे स्टेशननजीकच्या मोटार स्टँडवर दीड वाजतां आली. स्टेशनच्या समोरच म्युनिसिपल छत्र आहे, तेथें सामान टाकून मी लागलाच क्विलॉनचें वाळवंट पाहण्यास निघालों; कारण तें बरेंच दूर आहे असें कळलें. तेव्हां तें आधीं पाहून घेऊन क्विलॉनचा सरोवर कालवा व मोटार बोटी लागण्याचा धक्का मागाहून पाहूं असा मीं मनाशीं बेत केला. व तडक वाळवंटाकडे निघालों. रस्ता वांकडा तिकडा व लहानच वाटला; पण एकदांचा मी वाळवंटावर आलों. हें वाळवंट कोचीन किंवा आलेप्पे-प्रमाणें सुंदर वाटलें नाहीं. आधीं वाळू बदामी रंगाची होती, ती पांढऱ्या वाळू इतकी सुंदर दिसली नाहीं. ,शिवाय या वाळवंटावर सारख्या मासेमारी होड्याच होड्या पडलेल्या होत्या. शिवाय वाळवंटाचे बाजूनें कोचीन वाळवंटाच्यासारखा चांगला रस्ताही नव्हता. मात्र हें वाळवंट व क्विलॉनचा हा किनारा मुंबईच्या बॅकबेप्रमाणें अर्धवर्तुळाकार दिसला. तेव्हां येवढें अर्धवर्तुळाकार वाळवंट तुडवीत जाण्याचे श्रम घेण्याइतकें आकर्षक वाटलें नाहीं म्हणून मी पुन्हां आल्या रस्त्यानें दीपगृहाकडे चाललों. पण रस्ता सरतां सरेना; जिकडे तिकडे सामसूम; तेव्हां इकडे कसलें बंदर असेल असें मला वाटलें. शेवटीं रस्ता एका खासगी कारखान्याकडे जातो असें पाटीवरून कळलें. तेव्हां तर रस्ता चुकलों कीं काय अशी शंका आली. पण विचारपूस करतां दीपगृह येथून डाव्या

हातच्या पाऊल वाटेसारख्या रस्त्यानें गेलें म्हणजे लागेल असें कळलें व त्या रस्त्यानें जरासें गेल्याबरोबर एकदाचा दीपगृहाचा मनोरा दृष्टीस पडला; पण येथेंही सामसूमच. जमिनीचें खडकाळ टोंक येथें जरा समुद्रांत शिरलें आहे व म्हणून येथें दीपगृह बांधण्यांत आलें आहे. कोचीन किंवा आलेप्पे बंदराप्रमाणें धक्क्यानजीक व बंदराजवळ असें क्विलॉनचें दीपगृह नाहीं; तर तें मुंबईच्या कुलाब्याप्रमाणें एका कोपऱ्याला आहे. दीपगृहाच्या दरवाज्याशीं जातां दीपगृह पाहण्याची फी अडीच आणे केली आहे अशी नोटीस वाचली, तेव्हां दीपगृह पाहावें अशी इच्छा झाली. म्हणून शेजारच्या इमारतींत चवकशी करतां एक शिपायी भेटला. त्याचेजवळ अडीच आणे दिल्यावर त्यानें किल्ली आणली व मग त्याचेबरोबर मी दीपगृहाचे मनोऱ्यावर चढलों. दिव्याच्या सभोंवार असलेल्या गॅलरींतून एक फेरी घातली, पण शहराचें नखही कोठें दिसलें नाहीं. एकीकडे आरबी समुद्राचें अफाट पाणी तर बाकी सर्व बाजूंस नारळीच्या झाडांचें दाट रान याखेरीज या मनोऱ्यावरून कांहींच दिसत नाहीं. मला वाटलें या नगरसुंदरीनें हिरवा हिरवा गोषाच जणूं सर्व अंगावर व डोक्यावरून घेतला आहे व मनोऱ्यासारख्या उंच ठिकाणाहून चोरून पाहणारासही आपलें नखसुद्धां दृष्टीस पडूं नये अशी खबरदारी घेतली आहे. तेव्हां या दीपगृहाच्या मनोऱ्यावर मी उगाच चढलों असें वाटलें. म्हणून लागलीच खालीं आलों व शहराकडे जाण्यास दुसऱ्या बाजूनें रस्ता आहे काय असें विचारतां कळलें कीं, दीपगृहाचे दुसरे बाजूस सारखा खडकाळ भाग असून किनाऱ्यानें जाण्यास वाट मुळींच नाहीं. तेव्हां आलेला रस्ताच परत तुडवीत छत्राला जाणें भाग होतें. बराच वेळ चालल्यामुळें पाऊलही जलद पडत नाहींसें झालें व मोठ्या कष्टानें व कंटाळवाण्या रीतीनें मी आल्या मार्गानें परत स्टेशनशीं आलों. तेथल्या इंडियन रिफ्रेशमेंट रूममध्यें कॉफीपाणी करून छत्रांत परत आलों, तोंच मोठी पावसाची सर आली. हा पाऊस मग रात्रपर्यंत व रात्रींसुद्धां पडतच

होता. यामुळें सरोवर–कालवा, धक्का व क्विलॉन शहर पाहण्याचे बेत जागच्या जागींच राहिले. पण या सर्क्तीच्या छत्रवासाचा मी चांगलाच उपयोग केला. कारण माझ्या प्रवास वर्णनाचें एक प्रकरण मी या छत्रांत रात्रीं लिहूं शकलों. झालें ! केरलाच्या तीन बंदरांचें पुराण येथें संपलें. कारण दुसरे दिवशीं सकाळींच निघून मी वाटेंत जनार्दनाचें देऊळ पाहिलें. त्याचें वर्णन मागील प्रकरणांत आलेंच आहे. तेथून त्रावणको-रची राजधानी त्रिवेंद्रम् येथें मी ता. १० जानेवारी १९३४ रोजीं दोन प्रहरीं १ वाजतां पोहोंचलों. केरळ प्रांतांतील प्रेक्षणीय स्थळांपैकीं त्रिवें-द्रम् व कन्याकुमारी येवढींच दोन स्थळें मी माझ्या केरल प्रवासाचे शेवटीं पाहिलीं; तरी त्या दोन स्थळांचें वर्णन एका स्वतंत्र प्रकरणांतच करणें बरें, तेव्हां लेखणीस तूर्त विश्रांति देतों.

# प्रकरण ७ वें

## त्रिवेंद्रम् व कन्याकुमारी

माझा दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास म्हणजे प्राय: केरल किंवा मलबार प्रांतांतील प्रवास होय; त्यांतही केरलाच्या कोचीन व त्रावणकोर या दोन संस्थानांतील कांहीं प्रेक्षणीय स्थळें मीं पाहिलीं. हा माझा एकंदर प्रवास बरोबर तीन आठवड्यांचा झाला. नाताळच्या सुट्टीचा पहिला दिवस क्रिस्मस डे म्हणजे २५ डिसेंबर सन १९३३ या दिवशीं रात्रीं मी जाफना शहराहून या प्रवासास निघालों, तो ता. १४ जानेवारी सन १९३४ रोजीं रात्रीं 'ट्युटीकोरीन बंदरास येऊन पोहोंचलों. या माझ्या तीन आठवड्यांच्या प्रवासाच्या शेवटच्या अर्ध्या आठवड्यांत मी त्रावणकोर संस्थानची राजधानी त्रिवेन्द्रम् शहर व त्या संस्थानच्या ताब्यांत असलेलें हिंदुस्थान देशाचें अगदीं दक्षिणे-कडचें टोंक कन्याकुमारी हीं दोन प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. त्यांचेंच या एका प्रकरणांत वर्णन करावयाचें आहे.

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मी क्विलॉनहून त्रिवेन्द्रम्ला आगगाडीनें गेलों व त्रिवेन्द्रम्ला जातां जातांच वाटेंत जनार्दनाचें देऊळ पाहून घेतलें. वर्काला स्टेशनपासून त्रिवेन्द्रम् शहर अवघें चोवीस पंच-वीस मैलच आहे. पण तेथें पोहोंचण्यास दोन तासांच्यावर लागले. हा भाग बराच उंचसखल व कांहींसा डोंगराळ आहे. मधूनमधून उघडे बोडके काळेकाभिन्न असे विचित्र आकाराचे खडकही लागले, बाकी सर्वत्र बगीच्यासारखें स्वरूप होतें. त्रिवेन्द्रम्च्या आधीं मात्र थोडे मैल थेट रामेश्वर धनुष्कोडीसारखा शुभ्र वालुकामय पांढरा भूमिभाग लागला, पण त्रिवेन्द्रम्ची हद्द लागतांच पुन्हां सर्व देखावा बदलला. आतां उंच-सखल जमीन, हिरवीं हिरवींगार भातशेतें व केरल प्रांताचा विशेष

म्हणजे नारळी, पोफळी, केळी यांची समृद्धि सुरू झाली व तांबड्या दगडाचा व मातीचा सुंदर भूमिभाग लागला. लगेच त्रिवेन्द्रम्‌चें पेटा स्टेशन आलें व मैल दीड मैलांतच रेलवेचें शेवटचें व मुख्य स्टेशन **त्रिवेन्द्रम् सेंट्रल** नांवाचें आलें. स्टेशनची पांढरी क्रॉक्रीटची इमारत दुमजली व प्रशस्त दिसली. स्टेशनच्या बाहेर तर विस्तीर्ण हिरवेंगार खुलें मैदान व मध्यें तांबडे तांबडे रस्ते मोठे मजेदार दिसत होते. स्टेशनानजीकच छत्र आहे असें मला कळल्यामुळें मी स्टेशनवर झटका न करतां हमालाचे डोकीवर बॅग व बेडिंग देऊन चालत रेलवेला समांतर असलेल्या पांढरट तांबडसर वाळूच्या चढत्या रस्त्यानें बराच वेळ चाललों. दोन प्रहरची ती भर उन्हाची वेळ; यामुळें मला केव्हां छत्र येईल असें झालें होतें. पण हमाल तो सबंध चढता रस्ता चालून डाव्या हाताला असलेल्या रेलवे पुलावरून रेलवेच्या पलीकडे पण आतां उतरत्या रस्त्यानें पुढें पुन्हां बराच गेला. शेवटीं उजव्या बाजूस मुळजी जेठा नांवाच्या मुंबईच्या प्रख्यात पेढीच्या नांवाचें छत्र दृष्टीस पडलें; तेव्हां आणखी पुढें महाराजांचें छत्र शोधीत न बसतां मी येथेंच उतरलों. पण हें छत्र खरोखरींच फार उत्तम बांधलेलें, सर्व सोयींनीं युक्त व स्वच्छ ठेवलेलें पाहून मला फार आनंद झाला. कोठें मुंबई व कोठें त्रिवेन्द्रम् पण अशा ठिकाणीं सुद्धां असें उत्तम छत्र यात्रेकरूंच्या मोफत उपयोगाकरितां ठेवलेलें पाहून मला गुजराती व्यापाऱ्यांची दानशलिता व धर्मशीलता यांचें मोठें कौतुक वाटलें. असो.

**त्रिवेन्द्रम** हें सुमारें एक लाख वस्तीचें पण चार मैल लांब व चार मैल रुंद असें चौकोनी वसलेलें शहर आहे. शहराच्या पश्चिम भागांतून व समुद्राच्या बाजूनें क्विलॉनकडून नव्हे थेट कालिकतकडून आलेला जलमार्गाचा कालवा उत्तर दाक्षिण गेला आहे; तर शहराचे पूर्व दिशेला तसाच भातशेतीला पाणी देणारा नदीचा कालवा गेला आहे. शहराच्या पश्चिमेस दोन अडीच मैलांवर अरबी समुद्र असून त्रिवेन्द्रम्‌चें बंदर, वाळवंट व मालाचा धक्का शहराच्या नैऋत्य कोपऱ्याला

आहे. शहराचे दक्षिण बाजूस व मधोमध मूळचा किल्ला व आंतील प्रख्यात पद्मनाभाचें देऊळ हीं आहेत. हा भुईकोट किल्ला असून त्याच्या तटाच्या भिंतींना प्रचंड कमानदार असे फाटक दरवाजे आहेत. मुख्य दरवाजा पश्चिमाभिमुख आहे. या शहराच्या रचनेची मुख्य मजा अशी आहे कीं राजवाड्यांनीं या शहराच्या जणूं कांहीं सर्व दिशा रोखल्या आहेत व त्याच शहराच्या बाहेरच्या मर्यादा आहेत. किल्ल्यांत महाराजांचा राजवाडा व राजवंशांतील मंडळींचे राहण्याचे आणखी राजवाडे आहेत. बंदराच्या उत्तरेस पण शहराच्या नैऋत्य टोंकाला समुद्रकांठीं एक **संकुमुगम्** नांवाचा राजवाडा आहे, तसेंच वायव्य टोंकास **पटम्** नांवाचा राजवाडा आहे, तर ईशान्येस **कनक-कुनु** नांवाचा राजवाडा आहे. शेवटीं पूर्वेस **पुजपुरा** व **सेथलमांड** नांवाचे राजवाडे आहेत. शिवाय हल्लीं ब्रिटिश रेसिडेंटाकरितां उपयोगांत आणलेला राजवाडा व त्याचें सुंदर बगीच्यांनीं व मोठमोठ्या वृक्षांनीं शोभायमान झालेलें व सभोंवार तटवजा भिंतींनीं संरक्षिलेलें आवार किल्ल्याच्या व रेल्वेच्या स्टेशनच्यापलीकडे ईशान्य टोंकास आहे व तें शहरामध्येंच आहे. याच राजवाड्याच्या मोठ्या आवारामुळें व विशेषतः राजवाड्याचे दक्षिणोत्तर दरवाज्यांवर सदा संत्री पहारा असल्यामुळें शहराच्या पूर्वभागांतून जाणारा व उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारा मूळचा सरळ रस्ता बराच वेडावांकडा व वांकणाचा झाला आहे. भर शहरांतला मुख्य रस्ता—मेन रोड नांवाचा—हा मात्र शहराच्या दक्षिणेकडून जो सरळ आला आहे तो किल्ल्याच्या पूर्व तटास खेटून सारखा सरळ शहराच्या उत्तरेकडच्या उंचवट्याच्या भागापर्यंत गेला आहे. पूर्वेकडचा रस्ताही रेसिडेन्सीच्या संरक्षित संत्री पाहऱ्याचा आडथळा सोडून दिला तर सरळ आहे. हे दोन्ही रस्ते सरासरी समांतर असून शहरांतील मोठे व महत्त्वाचे रस्ते होत. शहराच्या पश्चिम भागास पूर्व-पश्चिम जाणारा असा सरळ सलंग रस्ता नाहीं; मात्र राजवाड्याकडे जाणारा व बंदरापर्यंत जाणारा असे दोन समांतर पण शहराच्या रच-

नेच्या दृष्टीनें तिरकस असे जाणारे दोन मोठे व महत्त्वाचे रस्ते आहेत. आतां शेवटची शहराच्या सामान्य स्वरूपाची कल्पना देणारी गोष्ट म्हणजे जरी हें शहर उत्तरेस उंचवटच्यावर तर दक्षिणेकडे व नैऋत्येस बंदराच्या बाजूस उतरतें व सखल होत गेलें आहे तरी एकंदरींत शहरांत उंचसखल भाग पुष्कळ असून या सखल भागांत भातशेती आहे. या शहरांत लहान लहान टेकड्यावजा उंचवट्याच्या जागा जागोजाग आहेत व त्यांवरील सार्वजनिक इमारती व बंगले फारच उठावांत दिसतात. या शहराची सहज व चटकन् कल्पना येण्याची सोय म्हणजे या शहराचा सुंदर रंगीत नकाशा संस्थानच्या आलमनाक व डायरेक्टरीमध्यें— त्यांत दुसरा सबंध संस्थानचाही सुंदर नकाशा आहे--मिळतो. ही डायरेक्टरी फक्त सव्वा रुपयास सरकारी छापखान्यांत मिळते. पण हे नकाशे दोनचार आण्यांस स्वतंत्र व वेगळे विकण्याची व्यवस्था केल्यास प्रवाशांची व यात्रेकरूंची मोठी सोय होईल. पण या साध्या नकाशाखेरीज या शहराच्या पदार्थसंग्रहालयांत या शहराचा निम्नोन्नतिदर्शक मोठा नकाशा ( रिलीफ मॅप ) कांचेच्या कपाटांत टेबलावर ठेवलेला आहे. सर्व त्रावणकोर संस्थानचाही निम्नोन्नतिदर्शक मोठा नकाशा आहेच. या संस्थानच्या एकंदर सुधारलेल्या व आजतागाईत प्रगतिपर कारभाराचें द्योतक म्हणजे—भाताची परीक्षा शितावरून होते त्याप्रमाणें—हा शहराचा निम्नोन्नतिदर्शक नकाशा होय असेंच मला वाटलें. कारण लंडन शहरांत असतांना लंडन शहराचा निम्नोन्नतिदर्शक नकाशा पाहण्याची मला फार इच्छा होती, पण असा नकाशा मला केव्हांच पहाण्यास मिळाला नाहीं. पुढें शोधाअंतीं कळलें कीं, लंडन शहर अफाट व दोन तीन छोट्या टेकड्या सोडून सामान्यतः सपाट असल्यामुळें लंडनचा निम्नोन्नतिदर्शक नकाशा केलेलाच नाहीं.

त्रिवेन्द्रम् शहराचें सामान्य स्वरूप निवेदन आतां पुरें करतों. पण या शहरांत प्रथम प्रवेश करणाऱ्या माझ्यासारख्या प्रवाशाच्या मनावर शहराच्या रचनेचा, टापटिपीचा व स्वच्छतेचा अनुकूल परिणाम होतो हें

खास. मला तर माझ्या म्हैसूर संस्थानांतील म्हैसूर बंगळूर शहरांच्या प्रथम प्रवेशाची आठवण झाली. म्हैसूरप्रमाणेंच त्रिवेन्द्रम् हें राजधानीचें शहर मोठें सुंदर आहे असें वाटलें. आतां प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांच्या वर्णनास लागूं या.

पण सगळेंच मुसळ केरांत. **त्रिवेन्द्रम्** शहरांतील दळणवळणाच्या साधनांच्या सोयीची माहिती सांगावयाची राहूनच गेली. त्रिवेन्द्रमला उत्तरेकडून क्विलॉनपासून आलेला एकच रेलवे रस्ता आहे. तो शहराच्या पश्चिमेकडून शहराच्या मध्याच्या सुमारास पूर्वेकडे वळतो व मग लगेच शहराच्या पश्चिमभागाकरितां त्रिवेन्द्रम् पेटा नांवाचें गांवांतच स्टेशन लागतें. शहराच्या पूर्वभागाकरितां त्रिवेन्द्रम् सेन्ट्रल नांवाचें रेलवेचें शेवटचें स्टेशन लागतें. रेलवे रस्त्याचा दुसरा फाटा पश्चिम दिशेकडून परभारें पीअरवर नेला आहे. ही झाली रेलवेची सोय. कालवा हा जल-मार्ग व मोटारीचा खुष्कीचा मार्ग मागेंच सांगितले आहेत. मला या शहरांत आल्यावर प्रथम आनंद वाटला तो हा कीं येथें माणसाला बैलाप्रमाणें गाडी ओढायला लावणाऱ्या रिक्शा मुळींच नाहींत. माझ्या लंकेच्या काय, दाक्षिण हिंदुस्थानच्या काय किंवा केरळाच्या काय सर्व प्रवासभर माझा या रिक्शांनीं पिच्छा पुरविला होता. मला रिक्शांत बसावयाचें नाहीं हें सांगून सांगून माझे दांत झिजले. म्हणून येथें रिक्शा नाहींत हें पाहून मला साहजिकच आनंद झाला. येथलें वाहनाचें मुख्य साधन म्हणजे बैलाचे झटके व घोड्याच्या बेळगावी धमनीसारख्या पण एकच घोडा जोडलेल्या अशा सुबक गाड्या होत. या एकाच घोड्याच्या गाड्यांत चार माणसें बसतात. पण हें वाहन बरेंच महाग आहे असें कळलें. मात्र बैलाचे झटके स्वस्त भाड्यानें मिळतात. या शहरांत ट्रॅम गाड्या नाहींत. किल्ल्यांतील पश्चिमेकडच्या दरवाज्या-पासून तों पदार्थसंग्रहालयापर्यंत नुकत्याच बसेस चालू झाल्या आहेत, पण ही कंपनी नसून व्यक्तिशः मोटार बसवाले मोटार बसेस या मुख्य शहराच्या रस्त्यानें पंधरावीस मिनिटांनीं नेतात आणतात. बंदराकडे


जाणाऱ्या मोटार बसेस दिवसांतून फार झालें तर पांचसहा वेळां जात येत असतील. तेव्हां या शहराचें मध्यम स्थितींतील माणसाचें दळण-वळणाचें मुख्य व नेहमीचें साधन म्हणजे स्वतःचे पाय. मात्र पादचारी माणसास या शहरांत बिनधोक, बिनघोर, बिनदिक्कत जाण्यासारखे प्रशस्त, निर्धूळ व दोन्ही बाजूंस पायवाटा असलेले मोठे सुंदर रस्ते आहेत यांत शंका नाहीं. इकडल्या साधारण रीतीप्रमाणें पादत्राणाची मुळींच जरूरी नाहीं. कारण या माझ्या तीन्ही प्रांतांतील प्रवासांत मला एक गोष्ट दिसून आली ती ही कीं येथें बहुतेक लोक अनवाणी चालतांना दिसतात; त्यांतल्यात्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे अशिक्षित सुशिक्षित, स्त्रीपुरुष, ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे सर्व जातींचे व सर्व दर्जाचे लोक अनवाणी पायानें चालतात. अर्थात् सर्व मोठमोठ्या शहरांप्रमाणें नाहीं तरी क्वचित् क्वचित् भाड्याच्या मोटार टॅक्सी दिसतात. अशा प्रकारची या शहराचीं दळणवळणाचीं साधनें आहेत. असो.

मी जाफनाहून केरळ प्रांत पहाण्यास निघालों तेव्हां त्रिवेन्द्रम्‌च्या सेवानिवृत्त अशा एका संगीतकलानिपुण, वाङ्मयनिर्मात्या अशा वृद्ध गृहस्थांस माझ्याबद्दलचें परिचयपत्र माझे जाफना येथें नवेच झालेले स्नेही स्वामीजी यांनीं पाठविलें होतें. तेव्हां मूळजी जेठा छत्रामध्यें सामान टाकून नजीकच्या उपाहारगृहांत पोटपुजा करून मी रा. लक्ष्मण पिल्ले या गृहस्थांना भेटण्यास बाहेर पडलों. बऱ्याच विचारपुशी-नंतर एकदांचें मला त्यांचें घर सांपडलें व सुदैवानें ते गृहस्थही घरीं भेटले. गृहस्थ बरेच वयातीत होते, तरी पण त्यांची प्रकृति उत्तम दिसली. त्या गृहस्थांनीं माझें मनापासून स्वागत केलें. अर्थात् कॉफी पाणी झाल्यावर आम्ही लागलीच शहरांतील दृश्य दर्शनास निघालों.


रा. पिले या गृहस्थांची मुलगी मुलींच्या कॉलेजांत संगीत शिक्ष-कीण असल्यामुळें ते आपलें स्वतःचें घर भाड्यानें देऊन कॉलेजच्या वसतीगृहाचे मागच्या बाजूस राहावयास आले होते. तेव्हां त्यांच्या

घराहून मोठ्या सुंदर डामरी रस्त्यावर आम्ही आलों तोंच कॉलेजची भव्य इमारत व फाटकावरील अर्धवर्तुळाकार सुंदर पाटी पाहिली. या शहरांत उंच सखल असा भाग फार आहे हें मागें सांगितलें, त्याचें प्रत्यंतर रा. पिले यांचेबरोबर चालतांना आलें. आम्हांला सारखा चढउतार करावा लागत होता. एका उंचवट्याच्या रस्त्यावरील चौकाचे कोपऱ्यास एक काळसर तांबडा रंग दिलेली नवी इमारत दिसत होती; पुढें छोटीशी पण सुबक फुलबाग होती; इमारतीच्या आवारासभोंवार उत्तम तांबड्या विटांची **आवार-भिंत** होती व त्याला मोठें लोखंडी प्रशस्त फाटक होतें. ही इमारत मागच्या महाराजांचें एक स्मारक म्हणून बांधलेली असून त्यांत 'औद्योगिक संस्था' नांवाचें संस्थानांत तयार झालेल्या नानाविध आवश्यक व चैनीच्या मालाचें व कलाकौशल्याच्या मासल्यांचें कायमचें प्रदर्शनगृह आहे. तेथल्या मुख्याधिकाऱ्यानें कपाटांत व्यवस्थेनें नांव व किंमत इत्यादि माहिती देणाऱ्या फलकासकट नाना तऱ्हेच्या वस्तू व्यवस्थेनें मांडून ठेवलेल्या होत्या. हें छोटेसें प्रदर्शनगृह प्रेक्षणीय आहे. प्रेक्षक-पुस्तकांत अनुकूल अभिप्राय व नांव लिहून नंतर आम्ही सरकारी छापखान्यांत गेलों. छापखान्याचा कारखाना बराच मोठा असून त्यांतील व्यवस्था व निरनिराळ्या खात्यांचें वर्गीकरण वाखाणण्यासारखें होतें. येथें मी त्रिवेन्द्रम् संस्थानची दोन सुंदर नकाशे जोडलेली डायरेक्टरी सव्वा रुपयास विकत घेतली. नंतर आम्ही शहराच्या मागें सांगितलेल्या मुख्य रस्त्याला आलों. येथें पुष्कळ सपाटी आहे, पण हा शहराचा भाग किल्ल्यापेक्षां पुष्कळच उंच आहे. या मोठ्या मुख्य रस्त्याच्या उजव्या हातास भव्य व लांबच लांब अशी सार्वजनिक कचेऱ्या नांवाची दुमजली इमारत आहे. मध्यें व बाजूस तीन मजले असून मधल्या मजल्याला छोटासा मनोरा आहे व त्यावर मोठें थोरलें घड्याळ बसविलें आहे. या शहरांत 'स्टँडर्ड' वेळ चालत नाहीं. तर येथें स्थानिक अशी निराळीच वेळ ( टाइम ) चालते. ती स्टँडर्ड वेळेच्या अर्धा तास मागें आहे. आम्हीं या इमारतींतल्या निर-

निराळया कचेऱ्या नजरेखालीं घातल्या. या इमारतीच्या पुढें व मागें अशी लांबचलांब फुलबाग असून सुंदर हिरव्यागार गवताचें, हिरवा गालिचा पसरल्याप्रमाणें दिसणारें मैदान आहे. मागल्या बाजूस गेलें म्हणजे हें ठिकाण शहराच्या इतर भागापेक्षां किती तरी उंचावर आहे हें कळून येतें. या मागच्या बाजूनें सभोंवारचा पण खालीं खोल असलेला व हिरव्यागार झाडीनें आच्छादलेला पण मधूनमधून तांबड्या लाल विटांच्या इमारतींनीं शोभायमान झालेला भूमिभाग मनोहर दिसतो यांत शंका नाहीं. ही त्रिवेन्द्रम् येथील सार्वजनिक कचेऱ्यांची इमारत व बंगलोरच्या सार्वजनिक कचेऱ्यांची इमारत यांमध्यें पुष्कळ साम्य आहे असें वाटलें. मात्र बंगलोरच्या इमारतीला लागून कबन पार्क आहे, तर येथला सार्वजनिक पार्क जरा दूर अंतरावर आहे. या सार्वजनिक कचेऱ्यांसमोरच्या मुख्य व प्रशस्त पायवाटेच्या रस्त्यानें आम्ही चालतच पार्कला गेलों. हा रस्ता पांढऱ्या कॉंक्रीटचा केलेला असून त्याला लागून असलेल्या पायवाटा तांबड्या मातीच्या व रेतीच्या आहेत. डाव्या बाजूस हिरवेंगार असें कवाईतीचें विस्तीर्ण खुलें मैदान लागलें. या मैदानाचे किंचित् आधीं पण डाव्या हातास शहराचा टाऊन हॉल आहे. ही तांबड्या विटांची व समोरच मोठा मनोरा व घड्याळ असलेली इमारत फारच सुंदर दिसते. त्रिवेन्द्रम् येथील पार्क म्हणजे पदार्थसंग्रहालय, पशुपक्षीसंग्रहालय व सार्वजनिक सहल करावयाची बाग अशी प्रेक्षणीय स्थळांची त्रिस्थळी आहे. पांच वाजून गेले असल्यामुळें पदार्थसंग्रहालय अर्थात् बंद होतें; पण मी तें नंतर एकटाच पाहूं शकेन असें रा. पिले यांस सांगितलें. पशुपक्षीसंग्रहालय व बाग हीं साडेसात आठपर्यंत खुलीं असल्यामुळें तीं आम्हीं सावकाशपणें पाहिलीं. या बागेची जागा शहराच्या उंच सखल वृत्त्यनुरूप खूपच उंच सखल आहे. या बागेंतून कालवा गेला आहे, तो अर्थात् अगदीं सर्वांत सखल अशा भागांतून गेला आहे. तेथेंच बागेंतला एक तलाव असून त्यांत हंस पक्षी पोहत होते. पदार्थसंग्रहालयाची इमारत असलेला बागेचा भाग सर्वांत



नं. १३ ] त्रिवेंद्रम : सार्वजनिक कचेऱ्या [ पोत ६४



नं. १४ ] त्रिवेंद्रम : कालव्यांतील होड्या लागण्याचा धक्का [ पान ९१

उंच ठिकाणीं आहे. त्याचेही वरील पठारावर महाराजांचा **कनककुनु** नांवाचा छोटा पण फार टुमदार व समोर सुंदर बगीचा असलेला राजवाडा आहे. येथें महाराज दररोज टेनीस खेळावयास व दोन तास इतर करमणुकींत घालविण्यास येतात असें कळलें. रोज येऊन थोडा वेळ तरी करमणूक करण्यासारखें हें ठिकाण आहे यांत शंका नाहीं. हा राजवाडा, त्याची उंच पठारावरील उठावाची जागा, राजवाड्यासमोरची फुलबाग, सभोंवारच्या सर्व जागेचा स्वच्छपणा व नीटनेटकेपणा व एकंदर निसर्गरमणीयता यांपैकीं कोणत्या गोष्टी जास्त वाखाणण्यासारख्या आहेत हें ठरविणें मोठें कठीण काम आहे असें मला वाटलें. आम्ही या बागेंतील पशुपक्षीसंग्रहालयाचीं निरनिराळीं गृहें पाहिलीं. सर्वत्र टापटीप व नीटनेटकेपणा पाहून पाहणारास आनंद होतो. हिंस्र पशूंचा कोंडमारा न होतां त्यांना स्वैरपणें हिंडतां फिरतां यावें अशीं विस्तीर्ण, मोठमोठ्या तटवजा भिंतींनीं व वाकलेल्या भाल्यासारख्या लोखंडी गजांनीं संरक्षिलेलीं खुलीं गृहें आम्हीं येथें नवीन केलेलीं पाहिलीं. येथल्या पशुसंग्रहालयांत मोठमोठे पट्ट्याचे वाघ व मोठमोठ्या आयाळीचे सिंह आहेत. येथें बायझन ( गवा ) नांवाचा रेड्यासारखा प्रचंड हिंस्र पशू आहे. येथें नाना जातीचे, नानारंगी पक्षी आहेत. सारांश हें प्राणिसंग्रहालय त्रावणकोरसारख्या प्रगतिपर मोठ्या संस्थानाला शोभेल असें आहे. बाग तर खूपच विस्तीर्ण आहे. त्या बागेच्या जागेचा विलक्षण उच्चनीचपणा बागेची विविधता व विस्तीर्णता वाढवितो यांत शंका नाहीं. त्रिवेन्द्रम् शहराची ही बाग मुंबईच्या मलबार हिलवरील बागेप्रमाणें लोकांची आवडती बाग दिसली. किती तरी लोक या बागेंत इकडे तिकडे फिरतांना दिसत होते. रा. पिले या वृद्ध गृहस्थांनीं संस्थानची पुष्कळ वर्षें व पुष्कळ खात्यांत नोकरी केली असल्यामुळें शहरांतील किती तरी सुशिक्षित व उच्च दर्जाच्या लोकांशीं त्यांचा परिचय दिसला. कारण त्यांना येथें ओळखीचे लोक बरेच भेटले व त्यांनीं त्या गृहस्थांशीं माझा परिचयविधि

करून दिला. अगदीं काळोख पडल्यावर आम्ही बागेंतून बाहेर आलों. मग रा. पिले आपल्या घरीं गेले व मी आपल्या छत्रांत आलों.

ता. १० जानेवारी सन १९३४ रोजीं दोनप्रहरीं मी त्रिवेन्द्रमला आलों व त्या दिवशीं वर वर्णिलेलीं तीन प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. दुसरे दिवशीं रा. पिले यांना संगीतशास्त्राच्या परीक्षेचा कागद काढून अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचा होता म्हणून त्यांना माझ्याबरोबर येण्यास वेळ नव्हता; तेव्हां ता. १२ रोजीं सकाळींच स्नान करून व धोतर उपरण्याखेरीज जास्त कपडा न घालतां रा. पिले यांच्या घरीं जाऊन मग दोघांनीं मिळून **पद्मनाभ** देवाचें दर्शन घ्यावें असें ठरलें. मलाही दोन अडीच आठवडे चाललेल्या दररोजच्या दृश्यदर्शनानंतर विश्रांति पाहिजेच होती म्हणून ता. ११ रोजीं दिवसभर मी छत्राबाहेर पडलोंच नाहीं. तो दिवस मी कोडईकनालचें वर्णन लिहिण्यांत घालविला. सायंकाळीं स्टेशनच्या खुल्या हिरव्यागार मैदानाच्या बाजूस फक्त फेरफटका करून परत आलों.

पूर्वी ठरल्याप्रमाणें मी दुसरे दिवशीं पहांटे स्नान करून केरल प्रांतांतील कडक नियमानुरूप दिगंबर स्थितीचा नव्हे पण संवयीनें जवळ जवळ दिगंबर वाटणारा बिनकपड्याचा धोतर उपरण्याचा पोशाख करून देवदर्शनास सज्ज झालों व रा. पिले यांचे घरीं आलों तों पिले स्नान करण्याच्या तयारींत होते. इतक्या लवकर स्नान करून छत्रापासून मी चालत आलेला पाहून रा. पिले यांना जरा आश्चर्य वाटलें. तेव्हां माझा नेहेमींचाच पहांटेस उठून फिरण्यास जाण्याचा परिपाठ आहे असें मीं त्यांना सांगितलें. तें ऐकून त्या वयातीत गृहस्थांना समाधान वाटलें. रा. पिले लवकरच स्नान करून कपाळाला भस्म लावून अंगावर रेशमी पांबरी घेऊन घराबाहेर पडले व मग आम्ही दोघेजण किल्ल्याच्या पूर्व दरवाज्यानें किल्ल्यांत शिरलों. पद्मनाभाचें हें देऊळ केरळ प्रांतांतील बांधकलापद्धतीचें नाहीं; तर तें दक्षिण हिंदुस्थानांत प्रचारांत असलेल्या

द्राविड बांधकलापद्धतीचें आहे. प्रवेशद्वारावर एकच गोपुर आहे, पण तें खूपच लांब व उंच आहे. त्यावरील दगडी नक्षीकाम थेट द्रविड पद्धतीचें आहे. देवळाशेजारींच खूप मोठा उत्तम दगडी बांधणीचा तलाव आहे. असा आणखी एक तलाव देवळाच्या दुसऱ्या द्वाराजवळ आहे. पायऱ्या चढून आम्ही देवळांत गेलों तों मुख्य देवळाचा दरवाजा बंद होता. तो उघडण्यास पुष्कळ अवकाश आहे असें कळलें. तेव्हां माझी थोडी निराशा झाली. पण आम्ही या मुख्य मूर्तीच्या आसपास असलेल्या इतर देवांचें दर्शन घेतलें. या देवालयांतील नक्षीकाम उत्तमच आहे. पण एकंदरींत या देवळांत बराच साधेपणा दिसला. नक्षीकामाचा अतिरेक नसल्यामुळें मला हें देवालय जास्त आवडलें. या देवालयाचा मंडप मात्र खूप नक्षीकामाचा आहे. मंडप मोठा प्रमाणबद्ध असल्यामुळें सुंदर दिसतो. मंडपाचा प्रत्येक खांब एकसंधी काळया दगडाचा असून प्रत्येक खांबावर देवादिकांच्या निरनिराळया पण फारच बारकाईचें नक्षीकाम केलेल्या मूर्ती आहेत. एक मूर्ति विष्णुची तर दुसरी बासरी वाजवित असणाऱ्या कृष्णाची, एक शेषशायी नारायणाची तर दुसरी गणपतीची, अशा प्रत्येक खांबागणिक निरनिराळया सुबक मूर्ती खोदलेल्या आहेत. केवढें अवाढव्य श्रमाचें व कौशल्याचें हें काम आहे! कारागिरांचा हात तरी किती घटलेला व सफाईचा असला पाहिजे कारण नक्षीकामांत जरा चूक झाली कीं सबंध खांब निकामी व्हावयाचा. या मंडपाचें मूर्तिकलाकाम खरोखरींच आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. आम्ही याप्रमाणें मंडपाचें कलाकौशल्य पाहाण्यांत गर्क असतां एक देवळाचा उपाध्याय घाईघाईनें आला व रा. पिले यांस म्हणाला "मुख्य देवळाकडे लवकर चला, कारण देवाचा दरवाजा उघडला आहे." आमच्या देवदर्शन घेण्याच्या प्रबल इच्छेचा हा प्रभाव असो कीं आमच्या सुदैवाचा हा प्रभाव असो पण आम्हांला फार वेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं हें खरें. आम्ही लागलीच मुख्य गाभाऱ्याकडे गेलों व मूर्तीचें दर्शन घेतलें. हें देऊळ विष्णूचें आहे. देवदर्शन

झाल्यावर आम्ही परतलों. मला गादीला गुंडाळतां येणारी दोन फूट रुंदीची चटई घ्यावयाची होती; म्हणून एका चटईवाल्याच्या दुकानीं गेलों. मला पाहिजे होती अशी सुंदर चटई अवघी तेरा आण्यांस मिळाली. पण त्या दुकानीं मी रेशमी कपड्यासारख्या मऊ व बारिक विणीच्या लोकरी गालीच्याप्रमाणें मौल्यवान चटया पाहिल्या. त्या दहा दहा बारा बारा रुपयांपर्यंत किंमतीच्या होत्या. शाळेंत नकाशे ठेवण्याकरितां जशा कापडाच्या लांब व बारिक पिशव्या करतात तशा बारिक व लांब पिशव्यांत या चटया ठेवलेल्या होत्या. इतकें नाजूक व कलाकुसरीचें गवती चटयांचें काम त्रावणकोर संस्थानांत होतें. पदार्थसंग्रहालय, वेधशाळा, त्रिवेंद्रमचें वाळवंट व बंदर वगैरे प्रेक्षणीय स्थळें रा. पिले यांना अधिक त्रास न देतां मीं स्वतःच पाहण्याचें ठरविलें होतें. दुसरे दिवशीं म्हणजे शनिवार ता. १३ जानेवारी रोजीं सायंकाळीं त्रिवेन्द्रमला परत येऊन मलबारचें सर्व दृश्यदर्शन संपवून आदितवारीं कन्याकुमारीस जाऊन सकाळच्या आगगाडीनें मध्यें कोठेंही न थांबतां तडक ट्युटिकोरिन बंदरास जाण्याचा माझा बेत त्यांना सांगितला, तो त्यांना पसंत झाला. पण एकदां तरी आमच्या घरीं जेवणास या असा आग्रह रा. पिले यांनीं केल्यावरून आपले घरीं रात्रीच्या जेवणाला येतों असें सांगून मी रा. पिले यांचा निरोप घेतला व परत छत्राला आलों. दैवदशनाचा दिगंबरप्राय पोशाख उतरून शर्ट, कोट, टोपी, धोतर व चपला असा साधा पोशाख करून स्टेशनच्या इंडियन रिफ्रेशमेंट रूममध्यें पोटोबाची पूजा करून चालतच रेसिडेन्सीच्या पूर्वेकडून जाणाऱ्या रस्त्यानें—कारण हा रस्ता मी अजून मुळींच पाहिला नव्हता—पदार्थसंग्रहालयाकडे जाण्याचा बेत केला व तडक स्टेशनपढच्या रस्त्यानें चाललों. मागें सांगितल्याप्रमाणें रेसिडेन्सीच्या संगीनीच्या पाहाऱ्यापायीं हा मूळचा सरळ रस्ता वांकडा तिकडा व वळणाचा बनला आहे. हा रस्ताही रेलवे स्टेशनकडून चढता व उंचवट्यावरचा आहे. स्टेशनसमोरच्या रस्त्यानें जातांना त्रिवेन्द्रम शहर कांहींसें अर्धवर्तुळाकार कसें आहे हें समजलें.

या सखल भागांत भाताचीं हिरवींगार शेतें असून त्यांचे सभोंवार नारळी, पोफळी, केळींची गर्द झाडी आहे. मुख्य रस्त्याप्रमाणें हा रस्ताही मोठा प्रशस्त असून निर्धूळ, दोन्ही बाजूंस उत्तम पाऊलवाट असलेला व त्याचे कडेस उंच उंच वृक्ष असलेला असाच आहे. तसेंच याचे दोन्ही बाजूंस सरकारी कचेऱ्या व मोठमोठ्या बागांनीं अलंकृत केलेले बंगले आहेत. रस्ता चढत चढत सर्वांत उंच ठिकाणीं येतो. येथें शहराच्या पाणीपुरवठ्याचें प्रचंड तलावाचें काम चालू होतें; म्हणून टेकडीवर चढलों तोंच वेधशाळेची कचेरी लागली. वेधशाळेचे दुय्यम अधिकारी तेथें होते. त्यांनीं मला सर्व वेधशाळा दाखविली. हें ठिकाण शहरांत सर्वांत उंच आहे व म्हणूनच येथें वेधशाळा उभारली आहे. आतां शहरांतील उंचवटयाच्या बंगल्यांना व इमारतींना पाणीपुरवठा करण्याकरितां दोन प्रचंड तलाव बांधण्यांत येत आहेत असें त्या अधिकाऱ्यानें सांगितलें. आम्ही वेधशाळेच्या वायुवेगदर्शक व इतर यंत्रें ठेवण्याच्या उंच गच्चीवर गेलों. येथून सर्व शहराचा व सभोंवारचा विलक्षण देखावा दिसत होता. या शहरांत लहान लहान टेकड्या कशा आहेत व त्यामुळें शहर कसें विलक्षण उंचसखल झालेलें आहे; तसेंच शहरांत झाडी किती दाट आहे व शहरांत व आसपास तलाव, पाण्याचे पाट यांची विपुलता किती आहे, या सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून मला या गच्चीवरून दिसल्या. सार्वजनिक इमारती आपल्या मनोऱ्यांच्या व मंगलोरी कवलांच्या छपरांच्या मिषानें आपलीं विड्यानें रंगलेलीं तोंडें त्या सर्व हिरव्यागार गर्द झाडींतून हिरव्या रंगाचा गोषा पांघरलेल्या बायकांप्रमाणें चोरून बाहेर काढीत आहेत असा मला भास झाला. मग मी तलावाच्या भिंतीवर चढलों. या भिंती आतां गच्चीपेक्षांही उंच झाल्या होत्या. येथूनही शहराचा मोठा मनोहर देखावा दिसला. नंतर प्रेक्षक-पुस्तकांत वेधशाळा पाहिल्याबद्दल मीं आपली सही केली व त्या अधिकाऱ्याचे आभार मानून नजीकच असलेल्या पदार्थ–संग्रहालयांत गेलों. तेथें मराठी भाषा बोलणारी मंडळी भेटली. त्यांपैकीं रा.

दीक्षित, एम्. ए., एल्एल्. बी. (सध्या उमरावतीस वकिली करतात) यांनीं मला ताबडतोब ओळखलें. कारण त्यांनीं मला पांचसात वर्षांपूर्वीं नागपुरास पाहिलें होतें. त्यांच्या पत्नीनें तर मला अधिक नजीकची ओळख सांगितली ती अशी कीं, "आपली सून व मी पुण्याच्या हुजूरपागेच्या वसतिगृहांत असतांना एकाच खोलींत राहात होतों." महाराष्ट्रीय मंडळींच्या भेटीचा हा मोठा अचानक योग आला म्हणून मला अधिक आनंद वाटला. नंतर आम्ही सर्व पदार्थ-संग्रहालय हिंडलों. ही इमारत बडोद्याच्या पदार्थ-संग्रहालयाच्या इमारतीसारखी वाटली. कदाचित् थोडी लहान असेल. येथेंच मला त्रिवेन्द्रम् शहराचा व त्रावणकोर संस्थानचा असे दोन्ही मोठमोठे निम्नोन्नतिदर्शक नकाशे पहाण्यास मिळाले. ते मला फारच आवडले व मी ते किती वेळ तरी बारकाईनें पहात होतों.

त्रावणकोर संस्थानच्या पूर्वेस एकसारखी कन्याकुमारीपर्यंत पर्वतांची उंचच उंच रांग लागलेली आहे. त्यामध्यें **अगस्त्य** शिखर नांवाचें समुद्रसपाटीपासून सहा हजार फुटांच्यावर उंच असलेलें ठिकाण पाहून तर मला आश्चर्य वाटलें. दक्षिणेकडचा पश्चिमघाट या अर्वाचीन नांवानें प्रख्यात असलेली ही पर्वतराजी आमच्या सह्याद्रीपर्वतापेक्षां ठेंगणी आहे अशी माझी केव्हां तरी व कशी तरी समजूत झाली होती; पण माझ्या दक्षिण हिंदुस्थान व केरल या प्रांतांच्या प्रत्यक्ष दर्शनानें व या निम्नोन्नतिदर्शक नकाशानें ती समजूत किती चुकीची होती हें मला कळून आलें. त्रावणकोर संस्थान सह्याद्रीपर्वताच्या पश्चिमेकडील कोंकणाप्रमाणेंच आहे हें पाहून न कळत आपलेपणाची भावना माझ्या मनांत उभी राहिली. या संग्रहालयांत झाडाच्या सालीचें कापड — ज्यापासून पूर्वकाळीं आर्य ऋषी वल्कलें करीत तें — पाहिलें. लंकेंत पेरेडॅनिया बागेंत तर प्रत्यक्ष त्या सालीचा वृक्षच पाहिला.

पदार्थसंग्रहालय पाहिल्यावर आम्हीं मुख्य रस्त्यावर असलेलें **कलाभुवन** व तेथल्या मुलांनीं केलेलीं कलाकुसरीचीं कामें व चित्रें पाहिलीं. प्रख्यात

चित्रकार राजा रविवर्मा यांच्या खुद्द हातचीं कांहीं चित्रें पाहिलीं. नंतर आम्ही सर्व मंडळी मोटार बसमध्यें बसून राजकन्येच्या भावी विवाहानिमित्त नवा होऊं घातलेला लग्नमंडप पाहण्याकरितां किल्ल्याच्या फाटकाशीं आलों व त्या लग्नमंडपाचा शोध करीत देवळाच्या तलावापाशीं आलों. तेथून देवळाचा खरोखरीच सुंदर देखावा दिसला; म्हणून रा. दीक्षित यांनीं तलावाच्या पाण्यांतल्या पायरीवरून तात्काळ एक फोटो घेतला, व मग आम्ही चवकशी करीत कसे तरी त्या लग्नमंडपापाशीं आलों; पण बांबूच्या तट्ट्यांनीं मढविलेल्या खांबाखेरीज तेथें कांहींच दिसलें नाहीं. अर्थात् मंडप अजून तयार होऊन त्या खांबावर रंगचित्रें वगैरे सर्व काढून मंडपाची शोभा व रोषनाई वाढविणारीं कामें व्हावयाचींच होतीं. उगाच येथें येण्यांत वेळ खर्च केला व पायाचें भाडें दिलें असें सर्व मंडळीला वाटलें. म्हणून आम्ही किल्ल्याच्या फाटकापाशीं आलों. तोंच त्रिवेन्द्रम्च्या बंदराला व वाळवंटाला जाणारी मोटार तयार होती; तेव्हां लग्नमंडप पहाण्याच्या नादीं लागून आमचें वाळवंट व बंदर यांचें दर्शन तरी चुकलें नाहीं. येवढ्यांतच समाधान मानून आम्ही मोटारींत बसलों व सुमारें अर्ध्या तासानें बंदरावर आलों. त्रिवेन्द्रम्चें बंदर व वाळवंट आलेप्पेच्या प्रमाणें मोठें सुंदर आहे. आधीं बंदरावर बऱ्याच माल सांठविण्याच्या व इतर इमारती आहेत, तेव्हां हें वाळवंट क्विलॉनच्या प्रमाणें सामसुमीचें व निर्जन वाटलें नाहीं. शिवाय त्रिवेन्द्रम्चा किनारा सारखा सरळ असून वाळू बारिक, गुळगुळीत, किंचित् तांबड्या रंगाची छटा मारणारी पण पांढरी आहे. यामुळें हें वाळवंट मला फारच मनोहर वाटलें. आलेप्पेच्या प्रमाणें येथेंही समुद्रांत घुसलेला लांबच लांब व रुंद असा लोखंडी खांबाचा व लाकडी तक्तपोशीचा धक्का आहे. आगगाडीचा रस्ता धक्क्याच्या टोकापर्यंत नेला असून मालाची चढउतार करण्याकरितां लहान मोठ्या यान्याही धक्क्यावर बसविलेल्या होत्या. तसेंच माल

भरलेल्या बैलगाड्यांची जा ये सुरू होती. याप्रमाणें त्रिवेन्द्रम्‌चें बंदर गजबजलेलें दिसलें.

**आरबी** समुद्राचें काय किंवा त्याचाच सहोदर जो **हिंदी महासागर** त्याचें काय स्वरूप केव्हांही, कोठेंही व किती वेळही पहा, तें सारखेंच दिसतें. त्याचा तो हिरवट, नीळसर रंग, त्याच्या लाटांचा तो धूमधडाका व त्या लाटांवरील पांढऱ्या शुभ्र फेंसाची उसळी सदोदित सारखी चालूच असते. पावसाळ्याच्या समयीं व त्याच्या सुरवातीस तर त्या लाटा फारच उग्र व अक्राळविक्राळ स्वरूप धारण करतात. या आरबी समुद्राचा माझ्या गेल्या पांच चार वर्षांच्या आयुष्यक्रमांत कितीतरी दृढ परिचय होत आला आहे. आधीं विलायतेची यात्रा करितांना मीं सबंध आरबी समुद्र भर पावसाळ्यांत ओलांडला होता. पण माझ्या समुद्र ओलांडण्याच्या पहिल्याच धाडसाबद्दल मला अद्दल घडावी म्हणून कीं काय आरबी समुद्रानें त्यावेळीं मला दर्यादुर्खीचें दुःख सोसण्यास भाग पाडलें. मला नांवानें तांबडा व वस्तुतः नीलवर्ण असा तांबडा समुद्र येईपर्यंत खोलीबाहेर पडतांच आलें नाहीं व आरबी समुद्राचें दर्शन त्यावेळीं मुळींच घेतां आलें नाहीं; पण माझ्या परत प्रवासाचे वेळीं मात्र मला दर्यादुखी मुळींच लागली नाहीं व आरबी समुद्रांतील प्रवासाच्या सर्व आठवडाभर मला आरबी समुद्र सदोदित दिसत होता. माझ्या लंकेच्या प्रवासांत दोन दिवस मी सारखा आरबी समुद्रांतून चाललों होतों. नाताळच्या सुटींत दक्षिण हिंदुस्थानला परत येतांना धनुष्कोडीस मला बंगालचा उपसागर व आरबी समुद्र यांचा संगम पहाण्यास सांपडला. केरल प्रांतांत शिरल्यावर केव्हां दुरून तर केव्हां अगदीं जवळून आरबी समुद्र मीं किती तरी वेळां पाहिला; व आतां त्रिवेन्द्रम् येथें रा. दीक्षित यांच्या समवेत मी त्या सुंदर वाळवंटावरून आरबी समुद्राकडे व त्याच्या लाटांच्या तांडवाकडे मोठ्या मजेनें पहात होतों. आम्ही वाळवंटाच्या कोरड्या वाळूवर पाण्यापासून वावभर दूर उभे होतों. समुद्राच्या लहरीनृत्याकडे पहात असतांच एक लाट येवढी

मोठी जोरानें आली कीं, तिनें वावभर अंतर जलमय करून आम्ही उभे होतों तेथें पाऊलभर पाणीच पाणी केलें व आमच्या मागें पुढें डाव्या उजव्या बाजूस फेंसाचें जाळेंच्या जाळें पसरल्याप्रमाणें झालें. आरबी समुद्र आपल्या जाळ्यांत आम्हांला आडकवितो कीं काय अशी मनांत किंचित् धास्ती उत्पन्न झाली. आरबी समुद्राचें याप्रमाणें सर्वदा भव्य व केव्हां केव्हां भीतिदायक स्वरूप असतें. तरी पण या समुद्राकडे सारखें पहात राहावें असें वाटतें यांत शंका नाहीं. आरबी समुद्र मानवी मनाला आश्चर्य, आनंद व उत्साह यांची जोड करून देणारा कल्पवृक्ष आहे, निदान माझा तरी आतांपर्यंतचा तसा अनुभव आहे. तेव्हां भव-भूतीच्या शब्दानें त्याचें वर्णन 'रमणीयक निधीचा अधिदेव व सौंदर्य-सार समुदाय' असें मी करीन. अशा प्रकारचे विलक्षण व सिंहाव-लोकनरूप विचारतरंग माझ्या मनांत उठत होते तोंच बंदराहून गांवांत परत जाणारी शेवटची मोटार आली असें कळलें. म्हणून आम्ही त्या वाळवंटाच्या मऊमऊ व बारीक वाळूवरून अनवाणी चालत मोटारपाशीं आलों व मोटारींत बसलों. दुसरे दिवशीं प्रातः-काळीं मला दक्षिण दिशेस तर त्या महाराष्ट्रीय मंडळीस उत्तर दिशेस जावयाचें होतें; तेव्हां मोटारींतच परस्परांचा निरोप घेऊन ती मंडळी छत्राकडे गेली व मी रा. पिले यांच्या घराकडे गेलों. झालें. येथेंच माझें त्रिवेन्द्रमचें दृश्यदर्शन संपलें.

दुसरे दिवशीं पहांटेस साडेसहा वाजतां मी प्रथम त्रिवेन्द्रम्‌पासून तेवीस मैलांवर असणाऱ्या **मार्तंड** या गांवीं गेलों. कारण तेथें ग्रामो-द्धाराचें मोठें काम फार मोठ्या प्रमाणावर झालें असून तें बघण्या-सारखें आहे असें धारवाडच्या सहकारी पतपेढ्यांच्या खात्यांतील एका गृहस्थानें मला सांगितलें होतें व मार्तंड येथील संस्थेच्या सेक्रेटरीस एक परिचयपत्रही त्यांनीं दिलें होतें. म्हणून मी प्रथम मार्तंड येथेंच आलों. ग्रामोद्धार संस्था अशी मोठी पाटी मार्तंड

गांवच्या रस्त्यावरच होती. तेव्हां मी तेथें उतरलों. आवारांत थोडासा बागबगीचा केलेला असून समोर एक साध्या बांधणीचा एकमजली झोपडीवजा पण खुला सोपा होता. त्यांत जिकडे तिकडे बसायाचीं बाकें पसरलेलीं होतीं. भिंतीवर आरोग्यविषयक व कृषिविषयक माहिती देणारे सचित्र नकाशे व कोष्टकें टांगलेलीं होतीं. त्यावरून ही व्याख्यानाची व कृषिविषयक व ग्रामोद्धारविषयक माहिती देण्याची जागा आहे हें स्पष्ट दिसत होतें. आवाराच्या एका बाजूस एक कोंबड्यांचें तारांचें घरकूल होतें. त्याचे नजीक एक मोठा सिंधी बैल झाडाला बांधलेला होता. सोप्याच्या मागें थोडीं पिकें लावलेलीं होतीं. तेथें मी कांहीं वेळ थांबलों, पण चिटपाखरूं दिसलें नाहीं. शेवटीं एक माणूस दृष्टीस पडला. त्याला मी इंग्रजींत सेक्रेटरी कोठें आहेत हें विचारलें व त्यांच्या नांवाचें पत्र दाखविलें. त्याला इंग्रजी येत नसावें. त्या माणसानें खुणेनें बांकावर बसावयास सांगितलें व मी बसलों. बराच वेळ झाला तरी सामसूम व कोणाचाही पत्ता नाहीं. तेव्हां मी उतावीळ झालों व मग तें पत्र सेक्रेटरीस नेऊन देण्यास त्या माणसास खुणावलें. त्याला तें समजलें व मग त्यानें एका सायकलवाल्या पोऱ्याबरोबर पत्र पाठवून दिलें. थोडा वेळ झाला तरी कोणी आलें नाहीं. शेवटीं माझें पाठविलेलें पत्र घेऊन एक तरुण मुलगा माझ्याकडे आला. त्यानें इंग्रजींत मला सांगितलें कीं ज्यांना पत्र लिहिलेलें आहे ते सेक्रेटरी त्रिवेन्द्रम्‌मध्यें राहतात. तुम्हांला ते तेथें भेटतील. येथें माझे वडील काम करतात; पण ते दौऱ्यावर गेले आहेत. तेव्हां त्या मुलाजवळून जी काय माहिती मिळाली तेवढी घेतली. त्यानें सांगितलें कीं शेतकऱ्यांना कृत्रिम मधमाशांचीं पोळीं देऊन त्यांपासून मध कसा जमवावा, कोंबड्यांची जोपासना व अंड्यांची पैदास कशी करावी वगैरे माहिती शेतकऱ्यांस दिली जाते. आमच्या सांगलीस अमेरिकन मिशनची मंडळी यापेक्षां जास्त चांगलें व जास्त प्रमाणावर काम करतात असें मला वाटलें. सारांश, ही ग्रामोद्धार संस्था नेहेमींची धोपटमार्गी काम करणारी सामान्य

संस्था आहे; त्यांत कांहीं विशेष नांव घेण्यासारखें आहे असें मला वाटलें नाहीं. म्हणून मी त्या मुलाचे आभार मानून रस्त्यावरून **नागर कॉइलक**डे जाणाऱ्या मोटारींत बसून मार्गस्थ झालों. दुरून डोंगर साजरे या म्हणीची मला यावेळीं आठवण झाली. असो.

त्रिवेन्द्रम्‌पासून **नागर कॉइल** या मोठ्या गांवापर्यंतचा केरल प्रांताचा हा भाग फारच उंचसखल व डोंगराळ आहे; पण इतक्या माळरानीं, तांबड्या जमिनीच्या उंचवट्याच्या भागांत नारळी, पोफळी, केळी यांची लागवड मुबलक आहे. अर्थात सपाट, सखल भागांत हिरवींगार, पिवळसर लोंबी येऊन तयार होत आलेलीं व नुकतींच लावलेलीं अशीं तिन्ही अवस्थांतील भाताचीं सुंदर पिकें जागोजाग दिसत होतीं. पूर्व बाजूस पश्चिम पर्वताची रांग सारखी लागलेली दिसत होती. मात्र आतांचे हे डोंगर केरल प्रांताच्या सार्वत्रिक स्वरूपाप्रमाणें झाडीनें व हिरव्यागार रानानें व्यापलेले नव्हते; तर महाराष्ट्रांतील मला चिरपरिचित अशा काळ्याकभिन्न, उघड्याबोडक्या व निर्वृक्ष, निर्जळ अशा डोंगराप्रमाणें होते. हें दृश्य विलक्षण वाटलें. शिवाय काय त्या डोंगरांचे विचित्र व विक्षिप्त ( हा शब्द निर्जीव डोंगरांना लावतां येईल तर ) आकार! त्यांचें वर्णन किंवा शब्दचित्र देणें लेखणीच्या शक्तीबाहेरचें काम आहे. आमच्या महाराष्ट्रांतील काळ्याकुट्ट कातळांनीं जणूं कांहीं इतका लांबचा प्रवास केला व या लांबीच्या व दीर्घश्रमाच्या प्रवासानें त्यांची अंगयष्टि अशी वांकडी तिकडी व विचित्र आकाराची बनली असावी असें मला वाटलें. हे डोंगर आमच्या महाराष्ट्रांतील डोंगराप्रमाणें निर्जल, निर्वृक्ष म्हणून भीषण भासणारे होते खरे. पण पश्चिमेकडील सपाट जमीन मात्र आमच्या माळरानासारखी रुक्ष व भुरट्या रानानें युक्त अशी नव्हती; तर त्यांत सुंदर भातशेती असून जिकडे तिकडे पाटाचें पाणीच पाणी दिसत होतें. याचा अर्थ हा कीं त्रावणकोरच्या जुन्या व हल्लींच्या राजवटींत पश्चिम घाटावर पावसाळीं पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा संग्रह तलावांमध्यें करण्यांत येऊन त्याचे पाट थेट

कन्याकुमारीपर्यंत नेलेले आहेत. या संस्थानाधिपतीची प्रजावात्सल्यता किती कौतुकास्पद पहा! नाहीं तर आमच्या कोंकणांतील ब्रिटिश अमदानीची कारकीर्द पहा. त्या कारकीर्दींत जुन्या राजवटींतील जुने तलावही बुजून गेले व त्यांची अनिश्चित पावसावर अवलंबून असणारी भातशेती करण्यांत आली; मग नव्या तलावांचें नांवच नको. कोकणांत शंभर दीडशें इंच पाऊस पडत असून तें सर्व पाणी 'समुद्राः तृप्यंतु' असें म्हणून समुद्रांत वाहूं दिलें जातें व उन्हाळयाच्या चार महिन्यांत खेड्यांतील लोकांना धड प्यायला पाणी मिळत नाहीं. अशी आमची ब्रिटिश अमदानी. निसर्गानें सारख्या स्थितींत निर्माण केलेल्या दोन प्रांतांमध्यें एके ठिकाणीं मनुष्याच्या करामतीनें व दुसऱ्या ठिकाणीं मनुष्याच्या हलगर्जीपणामुळें किती जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे असा जरा खेदजनक विचार माझ्या मनांत उभा राहिला. असो.

जसजशी आमची मोटारबस कन्याकुमारीनजीक येत चालली तसतसें भूमिभागाचें स्वरूप रामेश्वराकडे व धनुष्कोडीकडे पाहिल्याप्रमाणें वाळवंटी व समुद्रवलयांकित असें न भासतां उलट हा भूमिभाग महाराष्ट्रांतील घाटमाथ्यानजीकच्या भागाप्रमाणें तांबड्या मातीचा, तांबडसर मुरुमाचा व भुरट्या रानाचा बनलेला दिसला. आम्हीं हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकानजीकच्या व अफाट हिंदीमहासागराच्या तोंडाशीं चाललों आहों हें जर मैलाच्या दगडावरील कमी कमी होणाऱ्या आकड्यांनीं कळविलें नसतें तर थोड्याच मिनिटांत आमची बस समुद्राच्या किनाऱ्यावर जाणार हें कदापिही समजून आलें नसतें. जिकडे पहावें तिकडे घट्ट, तांबड्या खडकाची व पिवळसर तांबड्या मुरुमाची जमीनच जमीन व त्यावरील तें भुरटें रान व दूर दूर कांहींशी गर्द झाडी; असा हा मोठा अनपेक्षित, आश्चर्यकारक व अचंबा वाटणारा देखावा दिसतो. याचें कारणही तावडतोब ध्यानांत येतें. तें हें कीं हिंदुस्थानचें दाक्षिण टोंक कन्याकुमारी हें धनुष्कोडीप्रमाणें समुद्रामध्यें घुसलेलें लांबट पण


अरुंद असें टोंक नाहीं; हें दक्षिण टोंक अर्धगोलाकार, रुंदट जमिनीचें टोंक आहे; शिवाय त्या टोंकाकडचा भूमिभाग जरा चढता आहे. यामुळें कन्याकुमारीस थेट पोहोंचेपर्यंत तो अफाट हिंदीमहासागर यात्रेकरूंना दर्शन देत नाहीं. पण शेवटीं एकदांची आमची मोटारबस तो चढावाचा रस्ता चढून वर आली मात्र, तोंच समोंवार तो अफाट व काळ्यानिळ्या रंगाचा हिंदीमहासागर माझ्या दृष्टीस पडला. शेवटीं एकदां हिंदुस्थानचें दक्षिण टोंक गांठलें असें वाटून मला मोठें समाधान वाटलें. **कन्याकुमारी** हें नांव मीं माझ्या दहाव्या वर्षीं मराठी चवथ्या इयत्तेंत असतांना वाचलें होतें व पाठ केलें होतें. वयाच्या दहाव्या वर्षापासून परिचितनाम असें तें प्रख्यात स्थान प्रत्यक्ष पाहण्याचा योग आज वयाच्या चौसष्टाव्या वर्षीं व नांव पाठ झाल्यापासून चौपन्न वर्षांनीं आला हें ध्यानांत येऊन माझें मन आभार व आनंद या दोन मनोभावनांनीं उचंबळून आलें. परमेश्वरानें मला हिंदी माणसाच्या दृष्टीनें दीर्घायुष्य दिलें, इतकेंच नाहीं तर या वयांत लांबलांबचा प्रवास करण्याची तरुण हौस, प्रवासाची दगदग व त्रास सोसण्यास समर्थ अशी प्रकृति व रोज दहा बारा मैलांची मजल मारण्याची पायांना दिलेली ताकद या सर्व दैवी देणग्यांबद्दल मीं प्रथमतः परमेश्वराचे मनोमय आभार मानले. पण या सर्व देणग्या असूनसुद्धां संसाराचा लकडा व जबाबदारी अंगावर असती तर किंवा पैशाचा फाजील लोभ असता तर मी इतर सेवानिवृत्त लोकांप्रमाणें पुन्हां सेवाशृंखलाबद्धच झालों असतों. मग मला असे लांबचे प्रवास करण्यास सवड किंवा संधि सांपडली नसती. तेव्हां मला वाटलें कीं माझें दैव किती चांगलें कीं, माझे सर्व मुलगे आपआपला संसार संभाळण्यास समर्थ झाले असून माझ्यावर संसाराचा भार कांहीं एक राहिला नाहीं. पण इतक्या गोष्टी अनुकूल असून सुद्धां प्रवासाला 'तण्डुलाः प्रस्थमूलाः' असे पैसे पाहिजेत. त्या पैशाची मुक्त हस्तानें मदत करणारे आश्रयदाते व सन्मित्र मला लाभले हें माझें केवढें भाग्य असें माझ्या मनांत आलें. त्या माझ्या सन्मित्राचे व आश्रयदात्याचे मनांतल्या मनांत मीं आभार मानले.

कन्याकुमारीचें श्रुतिपरिचित स्थळ पाहतांच वर निर्दिष्ट केलेल्या मनो-वृत्ती माझ्या मनांत एकदम उद्भूत झाल्या व त्यामुळें **कन्याकुमारी देवीचें** दर्शन घेण्याचें मला भानच राहिलें नाहीं. पण लवकरच माझें लक्ष त्या देवळाच्या छोट्या शिखराकडे गेलें. मग मी तें सर्व स्थळ व देऊळ सावकाशपणें पाहिलें. असो.

मी कन्याकुमारीस पोहोंचलों तेव्हां साडेबारा एकाचा सुमार होता. देवळाच्या आवारांत व समुद्रकांठीं चिटपाखरूंही दिसलें नाहीं. येथें किनारा अर्धगोलाकार असून देवालय अर्धगोलाच्या मधोमध म्हणजे खरोखरींच टोंकाला आहे. येथें वाळवंट किंवा बारिक वाळू मुळींच नाहीं, सर्व किनारा काळसर जांभळ्या खडकाचा आहे. ज्याप्रमाणें बाणकोटच्या पलीकडील **हरेश्वरीं** मोठमोठ्या खडकांचा किनारा आहे तसा कांहींसा येथें देखावा आहे. मात्र येथें डोंगर नसून सारखी सपाटीच आहे. किनाऱ्याच्या सर्व बाजूला खुल्या भिंती बांधलेल्या आहेत; मधूनमधून समुद्राच्या पाण्यापर्यंत जाण्यास दगडी पायऱ्या बांधल्या असून दोन ठिकाणीं छोटेसे दगडी मंडप बांधलेले आहेत. स्नान करणाऱ्या यात्रेकरूंना कपडेलत्ते ठेवण्याकरितां व पाऊस पडत असल्यास उभें राहण्याकरितां हे मंडप बांधले असावेत असा मीं तर्क केला. किनारा सर्व खडकमय आहे. जेथें खडक फार अवघड आहेत तेथें थोडें बांधकाम करून पाऊलवाटेपुरता धक्का केला आहे. या धक्क्यासमोर नजीकच दोन तीन काळेभोर खडक समुद्रांत बेटांसारखे वर आलेले आहेत व ते खडक किनाऱ्यावरील धक्क्याशीं कठड्यांनीं व अवघडशा पाऊल वाटेनें जोडलेले आहेत. धक्क्याला लागून समुद्राच्या पाण्यापर्यंत खोल पायऱ्या केलेल्या आहेत, व पायऱ्यांच्या जवळच पाण्याची खोली दाखविणारा खांब रोवलेला आहे. अर्थात् नाशीक, वाई वगैरे क्षेत्रांचे ठिकाणीं नदींत स्नानाकरितां जशीं कुंडें केलेलीं आहेत तसें हें कन्याकुमारी येथें समुद्रस्नानाकरितां समुद्रकुंड केलेलें आहे. मी त्रिवेन्द्रम् येथून कन्याकुमारीकडे येण्यास निघालों तेव्हां **बरोबर कांहींएक** सामान घेतलें नव्हतें पण **सेतु रामे-**



नं. १५ ] कन्याकुमारी : किनाऱ्याचा देखावा [ पान ९६



नं. १६ ] कन्याकुमारी येथील देवळाचा प्राकार [ पान ११०

श्वरीं ज्याप्रमाणं समुद्रस्नान केलें तसें करतां यावें म्हणून एक टॉवेल, एक धोतरी व एक उपरणी बरोबर घेतली होतीं. दक्षिण हिंदुस्थानांतील सामान्य लोकांचें नेसावयाचें म्हणण्यापेक्षां कमरेभोंवतीं दुहेरी गुंडाळाव-याचें छोटें धोतर याला धोतरी हें नांव शोभेल; व त्यांचे उपरणें म्हणजे लहानसा आखुड पंचा तेव्हां त्याला उपरणी म्हणणें शोभेल. कारण सेतु रामेश्वराप्रमाणें पुष्कळ लोक कन्याकुमारीस समुद्रस्नान करीत अस-तील असें मला वाटलें होतें. पण मी अगदीं अवेळीं गेलों होतों म्हणून म्हणा किंवा सेतु रामेश्वराइतका येथें स्नानाचा सररहा प्रघात नसावा म्हणून म्हणा; पण वर सांगितल्याप्रमाणें मी कन्याकुमारीच्या आवारांत गेलों तेव्हां तेथें चिटपाखरूंही नव्हतें. आरबी भाषेंतील गोष्टींतील ओसाड वाड्याप्रमाणें हें सर्व आवार निर्मनुष्य होतें. मी एकदां त्या खोल कुंडानजीक गेलों. तेथें पाणी तीन साडेतीन फूट असावें असें खांबाच्या आंकड्यावरून दिसत होतें; या कुंडांतही लहानशा लाटा येत होत्या, त्यानें पाणी थोडें खालीं वर जात होतें. तेव्हां अशा या अज्ञात समुद्रकुंडांत एका निर्जीव खांबावरच्या आंकड्याच्या आधारावर माझ्याच्यानें कुंडांत प्रवेश करून स्नान करण्याचें धैर्य झालें नाहीं हें मला कबूल केलें पाहिजे. माझ्या मनांत शंका आली कीं खांबावरून तीन फूट पाणी आहे असें दिसतें खरें. पण मध्येंच एखादा खळगा नसेल कशावरून किंवा नुकताच पडला नसेल कशावरून! शिवाय मला आतां आमच्या आरबी समुद्राची काय किंवा हिंदी महासागराची काय चांगलीच माहिती झाली होती. त्यांच्या लाटांचा धूमधडाका मीं किती तरी ठिकाणीं पाहिला होता; कन्याकुमारीच्या या कुंडाखेरीजच्या खडकांवरील लाटांची आदळ आपट व धूमधडाका मी प्रत्यक्ष पहातच होतों; मात्र कुंड सर्व बाजूनें संरक्षित असल्यामुळें येथें फारशा लाटा मारीत नव्हत्या: पण मला वाटलें इतर ठिकाणांप्रमाणें मी स्नानाला कुंडांत शिरलों असतांच एखादी मोठी लाट आली तर काय करा. सारांश, या एकाकी, ओसाड, निर्मनुष्य कुंडांत एकट्याच्यानें मला स्नान करवेना हें खरें. मला यावेळीं

**कार्लाईलच्या** एका प्रसिद्ध उक्तीची आठवण झाली. मनुष्यप्राणी हा एकलकोंडा, एकटा असला म्हणजे भित्रा प्राणी असतो; पण त्याला सोबती मिळाल्यास त्याचें धैर्य व कर्तबगारी दुप्पटच नव्हे तर दसपट वाढते. हें तत्त्व मला येथें प्रत्यक्ष अनुभवानें पटलें. या कुंडांत त्यावेळीं दुसरीं मनुष्यें स्नान करीत असतीं किंवा एखादा तरी सोबती माझ्या-बरोबर असता तर मला या कुंडांत स्नान करावयास खातरीनें धैर्य आलें असतें असें मला वाटलें. तात्पर्य काय कीं स्नानाची सर्व सामुग्री सज्ज असतां मीं कन्याकुमारीच्या समुद्रकुंडांत आंघोळ केली नाहीं. फक्त सध्यांच्या संध्येंत ज्याप्रमाणें डोक्यावर पाणी शिंपडून तांत्रिक स्नान करतात त्याप्रमाणें मीं समुद्राचें पाणी ओंजळींत घेतलें, तें नाकानें हुंगलें व मग थोडेसें पाणी डोक्यावर टाकून मीं कन्याकुमारीच्या कुंडांत तांत्रिक स्नान केलें व मग देवळांत शिरलों. दाक्षिण हिंदुस्थानांतल्याप्रमाणें या देवळालाही बाहेर प्राकार असून आंत प्रदक्षिणा मार्ग आहे. तेथें एक एकाकी शिपायी उभा होता. त्याला थोडें इंग्रजी येत होतें म्हणून बरें झालें. त्यानें देवीचें देऊळ पांच वाजतां उघडेल तेव्हांच देवीचें दर्शन होईल असें सांगितलें. मला अर्थात् तेथपर्यंत थांबण्यास वेळ नव्हता. तेव्हां नमस्काररूपी माझ्या नांवाचें कार्ड देवीच्या दारीं ठेवून मीं देवळाचा खुला भाग पाहिला. हें देऊळ बरेंच साध्या बांधणीचें आहे; दगडावर साधारण नक्षीकाम व थोडें फार मूर्तिकाम केलेलें आहे, तें मीं पाहिलें. शिपायाचे हातावर त्रिवेन्द्रम् संस्थानचें आपल्या अर्ध्या आण्यासारखें चक्रम् नांवाचें नाणें आहे तें चिरिमिरी दाखल ठेवून पुन्हां एकदां कन्याकुमारीच्या समुद्राच्या किनाऱ्यावरून फिरलों. समुद्राच्या देखाव्याचें शेवटचें दर्शन घेतल्यानें येथें आल्याचें सार्थक झालें अशा समाधानवृत्तीनें मी मोटारबस स्टँडपाशीं आलों व मोटारबस लवकरच निघाली. मोटार पाऊण तासांत **नागरकॉईलला** आली. कारण नागरकॉईलपासून कन्याकुमारी फक्त बाराच मैल आहे. येथें पावसाची

५०१५५

बरीच मोठी सर पडली. साधारण अर्धा तास येथें थांबावें लागलें; इतक्या वेळांत मी स्टँड शेजारच्या कॉफीगृहांत जाऊन पोटपुजा केली व मग मोटारींत बसलों, तो सायंकाळीं साडेसहा वाजतां त्रिवेंद्रमला पोहोंचलों. वाटेनें व त्रिवेंद्रम् येथेंही थोडथोडा पाऊस पडत होता. बऱ्याच रात्रपर्यंत पडत असावा. दुसरे दिवशीं सकाळींच म्हणजे ता. १४ जानेवारी सन १९३४ रोजीं मी आपला केरल प्रांताचा प्रवास संपवून **टच्युटीकोरिनला** तडक जाण्याकरितां त्रिवेंद्रम् एक्स्प्रेसगाडीच्या सेकंड क्लासांत सामान नेऊन टाकलें व मग स्वस्थपणें इंडियन रिफ्रेशमेंटमध्यें सकाळची न्याहारी केली. आमची आगगाडी सव्वासात वाजतां चालूं झाली. त्रिवेंद्रमपासून क्विलॉन चाळीस एक मैल असून रस्ता समुद्रकांठानें थेट उत्तरेस जातो. या पाहिलेल्या प्रदेशाचें पुनर्वर्णन म्हणजे द्विरुक्ति होणार तेव्हां तें न करतां येवढें सांगणें बस आहे कीं पूर्वीपेक्षां हा माझा आगगाडीचा प्रवास जलद झाला. मी दोन तासांतच **क्विलॉन** स्टेशनला आलों. येथून रेलवे रस्ता कांहींसा धनुष्याकार पण थेट पूर्वदिशेनें घाटाकडे वळतो. क्विलॉनपासून शेणकोटा स्टेशनपर्यंत सुमारें साठ मैलांचा रेल्वे रस्ता त्रावणकोर संस्थानांतून जातो. **शेणकोटा** हें घाटमाथ्यावरील स्टेशन त्रावणकोर संस्थानच्या हद्दीवरील गांव आहे; पुढें ब्रिटिश मुलखांतील तिनीवेली जिल्हा लागतो. या साठ मैलांपैकीं चाळीस मैल मुलुख तांबड्या लाल मातीचा असून तो साधारण समुद्रसपाटीवरच आहे, पण उंचसखल आहे. पिकांची तऱ्हा सारखीच आहे. वीस मैल रेल्वे रस्ता किंवा घाटाचा रस्ता हा वांकड्यातिकड्या दऱ्याखोऱ्यांतून व पर्वतांच्या चिळणींतून गेला आहे. या पर्वतराजींवर अतर्क्य असें मोठं दाट व उंच रान आहे. जिकडे पहावें तिकडे गगनचुंबी प्रचंड वृक्ष दृष्टीस पडतात. या वृक्षांची जणूं कांहीं पर्वतशिखराबरोबर उंचीच्या बाबतींत चढाओढ चालू आहे ! घाटामधील स्टेशनवर पडलेल्या लाकडांच्या प्रचंड ओंडक्यांवरून या त्रावणकोरच्या प्रचंड रानाची कांहींशी कल्पना होते. सह्याद्रि घाटांतील रान या राना-

पुढें कःपदार्थ आहे. हें मोठें आश्चर्यकारक अरण्य आहे यांत शंका नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें या घाटांत आमच्या सदर्न मराठा रेलवेरस्त्यावरील घाटांतल्याप्रमाणें अर्धवर्तुळाकार असें मोठें वळण आहे. पण कोठें ते आमच्या घाटांतील निर्वृक्ष, रुक्ष, मुरमी, धड ना पिवळा धड ना तांबडा अशा धूसर रंगाचे टेकडीवजा उघडे बोडके व अक्राळ विक्राळ डोंगर व कोठें या त्रावणकोरच्या घाटांतील घनदाट वृक्षांनीं सुशोभित झालेले, तांबड्या लाल मातीनें व तांबूस पांढऱ्या रंगाच्या खडकानें बनलेले आकाशभेदी उंच उंच डोंगर; कोठें आमच्या घाटांतील ते कोरडे खडखडीत व दगडाळ ओढे व कोठें या त्रिवेंद्रम् घाटांतील झुळझुळ वाहणारे, जलपूर्ण व सुंदर रंगी बेरंगी गोट्यांनीं व वाळूनें भरलेले ओढे; कोठें आमच्या घाटांतील त्या ‘ तुरळक तुरळक केश रुपेरी ’ अशा गवतानें आच्छादलेल्या व फिकट व पिकुटलेल्या पिकांनीं भरलेल्या दऱ्या व सपाट जमिनी व कोठें त्रावणकोर घाटांतील हिरव्या हिरव्यागार गवतानें शोभायमान झालेल्या व सतेज, सारख्या दाट वाढीच्या सुंदर भाताच्या पिकांनीं भरलेल्या दऱ्या व सखल जमिनी! याप्रमाणें या दोन घाटांतील जमीनअस्मानाचें अंतर पाहून मला आश्चर्य वाटलें. सृष्टिसुंदरीची **केरल** प्रांतावर इतकी बहाल मर्जी कां व आमच्या **महराष्ट्रावर** तिची इतकी गैरमर्जी कां हा मोठा गूढ व गहन प्रश्न आहे असें मला वाटलें. याप्रमाणें त्या घाटांतील सृष्टिसौंदर्याचें आकंठ पान करीत असतां शेनकोटा स्टेशन केव्हां आलें तें कळलें सुद्धां नाहीं; पण मग येथें मला गाडी बदलावयाची आहे व दुसरी गाडी निघण्यास बराच अवकाश आहे असें पाहून मी दुसऱ्या वर्गाच्या **वाटपाही** खोलींत जाऊन बसलों. मनीयाची स्टेशनपर्यंत जाणारी आगगाडी एक तासानें प्लॅटफॉर्मवर आली. मी आगगाडीच्या डब्यांत जाऊन बसलों व लवकरच गाडी सुरू झाली. **तिनीवेली** हा दक्षिण हिंदुस्थानचा शेवटला जिल्हा होय. हा अगदीं सपाट प्रदेश असून बराच सुपीक दिसला. जिकडे तिकडे हिरवीं गार व सारखीं दाट वाढलेलीं

भाताचीं शेतेंच शेतें ! या शेतांना कालव्यानें पाणीपुरवठा झालेला असल्यामुळें वाटोवाट लहान मोठे कालवे लागत होते. आतां केरळ प्रांतांतील तीं नारळी पोफळी केळीच्या बागांची सुबत्ता संपली. मात्र येथल्या भातशेतांच्या बांधांवर **पालमिरापाम** झाडांची रांगचीरांग लावण्याची पद्धति दिसली. माळरान जमिनींत तर खूप दाट अशी पालमिरा पाम झाडांची लागवड केलेली दिसली. हीं पालमिरा पामचीं झाडें सरळ सोटासारखीं वाढत जातात. कांहीं लोक डोक्यावर घेरेदार शेंडी ठेवतात त्याप्रमाणें या झाडांच्या सोटांच्या डोक्यावर घेरेदार अशी पानांची शेंडीच जणूं कांहीं वाढल्यासारखी भासते. कांहीं ठिकाणीं हीं झाडें चौकासारख्या जागेंत दाटदाटीनें लावतात. असे चौक मला हजारों खांबांनीं सुशोभित केलेल्या मंडपाप्रमाणें थेट दिसले. मला असें वाटतें कीं दक्षिण हिंदुस्थानांतील प्रचंड देवळांना हजार हजार खांबांचे दगडी मंडप बांधण्याची कल्पना या देशांतील धनिक धार्मिकांना व संपन्न राजेरजवाड्यांना या पालमिरा पामांच्या निसर्ग-निर्मित मंडपावरून सुचली असावी. तिनीवेली स्टेशनाच्या किंचित् आधीं व तें स्टेशन गेल्यावर कांहीं वेळानें नापीक व निवळ खडकाळ अशी जमीन बरीच दृष्टोत्पत्तीस आली. यावरून तिनीवेली हा जिल्हा मदुरा जिल्ह्याइतका सुपीक नसावा व त्यांत भाताखेरीज कांहीं एक पिकत नसावें असें मला वाटलें. पण मनीयाची स्टेशनच्या नजीकच्या भागांत मात्र कापूस, बाजरी, भुइमूग इत्यादि विविध पिकें करण्यांत आलीं होतीं. पण जमीन भिकार दिसली. त्यामुळें पिकांची वाढ बेता-बाताची दिसली. आमची गाडी **मनीयाची** जंक्शन स्टेशनला सुमारें पावणेसात वाजतां आली. आतां काळोखही पडला व पाऊसही पडूं लागला. शेणकोट्टापासून मनीयाची सुमारें सत्तर मैल आहे. येथें दोन तास थांबावें लागलें. अर्थात् येथें मीं इंडियन रिफ्रेशमेंटरूममध्यें रात्रीचें जेवण केलें. मनीयाचीपासून ट्युटीकोरीन अवघें वीस मैल आहे; त्या प्रवासास एक तास लागला. **ट्युटीकोरीन** स्टेशनवर रात्रीं साडेनऊ

वाजतां पोहोंचलों. गाडींत भेटलेल्या एका गृहस्थाच्या मदतीनें मी स्टेशनच्या समोरच्या खाणावळींत दोन दिवसांची राहण्याजेवणाची सोय करून घेतली. कोलंबोला जाणारी आगबोट ता. १६ जानेवारी १९३४ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां निघावयाची होती. मी ट्युटीकोरीनला ता. १४ जानेवारी रोजीं रात्रीं पोहोंचलों. आम्हांला मनीयाचीपासून जो पाऊस लागला तो त्या रात्रभर व ता. १५ रोजीं सर्व दिवस रात्रभर पडत होता. ता. १६ रोजीं पाऊस कमी झाला; तरी सकाळीं थोडथोडा व मधून मधून पडत होताच. यामुळें मला ट्युटीकोरीन शहर व बंदर मुळींच पाहतां आलें नाहीं. त्या दोन दिवसांत मी खोली बाहेर पडलोंच नाहीं. पण ही मला एक इष्टापत्तिच वाटली. कारण या दोन दिवसांत मी माझ्या केरलवर्णनपर पुस्तकाचीं तीन प्रकरणें लिहिलीं.

झालें. केरळ प्रांतांतील मी प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन संपलें; पण हें केरलवर्णनपर पुस्तक येवढ्यानें पुरें होऊं शकत नाहीं. एखाद्या सुंदर स्त्रीच्या अंगावरील दागिन्यांचें सविस्तर वर्णन करणें व तिच्या स्वरूपाबद्दल, स्वभावाबद्दल व पूर्वपीठिकेबद्दल अगदीं मूक वृत्ति धरणें हें ज्याप्रमाणें हास्यास्पद ठरेल त्याप्रमाणें केरल प्रांतांतील प्रेक्षणीय स्थळांचें सविस्तर वर्णन करणें व केरळप्रांताची पूर्वपीठिका व तेथील दोन संस्थानें व त्यांचीं हल्लींचीं राजघराणीं याबद्दल चकार शब्दहि न काढणें हास्यास्पद ठरेल. म्हणून पुढच्या प्रकरणांत मी केरल प्रांताचा पूर्व इतिहास व त्रावणकोर व कोचीन या दोन संस्थानांचा व त्यांच्या राजघराण्यांचा इतिहास देणार आहें. अर्थात् हा इतिहास स्वतंत्र पुस्तकाप्रमाणें पाल्हाळानें न देतां प्रवासवर्णनपर पुस्तकाला झेपेशा व शोभेशा रीतीनें देऊन मी आपल्या केरळप्रवासवर्णनपर पुस्तकाची परिसमाप्ति करणार आहें.

# प्रकरण ८ वें.

## केरल प्रांताची पुरातन पूर्वपीठिका.

ज्या प्रांताला हल्लीं **मलबार** प्रांत म्हणतात त्याची सध्यांची राजकीय स्थिति कुतरओढीची आहे. मूळचा हा एकजिनशी, एकभाषी, एकसंस्कृति प्रांत त्रावणकोर, कोचीन हीं दोन देशी संस्थानें व मद्रास इलाखा इतक्या निरनिराळ्या राज्यव्यवस्थेखालीं विभागलेला आहे. मागें सांगितल्याप्रमाणें मलबार हें या प्रांताचें अर्वाचीन नांव आहे. पण फार पुरातन काळापासून हा प्रांत **केरल** या नांवानें प्रसिद्ध आहे.

हिंदुस्थानचे प्रथम वसाहत केलेले जर कोणते प्रांत असतील तर ते सिंधु, गंगा व यमुना या मोठमोठ्या नद्यांच्या कांठचे सुपीक व सपाट प्रांत व दक्षिण हिंदुस्थानच्या टोंकाकडले तितकेच सपाट व सुपीक प्रांत हे होत यांत शंका नाहीं. हे प्रांत एकाच काळीं **आर्य व द्रविड** या दोन वंशांच्या लोकांनीं वसविलेले असोत किंवा मागेंपुढें वसलेले असोत, पण या प्रांतांत फार पुरातन काळापासून मोठमोठे राजे व राज्यें उदयास आलीं हें खात्रीपूर्वक सांगतां येतें. कारण त्यासंबंधाचे उल्लेख क्रिस्ती शकाच्या पूर्वींच्या चारपांच शतकांपासूनच्या वाङ्मयांत सांपडतात. उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान या मधला मोठा प्रदेश हा बऱ्याच काळापर्यंत अरण्यमय असून तो निर्जन असावा, फार तर त्यामध्यें तुरळक तुरळक द्रविड लोकांची वस्ती झालेली असावी. पण उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान हे प्रांत मात्र फार पुरातन काळापासून संस्कृतीचीं केन्द्रें बनले होते. केरल प्रांताच्या स्वाभाविक मर्यादा पहिल्या प्रकरणांत निर्दिष्ट केल्या आहेत.

या केरल प्रांताची भाषा एक आहे. त्याची संस्कृति एक आहे. त्याची भौगोलिक स्थितिही एक आहे. अशा तऱ्हेनें हा एक हिंदुस्था-

नचा स्वाभाविक, स्वतंत्र व सलग विभाग झालेला आहे. या प्रांताची दक्षिणोत्तर लांबी सुमारें चारशें मैल व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें पन्नास मैल आहे. या प्रांताबद्दल मागें उल्लेखिलेली नवलाची पण आपलेपणाची जी गोष्ट वाटते ती ही कीं या प्रांताच्या उत्पत्तीची दंतकथा व कोकण प्रांताच्या उत्पत्तीची दंतकथा **एकच** आहेत !

परशुरामाची दंतकथा पौराणिक पद्धतीनें प्रांताची उत्पत्ति सांगते. अर्थात् ती शास्त्रीय दृष्टीला पटणारी नाहीं; पण त्यामध्यें सत्याचा अंश नाहीं असें नाहीं. तो अंश इतकाच कीं, फार प्राचीन काळीं आरबी समुद्र पश्चिम घाटाच्या पायथ्याशीं असून एखाद्या धरणीकंपाच्या प्रचंड उलथापालथींत घाटाच्या पायथ्याची जमीन वर आली व समुद्र मागें हटला व म्हणून केरळ प्रांतरूपी अरुंद, सखल, सुपीक व मनुष्यवस्तीस योग्य अशी जमिनीची पट्टी तयार झाली.

जी दंतकथा केरळ प्रांताची उत्पत्ति सांगते तीच कथा तेथील एका जातीच्या वसाहतीच्या सुरवातीची गोष्ट सांगते. त्या दंतकथेप्रमाणें परशुरामानें ६४ ब्राह्मण कुळें केरळ प्रांतांत आणिलीं. तेच केरळ प्रांतांतील **नांबुद्री** ब्राह्मण होत. या प्रांतांत हे ब्राह्मण सर्वत्र पसरले व ते तेथील जमिनीचे मालक बनले, कांहीं तर प्रत्यक्ष छोटे राजे बनले. तेथल्या जुन्या रहिवाशांचे ते उपाध्याय व धर्मगुरु बनले; प्रांतांतील सर्व देवळें त्यांच्या ताब्यांत आलीं. याप्रमाणें ही नांबुद्री ब्राह्मणांची जात सर्व प्रांतांत प्रमुखत्व पावली.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां परशुरामाच्या दंतकथेंतील सत्यांश हाच कीं, केरळ प्रांतांत फार प्राचीन काळीं आर्यांतील ब्राह्मण येऊन ते तेथले स्थाईक रहिवाशी झाले. नांबुद्री ब्राह्मण येवढेच शुद्ध आर्यवंशी लोक केरळ प्रांतांत आहेत यांत शंका नाहीं. ह्या प्रांतांतील बाकीची वस्ती आर्यांचे पूर्वी आलेले द्रविड लोक व मूळचे त्या प्रांतांतील रानटी लोक यांची आहे. अर्थात् त्यांच्याच अठरा पगड जाती बनल्या. त्यांपैकीं

मूळचे लोक हे ब्राह्मण काय किंवा द्रविड काय या दोन्ही वंशांच्या लोकांपासून वेगळे होते व तेच त्या प्रांतांतील सध्यांचे अस्पृश्यवर्णीय लोक होत.

या प्रांतांत द्रविड लोकांची वसाहत आर्यांच्या पूर्वींची आहे यांत शंका नाहीं. त्यामुळेंच सर्व प्रांतांत **मलयाली** ही द्राविडी भाषा सररहा बोलण्याची भाषा बनली; द्रविड लोकांतील सामाजिक चालीरीती व धर्म-समजुती सर्व लोकांत प्रचलित झाल्या. म्हणून जरी नांबुद्री ब्राह्मण हे आर्यवंशीय लोक मागाहून प्रांतांत आले व त्यांनीं समाजाचें धार्मिक व व्यावहारिक पुढारीपण पटकावलें तरी पण त्यांना आपली भाषा टाकून द्राविडी भाषा व द्राविडीं धर्मसमजुती व सामाजिक चालीरीती स्वीकाराव्या लागल्या. म्हणून हिंदुस्थानांतील ब्राह्मणवर्गामध्यें असणाऱ्या सामान्य चालीरीतीपेक्षां फारच वेगळ्या चालीरीती नांबुद्री ब्राह्मणांत दिसून येतात.

नांबुद्री ब्राह्मणांत बालविवाहाचा प्रघात मुळींच नाहीं. आपल्या कुटुंबांची आर्थिक स्थिति व सामाजिक दर्जा उच्च प्रकारचा राहण्याकरितां त्यांनीं कुटुंबांतील थोरल्या मुलानें फक्त सजातीय स्त्रीशीं विवाह करून कुटुंबपरंपरा व कुटुंबाची मिळकत चालू ठेवावी अशी रीत पाडली. बाकीच्या भावांनीं द्रविड लोकांमध्यें व विशेषतः त्या लोकांतील क्षत्रियपेशाच्या **नायर** नांवाच्या लोकांमध्यें प्रचलित असलेल्या बहुपतिकत्वाच्या चालीनुरूप नायर बायकांशीं **संबंध** ठेवून राहावें अशी चाल पडली. नांबुद्री ब्राह्मणाकडून नायर बायकांना झालेली संतती स्त्रीवंशपरंपरेच्या चालीनुरूप नायर समजली जाई व त्यांचा पेशा नायर लोकांच्याप्रमाणें लष्करी बनून ते पुरुष सैन्यांत शिरून लढाईचीं कामें करीत. केरल प्रांतामध्यें नायर लोकांचीं पांचशें, साहाशें, हजार इसमांचीं कुटुंबें असत, त्यांत नायर पुरुषापासून व नांबुद्री पुरुषापासून **संबंध** नांवाच्या विवाहपद्धतीनें नायर स्त्रियांना झालेली पुरुषसंतती

सरखा नायर म्हणून शिपायी बनत. केरल प्रांताच्या पूर्वकाळच्या इतिहासांत याच नायर सैन्यानें वीरश्रीचीं कामें केलेलीं आहेत. कांहीं नांबुद्री ब्राह्मण छोटे छोटे राजे बनले खरे तरी मोठमोठे राजे व चक्रवर्ती राजे हे नायर जातीपैकींच असत.

केरल प्रांतांत नांबुद्री व नायर हे हिंदुस्थानांतील ब्राह्मण-क्षत्रियांप्रमाणें सर्व समाजांतील प्रमुख व सत्ताधीश वर्ग बनले व त्यांच्यामधील बहुपतिकत्वाच्या चालीमुळें या दोन जातींमध्यें सामाजिक तुटकपणा राहिला नाहीं. आपल्या जातीचें शुद्धत्व व दर्जा कायम राखण्याकरितां नांबुद्री ब्राह्मणांनीं राजघराण्याप्रमाणें थोरल्या मुलाकडे धार्मिक व आर्थिक आर्यकुटुंबपरंपरा ठेवण्याची पद्धति सुरू करून आपली जात व वर्ण अमिश्र व वेगळा ठेवण्याची तजवीज केली यांत शंका नाहीं.

पण आर्य व द्रविड या दोन्हीं वंशांतील लोकांचा एकच हिंदुधर्म होता. मात्र यामध्यें मागें सांगितल्याप्रमाणें कडक निर्बंधांनीं युक्त अशा अठरा पगड जाती निर्माण झाल्या. पण हिंदुस्थानच्या इतर भागांत न दिसून येणारी आणखी एक विशेष गोष्ट केरल प्रांतांत घडून आली होती. ती ही कीं, येथें यहुदी, ख्रिस्ती व मुसलमान धर्मांचे अनुयायी फार जुन्या काळापासून वसाहत करून राहिलेले दृष्टीस पडतात. याचें कारण केरल प्रांताचें **आरबी** समुद्र व तांबडा समुद्र यांच्यामधील जलमार्गानें, इजिप्त, अरबस्तान व पूर्वयुरोप यांच्याशीं दळणवळण व व्यापार फार पुरातन काळापासून चालू होता. ख्रिस्ती धर्माच्या जुन्या कराराच्या पुस्तकांत **सॉलोमन** राजाच्या गलबतांनीं दूर देशाहून हस्तीदंत, वानर, मोर, दालचिनी, आलें, व साग इत्यादि पदार्थ आणल्याबद्दल उल्लेख आहे. आतां हे पदार्थ हिंदुस्थान व विशेषतः मलबार या देशांखेरीज दुसऱ्या कोठेंही होत नाहींत हें स्पष्ट आहे. तेव्हां त्या पुरातन काळापासून केरल प्रांत व अरबस्तान यांमध्यें जलमार्गानें व्यापार चालू होता हें सिद्ध होतें; आणखी प्रत्यंतर हें कीं, निर्दिष्ट केलेल्या पदार्थांचीं हीब्रू भाषेंतील नांवें **द्रविड** भाषेंतील शब्दांचीं अपभ्रष्ट रूपें आहेत असें

सं. ता. ग्रा.

भाषाशास्त्रावरून ठरतें. तेव्हां सॉलोमन राजाच्या काळीं हे व्यापारी केरल प्रांतांतून तिकडे गेले असले पाहिजेत यांत शंका नाहीं. पुढें रोमन साम्राज्यकाळीं सुद्धां जलमार्गानें युरोपशीं केरल प्रांताचें दळणवळण चालू होतें ही गोष्ट त्रावणकोर प्रांतांत चार पांच रोमन बादशाहांच्या काळचीं जुनीं नाणीं सांपडलीं आहेत व तीं सध्यां त्रिवेंद्रम येथील पदार्थसंग्रहालयांत प्रत्यक्ष पहाण्यास सांपडतात हें होय. पुढें मुसलमानांच्या स्वाऱ्या व धामधूम चालू असतांना हें दळणवळण बंद पडलें. जुन्याकाळीं जलमार्गानें युरोप व हिंदुस्थान यामध्यें दळणवळण चालू असतांना ज्यू लोकांची एक टोळी केरल प्रांतांत आली. ते प्रथमतः केरल प्रांताचे प्राचीन बंदर **क्रँगनूर** (कोचीनच्या उत्तरेस वीस मैलांवर असलेलें) येथें उतरले. कालिकतच्या झामोरिन राजानें त्या लोकांना राहण्यास जागा देऊन त्यांना आश्रय दिला व त्यांना व्यापार करूं दिला. त्यांनीं राजाकडून कांहीं हक्क व सवलती मिळविल्याः त्या सवलती देणारा ताम्रपट अजून त्या लोकांजवळ आहे. पुढें हे लोक क्रँगनूर बंदर टाकून **कोचीन** बंदरीं राहण्यास आले. हल्लीं कोचीन येथें 'ज्यू टाऊन' म्हणून शहराचा एक भाग आहे; व त्याचे व्हाईट ज्यू टाऊन व ब्लॅक ज्यू टाऊन असे दोन पोट भाग झालेले आहेत. कारण मूळचे शुभ्रवर्णी ज्यू लोक वेगळे राहिले व त्यांची एक शुभ्र जात राहिली; तर ज्यू धर्म स्वीकारलेल्या द्रविड लोकांची आणि ज्यू व द्रविड यांच्या शरीरसंबंधानें झालेल्या संततींची काळे ज्यू म्हणून एक वेगळी जात बनली. या दोन जाती शहराच्या दोन पोटभागांत राहूं लागल्या कोचीनला असतांना मी व्हाईट ज्यू टाऊनमध्यें गेलों होतों व तेथें गोरी गोरी पान व सोनेरी केसांची ज्यू जातीची मुलीं, मुलें पाहून मला मोठें नवल वाटलें. इतकीं शतकें मूठभर लोकांनीं आपली वर्णशुद्धता कशी कायम ठेवली याबद्दल आश्चर्य वाटलें.

ज्यू लोकांप्रमाणें फार पुरातन काळापासून ख्रिस्त धर्मी लोक केरल प्रांतांत आहेत. त्यांच्यामध्यें असा समज आहे कीं, त्रारा ख्रिस्त धर्मी

प्रेषितांपैकीं ( Apostles ) **संट टॉमस** हा प्रेषित जलमार्गानें केरल प्रांतांत कॅलिकत येथें आला व त्यानें ख्रिस्ती धर्माचा येथें प्रसार केला. या धर्माच्या लोकांनाही मलबारच्या राजांनीं विशेष हक्क व सवलती दिल्या व त्याबद्दल ताम्रपट करून दिला. तो ताम्रपट अजून त्या लोकांजवळ आहे. या ख्रिस्ती लोकांना **सीरीयन** ख्रिश्चन असें म्हणतात. कारण ते सीरिया प्रांतांतून आले व त्यांचे धर्मोपदेशक व उपाध्याय नेहेमीं तिकडून पाठविले जात असत.

या वसाहती ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर लवकरच झालेल्या पण मुसलमानी धर्माच्या उदयाच्या आधींच्या खास आहेत. पुढें मुसलमानी धर्माच्या उदयानंतर अरबस्थानांतून मुसलमानधर्मीय व्यापारी केरल प्रांतांत येऊं लागले व त्यांनीं तेथें कायमच्या वसाहती केल्या. ज्यू लोकांप्रमाणें त्यांच्यामध्यें मूळचे आरबस्थानांतून आलेले मुसलमान यांची एक जात झाली व बाटलेल्या हिंदूंची व वर्णसंकरानें झालेल्या लोकांची **मोपला** म्हणून एक पोट जात झाली.

युरोपच्या पश्चिम किनाऱ्यावरील युरोपीयन लोकांपैकीं पोर्तुगाल देशांतला सरदार **वास्को डि गामा** यानें शोधून काढलेल्या नव्या व सलग जलमार्गाच्या द्वारें त्या लोकांच्या स्वाऱ्या सुरूं होण्यापूर्वीं कितीतरी शतकांपासून मलबार प्रांतांत ज्यू, ख्रिस्ती व मुसलमान अशा तीन्ही धर्मांचे लोक व मूळचे हिंदुधर्माचे लोक अशा चारी धर्मांचे लोक स्थाईक रहिवाशी झाले होते.

आतां केरल प्रांतांतील राज्यव्यवस्थेच्या पद्धतीकडे व स्थितीकडे वळणें बरें. मागें सांगितलेंच आहे कीं, केरल प्रांतांत आर्यांचे पूर्वीं द्रविड लोकांची कायमची वस्ती झाली होती व त्यांच्यापैकींच शूर पुरुषांनीं राज्यें स्थापन केलीं. त्यांच्यापैकींच एका राजाचा सबंध केरल प्रांतावर अंमल सुरू झाला असला पाहिजे, कारण **अशोकाच्या** शिलालेखांत ‘ केरलाधिपती ’ चा उल्लेख सांपडतो. पुढें नांबुद्री ब्राह्मणांनीं केरलांत

कायमची वसाहत केली. त्यांनीं नायर लोकांवर व इतर लोकांवर आपलें धार्मिक वर्चस्व स्थापित केलें व त्यांच्यापैकीं पुष्कळ शूर पुरुष राजेही बनले. पण प्रांतभर पसरलेल्या छोट्या छोट्या राजांच्याकडून सर्व प्रांताची सुव्यवस्था राहीना असें पाहून या नांबुद्री ब्राह्मण राजांनीं व जमीनदारांनीं सर्व प्रांताचा राज्यकारभार चालविण्याकरितां नायर लोकांनीं एका पुरुषाची निवड करावी व त्याच्यावर बारा वर्षें राज्यकारभार करण्याची जबाबदारी टाकावी अशी पद्धति सुरू केली. या नियुक्त राजाला 'पेरुमल' अशी संज्ञा असे. अशा पुरुषाची निवड **महामख** नांवाच्या बारा वर्षांनीं येणाऱ्या पर्वणीच्या वेळीं होई. त्यावेळीं सर्व मलबार प्रांतांतील लोकांचें एक **कूट** ( सभा ) **आलवाये** नदीच्या कांठीं भरत असे व तेथें त्या पुरुषाची निवड होत असे व त्या सभेंत सर्व प्रांताच्या संबंधींच्या गोष्टींचा विचारही होत असे. या महामख पर्वणीला धार्मिक स्वरूप असे.

प्रथम प्रथम पूर्वींचा **पेरुमल** सेवानिवृत्त होऊन दुसऱ्याची निवड होत असली पाहिजे; पण पुढें पुढें धर्मभोळेपणा वाढून पेरुमलनें देवीपुढें आपला बळी द्यावा असा परिपाठ पडला; पुढें तर सशस्त्र व सज्ज पेरुमलला भावी पेरुमलानें द्वंद्वयुद्धांत मारावें व मग आपण पेरुमल व्हावें अशी प्रथा पडली. सारांश मूळच्या साध्या लोकप्रतिनिधी म्हणजे पेरुमल निवडण्याच्या पद्धतीला विकृत नरमेधाचें स्वरूप प्राप्त झालें असावें. पण ही सर्व प्रांतावर एक पेरुमल नेमण्याची पद्धति केरलांत बऱ्याच शतकें चालली यांत शंका नाहीं.

सर्व प्रांताचा राज्यकारभार चांगल्या तऱ्हेनें चालावा म्हणून लोकप्रतिनिधींकडून बारा वर्षांच्या मुदतीचे पेरुमल नेमण्याची पद्धति सुरू झाली; त्याप्रमाणें सरकारी अंमलदारांकडून लोकांच्या हक्कावर गदा येऊं नये व राज्यकारभार लोककल्याणाच्या दृष्टीनें चालावा अशा करितां दुसरींही दोन कुटें केरल प्रांतांत वर्षोनुवर्ष भरत असत असें दिसतें. अर्वाचीन भाषेंत सांगावयाचें म्हणजे केरल प्रांतांत लोकसत्ताक

राज्यपद्धति बीजरूपानें तरी होती यांत शंका नाहीं. कारण राज्यव्यवस्थे-करितां प्रांताचे विभाग पाडलेले असत.

अर्थात् सर्व प्रांतविभागांचा पाया म्हणजे खेडें हा होता. त्याला मल्याळी भाषेंत **तार** किंवा तारवड म्हणत व प्रत्येक तारवडाचें एक एक कूट असे. या कूटांमध्यें खेड्यांतील प्रत्येक कुटुंबाच्या मुख्य पुरुषास येण्याचा हक्क असे. हीं कूटें वारंवार जमत असत व स्थानिक प्रश्नांचा या कूटांमध्यें विचार होत असे व या कूटांच्या सल्ल्यानुरूप गांवचा कारभार चाले. पुष्कळ खेडीं मिळून नाडू ( जिल्हा ) होत असे व जिल्ह्याचें एक कूट दर वर्षी जमत असे. हें कूट जिल्ह्याच्या हितसंबं-धाचा विचार करी व त्याच्या सल्ल्यानें जिल्ह्याचा कारभार चाले.

या तीन प्रकारच्या कूट पद्धतीमुळें केरल प्रांतांतील राज्यकारभार लोकमतानुरूप व लोकहिताच्या दृष्टीनें चाले व ही कूटांची पद्धति चालू होती तेथपर्यंत केरल प्रांत भरभराटींत होता असें दिसतें. कारण पूर्वकाळीं जेवढे जेवढे परदेशी प्रवासी केरल प्रांतांत येऊन गेले तेवढ्या तेवढ्यांनीं या प्रांताच्या संपन्नतेबद्दल व सुव्यवस्थेबद्दल प्रशंसा केली आहे. कालि-कत बंदरामध्यें दूरदूरच्या देशांचे व्यापारी व गलबतें येत असत व तेथें मालाची पूर्ण सुरक्षितता राखली जाई असें या प्रवाशांनीं लिहून ठेवलेलें आहे. असो.

केरळोत्पत्ति या ग्रंथामध्यें एकंदर पंचवीस पेरुमलांची यादी दिलेली आहे. पहिला पेरुमल **कोइमतूर** येथला नेमण्यांत आला होता व त्याची नेमणूक ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या शतकांत झाली; शेवटचा पेरुमल **चेरामन** नांवाचा होऊन गेला. त्यानें जवळ जवळ तीन तपें राज्यकार-भार केला. आयुष्याच्या अखेरीस त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारला व मक्केस जाण्यापूर्वीं त्यानें केरल प्रांताचे चार विभाग करून ते आपल्या नातेवाईकांना व आश्रितांना दिले. तेव्हांपासून केरलप्रांताचीं कोलत्तिरीचा राजा, कालिकतचा झामोरीन, कोचीनचा राजा व त्रावणकोरचा राजा

अशीं चार मुख्य राज्यें झालीं. त्यापैकीं कोचीनचे राजे चेरामनचे जवळचे नातेवाईक असल्यामुळें सर्व प्रांतावर अंमल चालविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती, तर झामोरिनच्या राजाला चेरामन पेरुमलनें आपली ढाल व तरवार दिली म्हणून झामोरिन आपल्याला सर्व केरलप्रांताचा राजा म्हणवीत असे.

याप्रमाणें केरल प्रांतांत कोचीन व कालिकत या दोन ठिकाणच्या राजांमध्यें वर्चस्वाकरितां सारखी चढाओढ चालू होती व सर्व प्रांतभर जे लहान मोठे राजे होते ते आपल्याला या चार मुख्य राजांचे मांडलिक म्हणवीत असत, पण प्रायः स्वतंत्रपणें कारभार करीत व एकमेकांशीं तंटे भांडणें करीत.

अशी केरल प्रांतांतील राजकीय स्थिति असतां हिंदुस्थानाच्या नव्या जलमार्गाचा शोध पंधराव्या शतकाच्या शेवटीं लागून युरोपीयन राष्ट्रांच्या स्वाऱ्यांस सुरवात झाली. येथून केरलच्या अर्वाचीन काळास सुरवात झाली. तेव्हां त्याची हकीकत पुढील प्रकरणांत देणें सोयीचें होईल.

# प्रकरण ९ वें

## केरल प्रांतात पोर्तुगीजांचा प्रवेश व व्यापारी वर्चस्व
## ( सन १४९८ ते १६६२ )

मागच्या प्रकरणावरून वाचकांस हें कळलें असेल कीं युरोप व हिंदुस्थान व विशेषतः केरल प्रांत यामध्यें व्यापारी दळणवळण फार पुरातन काळापासून होतें. पण तें आफ्रिकेंतील ईजिप्त देश व इटली देशांतील व्हेनीस शहर या जलस्थल मार्गानें होतें. केरल प्रांतांतील मसाल्याच्या पदार्थांना व तलम कापडाला युरोपमध्यें पुष्कळ मागणी असून या वस्तूंचा व्यापार फार किफायतशीरही होता. हा व्यापार आपल्या देशाला मिळावा अशी महत्त्वाकांक्षा पोर्तुगाल, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड व बेलजम इत्यादि पश्चिमेकडच्या राष्ट्रांना होती. त्यांतल्या त्यांत पोर्तुगालच्या राजाला व तेथील राजघराण्यांतल्या **हेनरी** नांवाच्या राजकुमाराला तर हिंदुस्थानांत नेणारा नवा, सलग व स्वतंत्र जलमार्ग शोधून काढण्याचा मोठा नाद व निदिध्यासच लागला होता. तो आटलांटिक महासागरांतून दरवर्षीं आरमारी स्वारी या जलमार्गाच्या शोधास पाठवीत असे. सन १४६० मध्यें पोर्तुगालच्या आल्फोंझो राजानें **मार्कोपोलोच्या** प्रवासवृत्ताची व त्यानें तयार केलेल्या जगाच्या नकाशाची एक प्रत मिळविली. त्या माहितीचा उपयोग करून त्यानें ग्रीक व रोमन काळापासून युरोपियन लोकांना ठाऊक असलेल्या **जलस्थल** मार्गानें एका मनुष्यास हिंदुस्थानांत पाठविलें. त्याप्रमाणें तो मनुष्य केरल प्रांतांतील **कॅननूर** बंदराला आला व तेथल्या व्यापारी मालाची माहिती मिळवून आल्या मार्गानें देशीं परतला; पण वाटेंत आबिसीनिया येथेंच त्याचा अंत झाला. सन १४८६ मध्यें दोन गलबतें आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाला पोहोंचून त्यांनीं **केप ऑफ गुड होप** हें टोंकही गांठलें. पण त्या आरमाराला तेथूनच परतावें लागलें. दुसऱ्या आर-

मारी स्वारीची तयारी होण्यापूर्वींच पोर्तुगालचा राजा सन १४९६ मध्यें वारला. पण त्या राजानंतर गादीवर आलेल्या डॉन मॅन्युअल राजानें सन १४९७ मध्यें तीन गलबतें लांबच्या जलप्रवासाकरितां मुद्दाम भक्कम बांधविलीं व पूर्वींच्या पन्नास वर्षांतील स्वाऱ्यांच्या अनुभवानें मिळालेल्या माहितीचा उपयोग करून या आरमारी स्वारीची जय्यत तयारी केली. पण त्यानें आपल्या परिवारांत असलेल्या खानदानी घराण्यांतील **वास्को डि गामा** या सरदाराला या स्वारीचें आधिपत्य दिलें. पूर्वींचा आरमारी खात्याचा अनुभव नसतांना वास्को डि गामाची निवड करण्याचें कारण हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढण्याची कल्पना वास्को डि गामाच्या बापाची होती व राजानें ती गोष्ट स्मरून ही कामगिरी वास्को डि गामावर सोंपविली. हें तीन गलबतांचें आरमार ता. ८ जुलै स. १४९७ रोजीं **बेलम** बंदरांतून हिंदुस्थानाकडे येण्यास निघालें. केप ऑफ गुड होप टोकाशीं आफ्रिकेला वळसा घालून वास्को डि गामा **मोझांबिक** बंदराला मार्च सन १४९८ मध्यें पोहोंचला. तेथें त्यानें **दवणे** नांवाचा हिंदी मनुष्य आपल्याबरोबर घेतला व आरबी समुद्रामधून तो केरल प्रांतांतील झामोरिन राजाच्या **कॅलिकत** राजधानीला तारीख १७ मे सन १४९८ रोजीं येऊन पोहोंचला.

झामोरिन व वास्को डि गामा यांची सरदारी थाटाची भेट झाली. व्यापारी तह करण्यासंबंधीं बोलणें झालें. त्यांत गामाच्या इच्छेप्रमाणें त्याला सवलती मिळाल्या नाहींत म्हणून तो झामोरिनवर नाखूष झाला. शिवाय गामानें बरोबर आणलेला मालही खपला नाहीं व त्याला पाहिजे इतका मसाल्याचा मालही मिळाला नाहीं. पण पावसाळयामुळें त्याला ऑगस्ट अखेर कालिकत बंदरांत राहावें लागलें. पावसाळा संपतांच तो कॅननूर बंदरास आला. केरल प्रांतांत पुष्कळ लहान मोठे राजे असल्यामुळें व त्यांची आपआपसांत नेहेमीं कुरबूर चालत असल्यामुळें कोलत्तिरीच्या राजानें गामाचें मनःपूर्वक स्वागत केलें. त्याला व्यापाराच्या सवलती देऊन गलबतावरील माल विकत घेऊन त्याला पाहिजे तो माल

मिळण्याची राजानें तजवीज केली व गामा नवंबर १४९८ मध्यें देशीं परत जाण्यास निघाला. सुमारें दोन वर्षांत हिंदुस्थानची यशस्वी रीतीनें सफर करून आल्यामुळें पोर्तुगालच्या राजानें मोठ्या थाटानें गामाचें स्वागत केलें व त्याला डॉन हा बहुमानाचा किताब दिला.

जरी झामोरिनशीं सवलतीचा तह करितां आला नाहीं तरी व्यापाराच्या दृष्टीनें गामाची सफर मोठी किफायतशीर झाल्यामुळें पोर्तुगालच्या राजानें पेड्रो कॅब्रालच्या आधिपत्याखालीं २३ गलबतें व १५०० शिपायी यांचें आरमार केरलला पाठविलें. झामोरिन राजानें मूर लोकांना हाकून देऊन युरोपच्या व्यापाराचा मक्ता पोर्तुगाल देशाला द्यावा अशा प्रकारचा करारनामा झामोरिनकडून करून घ्यावा, हें न साधल्यास मग कॅननूर किंवा दुसऱ्या बंदरास जावें अशा प्रकारचा हुकूम कॅब्रालला दिला होता. पण हिंदी राजाशीं सलोख्यानें सख्य संपादन करण्याचें कौशल्य कॅब्रालमध्यें मुळींच नव्हतें. त्याला व्यवहारचातुर्य नव्हतें; त्याला दूरदर्शीपणा नव्हता; तो फार गर्विष्ठ, संतापी व संशयी मनुष्य होता. कॅब्रालनें कॅलिकतला पोहोंचल्यापासून झामोरिनशीं ताठरपणानें वागण्यास सुरवात केली. सर्व समुद्रावर आपला ताबा असून गलबतांची तपासणी करण्याचा आपल्याला हक्क आहे असें कॅब्राल म्हणूं लागला व त्याप्रमाणें त्यानें आरब गलबतें आडविलीं. यामुळें कालिकतचे लोक बिथरले व त्यानीं पोर्तुगीज लोकांना त्रास दिला. कॅब्रालनें बंदरांतील गलबतें बुडविलीं व त्यावरील माणसांना क्रूरपणें वागविलें. त्याच्या वर्तनानें कालिकतच्या लोकांचें व झामोरिनचें पोर्तुगीज लोकांबद्दल फार वाईट मत झालें म्हणून कॅब्रालला कालिकत सोडून कोचीन बंदरास जावें लागलें. तेथें त्याचें बस्तान उत्तम बसलें. कारण कोचीनच्या राजाला झामोरिन राजाचें मांडलिकत्व अपमानाचें वाटे. कारण आपण चेरामन पेरुमलचे निकटचे संबंधीं आहों तेव्हां आपलें राज्य स्वतंत्र असावें अशी कोचीनच्या राजाची महत्त्वाकांक्षा होती म्हणून नव्या आलेल्या पोर्तुगीज लोकांचें व त्यांच्या राजाचें सख्य व

साहाय्य संपादन करून झामोरिनपासून आपणांस स्वतंत्र होतां येईल असें समजून कोचीनच्या राजानें कॅब्रालचें सर्व म्हणणें कबूल करून कोचीन बंदरावर किल्ला बांधण्यास **कॅब्रालला** परवानगी दिली व सर्व युरोपच्या व्यापाराचा मक्ता पोर्तुगालला दिला. त्याप्रमाणें कोचीन येथें तावडतोब किल्ला बांधण्यांत आला व कोचीन हें पोर्तुगालच्या राजाचें केरल प्रांतांतील पहिलें ठाणें व व्यापाराचें केन्द्र बनलें. केरल प्रांतांतील दुसऱ्या लहान लहान राजांशीं सवलतीचे तह करून पोर्तुगीज लोकांनीं केरलचा परदेशी व्यापार आपल्या ताब्यांत आणला. या तहान्वयें कोचीनप्रमाणें क्विलॉन व कॅननूर हीं बंदरेंही त्यांचीं व्यापारी केन्द्रें बनलीं. पण या धोरणानें झामोरिनचें त्यांनीं कायमचें वैर संपादन केलें. झामोरिननें आपल्या मांडलिकांचा सूड घेऊन पोर्तुगीज लोकांना केरल प्रांतांतून हाकून लावण्याकरितां सैन्याची व आरमाराची तयारी केली. त्यांच्या पुष्कळ लढाया झाल्या. पण कोणत्याही पक्षाचा अगदीं बीमोड झाला नाहीं. आपला व्यापार कायम ठेवण्याकरितां व पूर्वेकडील समुद्रावर आपला ताबा ठेवण्याकरितां पूर्वेकडील आपल्या मुलखावर एक कायमचा प्रतिनिधी ठेवण्याची आवश्यकता पोर्तुगालच्या राजाला वाटली व म्हणून त्यानें **फ्रान्सेस्को आलमीडा** नांवाचा पहिला व्हाईसरॉय सन १५०५ मध्यें नेमला व त्याला केरल प्रांतांत पाठविलें.

पण त्याला झामोरिन राजाशीं सारखें युद्ध करावें लागलें व त्यामध्यें कोणत्याही पक्षाची सरशी झाली नाहीं. उलट पोर्तुगीज सैन्याची व आरमाराची बरीच खराबी झाली व पोर्तुगीज राजाचें केरल प्रांतावरील वर्चस्व डळमळूं लागलें. म्हणून पोर्तुगालच्या राजानें **आलबुकर्क** नांवाच्या प्रख्यात मुत्सद्दी योद्ध्यास व्हाईसरॉय म्हणून पाठविलें. पोर्तुगालच्या सर्व व्हाईसरॉयांमध्यें **आलबुकर्क** हा फार मोठा कर्तृत्ववान् पुरुष निघाला. त्यानें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील **गोवें** प्रांत काबीज केला व तेथलें **गोवें** बंदर व शहर पूर्वेकडील सर्व मुलखाच्या राजधानीचें ठिकाण

केलें व झामोरिन राजाशीं वैरभाव टाकून त्याच्याशीं तह केला. **आलबुकर्कनें** हिंदुस्थानांतील पोर्तुगीज मुलखावरील अंमलाला स्थाईक स्वरूप आणलें. त्यानें राज्यकारभारांत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. यामुळें पोर्तुगाल देशाचा व हिंदुस्थानचा पुष्कळ व्यापार वाढला. पण या व्यापाराचा पूर्ण मक्ता त्यांना आपल्याकडे ठेवतां आला नाहीं. कारण इंग्रज लोक, फ्रेंच लोक व डच लोकांनींही व्यापारी कंपन्या स्थापून हिंदुस्थानांत व पूर्वेकडील इतर देशांत व्यापार सुरू केला व आपल्या व्यापाराच्या संरक्षणाकरितां ठिकठिकाणीं कायमचीं ठाणीं बसविलीं, यामुळें मूळचे हिंदी राजे व युरोपीयन कंपन्या अशा दुहेरी सत्तांशीं पोर्तुगीज लोकांना झगडा करावा लागला. **आलबुकर्कनें** केरल प्रांतांतील एकंदर परिस्थितीचा विचार करून असें ठरविलें कीं, कोणत्याही एका राजाचा पक्ष घेऊन इतर राजांशीं तंटाबखेडा करण्यांत पोर्तुगालचें खरें हित नाहीं. म्हणून त्यानें सर्वांशीं सलोख्याचें धोरण ठेविलें व राज्य-विस्तार करण्याचा विचार सोडून दिला. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्या-वर मात्र थोडा फार मुलुख काबीज करून त्यानें **गोवें** येथें हिंदुस्थानां-तील पोर्तुगीज प्रांताची राजधानी केली.

म्हणून हिंदुस्थानांतील पोर्तुगीज अंमलाच्या इतिहासांत **आलबुक-र्कला** प्रमुख स्थान देण्यांत येतें. असा केरल प्रांताशीं पोर्तुगीज लोकांचा राजकीय व व्यापारी संबंध सुमारें दीडशें वर्षें—कोचीनमध्यें किल्ला बांधल्या वेळेपासून तो किल्ला व तें ठिकाण डच लोकांच्या स्वाधीन करीपर्यंत—टिकला. या संबंधापासून राजकीय, आर्थिक व सामाजिक दृष्टीनें केरल प्रांतावर काय काय परिणाम घडले याचें थोडक्यांत सिंहा-वलोकन करणें येथें योग्य होईल.

केरल प्रांतांत पोर्तुगीज लोकांचा जो चंचुप्रवेश झाला त्याचा राज-कीय परिणाम असा झाला कीं, केरल प्रांतांतील राजांचा झामोरिन राजाच्या आधिपत्याखालीं एक संघ होऊं शकत नाहीं. पोर्तुगीज

लोकांच्या साहाय्यानें अत्यंत मर्यादित मुलखावर अंमल असलेल्या व झामोरिनचा मांडलिक असलेल्या कोचीनराजाला झामोरिनच्या महत्त्वाकांक्षेला आळा घालून आपली सत्ता व राज्य वाढवितां आलें. लहान लहान राजांशीं स्वतंत्रपणें सलोखा व व्यापारी तह करून पोर्तुगीज लोकांनीं त्या राजांची एकी होऊं दिली नाहीं; किंवा केरल प्रांतांत एकसत्तात्मक बलाढ्य राज्य होऊं दिलें नाहीं. यामुळें केरल प्रांताचें एका अंमलाखालीं एकीकरण होऊं शकलें नाहीं.

आर्थिक दृष्ट्या केरल प्रांतांत पोर्तुगीज लोकांच्या संबंधानें पुष्कळ फरक घडून आले. पोर्तुगीज लोकांनीं केरल प्रांतांत नव्या पिकांची व वृक्षांची लागवड सुरू केली; उ. काशु ( काजू ) झाड, तंबाखू, नारळाच्या नव्या जाती व त्यांची निर्गत व्यापाराकरितां लागवड. पोर्तुगीज लोकांच्यामुळें केरल प्रांतांतील मिरी, वेलदोडे, दालचिनी, आलें, सुंठ, नारळ, काथ्या व त्याचीं दोरखंडें इत्यादि मूळच्या पिकांना व पदार्थांना युरोप व आफ्रिका या खंडांमध्यें विलक्षण मागणी वाढली व पूर्वीं केरल प्रांतांत हीं पिकें व हे पदार्थ घरगुती खपापुरतेच करीत असत ते सर्व प्रांतभर मोठ्या प्रमाणावर व निर्गत व्यापाराकरितां करूं लागले. यामुळें प्रांतांतील सर्व प्रजेची सांपत्तिक स्थिति सुधारली. कारण मागणीमुळें संपत्तीची जास्त पैदास होऊं लागली.

व्यापाराच्या वाढीमुळें व लोकांच्या सांपत्तिक संपन्नतेमुळें पोर्तुगीज कारकीर्दींत पुष्कळ नवीं शहरें व बंदरें उदयास आलीं. कालिकत हें जुन्या काळापासून मोठें बंदर व शहर होतें त्याचा तो दर्जा कमी झाला नाहीं खरा, पण जें कोचीन बेट सन १३४१ मध्यें मोठ्या महापुरानें बनलें व जें पोर्तुगालचा कॅब्राल येईपर्यंत एक क्षुल्लक खेडें होतें तें मोठें व्यापारी शहर व बंदर बनलें. पोर्तुगीज कारकीर्दींत उदयास आलेलीं दुसरीं शहरें म्हणजे **चिलियम, पुडपट्टनम, प्रोकूड** हीं होत. पण केरलचीं फार पुरातन काळपासून प्रख्यात असलेलीं बंदरें कॅगनूर व

क्विलॉन हीं पोर्तुगीज कारकीर्दींत मागें पडलीं. केरल व पोर्तुगाल या या दोन देशांच्या दीडशें वर्षांच्या संबंधामुळें केरलाच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितींत पुष्कळच फरक पडला यांत शंका नाहीं. आधीं पोर्तुगीज लोकांच्या ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या वेडानें पुष्कळ लोक नाइलाजानें व नाखुशीनें रोमन कॅथलिक पंथी बनले. पोर्तुगीज लोकांनीं सीरियन क्रिश्चन लोकांना रोमन कॅथलिक पंथांत आणण्याबद्दल पुष्कळ खटपट केली पण ती फारशी यशस्वी झाली नाहीं. म्हणून तेथें सीरियन क्रिश्चन व लॅटिन क्रिश्चन अशा क्रिश्चन लोकांच्या दोन परस्परविरोधी जाति निर्माण झाल्या. हिंदु लोकांच्या राहणींत थोडाफार फरक घडून आला. पण पोर्तुगीज भाषेचा फैलाव पुष्कळच झाला. राजेरजवाडे व सरदार लोक यांच्यापैकीं पुष्कळ लोकांना पोर्तुगीज भाषा चांगली बोलतां लिहितां येत असे. पोर्तुगीज लोकांची सत्ता नामशेष झाल्यावर देखील कित्येक वर्षें केरलांतील राजे इंग्रजांशीं पोर्तुगीज भाषेमध्यें पत्रव्यवहार करीत.

यापेक्षां पोर्तुगीज संस्कृतीचा फारसा परिणाम केरल प्रांतावर झाला असें म्हणतां येत नाहीं. कारण पोर्तुगीज लोकांची संस्कृति केरल लोकांच्या संस्कृतीपेक्षां वरच्या दर्जाची नव्हती. असो.

# प्रकरण १० वें

## केरळांत डच लोकांचा प्रवेश व व्यापारी वर्चस्व
## ( सन १६६३ ते १७९६. )

केरळ प्रांताशीं डच लोकांचा संबंध पोर्तुगीज लोकांच्यानंतर शंभर सवाशें वर्षांनीं आला. डच लोकांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याकरितां एक कंपनी सन १५९२ मध्यें काढली व तिचा सन १६०४ मध्यें कालिकतच्या राजाशीं व्यापारी तह होऊन तिला कोचीन येथें किल्ला बांधण्याची परवानगीही मिळाली खरी; पण पहिल्या प्रथमच डच लोकांचा जाव्हा बेटांत जम बसला व बटॅव्हिया हें त्यांचें पूर्वेकडील राज्यकारभाराचें केंन्द्र बनलें. पुढें कांहीं काळानें त्यांचा लंका बेटांत शिरकाव होऊन त्यांना कोलंबो बंदराचा ताबा मिळाला. तेथली स्थिरस्थावरता झाल्यावर डच कंपनीनें केरळ प्रांताकडे आपला मोर्चा फिरविला. तोंच कोचीन राज्यांत आपसांतील दुही सुरू झाली व त्यामुळें डच लोकांना केरळ प्रांतावर स्वारी करण्याची आयती संधि मिळाली. सन १६५८ मध्यें कोचीनचा राजा वारला व त्या राजघराण्यांतील वडील शाखेच्या राजपुत्राला टाकून पोर्तुगीज सरकारनें आपल्याला अनुकूल असलेल्या तॅनूर घराण्यांतील राजपुत्राला कोचीन राजघराण्यांत दत्तक देऊन त्याला राजा बनविलें. म्हणून मूळच्या कोचीन राजघराण्याच्या वडील शाखेच्या राजपुत्रानें कोलंबोला जाऊन डच कंपनीची राज्याप्रीत्यर्थ मदत मागितली. या मदत मागणीनें डच कंपनीला पोर्तुगीज लोकांना हाकून देऊन केरळ प्रांतांत आपला व्यापार व वर्चस्व स्थापन करण्याची सुवर्ण संधि मिळाली म्हणून व्हॅन गोव्हन्स या डच गव्हरनरानें सैन्य व आरमार यांची तयारी करून तें सैन्य व आरमार केरळ प्रांतावर पाठविलें. त्यांनीं प्रथम क्विलॉन बंदर काबीज केलें. पण इतक्यांत

तें सैन्य व आरमार बटॅव्हिया सरकारच्या हुकमावरून दुसरीकडे धाडण्यांत आलें. नंतर सन १६६२ मध्यें जानेवारी महिन्यांत व्हॅन गोव्हन्स कोचीन नजीक येऊन प्रथम त्यानें कॅंगनूर बंदर व किल्ला हस्तगत केला. नंतर त्यानें **वायपिन** ( कोचीनच्या नजीकचें उत्तरेकडील बेट ) येथें तळ दिला व कोचीन बंदराची नाकेबंदी केली. पण पावसाळा आल्यामुळें त्याला तीन चार महिने थांबावें लागलें. पण पावसाळा संपतांच त्यानें कोचीन बंदरावर व किल्ल्यावर निकराचा हल्ला चढविला. पोर्तुगीज किल्लेदारानें किल्ला मोठ्या शौर्यानें लढविला. पण त्याला कुमक न मिळाल्यामुळें शेवटीं त्याला कोचीन किल्ला डच सेनापतींचे स्वाधीन करावा लागला. सर्व पोर्तुगीज शिपायी डच सैनापतींच्या स्वाधीन झाले. याप्रमाणें सन १६६२ सालीं **क्विलॉन, कॅंगनूर,** व **कोचीन** या तिन्ही ठिकाणीं डच कंपनीचें निशाण फडकूं लागलें. व पोर्तुगीज लोकांचें केरलावरील वर्चस्व नाहींसें होऊन डच वर्चस्व सुरू झालें.

केरल प्रांतांत पोर्तुगीज लोकांचा चंचुप्रवेश झाला त्या वेळच्या परिस्थितीपेक्षां डच लोकांच्या प्रवेशकाळीं वेगळी परिस्थिति होती. सन १४९८ मध्यें पोर्तुगीज प्रथम केरल प्रांतांत आले, तेव्हां ते पहिलेच युरोपीय व्यापारी होते व म्हणून त्यांना केरल प्रांताच्या निर्गत व्यापाराच्या मक्त्याबद्दल केरल प्रांतांतील राजेरजवाड्याशीं करारमदार करतां आले व सर्व व्यापार आपल्या एकट्याच्या हातांत ठेवतां आला. शिवाय त्याकाळीं झामोरिनच्या राजाखेरीज बाकीचे केरल प्रांतांतील राजे फार लहान लहान मुलखाचे राजे होते व त्यांचे आपआपसांत तंटेबखेडे चालत होते. पण डच लोकांचा प्रवेश झाला तेव्हां युरोपांतील दुसऱ्या दोनतीन राष्ट्रांच्या व्यापारी कंपन्या केरल प्रांतांत येऊन त्यांनीं आपलीं व्यापारी ठाणीं ठिकठिकाणीं ठेविलीं होतीं. इंग्रजी कंपनीचीं ठाणीं **तेलीचेरी, टॅंगाचेरी** व **अँजेंगो** येथें होतीं; तर **माहे** हें फ्रेंचांचें ठाणें होतें. या चार युरोपीय राष्ट्रांच्या व्यापाऱ्यांची केरल प्रांताच्या निर्गत व्यापा-

राचा वांटा आपल्याला मिळावा अशी धडपड चालू असल्यामुळें डच लोकांना प्रथमपासून केरलांत प्रतिस्पर्धी होते.

डच कंपनीनें कोचीन बंदर काबीज केल्यावर त्यांनीं आपल्या आश्रित राजकुमाराला कोचीनच्या गादीवर बसविण्याचा बेत केला. पण दुर्दैवानें तो राजकुमार राज्याभिषेक होण्यापूर्वींच वारला. म्हणून **व्हॅन गोव्हन्सनें** त्या राजकुमाराचा पुतण्या **वीर केरलवर्मा** याला राज्यावर बसविलें व त्याच्याशीं व्यापारी तह केला. त्या तहानें पोर्तुगीज लोकांना जे जे हक्क व त्यांचे ताब्यांत जो जो मुलूख होता ते ते हक्क व तो तो मुलूख डच कंपनीला मिळाला. शिवाय निरनिराळया छोट्या राजांशीं कंपनीनें व्यापारी करार केले. सारांश, पोर्तुगीज लोकांचेंच सर्व धोरण त्यांनीं चालू ठेवलें. डच कंपनीनें कोचीन बंदर काबीज करतांना झामोरिन राजाचें साहाय्य घेतलें होतें. म्हणून त्यानें **वायपिन** बेट आपल्याला द्यावें व कोचीन राजाला आपलें मांडलिकत्व कबूल करण्यास लावावें अशा दोन मागण्या केल्या. पण **व्हॅन गोव्हन्सनें** या मागण्या नाकबूल केल्या, म्हणून झामोरिनचा राजा कोचीन व डच या दोघांवरही नाखुष झाला व त्यानें कोचीनच्या राजाविरुद्ध शेजारच्या राजांना उठविण्याचा उपक्रम सुरू केला. **व्हॅन गोव्हन्स**च्या दहा वर्षांच्या कारकीर्दीमध्यें फारशा भानगडी उपस्थित झाल्या नाहींत. पण सन १६७३ मध्यें **व्हॅन रीड** नांवाचा सरदारी घराण्यांतला तरुण व उत्साही लष्करी अंमलदार सेनापति होऊन आला. तो दहा वर्षांपूर्वीच्या कोचीनच्या हल्ल्यामध्यें हजर होता. तो आल्याबरोबर त्यानें निव्वळ किफायतशीर व्यापारावर समाधान मानून न घेतां केरल प्रांतावर राजकीय वर्चस्व मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरली. त्यानें प्रथम कोचीनच्या राजाला आपल्या पूर्ण ताबेदारींत आणलें, राजाचे व राजघराण्यांतील मंडळींचे तनखे त्यानें ठरवून टाकले व डच कंपनीच्या संमतीनें व पसंतीनें राज्याचा वारस दत्तक घेतला पाहिजे अशी अट घातली व ही अट राजा व त्याचे सरदार यांचेकडून कबूल करून घेतली. तसेंच

कोचीन राज्याची सर्व व्यवस्था राज्याचा वंशपरंपरा दिवाण **पलियाचा संस्थानिक** याचे मार्फत पण डच गव्हर्नरच्या संमतीनें व सल्ल्यानें फक्त चालेल असें जाहीर केलें. या चढाईच्या व वर्चस्वाच्या धोरणानें कोचीन-मधील व आसपासचे नायर सरदार आणि डच कंपनी व कोचीनचा राजा **वीर केरलवर्मा** यांचेमध्यें सलोख्याचें नातें राहिलें नाहीं. उलट डच कंपनी व राजा यांचे विरुद्ध बंड करण्याची ते वाट पहात होते. ती संधि त्यांना सन१६८१मध्यें मिळाली. कारण **वीर केरलवर्मा** राजानें डच कंपनीच्या सल्ल्यानें **चालीयुर** राजघराण्यांतील राजकुमार व राज-कुमारी दत्तक घेण्याचें ठरविलें ही निवड नायर सरदार व शेजारचे राजे यांना अगदीं नापसंत होती. तरी त्यांच्या विरोधांस न जुमानतां सन १६८९ सालीं दत्तविधान करण्यांत आलें. तेव्हां विरुद्ध पक्षाचे सर-दार व राजे हे एकत्र होऊन त्यांनीं कोचीनचा राजा व डच कंपनी या विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. या संकटाच्या प्रसंगीं कोचीनचा राजा व डच कंपनी यांनीं आपला झामोरिन राजाबद्दलचा वैरभाव विसरून त्याची मदत मागितली; त्यावेळीं **भरणी थिरूनल** नांवाचा मोठा कर्तब-गार राजा कालिकतच्या गादीवर होता. तो नुकताच म्हणजे १६८४ मध्यें गादीवर आला होता. त्यानें आपलें वंशपरंपरेचें कोचीन व परकी व्यापारी यांना विरोध करण्याचें धोरण टाकून कोचीनच्या राजाला व डच कंपनीला मदत करण्याचे कबूल केलें. मात्र **चेटवाई** हें बंदर व स्वारीचा सर्व खर्च दिला पाहिजे अशी अट घातली. ती कबूल झाल्यावर त्यानें आपलें सैन्य बंडवाल्या सरदारांवर धाडलें. कोचीन राजा, डच कंपनी व झामोरिन अशा त्रिवर्गांनीं एकदम तिहीं-कडून हल्ला केल्यामुळें बंडवाल्यांचा **आलवाई** येथें पराभव झाला व हें बंड मोडलें. तहाप्रमाणें **चेटवाई** बंदर झामोरिनला मिळालें. सन १६६३ मध्यें त्याला **क्रँगॅनूर** मिळालेंच होतें. या दोन ठिकाणांहून कोचीनला केव्हांही शह देणें सोपें होतें. शिवाय कोचीनच्या आसपासच्या राजांना आपल्या बाजूला ओढून घेण्याचा क्रम झामोरिननें सुरू ठेवलाच होता.

अशा स्थितींत कोचीन व कालिकत यांच्यामध्यें वर्षोनुवर्ष कुरबुर व कटकट चाले. डच कंपनी कोचीन राजाला मदत करण्याबाबत दुर्लक्ष करी. म्हणून कोचीन राजा डच कंपनीवर नाखुष होता. सन १७०० मध्यें गोष्टी निकरावर काल्या; तेव्हां डच कंपनीनें झामोरिनशीं वाटाघाट करून सामोपचारानें तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाहीं व झामोरिननें कोचीनच्या मुलखावर स्वारी केली. तेव्हां डच कंपनीला कोचीनच्या राजाच्या मदतीस येणें भाग पडलें. कंपनी या आपसांतील तंटयामध्यें फारसें मन घालीत नव्हती; पण झामोरिन इंग्रज कंपनीशीं तह करून कालिकत येथें त्यांना फॅक्टरी बांधून देणार असा सुमार दिसतांच डच कंपनीनें झामोरिनचा पाडाव करण्याचा निश्चय केला व लढाईची जय्यत तयारी केली. सुमारें तीन हजार डच सैन्य सिलोन व बटॅव्हियाकडून आणवून कंपनीनें झामोरिनच्या मुलखावर चाल करण्याचा बेत केला. झामोरिननें इंग्लिश कंपनीची मदत घेऊन लढाईची तयारी करून कोचीन मुलुखांतील डच लोकांच्या हातीं असलेल्या किल्ल्यावर हल्ला केला. डच कंपनीनें चेटवाई किल्ल्यावर हल्ला केला. येथें डच लोकांची सरशी झाली व आणखी थोडया झटापटीनंतर सन १७१७ मध्यें झामोरिन व डच कंपनी यांच्यामध्यें तह झाला. त्यांत चेटवाई डच कंपनीला मिळालें. व झामोरिननें लढाईच्या खर्चाबद्दल खंडणी देण्याचें कबूल केलें. या लढाईनें डच कंपनीचें कोचीनमधील वर्चस्व कायम राहिलें खरें, पण लढाईला विलक्षण खर्च आला व लढाईच्या धामधुमीमुळें कंपनीचा व्यापार बुडाला. असें त्यांचें दुहेरी नुकसान झालें. त्या मानानें झामोरिनचें फारसें नुकसान झालें नाहीं किंवा त्याचें सामर्थ्य कमी झालें नाहीं.

या तहानें आपला व्यापार पुन्हां पूर्ववत् सुरू होईल असा डच कंपनीला भरवंसा वाटला. कांहीं काळ तसें झालें सुद्धां. पण पुढें इंग्रज कंपनीची व्यापारी चढाओढ डच कंपनीला जाणवूं लागली. पुन्हां झामोरिनचा ससेमिरा त्यांच्या व कोचीनच्या पाठीमागें लागला. शिवाय,

दक्षिणेस प्रबल व सर्व केरळ प्रांत एकछत्री करण्याची महत्त्वाकांक्षा धरणारा त्रावणकोरचा राजा **मार्तंडवर्मा** याचा ससेमिरा डच कंपनीच्या पाठीमागें लागला. ( त्रावणकोरच्या उद्‌याचा व वाढीचा इतिहास पुढील प्रकरणांत येणार आहे. ) पण या दुहेरी कातरीमुळें अर्ध शतकांत डच कंपनीचा केरळांतील अंमल व वर्चस्व पार नाहींसें झालें. डच कंपनीनें त्रावणकोरच्या वाढत्या सामर्थ्याला आळा घालण्याकरितां दोन तीन स्वाऱ्या केल्या. प्रथम सन १७४१ मध्यें त्यांनीं सिलोनमधून मोठें सैन्य **कोलाचेल** ( त्रावणकोरचें दक्षिणेकडचे बंदर ) येथें उतरवून सर्व प्रांत काबीज करण्याचा घाट घातला. पण मार्तंडवर्म्याच्या सैन्यानें डच सैन्याचा पूर्ण पराभव केला व डच कंपनीला मार्तंडवर्म्याशीं तह करावा लागला. या पराभवानें डच लोकांची लष्करी इभ्रत व अब्रू पार नाहींशी झाली व मार्तंडवर्म्याची केरळांतील लहान मोठ्या राजांना दहशत बसली. सन १७५३ मध्यें पुन्हां युद्ध झालें. त्यामध्येंही मार्तंडवर्म्याला मोठा जय मिळाला व पुन्हां त्याच्याशीं तह करावा लागला. या तहामध्यें डच कंपनीला केरळांतील राजेरजवाडे यांच्या भांडणांत आपण केव्हांही पडणार नाहीं अशी अट कबूल करावी लागली; व पोर्तुगीज काळापासून सर्व तहांत घातलेली क्रिश्चन धर्मी लोकांना न्यायदान देण्याचा हक्क क्रिश्चन धर्मी कंपनीकडे असला पाहिजे ही अट वगळण्यांत आली. अर्थात् या दोन अटींच्या उद्‌यास्तामुळें डच कंपनीचें केरळांतील राजकीय वर्चस्व पार नाहींसें झालें व तिला केवळ व्यापारी कंपनीचा दर्जा प्राप्त झाला. त्या बाबतींत मात्र मार्तंडवर्म्यानें डच कंपनीला पुष्कळ मिरीं ठरींव सवलतीच्या दरानें पुरविण्याचा मक्ता घेतला व तेवढ्यावरच डच कंपनीला समाधान मानून घ्यावें लागलें.

या लढाईमध्यें कोचीनच्या वंशपरंपरा दिवाणगिरीचा हक्क असलेला पलीयाचा तरुण राजकुमार **कामुआचा** याला युद्धांतील कैदी म्हणून त्रिवेन्द्रम् येथें आणण्यांत आलें. त्याला त्याच्या दर्जाप्रमाणें वागविण्यांत आलें. त्यानें त्रावणकोरचें राज्य कसें सामर्थ्यवान बनलें हें पाहिलें, व

त्याच धोरणाप्रमाणें कोचीनचा कारभार चालविण्याचा त्यानें निश्चय केला. कोचीनचें खरें हित त्रावणकोरशीं कायमचा तारकमारक तह करण्यांत आहे अशी त्यानें मनांत खुणगांठ बांधली. तो सुटून परत आल्यावर त्यानें त्रावणकोरचा राजा व कोचीनचा राजा यांच्या परस्पर भेटीचा योग सन १७५७ मध्यें जुळवून आणला. पण त्यावेळीं प्रत्यक्ष तह घडून आला नाहीं. इतक्यांत मार्तंडवर्मा वारला. व त्रावणकोरच्या राज्याचा **रामवर्मा** राजा झाला. तोही मार्तंडवर्म्याप्रमाणें मोठा मुत्सद्दी होता. त्यानें सन १७६० मध्यें कोचीनशीं **तारकमारक** तह केला. झामोरिननें कोचीन गिळंकृत करण्याकरितां लढाई सुरू केलीच होती. तिचा प्रतिकार करण्याकरितां त्रावणकोरच्या राजानें सैन्य पाठविलें. त्या सैन्यानें झामोरिनला शह दिल्यामुळें त्याला **त्रिचूर** शहर सोडून द्यावें लागलें व कोचीन मुलुखांतून पोबारा करावा लागला. जरी झामोरिनचा प्रत्यक्ष पराभव झाला नव्हता तरी त्यानें त्रावणकोर व कोचीन यांच्याशीं सन १७६२ मध्यें तह केला. कारण त्याच्या प्रांतावर म्हैसूरचा महत्त्वाकांक्षी **हैदरअली** लवकरच स्वीकारणार असा रंग दिसू लागला.

त्या सालीं हैदरची टोळधाड आलीच व त्यानें **मंगलोर** शहर व बंदर काबीज केलें. तेव्हांपासून म्हैसूरचा ससेमिरा केरल प्रांताच्या पाठीमागें मारखा लागला. सन १७६६ मध्यें हैदरनें **चिराकलचें** छोटें राज्य काबीज केलें व त्यानें **कालिकत**वर हल्ला केला. झामोरिननें आपला पराभव होऊन आपण हैदरच्या हातीं सांपडतों या भीतीनें राजवाड्याला आग लावून त्यांत आपली प्राणाहुती टाकली. सन १७८३ मध्यें हैदरनें झामोरिनचें सर्व राज्य आपल्या राज्यांत सामील केलें. डच कंपनीला हैदरशीं तह करावा लागला. पण पुन्हा त्याच्याशीं कटकटी सुरू झाल्या. हैदर वारल्यावर **टिपूनें** बापाचेंच धोरण सुरूं ठेवलें. यामुळें डच कंपनीचा केरलांतील अंमल संपुष्टांत आला. सन १७९२ मध्यें टिपूचा पराभव होऊन उत्तर मलबार इंग्रज कंपनीच्या

वांटयास आला. पुढें इंग्रज व फ्रेंच यांमध्यें युरोपांत लढाई सुरू झाली. डच लोक फ्रेंचांच्या बाजूला होतो. त्याचा फायदा घेऊन इंग्रजांनीं सन १७९६ मध्यें कोचीनच्या किल्ल्यावर हल्ला करून डच कंपनीचा पराभव केला. याप्रमाणें जो किल्ला डच कंपनीनें सन १६६३ मध्यें पोर्तुगीजांकडून घेऊन केरलांत आपला अंमल बसविला तोच किल्ला त्यांनीं १७९६ मध्यें इंग्रजांच्या स्वाधीन केल्यामुळें त्यांचा अंमल संपुष्टांत आला. असो.

पोर्तुगीज लोकांच्यापेक्षां डच लोकांच्या संबंधापासून केरल प्रांताचा फायदा झाला. आधीं डच कंपनीचा कारभार फार व्यवस्थेनें व काटकसरीनें चालत असल्यामुळें लोकांवर जुलूमजबरदस्ती झाली नाहीं; तसेंच डच लोक सहिष्णु प्रॉटेस्टंट धर्माचे अनुयायी असल्यामुळें धार्मिक बाबतींत लोकांवर कधींही सक्ती झाली नाहीं तसेंच पोर्तुगीज लोकांप्रमाणें डच लोकांनीं लढाईत किंवा लढाईनंतर लुटालूट, बायकामुलांचे हाल, गलबतें माणसांसकट बुडविणें इत्यादि क्रूर व रानटी गोष्टी केल्या नाहींत. यामुळें डच लोकांबद्दल केरल प्रांतीय जनतेचा अनुकूल ग्रह सदा कायम राहिला. शेतकी संबंधामध्यें डच लोकांनीं पुष्कळ सुधारणा केली. भात व नारळ यांच्या लागवडींत इष्ट फेरफार घडवून आणले. त्यांनीं निळीची लागवड नवीच सुरू केली. त्यांनीं मीठ करण्याचे कारखाने काढले व वाढविले. त्यांनीं ट्युटीकोरीनहून कसबी रंगारी आणवून कापड रंगविण्याच्या धंद्याला उत्तेजन दिलें. याप्रमाणें शेतकी व तदनुषंगानें व्यापार यांमध्यें केरलची स्थिति डच कारकीर्दीमध्यें पुष्कळ सुधारली.

# प्रकरण ११ वें.

## केरलांत फ्रेंच व इंग्रज अंमल

पोर्तुगीज व डच या युरोपियन राष्ट्रांतील व्यापारी कंपन्यांच्या केरलांतील चंचुप्रवेशानंतर फ्रेंच व इंग्रज व्यापाऱ्यांच्या कंपन्या केरलांत आल्या. फ्रेंचांनीं **माहे** येथें आपलें ठाणें बसविलें. पण त्यांनीं पश्चिम किनाऱ्यावर पूर्व किनाऱ्याच्याप्रमाणें राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न कधींही न केल्यामुळें उपेक्षणीय परकीय ठाणें म्हणून **माहे** बंदराच्या कोणीही फारसें वाटेस गेलें नाहीं व म्हणून तें आज तागाईत फ्रेंचांच्या ताब्यांत आहे.

इंग्रज कंपनीनें केरलच्या दक्षिणोत्तर सर्व किनाऱ्यावर आपलीं व्यापारी ठाणीं बसविलीं व सावकाश, सतत, गुपचुप आपला व्यापार. वाढविला. तिनें केरलच्या राजांच्या भांडणांत व भानगडींत भाग घेतला नाहीं, फार तर अशीं भांडणें चालू राहण्यास व डच कंपनीचें वर्चस्व कमी करण्यास अप्रत्यक्ष उत्तेजन दिलें. कारण त्या कंपनीला हिंदुस्थानच्या मोठमोठ्या प्रांतांत आपला हात शिरकावण्यास संधी मिळत होती; तेव्हां हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतील केरल प्रांताकडे त्यांनीं व्यापारापलीकडे लक्ष देऊं नये हें स्वाभाविक होतें. पण म्हैसूरच्या हैदर व टिपू या दोघां पराक्रमी व महत्त्वाकांक्षी राज्यकर्त्यांचा केरलावर डोळा होता. त्यांना त्या प्रांतावर स्वारी करण्यास पश्चिम घाटामधील **पालघाट**च्या सपाट व सखल खिंडीनें सुलभ मार्ग करून ठेवला होता. तेव्हां त्यांना केरल प्रांताच्या उत्तर भागावर यशस्वी स्वाऱ्या करतां आल्या व त्यावेळच्या झामोरिननें आत्महत्येचा आततायी भ्याडपणा केल्यामुळें सर्व उत्तर केरल प्रांत कायदेशीर रीतीनें म्हैसूरच्या मालकीचा झाला. पुढें इंग्रजांनीं मराठे व निजाम यांच्या साहाय्यानें टिपूचा पूर्ण नायनाट केल्यावर अनायासें

व आयत्या बिळांत नागोबा या म्हणीप्रमाणें उत्तर केरल प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला.

पुढें त्यानीं डच कंपनीच्या हातीं असलेला **कोचीनचा** किल्ला व बंदर हीं काबीज केलीं. याप्रमाणें केरल प्रांत इंग्रज कंपनीच्या हिंदुस्थानांतील मोठ्या राज्यांत सामील होऊन त्याचें स्वतंत्र अस्तित्व व इतिहास नाहींसा झाला. बाकीच्या केरलावर **त्रावणकोर** व **कोचीन** अशा दोन घराण्यांतील राजांचा अम्मल चालू राहिला. तरी या दोन संस्थानांचे इतिहास स्वतंत्र प्रकरणांत देणें योग्य होईल.

# प्रकरण १२ वें

## केरल प्रांतांतील त्रावणकोर संस्थान.

केरल प्रांतांतील दोन देशी संस्थानांपैकीं अगदीं दक्षिणेकडचें संस्थान म्हणजे त्रावणकोर संस्थान होय. या संस्थानच्या स्थापनेचा, स्थित्यंतराचा व सद्यःस्थितीचा थोडक्यांत इतिहास देणें हें योग्य होईल. कारण केरल प्रांतांतील हें सर्वांत मोठें संस्थान असून त्याची प्रगतिपर राज्यव्यवस्थेबद्दल सर्व हिंदुस्थानांत फार ख्याती आहे.

त्रावणकोरच्या राजघराण्याचा धागादोरा अशोककालीन दक्षिण हिंदुस्थानच्या चोल, पांड्य व चेर या प्रख्यात राजघराण्यांपैकीं चेर राजघराण्याशीं पोहोंचतो.

पण पुढें या राजघराण्याचे पांच तुकडे झाल्यामुळें व त्यांचे आपआपसांत तंटेबखेडे होत राहिल्यामुळें केरलाच्या राजकारणांत त्यांचें महत्त्व व वजन फार कमी झालें. **क्विलॉन, एलायाडस्वरूपं, अतुंगल, नेदुवनगड** व **त्रावणकोर** हीं तीं पांच राजघराणीं होत. त्रावणकोर राजघराण्याचें महत्त्व व वजन कमी होण्याचें दुसरें एक कारण म्हणजे राज्यांतील सरदारांची सत्ता हें होय. त्रावणकोर संस्थानांत **श्रीपद्मनाभ** देवाचें देऊळ फार प्रख्यात असून त्या देवळाकडे राज्यांतील बऱ्याच जमिनीचें उत्पन्न लावून दिलेलें होतें. सन १०५० सालीं या देवळाची व त्याला लावून दिलेल्या जमिनीच्या उत्पन्नाची व्यवस्था व देखरेख करण्याकरितां आठ ब्राह्मण पुरोहित व त्रावणकोरचा राजा या घराण्यांची कमिटी नेमण्यांत आली होती. त्यांत राजघराण्यांतील पुरुषाला अर्धेंच मत होतें. कालेंकरून या आठ घराण्यांकडे राज्यांतील सर्व अधिकार गेले व त्रावणकोरचा राजा नामधारी राजा बनून राज्यांत बेबंदशाही माजली. सन १६६१ पासून १६७७ पर्यंत **आदित्यवर्मा** हा राजा होता. या

कारकीर्दींत तर बेबंदशाहीचा कळस झाला. राजवाड्याला आग लावण्यांत आली व खुद्द राजाला विषप्रयोग करण्यांत आला. **उम्मा अम्मा** नांवाची राणी व तिचीं सहा अज्ञान मुलें फक्त मागें राहिलीं. त्यावेळीं सर्व राजसत्ता सरदारांच्या हातीं गेली. या बेबंदशाहीची संधि साधून एक मोंगल सरदार कांहीं घोडेस्वारांसहित त्रावणकोर राज्यांत येऊन त्यानें राजधानीनजीक तळ दिला. राणी राजधानींतून निसटून गेली व तिनें **केरलवर्मा** नांवाच्या राजकुमाराची मदत घेऊन त्या मोंगल सरदारास राज्यांतून पिटाळून लावलें. पण केरलवर्म्याचा वध करण्यांत आला व राज्यांत पुनः बेबंदशाही सुरूच राहिली. अशा परिस्थितींत त्रावणकोर घराण्यांत **मार्तंडवर्मा** या अलौलिक पुरुषाचा सन १७०६ मध्यें जन्म झाला. वयाच्या चवदाव्या वर्षीं त्यानें सरदारांच्या जुलमी सत्तेचा नायनाट करण्याचा निश्चय केला व तेव्हांपासून तो त्या उद्योगास लागला. पण सरदारही त्याच्या पाठीस लागले व त्याला पळून जाऊन राज्यांतील शेतकऱ्यांचा आश्रय करावा लागला. राज्याची सद्यःस्थिति पाहून मार्तंडवर्म्याचें असें ठाम मत झालें कीं खडाजय्यत सैन्याखेरीज राज्यांतल्या सरदारांची जुलमी सत्ता नाहींशी होणार नाहीं. तें सैन्यसुद्धां केरल प्रांतांतील नायर लोकांपासून उभारून चालणार नाहीं. कारण नायर लोकांना राजाच्या हुकुमापेक्षां आपल्या कुटुंबांतील मुख्याचा हुकूम जास्त शिरसावंद्य वाटतो. तेव्हां मार्तंडवर्म्यानें राजकुमार असतांनाच **राजा रामवर्मा** नांवाच्या आपल्या चुलत्याला १७२६ मध्यें अशी सल्ला दिली कीं, दिल्लीच्या बादशाहाची कर्नाटक प्रांतांवर धाडलेल्या नव्या सुभेदारामार्फत मांडलिकी स्वीकारून त्याची लष्करी मदत घेऊन राज्यांतील सरदारांची सत्ता व जुलूम नाहींसा करावा. तदनुरूप राजा रामवर्मा **त्रिचनापल्लीस** गेला व त्यानें दर वर्षीं तीन हजार रुपयांची खंडणी सुभेदारास देऊं केली. सुभेदारानें मदत देण्याचें कबूल करून लागलीच दोन हजार पायदळ व हजार घोडेस्वार राजा **रामवर्म्याच्या** मदतीस पाठविले. अर्थात् या सैन्याचा खर्च राजा

**रामवर्म्यानें** चालवावयाचा होता. पण **रामवर्मा** या सैन्याचा उपयोग करण्याचे आधींच एकाएकीं वारला व **मार्तंडवर्मा** वयाच्या तेवीसाव्या वर्षीं व सन १७२९ मध्यें त्रावणकोरच्या गादीवर बसला. तो लागलींच मोगल सैन्याच्या मदतीनें सरदारांचा नायनाट करण्याच्या खटपटीस लागला. पण त्याला दिसून आलें कीं,हें परकी सैन्य आपले हुकुमाप्रमाणें न वागतां आपल्यावर कुरघोडी करूं पहातें. तेव्हां मार्तंडवर्म्यानें या सैन्याला रजा दिली व स्वतःच्या हिंमतीवर स्वतःचें नवें सैन्य उभारलें. इतक्यांत **रामवर्मा** राजाचा मुलगा व त्याच्या पक्षाचे सरदार यांनीं त्याच मोंगल सैन्याची मदत घेऊन मार्तंडवर्म्याला पदच्युत करण्याचा घाट घातला. पण मार्तंडवर्म्याची प्रसंग पडेल तसें वागण्याची तयारी होती. त्यानें मोंगल सैन्याच्या सेनापतीला लांच देऊन परत लावून दिलें. मग मागें राहिलेल्या सरदारांच्या सैन्याचा धुव्वा उडवून देऊन मार्तंडवर्म्यानें बंडांत सामील झालेल्या बेचाळीस सरदारांना फांशीची शिक्षा दिली व त्यांच्या बायका मुलांना गुलाम करून राज्याबाहेर घालवून दिलें. केरल प्रांताच्या सर्व इतिहासांत असें कडक शासन करण्याचें धाडस पूर्वींच्या कोणत्याही राजानें केलें नव्हतें. या धाडसी व कडक शिस्तीच्या कृतीनें सर्व केरल प्रांतभर मार्तंडवर्म्याचा ताबडतोब दरारा बसला. याप्रमाणें मार्तंडवर्म्यानें आपल्या स्वतःच्या राज्यामध्यें खरी एकसत्ताक राज्यव्यवस्था सुरू केली व देशांतली अंदाधुंदी नाहींशी केली. नंतर त्यानें आपल्या पूर्वींच्या तुकडे तुकडे झालेल्या राज्याकडे मोर्चा फिरविला. प्रथमतः त्यानें **क्विलॉन**च्या राज्यावर आपला हक्क आहे असें म्हणून त्यावर हल्ला केला व **क्विलॉन** काबीज करून तेथल्या राजाला कैद करून त्रिवेन्द्रममध्यें आणून ठेविलें व मुलुख आपल्या ताब्यांत घेतला. केरल प्रांतांत राजाची पदच्युति व त्याच्या राज्याचा दुसऱ्या राज्यांत अंतर्भाव या गोष्टी अभूतपूर्वच होत्या. यामुळें उत्तरेकडच्या राजांनीं संगनमत करून आपआपल्या सैन्यानिशीं एकत्र जमून मार्तंडवर्म्यावर स्वारी करण्याची तयारी केली. क्विलॉनचा राजाही बंदीवासां-

तून युक्तीनें सुटून आला व तो या सैन्याचा मुख्य होऊन त्यानें मार्तंडवर्म्याच्या सैन्यावर निकराचा हल्ला केला. यावेळीं मार्तंड-वर्म्याचा पराभव होऊन त्याला माघार घ्यावी लागली व क्विलॉनच्या राजाला त्याचें राज्य परत द्यावें लागलें. पण या पराजयानें मार्तंडवर्मा निराश व नाउमेद झाला नाहीं. उलट त्यानें आपल्या सैन्याची जास्त चांगली तयारी केली; इंग्रज कंपनीकडून दारुगोळा वगैरे युद्धसामुग्री मिळविली व पुन्हां लढाईची जय्यत तयारी केली. यावेळीं डच कंपनी सुद्धां छोट्या राजांच्या मदतीला आली. सिलोनहून त्यांनीं मोठी फौज आणवून ती **कोलाचेल** या बंदरीं उतरवून त्रावणकोर राज्याचा दक्षिण भाग काबीज केला. यावेळीं मार्तंडवर्म्यानें फ्रेंच कंपनीची मदत मागण्यास कमी केलें नाहीं. पण त्याच्या सुदैवानें फ्रेंचांची मदत येण्यापूर्वींच **कोलाचेल** येथें डच सैन्याचा पूर्ण पराभव झाला व डच कंपनीला मार्तंडवर्म्याशीं तह करावा लागला. हा तह सन १७४१ मध्यें झाला. या तहानें मार्तंडवर्म्याचा आपल्या राज्यांतच नव्हे तर सर्व केरळ प्रांतभर दरारा बसला व डच कंपनीची लष्करी इभ्रत व राजकीय वजन कायमचें पार नाहींसें झालें. मार्तंडवर्म्यानें **क्विलॉन** व **एलायाडम** येथील राज्यें आपल्या राज्यांत सामील करून घेतलीं. यामुळे **कन्या-कुमारी**पासून **कायाकुलम**पर्यंत त्याचा निर्वेध व निष्कंटक राज्यविस्तार झाला. मार्तंडवर्मा नुसता राज्यविस्तारच करून राहिला नाहीं; तर त्यानें नांजिनाद येथील पाटबंधाऱ्याचें खर्चाचें मोठें काम करून व इतर सुधा-रणा करून राज्याची व लोकांची भरभराट घडवून आणली.

**कोलाचेल** लढाईत सांपडलेल्या **डीलेनाय** व **डनकॉड** नांवाच्या फ्रेंच अंमलदारांस मार्तंडवर्म्यानें चाकरीस ठेवलें. त्यांच्याकडून आपल्या सैन्याला पाश्चिमात्य युद्धकलेचें शिक्षण देवविलें व दारूगोळा व तोफा करण्याचा कारखाना काढविला. याप्रमाणें त्यानें आपलें सैन्य युरोपी-यन कंपन्यांच्या सैन्याच्या तोडीचें तयार केलें. मग त्यानें उत्तरेकडे

आपला मोर्चा फिरविला, आणि उत्तरेकडचे राजे व डच कंपनी यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला.

या सारख्या चाललेल्या लढायांमुळें डच कंपनीचा व्यापार संपुष्टांत आला; सन १७४१ च्या पराजयानंतर झामोरिननें डच कंपनीला व कोचीन राजाला पुन्हा त्रास देण्यास सुरवात केली. अशा दुहेरी कैचींत सांपडल्यामुळें डच कंपनीनें सन १७५३ मध्यें मार्तंडवर्म्याशीं पुन्हां तह केला. या तहानें डच कंपनीचें राजकीय महत्त्व पार नाहींसें झालें. कारण मार्तंडवर्म्यानें त्यांचेकडून असें कबूल करवून घेतलें कीं आपण केरल प्रांतांतील ज्या ज्या राजांशीं मार्तंडवर्मा व त्याचे मागून येणारे राजे यांचीं भांडणें किंवा लढाई चालू असेल त्यांपैकीं कोणत्याही राजाला मदत करणार नाहीं व यापुढें केरल प्रांतांतील राजांच्या भांडणांत आपण पडणार नाहीं. तसेंच क्रिश्चन धर्मी लोकांचा न्याय करण्याचा आपला हक्क आपण सोडून देऊं. याप्रमाणें मार्तंडवर्म्यानें डच कंपनीचा सर्व राजकीय अधिकार काढून घेतला खरा; पण व्यापारी कंपनी या नात्यानें त्यानें कंपनीचा पुष्कळच फायदा करून दिला. कारण आपल्या राज्यांतील व आपण नवीन काबीज करूं त्या मुलखांतील मसाल्याचे पदार्थ सवलतीच्या दरानें डच कंपनीस विकूं असें मार्तंडवर्म्यानें कबूल केलें. याप्रमाणें चोवीस वर्षांच्या आंत मार्तंडवर्म्यानें कन्याकुमारीपासून कोचीनच्या सीमेपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार वाढविला व त्याचा उत्तम बंदोबस्त केला.

या लढाईमध्यें कोचीनच्या वंशपरंपरा दिवाणाच्या राजघराण्यांतला राजपुत्र **कोमुआचा** हा तरुण पुरुष कैदी म्हणून त्रिवेन्द्रमला नेण्यांत आला. तेथें त्याला त्रावणकोरच्या राजानें आपलें सामर्थ्य कोणत्या धोरणानें व कशा राज्यपद्धतीनें मिळविलेलें आहे, तसेंच डच कंपनी किती दुर्बल झालेली आहे व तिच्या मदतीनें कोचीनचा झामोरिन राजापुढें निभाव निघणें किती कठीण आहे या दोन गोष्टी कळून आल्या. तेव्हां त्यानें त्रावणकोर व कोचीन यांची मैत्री जमवून आण-

ण्याचा निश्चय केला. त्याच्या हुशारीमुळें त्रावणकोरच्या राजाची मर्जी त्याच्यावर बसली. त्याची त्रावणकोरमधून सुटका झाल्यावर तो कोचीनला परत आला व त्यानें सन १७५३ मध्यें दोघां राजांची भेट करवून **तारकमारक** तहाची वाटाघाट करविली; व बऱ्याच अटींबद्दल एकवाक्यता झाली, पण कांहीं बाबतींत वांधा पडला. पण येवढ्यानें कोमुआचमनें आपलें धोरण किंवा निश्चय सोडला नाहीं.

पण इतक्यांत झामोरिन राजानें पुन्हा कोचीन विरुद्ध युद्ध सुरू करून त्या राज्याचें मुख्य शहर **त्रिचूर** काबीज केलें व थेट कोचीनपर्यंत तो चाल करून आला. डच कंपनीच्याकडून या स्वारीचा प्रतिकार होण्याचा रंग दिसेना. तेव्हां कोमुआचमच्या धोरणाप्रमाणें सन १७५७ मध्यें कोचीनचा राजा त्रावणकोरपाशीं कायमचा तारकमारक तह करण्यास तयार झाला. दोघेही राजे पूर्वींप्रमाणें एकमेकांना भेटले व तहाचीं कलमें ठरलीं. पण तह पुरा होण्यापूर्वीं म्हणजे सन १७५८ मध्यें मार्तंडवर्मा एकाएकीं वारला. पण कोचीनच्या सुदैवानें झामोरिनही याच वेळीं मरण पावला. मार्तंडवर्म्यानंतर त्रावणकोरचा राजा **रामवर्मा** हा गादीवर आला. झामोरिनच्या गादीवरही दुसरा राजा आला. याप्रमाणें दोन राजे नवे आल्यामुळें व ते दोघेही तह करण्यास उत्सुक असल्यामुळें प्रथमतः सन १७६१ मध्यें कोचीन व त्रावणकोरमध्यें कायमचा तह घडून आला व दोन्ही राजांनीं **सुचिन्द्रम्** येथील प्रख्यात देवासमोर कायमच्या मैत्रीबद्दल आणा—शपथा घेतल्या. तसेंच सन १७६२ मध्यें कोचीन त्रावणकोर व झामोरिन यांचेमध्येंही तह घडून आला.

मार्तंडवर्मा हा अर्वाचीन त्रावणकोर संस्थानचा प्रस्थापक होय यांत शंका नाहीं. तो राज्यावर बसण्यापूर्वीं त्रावणकोर हें केरळ प्रांताच्या कोनाकोपऱ्यांतील एक छोटें संस्थान असून त्याला केरळप्रांताच्या राजकारणांत कांहीं एक महत्त्व व तेथल्या राजाला काडीची सत्ता नव्हती व खजिन्यांत पैसा नव्हता. सैन्य राजाच्या हुकमतींत नसून राज्यांतील बंडखोर सरदारांच्या हुकमतींत होतें; राजाचा जीव सारखा धोक्यांत असे.

केरल प्रांतावर आपलें अधिराज्य असून तेथल्या सर्व राजकारणांत हात घालण्याचा आपल्याला अधिकार आहे अशा भावनेनें व धोरणानें डच कंपनी केरल प्रांतांत वागूं लागली होती. पण थोड्याच काळांत मार्तंड-वर्म्यानें केरल प्रांताचा सर्व नकाशा बदलला. डच कंपनीला आपलें अरेरावीपणाचें धोरण सोडून त्रावणकोर राजाची मर्जी संभाळून व्यापारी कंपनी म्हणून राहावें लागलें. कोचीनपासून क्विलॉनपर्यंत असलेल्या छोट्या राजेरजवाड्यांचा नायनाट करून त्यानें त्रावणकोरचा पूर्ण अंमल भरभक्कम पायावर बसविला. त्यानें कवायती व कर्तव्यदक्ष असें उत्तम सैन्य तयार करून सर्व केरल प्रांतामध्यें त्रावणकोर संस्थानाला पहिल्या प्रतीचा दर्जा आणून दिला. त्यानें आपल्या राज्यांत पाटबंधा-ऱ्याचीं मोठमोठीं कामें, उत्तम रस्ते व जलमार्ग करविले. तसेंच आपल्या राज्यांत किती तरी लोकोपयोगी संस्था काढल्या. सारांश मार्तंडवर्म्यानें आपल्या सुमारें तीस वर्षांच्या कारकीर्दीमध्यें त्रावणकोरची सर्व बाजूनें प्रगति घडवून आणली. त्याच्या अंगीं दूरदर्शीपणा, दृढ-निश्चय, काम करण्याचा उत्साह, ताकद व प्रसंगावधान हे गुण होते. शिवाय तो धर्मशील इतका होता कीं, त्यानें संपादन केलेलें सर्व राज्य श्रीपद्मनाभ देवाला अर्पण केलें व तो आपल्याला देवाचा दास म्हणवून घेई. अजून सुद्धां त्रावणकोरच्या राजेराण्या देवाचे दास व सेविनी म्हणून राज्यकारभार करतात. त्यानें आपल्या कार्यसिद्धीकरितां केव्हां केव्हां क्रूरपणाचीं कृत्यें व विश्वासघाताचीं कृत्यें केलीं हें खरें आहे. तसेंच आपल्या घराण्याच्या हिताकरितां एक दोन वेळ त्यानें परकी राजांची मदत घेतली; झामोरिनच्या शेवटच्या युद्धाचे प्रसंगीं त्यानें हैदरअल्लीची मदत मागितली ही गोष्ट राष्ट्रीय दृष्ट्या फार गैर होती. कारण त्यामुळें हैदरअल्लीला मलबार प्रांतावर स्वारी करण्याची आयती संधि व सबब मिळाली. पण ‘ एकोहि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः ’ या न्यायानें मार्तंडवर्म्याचें चरित्र पाहिल्यास केरल प्रांताचा तो अत्यंत मोठा राजा होऊन गेला यांत शंका नाहीं.

त्याच्यानंतर आलेला राजा **रामवर्मा** हाही चांगला राजा निपजला. मार्तंडवर्म्यापेक्षां हा फार विद्वान व सुशिक्षित होता. त्याचा स्वभाव फार उदार होता. तोही प्रजाहिततत्पर होता. याचीही कारकीर्द चाळीस वर्षे चालली. या दोन राजांच्या दीर्घकालीन कारकीर्दीमुळें व त्यांच्या उत्तम राज्यव्यवस्थेमुळें त्रावणकोर संस्थानच्या कारभाराची जी एकदां उत्तम घडी बसली ती कायम राहून त्यामध्यें कालानुरूप व परिस्थित्यनुरूप इष्ट फेरफार व सारखी प्रगति होत गेली. राजा रामवर्मा सन १७९८ मध्यें वारला. त्याच्याच कारकीर्दीचे शेवटीं त्यानें ईस्ट इंडिया कंपनीशीं सलोख्याचा तह केला. तेव्हांपासून संस्थानला कायमचें स्थैर्य पण वस्तुतः मांडलिकत्व प्राप्त झालें. त्यानंतरच्या सत्याऐंशी वर्षांच्या काळांत त्रावणकोरमध्यें दोन राण्या व पांच राजे होऊन गेले. त्यांच्या कारकीर्दींत संस्थानची सारखी प्रगति होत गेली. सन १८८५ मध्यें महाराज **रामवर्मा** हे गादीवर बसले. त्यांनीं चाळीस वर्षे म्हणजे सन १९२४ पर्यंत राज्य केलें. हिंदुस्थानांतील संस्थानांमध्यें लोकप्रतिनिधी सभा स्थापण्याचा मान महाराज रामवर्मा यांनाच आहे. त्यांनीं सन १८८५ मध्यें प्रथमतः आठ लोकांचें कायदेमंडळ स्थापन केलें. सन १८९८ मध्यें या मंडळाची पंधरा सभासदांपर्यंत वाढ करण्यांत आली. याप्रमाणें वेळोवेळीं कायदेमंडळाची वाढ होत गेली व तिला जास्त जास्त अधिकार देण्यांत आले. सन १९२५ मध्यें महाराणी **सेतुलक्ष्मी** गादीवर आल्या; त्यांनीं कायदेमंडळाची आणखी सुधारणा केली. सन १९३१ मध्यें हल्लींचे त्रावणकोरचे महाराज **रामवर्मा** हे गादीवर आले. त्यांच्या कारकीर्दीचे प्रारंभींच त्यांनी कायदेमंडळाला कायद्यानें कायमची घटना दिली व सर्व सुधारलेल्या राज्यपद्धतीप्रमाणें कायदेमंडळाच्या **श्रीमूलम्** सभा व **श्रीचित्रम्** सभा नांवाच्या दोन प्रातिनिधिक सभा स्थापन केल्या. सारांश आतां त्रावणकोर संस्थानची राज्यव्यवस्था **मर्यादित राजसत्ता** प्रकारची बनली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्रावणकोरची सध्यांची राज्य-

व्यवस्था हिंदुस्थानांतील सर्व संस्थानांस आदर्शभूत आहे यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांतील हें अगदीं दक्षिणेकडचें संस्थान असून तें कन्याकुमारीपासून उत्तरेस **आलवाये** किंवा **पारूर** नदीपर्यंत पसरलें असून त्याची दक्षिणोत्तर लांबी १७४ मैल आहे. त्याच्या पश्चिमेस आरबी समुद्र व पूर्वेस पश्चिमघाट नांवाची पर्वतराजी असून त्याची पूर्वपश्चिम रुंदी ७५ मैल आहे.

या संस्थानची सध्यांची लोकसंख्या पन्नास लाखाची असून त्यापैकीं शेंकडा एकसष्ठ हिंदु, शेंकडा एकतीस क्रिश्चन, शेंकडा सात मुसलमान आहेत; इतर सर्वधर्मी लोक फक्त शेंकडा एक आहेत. या संस्थानामध्यें लोकवस्तीची दाटी अत्यंत सुधारलेल्या देशांच्या जवळ जवळ बरोबरीची आहे.

संस्थानामध्यें शेंकडा चव्र्‍यांशीं लोक **मलयाळी** भाषा बोलतात व शेंकडा पंधरा लोक **तामिळ** भाषा बोलतात. म्हणजे शेंकडा नव्याणव लोक द्राविडी भाषा कुटुंबाच्या परस्पर संबद्ध अशा शाखांची भाषा बोलतात. (पांच वर्षांखालील मुलें सोडून) लोकसंख्येच्या एकचतुर्थांश लोक साक्षर आहेत; पुरुषांमध्यें तर हें प्रमाण जवळ जवळ निम्यानें आहे. लोकसंख्येपैकीं शेंकडा चौपन्न लोक शेतकीवर उदर निर्वाह करतात व शेंकडा सात घरगुती व कारखानी उद्योगावर उदरनिर्वाह करतात.

त्रावणकोर संस्थानचें वार्षिक उत्पन्न दोन कोट रुपयांवर आहे. खर्चही त्याच मानानें आहे. पण नवलाची गोष्ट ही कीं, यांपैकीं फक्त शेंकडा चार म्हणजे आठ लाख इतकाच दर सालचा राजघराण्याचा खर्च आहे.

याप्रमाणें त्रावणकोर संस्थानची सद्यःस्थिती आहे.

---

# प्रकरण १३ वें

## केरळ प्रांतांतील कोचीन संस्थान

त्रावणकोर संस्थानापेक्षां कोचीन संस्थान बरेंच लहान आहे. कोचीनच्या राजघराण्याची पूर्वपरंपरा त्रावणकोरच्या राजघराण्याइतकी पुरातन नाहीं. कोचीनचा पहिला राजा **वीर केरलवर्मा** हा **चेरामन** पेरुमलच्या बहिणीचा मुलगा होता. म्हणजे मलयाळी पद्धतीप्रमाणें तोच सर्व केरळ प्रांताचा वारस होता. त्रावणकोरच्या राजघराण्याप्रमाणें याही राजघराण्याच्या चार पांच शाखा झाल्या होत्या व म्हणून त्याचें सामर्थ्य व वजन कमी झालें होतें. कालिकतचा राजा हा चेरामन पेरुमलचा आश्रित होता; पण त्याला पेरुमलनें आपली तलवार देऊन त्याला "मर, मार व मिळव" असा हुकूमवजा आशीर्वाद दिला व त्या उपदेशाप्रमाणें कालिकतच्या राजानें (त्याला झामोरिन म्हणत) आपला राज्यविस्तार पुष्कळ केला. कोचीनचा राजा पेरुमलचा सरळ वारस म्हणून व कालिकतच्या झामोरिनला राज्याधिकाराची खूण व उपदेश मिळाला म्हणून दोघां राजांमध्यें केरळ प्रांतावर वर्चस्व मिळविण्याबद्दल सारखी चढाओढ चालू होती. पण पोर्तुगीज लोकांच्या केरळांतील चंचुप्रवेशाच्या सुमारास झामोरिनचें पारडें जड झालेलें होतें. तो आपल्याला केरळाचा अधिराजा म्हणवी. सर्व प्रांत आपल्या अंमलाखालीं आणण्याची व सर्व राजांना आपले मांडलिक बनविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. विशेषतः आपल्या राज्याला लागून असलेलें कोचीनचें राज्य गिळंकृत करण्याची त्याची खटपट होती. तर कोचीनच्या राजाची झामोरिनचा पाडाव करून आपण स्वतंत्र राजा बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. दोन राजांमधील हा तंटा न तुटण्यासारखा होता. कोचीनच्या राजघराण्यांत त्रावणकोरच्या राजघराण्याप्रमाणें दीर्घकाल

कारकीर्दीचे कर्तबगार पुरुष निघाले नाहींत. यामुळें आपलें अस्तित्व व स्वातंत्र्य कायम ठेवण्याकरितां त्या राजांना दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याची संवय लागली होती. यामुळें पोर्तुगीज राजाचा सरदार कॅब्राल कोचीनला आल्याबरोबर या परकी राजाच्या प्रतिनिधीला आश्रय देऊन त्याची मदत मागण्याची आत्मघातकी बुद्धि कोचीनच्या राजाला झाली व सन १५०० मध्यें राजानें कॅब्रालला कोचीन बेटावर किल्ला बांधण्यास परवानगी दिली. तेव्हांपासून कोचीन व कालिकत यांचें वैमनस्य विकोपास गेलें व या दोन देशी राजांच्या एकमेकांचा पाडाव व नायनाट करण्याकरितां सारख्या लढाया चालू राहिल्या व कोचीनच्या राजांना परकीय युरोपीयन व्यापारी कंपन्यांच्या मदतीवर सदा भिस्त ठेवावी लागली व त्यांच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागलें. इतकें करून सुद्धां उत्तरेकडून झामोरिन व दक्षिणेकडून त्रावणकोर यांनीं कोचीन मुलखाची कुतरओढ चालविली होती. सन १७६१ च्या लढाईमध्यें तर सर्व राज्य नाहींसें होण्याचा प्रसंग आला. या आणीबाणीच्या व ऐन संकटाच्या समयीं कोमुआचमसारखा धोरणी, शहाणा, दूरदर्शी दिवाण कोचीनला लाभला होता. परकीयांचें आत्मघातकी सख्य सोडून स्वकीयांशीं कायमचें व कल्याणकारक सख्य करण्याचा सल्ला कोमुआचमनें कोचीनच्या राजाला दिला. राजालाही त्यावेळीं सुबुद्धि सुचून तो सल्ला पसंत पडला व मग त्रावणकोर व कोचीन या दोन संस्थानांमध्यें तारकमारक तह होऊन सचिन्द्राच्या देवाच्या देवळांत कायमच्या स्नेहाबाबत दोन्ही राजांनीं आणा शपथा घेतल्या. याविषयीं मागल्या प्रकरणांत सविस्तर हकीकत सांगितली आहे. त्रावणकोरच्या मदतीनें झामोरिनच्या मगरमिठींतून कोचीन त्यावेळीं सुटलें तें कायमचेंच सुटलें. पुढें कांहीं काळ म्हैसूरच्या राजाचें मांडलिकत्व कोचीनच्या राजाला पतकरावें लागलें. पण लवकरच इंग्रज कंपनीनें टिपूचा नायनाट केला. झामोरिनचें राज्य टिपूनें खालसा केलें होतें या सबबीवर त्या राजाचा मुलूख इंग्रज कंपनीनें आपल्या राज्यांत सामील केला. त्रावणकोरच्या राजानें म्हैसूरच्या स्वारींत

इंग्रजांना पुष्कळच मदत केली होती म्हणून व त्रावणकोर व कोचीन यांचा कायमचा **तारकमारक** तह होता म्हणून इंग्रज कंपनीनें त्रावणकोर व कोचीन या संस्थानांशीं सलोख्याचा तह केला. तेव्हांपासून त्रावणकोरप्रमाणें कोचीनचीही सारखी प्रगति व भरभराट होत गेली व त्रावणकोरप्रमाणें कोचीन संस्थान हें हिंदुस्थानांत आदर्शभूत संस्थान बनलें.

कोचीन हें छोटेखानी संस्थान त्रावणकोरच्या उत्तरेस व ब्रिटिश मलबार प्रांताच्या दक्षिणेस आहे. त्याची स्वाभाविक उत्तर मर्यादा म्हणजे पश्चिम घाट रांगेतील **पालघाट**च्या सखल व सपाट खिंडीवजा प्रदेशांतून वहात आलेली **पोनाई** नदी होय; दक्षिणेस त्रावणकोरच्या बाजूला स्वाभाविक अशी मर्यादा नाहीं; पश्चिमेस आरबी समुद्र असून पूर्वेस पश्चिम घाटाची पर्वत-रांग आहे. या संस्थानचें क्षेत्रफळ त्रावणकोरच्या पांचव्या हिश्शानें म्हणजे सुमारें १५०० मैल असून त्याची दक्षिणोत्तर साधारणतः लांबी चाळीस पन्नास मैल व रुंदी तीस चाळीस मैल आहे.

या संस्थानची लोकसंख्या सुमारें बारा लाख आहे. त्यांमध्यें हिंदु शेंकडा चौसष्ट, ख्रिश्चन शेंकडा अठ्ठावीस, व मुसलमान शेंकडा सात व बाकीच्या सर्व धर्मांचे लोक शेंकडा एक आहेत. लोकवस्तीची दाटी हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रांतापेक्षा किंवा संस्थानापेक्षां जास्त आहे. या बाबतींत त्रावणकोरचा नंबरसुद्धां कोचीनच्या खालीं लागतो. लोकसंख्येपैकीं सामान्यतः शेंकडा एकेचाळीस लोकसंख्या शेतकीवर उदरनिर्वाह करणारी आहे. बाकीचे घरगुती व कारखानी उद्योग करणारे आहेत. उद्योगधंद्यांना सरकारी उत्तेजन मिळत असल्यामुळें उद्योगधंदे वाढत्या प्रमाणावर आहेत.

साक्षर लोकांची संख्या हिंदुस्थानांतील ब्रह्मदेश सोडून सर्व बाकी संस्थानें व ब्रिटिश प्रांत यामधील साक्षरतेच्या प्रमाणापेक्षां जास्त आहे. विशेष नवलाची गोष्ट ही कीं या संस्थानांतील स्त्रियांमध्यें साक्षरतेचा प्रसार ब्रह्मदेशाच्यापेक्षां सुद्धां जास्त आहे. साक्षरतेप्रमाणें इंग्रजी भाषा

जाणणारांच्या शेंकडा प्रमाणामध्येंही कोचीनचा पहिला नंबर आहे. सारांश संस्थानच्या एकंदर उदार धोरणामुळें संस्थानच्या प्रजेची शैक्षणिक प्रगति प्रशंसनीय असून ब्रिटिश प्रांतांनाही लज्जेनें मान खालीं घालविणारी आहे यांत शंका नाहीं. त्रावणकोरच्याप्रमाणें या संस्थानांत शेंकडा सत्याण्णव लोक **द्राविड भाषा** कुटुंबांतील मलयाळी, तामीळ, कानडी व तेलगू भाषा बोलणारे आहेत. मलयाळी भाषेचा प्रसार व बोलण्याचा प्रघात वाढत्या प्रमाणावर आहे ही विशेष ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट आहे.

त्रावणकोर संस्थानाप्रमाणें या प्रगतिपर संस्थानांतसुद्धां प्रातिनिधिक सभा असून ती जास्त जास्त लोकमतानुवर्ती करून तिला जास्त जास्त हक्क देण्याचा प्रघात कोचीनच्या राजांनीं सुरू केला आहे.

संस्थानचें एकंदर उत्पन्न सुमारें नव्वद लाख आहे व त्या मानानेंच खर्च केला जातो. पण संस्थानची सांपत्तिक स्थिति चांगली आहे व एकंदर राज्यकारभार फार दक्षतेनें व व्यवस्थेनें चालविला जातो; याचें एक गमक हें आहे कीं जमाखर्चाची नेहमीं तोंडमिळवणी केली जाते व जमाखर्चांत तूट न येतां दर वर्षास कांहीं तरी शिल्लक टाकण्यांत येते. अशी जमलेली शिल्लक सुमारें एक कोटी रुपये आहे व ती ब्रिटिश कर्जरोख्यांमध्यें व बँकामध्यें ठेविलेली आहे.

या संस्थानांत सहकारी तत्त्वाचा पुष्कळच प्रसार करण्यांत आलेला आहे. एकंदर पतपेढ्या अडीचशेंच्यावर असून त्यांचा एकंदर नफा पावणेदोन लाखांचा आहे. सुमारें पंचवीस हजार सभासद सर्व पेढ्या मिळून आहेत.

तसेंच या संस्थानांत ग्रामपंचायतीचा प्रसारही पुष्कळ आहे. बहुतेक प्रत्येक गांवाला किंवा फारच लहान गांवें असल्यास **गांवसमुदायाला** एक ग्रामपंचायत आहे. त्यांच्या ताब्यांत गांवचे रस्ते, लहान लहान तलाव व पाट यांचीं कामें दिलेलीं आहेत. एकंदर ग्रामपंचायतींचें उत्पन्न पावणे दोन लक्ष असून त्यांचा खर्चही तेवढाच आहे.

सामान्य व उदार शिक्षणाप्रमाणें धंदेशिक्षणाचीही संस्थानानें चांगली सोय केलेली आहे. सुमारें पंचेचाळीस वरच्या दर्जाच्या औद्योगिक शाळा असून, शिवाय एकवीस खेडेगांवच्या दुय्यम दर्जाच्या शाळा आहेत.

# प्रकरण १४ वें.

## केरळांतील लोकस्थिति व रीतीभाती.

समाजशास्त्राचा नवीन अभ्यास करण्याच्या दृष्टीनें किंवा समाजशास्त्रीय ग्रंथांत वाचलेल्या प्रमेयांचें प्रत्यंतर पाहण्याच्या दृष्टीनें किंवा अधिक अवलोकनानें व तुलनात्मक पद्धतीनें समाजशास्त्रांत नव्या कल्पना, उपपत्ति व प्रमेयें काढण्याच्या दृष्टीनें,या कोणत्याही दृष्टीनें पाहतां जगांतील कोणत्याही देशापेक्षां हिंदुस्थानदेश व त्यांतल्या त्यांत केरळ प्रांत हें एक महत्त्वाचें व मनोरंजक अवलोकनक्षेत्र आहे यांत शंका नाहीं. केरळासारख्या लहान प्रांतांमध्यें नानावर्णी, नानाजाती व नानाधर्मी लोकांचें इतकें मिश्रण आहे व लोकांच्या चालीरीतींचें इतकें वैचित्र्य आहे कीं तें पाहून आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं. पण ज्याप्रमाणें केरळ प्रांताच्या नानाविध सृष्टिसौंदर्यामध्यें एक प्रकारचा एकजीवपणा व सलगपणा आहे त्याचप्रमाणें या नानाधर्मी व नाना जाती लोकांमध्यें आचार–विचारांचा व चालीरीतींचा गोड मिलाफ व एकसारखेपणा पुरातन कालापासून उत्पन्न झालेला आहे हें पाहून मोठें नवल व कौतुक वाटतें. लोकस्थितीच्या वर्णनास प्रांतांतील अगदीं मूळच्या रहिवाशांपासून सुरवात करूं या.

हिंदुस्थानच्या इतर भागांप्रमाणें केरळ प्रांतांतही मुळच्या रानटी व जंगली जाती पुष्कळच आहेत. त्या प्रांतांत मागाहून आलेल्या द्रविड व आर्य या दोन वंशांतील लोकांपेक्षांही या जंगली जाती जुन्या असाव्या. कारण त्यांच्या भाषा द्रविड व आर्य या दोन्ही भाषापेक्षां निराळ्या आहेत; त्यांची शरीराची ठेवण, रंग, आकार व उंची हीं सर्व निराळीच आहेत. या जातींपैकीं बऱ्याचशा जातींच्या लोकांमध्यें जाड केस, जाड ओठ, तोंडाची ठेवण वगैरे गोष्टी आफ्रिकेंतील नीग्रो-

जातीच्या सारख्या आहेत. तेव्हां द्राविड व आर्य येण्याच्या पूर्वीच आफ्रिकेकडून हे लोक प्रथम या प्रांतांत आले असावे कीं काय अशी कल्पना काढलेली आहे. पण यापैकीं पुष्कळ लोक तरी मूळचे या प्रांतांतीलच असावे असें म्हणतात. द्रविड व नंतर आर्य या संस्कृतीच्या लोकांच्या स्वाऱ्यामुळें या मूळच्या रहिवाशांना जंगलांत राहून तेथल्या फलमूलांवर व शिकारीनें मारलेल्या पशुपक्ष्यांवर आपली उपजीविका करावी लागली व अजूनहि लागत आहे. सारांश, समाजशास्त्रांतील उद्यमोत्क्रांतितत्त्वानुरूप मनुष्याचा आद्य उद्योग जो शिकार किंवा मृगया या पलीकडे त्यांची मजल जाऊं शकली नाहीं व सर्व जगांतील आद्य रानटी लोकांप्रमाणें अजूनही केरल प्रांतांतील हे लोक मृगयावृत्ति आहेत. त्यांच्यामधील नाना भेद व त्यांच्या विलक्षण चालीरीती यांची स्वतःच्या अवलोकनानें मिळविलेली मनोरंजक माहिती अनंत कृष्ण अय्यर यांनीं आपल्या 'कोचीनमधील टोळ्या व जाती' ( Tribes and Castes of Cochin ) नांवाच्या ग्रंथामध्यें एका स्वतंत्र भागांत दिली आहे. तिचा येथें उल्लेख करण्यापलीकडे जास्त उपयोग करतां येत नाहीं. सध्यां या सर्व जाती हिंदूमध्येंच मोडतात; पण त्यांची पायरी अगदीं शेवटची आहे हें उघड आहे.

बाकीच्या हिंदू जाती आर्य लोकांचे पूर्वी दक्षिण हिंदुस्थानांत व तेथून मग केरलांत कायमच्या राहण्यास आलेल्या द्राविड या काळ्यावर्णाच्या लोकांपैकीं आहेत. द्राविड कुटुंबापैकीं **मलयालम्** किंवा **मल्याळी** ही हल्लीं सर्व प्रांतभर सर्व जातीच्या लोकांची बोलण्याची भाषा झाली आहे. जरी पुढें निरनिराळ्या धर्मांचे व वंशाचे व वर्णांचे लोक केरलांत येऊन राहिले तरी या लोकांना **मलयालम्** भाषा मातृभाषा करावी लागली व द्राविडी संस्कृति कमी अधिक प्रमाणांत स्वीकारावी लागली. या द्रविड वर्णाच्या लोकांच्या पुष्कळ काळच्या वसाहतीनंतर आर्यवंशी नांबुद्री ब्राह्मण लोक केरलांत आले व केरल प्रांतांत शुद्ध आर्यवंशी लोक येवढेच आहेत; बाकीच्या सर्व जाती मुख्यतः द्राविड वंशीय

आहेत. पण केरलामधील हिंदु जातींपैकीं प्रमुख जाती नायर व नांबुद्री यांचें व त्यांच्या चालीरीतीचें वर्णन करण्यापूर्वी केरलांत असलेल्या इतर धर्मी लोकांची माहिती आधीं देणें सोयीचें होईल. हिंदुस्थानांत सामान्यतः शिकविल्या जाणाऱ्या इतिहासावरून आपली समजूत झालेली आहे कीं हिंदुस्थानांत मुसलमान धर्मी लोक गिझनीच्या महमुदाच्या स्वारीनंतर येऊं लागले व त्यांनीं हिंदुस्थानांत राज्य स्थापून येथल्या पुष्कळ लोकांना बाटविलें; तेव्हांपासून मुसलमान धर्मी लोक हिंदुस्थानचे कायमचे रहिवाशी झाले. तसेंच केप ऑफ गुड होपच्या मार्गानें वास्को डि गामा आल्यानंतर व पोर्तुगीज लोकांनीं येथल्या लोकांस जुलमानें बाटविल्यानंतर क्रिश्चन धर्मी लोक हिंदुस्थानांत दिसूं लागले. पण केरलांतील लोकस्थितीकडे नजर दिली असतां हे दोन्ही समज चुकीचे आहेत असें कळून येतें. कारण या प्रांतांत ज्यू, ख्रिस्ती व मुसलमान या तिन्ही धर्मांचे लोक फार पुरातन काळापासून जलमार्गानें येऊन तेथले कायमचे रहिवाशी झालेले आहेत असें दिसून येतें व या गोष्टीचें केरलांत प्रवास करणाऱ्यास मोठें नवल वाटतें.

केरलांत सध्यां चार पंथाचे क्रिस्ती लोक दिसून येतात; त्यांना सेंट टॉमस सीरियन क्रिस्ती, नेसटोरीयन क्रिस्ती, रोमन कॅथॉलिक क्रिस्ती व प्राटेस्टंट क्रिस्ती म्हणतात. यापैकीं सेंट टॉमस सीरियन क्रिस्ती लोकांमध्यें अशी दृढ समजूत व परंपरागत दंतकथा आहे कीं येशू क्रिस्ताच्या पहिल्या बारा प्रेषितांपैकीं सेंट टॉमस हा सीरिया देशांतून जलमार्गानें खुद्द केरल प्रांतांत आला. तेव्हां त्यानें केरलांत क्रिस्ती धर्माचा प्रसार करून येथें सात प्रार्थना मंदिरें बांधलीं व पुढें तो मद्रासला जाऊन तेथें क्रिस्तवासी झाला. तेव्हांपासून क्रिस्ती लोक केरल प्रांतांत राहत असून ते आपल्याला सीरीयन क्रिस्ती म्हणवितात. सीरीयन क्रिस्ती लोकांमध्यें ही दृढ श्रद्धा अजून कायम आहे. मला केरलांत प्रवास करतांना दोन चार सुशिक्षित सीरीयन क्रिस्ती लोक भेटले होते व त्यांपैकीं एका एंजीनीयरासमवेत मी कोडईकनालला

ग्रंथ संग्रहालय ... प्रत ... ता. ...



गेलों व तेथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं होतीं. त्या सर्वांचें मत असें कीं केरल प्रांतांत आपली वस्ती फार पुरातन कालापासून आहे. सेंट टॉमस केरलांत खरोखरी आला किंवा नाहीं याबद्दल अर्वाचीन शोधकांनीं शंका प्रदर्शित केली आहे. व हल्लीं क्रिस्ती लोकांमध्यें हा एक वादग्रस्त प्रश्न झाला आहे. सेंट टॉमस हा केरलांत येणें मात्र अगदीं संभवनीय आहे यांत शंका नाहीं. कारण बायबलामध्यें सालोमनच्या समारंभाचें वर्णन करतांना गलबतांतून केरल प्रांतांतील विशेष गोष्टी हस्तीदंत, मोर, चंदन व मसाल्याचे पदार्थ—आणल्याचा उल्लेख आहे व भाषा शास्त्रावरून असें सिद्ध झालें आहे कीं हीब्रू भाषेंतील त्या पदार्थांचीं नांवें मल्याळी भाषेंतील शब्दांचे अपभ्रंश आहेत. यावरून सीरीया व एशिया मायनरपासून केरलापर्यंत जलमार्गानें रहदारी चालू होती यांत शंका रहात नाहीं. म्हणून सेंट टॉमस केरलांत येऊन गेला असेल हे असंभवनीय नाहीं. पण सेंट टॉमस हा स्वतः केरलांत आला असो वा नसो; पण केरलांतील सीरीयन क्रिस्ती लोक फार पुरातन काळापासून तेथले रहिवाशी आहेत यांत शंका नाहीं. कारण केरलाच्या राजानें तिसऱ्या चवथ्या शतकांत दिलेला ताम्रपट अजून या लोकांचे जवळ आहे. नंतर आठव्या शतकांत नेसटोरीयन क्रिस्तपंथी लोक केरलांत आले व तेही लोक अजून केरल प्रांतांत आहेत. हिंदुस्थानच्या इतर भागाप्रमाणें हिंदुस्थानच्या नव्या जलमार्गाचा शोध लागल्यापासून क्रिस्ती मिशनरी हिंदुस्थानांत सररहा येऊं लागले व त्यांनीं येथील लोकांना बाटविलें व त्यामुळें रोमन कॅथालिक व प्राटेस्टंट पंथी लोकही केरलांत झाले हें उघड आहे. अर्वाचीन काळीं क्रिस्ती झालेल्या लोकांच्या चालीरीति व पोशाखाच्या तऱ्हा ॲंग्लो-इंडियन तऱ्हेच्या असल्या तरी सीरियन व नेसटोरीयन क्रिस्ती लोक मात्र केरलांतील हिंदु लोकांप्रमाणें वागतात. त्यांच्या पोशाखांची व राहण्याची तऱ्हा केरल प्रांतांतील हिंदु लोकांसारखीच आहे; त्यांची भाषा मल्याळीच आहे. सारांश, हे जुने खिस्ती लोक केरलप्रांतीं व हिंदु लोकांशीं सामाजिक बाबतींत अगदीं एकजीव झालेले आहेत. यावरून

हे लोक फार पुरातन काळापासून केरलांत स्थाईक झालेले आहेत या-बद्दल खातरी वाटते. पोर्तुगीज अंमलाचे काळांत या जुन्या ख्रिस्ती लोकांना रोमन कॅथॉलिक पंथामध्यें सामील करून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न, नव्हे जुलूम, करण्यांत आला; पण या लोकांनीं आपला जुना पंथ सोडला नाहीं व म्हणूनच इतक्या जुन्या पंथाचे लोक अजून केरलांत पुष्कळ आहेत.

या सीरियन क्रिस्ती लोकांनंतर थोड्याच वर्षांनीं केरलांत ज्यू लोकांची एक टोळी कायमची वसाहत करण्यास आली. प्रथमत: ते क्रँगानूर बंदरीं येऊन तेथेंच स्थाईक झाले; त्यांच्यापैकीं कांहींनीं केरलप्रांतांतील स्त्रियांशीं लग्नें केलीं, त्यांपासून मिश्र प्रजा झाली. त्यांना काळे ज्यू म्हणूं लागले व मूळच्या जातीला पांढरे ज्यू म्हणूं लागले. पुढें पोर्तुगीज कारकीर्दीमध्यें हे लोक कँग्रानूर सोडून कोचीन शहरीं राहण्यास आले व कोचीनच्या राजानें त्यांना आश्रय दिला व म्हणून सध्यां कोचीनच्या दोन 'भागांस पांढरे व काळे ज्यू शहर अशीं नांवें पडलीं आहेत व तेथें या दोन लोकांची वस्ती अजून आहे. या लोकांचेजवळच चवथ्या पांचव्या शतकापासूनचे केरलाधिपतींनीं दिलेलें ताम्रपट आहेत. यानंतर केरलांत येऊन स्थाईक झालेले लोक म्हणजे मुसलमान धर्मी लोक होत. हे आर-बस्थानांतून व्यापाराकरितां म्हणून आले व ज्यू लोकांप्रमाणें यांच्याही शुद्ध व मिश्र अशा दोन जाती झाल्या. त्यांना मूर व मोपला अशीं नांवें पडलीं. उत्तर हिंदुस्थानांवर मुसलमानांनीं राज्य-विस्ताराच्या लोभानें स्वाऱ्या केल्या व कालेंकरून सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज केलें. पण केरलांत ते केवळ व्यापारी म्हणून आले व केरलाच्या राजांनीं त्यांना आश्रय दिला. यामुळें केरलांत मुसलमानी राज्य झालें नाहीं. फक्त कॅनानोरचा अलीराजा म्हणून एक लहानसा राजा कांहीं काळ राज्य करीत होता. पण त्याचें मूळचें घराणें नायर होतें व बाटलेल्या त्या घराण्यांतील एक पुरुष कोलीत्तेरी राजाचा प्रधान झाला होता. पण कोलीत्तेरीचें राज्य नष्ट झालें तेव्हां तो कॅनानोरास

स्वतंत्र अली राजा म्हणून राहूं लागला. या अलीराजाच्या राज्यव्यवस्थेची एक नवलाची गोष्ट सांगण्यासारखी आहे. येथें सोन्याचें नाणें चालूं असे व खजिन्याच्या तिजोरीला एक भोक असून नाणीं त्या भोकांतून आंत टाकलीं जात असत. या तिजोरीला चार कुलुपें असत व त्यांची एक एक किल्ली राजा, जकातदार, सर न्यायाधीश व खजीनदार अशा चवघांजवळ ठेवीत असत व तिजोरींतून पैसे काढावयास चौघांचें संगनमत व हजेरी यांची जरूर लागे. राजाच्या अनियंत्रित सत्तेला व खर्च करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याची ही एक नवलाची युक्ति होय यांत शंका नाहीं.

हा अली राजा हैदर टिपु यांच्या स्वाऱ्यांच्या वेळीं त्यांना मिळाला व टिपूच्या मरणानंतर कालिकतच्या झामोरिनची जी अवस्था झाली तीच अली राजाची झाली. हल्लीं छोटासा जमीनदार म्हणून त्या घराण्याचा वंशज कॅनॉनूर येथें आहे. ज्याप्रमाणें केरलांतील सीरीयन क्रिश्चन लोक हिंदू जातींशीं समरस होऊन गुण्यागोविंदानें एकत्र राहतात तशी मात्र मूर व मोपला लोकांची गोष्ट नाहीं. हे लोक कडवे मुसलमानी धर्माचे आहेत व म्हणूनच केरलांत केव्हां केव्हां मोपल्यांचे दंगे होतात.

याप्रमाणें केरल प्रांतांत हिंदुस्थानच्या इतर भागाचे किती तरी आधींपासून ज्यू, क्रिस्त व मुसलमान या तिन्ही धर्मांचे लोक तेथील कायमचे रहिवाशी बनले असून ते एकत्र नांदत आहेत. यामुळें त्यांच्यामध्यें पुष्कळ संस्कृती मिश्रण झालेलें दिसून येतें. अर्थात् या धर्मांचे लोक संख्येनें पुष्कळ कमी आहेत. इतर प्रांतांप्रमाणें केरलामध्यें सुद्धां एकंदर बहुजनसमाज हिंदूंचाच आहे व त्याच हिंदु संस्कृतीचा पगडा इतरधर्मी लोकांवर झालेला आहे. म्हणूनच केरलांमध्यें चालीरीती, खाणें पिणें व पोशाख या बाबतींत पुष्कळ एकीकरण झालेलें दिसून येतें. आतां हिंदु धर्मी लोकांपैकीं प्रमुख जाती नायर व नांबुद्री यांच्या हकीकतीस लागूं या.

नायर हा शब्द नायक शब्दाचा अपभ्रंश आहे असें कोणी म्हणतात, तर कांहीं लोक नाग शब्दापासून नायर शब्दाची व्युत्पत्ति झाली असें म्हणतात. कारण नागाची पूजा करण्याचा प्रघात या जातींत पुष्कळ आहे. दुसऱ्यापेक्षां पहिली व्युत्पत्ति जास्त सयुक्तिक व संभवनीय दिसते. नायर जात ही द्रविड व आर्य यांच्या मिश्रणानें झालेली जात असावी असें त्यांच्या वर्णावरून वाटतें. कारण त्यांचा वर्ण निमगोरा पण दिसण्यांत सुंदर असतो यांत शंका नाहीं; विशेषतः नायर स्त्रियांचा वर्ण अधिक मनोहर असतो व त्यांचा तो पांढरा शुभ्र पोशाख त्यांच्या वर्णाला फार शोभतो यांत शंका नाहीं. केरलांतील नायर जात ही क्षात्रवृत्ति जात असून त्या जातींतील मुलांना लहानपणापासून स्पार्टन लोकांप्रमाणें लष्करी शिक्षण दिलें जात असे व यामुळें प्रत्येक नायर हा स्वयंसिद्ध असा शिपायी असे. केरलप्रांतामध्यें त्यांचे ५००, १००० वगैरे संख्यांनीं दर्शविलेले संघ असत. याचा निर्देश मागच्या एका भागांत केलाच आहे.

नायर लोकांची रहाणी मोठी नीटनेटकी व व्यवस्थितपणाची असते. यांचीं घरें व पोशाख हे पाहण्यासारखे असतात यांत शंका नाहीं. केरलांतील या लोकांच्या प्रथम दर्शनानें मनावर मोठा अनुकूल ग्रह उत्पन्न झाल्याखेरीज रहात नाहीं. नायरांमध्यें उपजाती पुष्कळ आहेत. आतां त्यांच्या विवाहविषयक व वंशपरंपराविषयक विलक्षण चालीरीतीं-कडे वळूं या.

नायर जातीमध्यें लग्नाचे दोन प्रकार आहेत असें समजतात. पहिल्याला **तालीकेतुकल्याणम्** व दुसऱ्याला **संबंधम्** म्हणतात. तालीकेतुकल्याणम् हा धार्मिक विधि असें समजतात; तर संबंधम् हा व्यावहारिक प्रकार आहे असें धरतात. तालीकेतुकल्याणविधि मुलगी वयांत येण्या-पूर्वींच करतात. मुलीचे आईबाप एखादा मुलगा पसंत करतात व मग मोठ्या समारंभानें त्याला आपल्या घरीं बोलावून आणतात. त्या मुलानें मुलीच्या गळ्यांत सोन्याची एक ताली ( एक प्रकारचा दागिना ) बांधा-

यची. विवाहविधीचा हाच मुख्य व धार्मिक भाग होय. बाकी मिरवणूक, मेजवान्या वगैरे सर्व विधी औपचारिक होत. हा विधि झाल्यावर नवऱ्यास दक्षिणा देतात व मग तो आपल्या घरीं जातो व त्याला वधूचे घरीं येण्याचा हक्क राहतो. पण पुष्कळ वेळां तो येत नाहीं. हा विधि झाल्या-वर व मुलगी वयांत आल्यावर तिला तिच्या इच्छेप्रमाणें एकापेक्षां अधिक पुरुषांशीं संबंधम् नांवाचें लग्न करतां येतें. अर्थात् हें लग्न म्हणजे खरें लग्न व व्यावहारिक विवाह होय. नायर जातीमध्यें बहुपतिकत्वाची चाल आहे म्हणतात ती हीच होय. मात्र एकापेक्षां जास्त पति असल्यास त्यांना निरनिराळे दिवस नेमून दिलेले असतात. मराठीं-तील संगीत नाटकाचे कविकुलगुरु अण्णा किर्लोस्कर यांनीं सौभद्र नाटकांत द्रौपदीच्या पांच पतींना वर्षाचे पांच भाग करून ते एक एक भावाला वांटून दिले होते असें जें वर्णन केलें आहे तें मूळ महाभारतांत असो वा नसो; पण ही कल्पना त्यांना नायर लोकाच्या रीतीवरून सुचली असावी असें वाटतें.

हा संबंधम् नांवाचा विवाह नायर बायका नांबुद्री ब्राह्मणाशीं कर-तात. यामुळेंच केरलांत एका दृष्टीनें जाती जातीमध्यें तुटकपणा पुष्कळ कमी आहे. या दोन्हीं प्रकारच्या लग्नविधीवरून केरलांतील कुटुंबव्यवस्था इतर प्रांतांपेक्षां अगदीं निराळी कशी व कां आहे हें दिसून येईल. केरलांतील कुटुंब मातृप्रधान आहे. इतर प्रांतांप्रमाणें पितृप्रधान नाहीं. केरलांतील कुटुंबाचे घटकावयव खालील होत. आई व तिचीं मुलें—मुलगे व मुली—व आईचा भाऊ हे होत. कुटुंबांतील मालकीण म्हणजे आई व कुटुंबांतील कर्ता पुरुष म्हणजे तिचा भाऊ किंवा मुलांचा मामा होय. कारण बायकोनें नवऱ्याकडे राहण्यास जाण्याची मुळींच पद्धति नाहीं. त्यामुळें या कुटुंबांतील मुख्य बाईचा नवरा हा कधींमधीं येणाऱ्या पाहुण्याप्रमाणें असतो व कुटुंबाची जबा-बदारी त्याच्यावर नसते. म्हणूनच या कुटुंबपद्धतीमध्यें बहिणीचा मुलगा हा वारस असतो. कारण वर निर्दिष्ट केलेल्या कुटुंबामध्यें माल-

मत्तेचा वारसा कर्ता पुरुष मामा याच्या मुलांकडे जात नाहीं किंवा मुलाकडे जात नाहीं तर मुलीकडे जातो व म्हणून विवाहित मुलीचा मुलगा हा मामा नंतर या कुटुंबाचा वारस बनतो. या कुटुंबव्यवस्थेचा विशेष म्हणजे मालमत्तेचा वारसा पुरुषाकडे न जातां मुलीकडे जातो व जरी मालमत्तेची व्यवस्था पुरुषाकडे असली तरी त्याच्या मुलांना किंवा मूळ मालकिणीच्या मुलांना वारसा जात नाहीं. या कुटुंबपद्धतीला **मरुमक्कथायम्** असें मल्याळींत नांव आहे. व बहिणीच्या मुलाकडे वारसा जाण्याच्या पद्धतीला **आलिया संतान** पद्धति म्हणतात. या पद्धतीमध्यें पुरुषापेक्षां स्त्रियांना महत्त्व जास्त आहे असें दिसून येईल व म्हणूनच केरल प्रांतामध्यें स्त्रीशिक्षणाचा प्रसार पुरुष शिक्षणाइत-काच नव्हे कांकणभर जास्तच आहे.

केरलप्रांतांत पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झाल्यामुळें संबंधम् या विवाहपद्धतीबद्दल लोकमत विरुद्ध होत चाललें आहे. बहुपतिकत्व तर अस्तंगत होत चाललें आहे व मातृप्रधान कुटुंबपद्धतीविषयीं प्रतिकूल मत होत चाललें आहे. कालेंकरून केरलांतील या विलक्षण सामाजिक चालीरीती नामशेष होऊन जातील व केरलांतील हिंदुसमाज हिंदुस्था-नांतील इतर हिंदुसमाजाच्या सारखाच होईल असें वाटतें. असो.

शेवटीं केरलांतील नांबुद्री ब्राह्मणांची जात राहिली. केरलप्रांतांत हल्लीं ब्राह्मणांच्या दुसऱ्याही जाती आहेत. पण त्या सर्वांमध्यें नांबुद्री ब्राह्मण हे सर्वांचे आधीं आलेले ब्राह्मण होत व त्यांच्यामध्येंच नायर जातीच्याप्रमाणें कांहीं कांहीं विलक्षण चालीरीती रूढ आहेत तिकडे आतां लक्ष देऊं या.

इतर धर्मांचे लोक केरलांत केव्हां आले ही बाब जशी मतभेदाची आहे तशीच नांबुद्री ब्राह्मणांच्या आगमनाची बाब आहे. केरल प्रांत समुद्राकडून घेतल्यानंतर परशुरामानें ६४ कुटुंबें केरलांत आणलीं ते नांबुद्री ब्राह्मण अशी एक दंतकथा आहे, तर आठव्या शतकांत अहिक्षेत्रांतून

मयूरवर्मा राजानें हे ब्राह्मण प्रथम केरळांत आणले अशी दुसरी दंतकथाही प्रचलित आहे. पण या दंतकथा खऱ्या असोत वा नसोत नांबुद्री ब्राह्मण हे आर्यवंशी असून ते क्रिस्ती शकानंतर लवकर केरळांत आले असावे असें समजण्यास हरकत नाहीं. कारण या नांबुद्री ब्राह्मणांमध्यें इतर प्रांतांतील ब्राह्मणांपेक्षां पुष्कळ निराळया चालीरीती आहेत यांत शंका नाहीं. तेव्हां हे ब्राह्मण फार पुरातन काळीं या प्रांतांत येऊन स्थाईक झालेले असावेत. पण ते द्रविड वसाहतीच्या पुष्कळ मागाहून आले असावे. कारण इतर प्रांतांप्रमाणें या आर्य ब्राह्मणांना आपल्या चालीरीती व भाषा द्रविड लोकांवर लादतां आल्या नाहींत; उलट त्यांना द्राविडी संस्कृतीचा स्वीकार करावा लागला. पण त्यांनीं सर्व समाजावर आपलें वर्चस्व बसविलें व विशेषतः पुष्कळ जमीन त्यांनीं आपल्या ताब्यांत आणली व आपल्या कुटुंबाचें वर्चस्व कायम ठेवण्याकरितां व कुटुंबाची शुद्ध परंपरा राखण्याकरितां राजघराण्यामध्यें चालू असलेला एक कडक नियम व लग्नाच्या बाबतींत दुसरा एक कडक नियम हे अमलांत आणले. नांबुद्री ब्राह्मणामध्यें कुटुंबाची मालमत्ता फक्त थोरल्या मुलाकडे जावयाची असा सक्त नियम आहे व त्यानें आपल्या जातींतील प्रौढ मुलीशींच वेदमंत्रयुक्त विधीनें विवाह करावा असाही सक्त नियम आहे. यामुळें कुटुंबाची शुद्धताही टिकली व कुटुंबाची सुस्थितिही कायम राहिली. नांबुद्री ब्राह्मणाच्या धाकट्या मुलांना नायर बायकांशीं **संबंधम्** प्रकारचें लग्न करण्याची परवानगी देण्यांत आली. या संबंधामध्यें नवऱ्यावर मुलांच्या संगोपनाची जबाबदारी पडत नाहीं; किंवा नायर बायकांना नांबुद्री ब्राह्मण कुटुंबांतही राहण्यास यावें लागत नाहीं. तेव्हां या पद्धतीनें नांबुद्री कुटुंबें शुद्ध राहून त्या कुटुंबांतील धाकट्या मुलांचीही सोय झाली. ते काय ते खाण्याजेवणापुरते आपल्या नांबुद्री कुटुंबांत राहणार. अशा प्रकारची विलक्षण चाल नांबुद्री ब्राह्मणांमध्यें पडली आहे. नांबुद्री ब्राह्मणांतील दुसऱ्या विलक्षण वाटणाऱ्या चाली अशा आहेत.

१ नग्न स्नान करावें (अर्थात् कोणताहि कपडा अंगावर असूं नये; फक्त मुंजीच्या वेळची लंगोटी असावी. ही चाल सध्यां सुद्धां सररहा चालू आहे व तिकडील तलावावर मोठमोठे पुरुष केवळ लंगोटी-निशीं स्नान करतांना मीं प्रथम पाहिले तेव्हां मला चमत्कारिक वाटलें. पण हा नुसता दृष्टिदोष आहे असें थोड्याच अनुभवानें कळून आलें.)

२ एक घासी जेवणें (म्हणून दाक्षिणेंतील लोक भाताचे गोळे करून ते तोंडांत फेकतांना आपल्याला दिसतात.)

३ विटाळशीचा विटाळ न मानणें.

४ प्रेत घराच्या मागच्या अंगणांत पुरणें किंवा जाळणें.

५ बायकांनीं नाकाला भोंक न पाडणें.

६ सुवासिनी बायकांनीं शुभ्रवस्त्र परिधान करणें (ही शुभ्रवस्त्राची पद्धति नायर बायकांनींही पूर्णपणें उचललेली दिसते.)

७ थोरल्या मुलानें फक्त धार्मिक लग्न करणें.

८ बहिणीचे मुलांस मालमत्तेचा हक्क देणें.

नांबुद्री ब्राह्मणांमधील या विलक्षण चालींवरून केरलप्रांतामध्यें नांबुद्री व नायर या दोन प्रमुख हिंदु जातींमध्यें चालीरीतीसंबंधीं विलक्षण मिश्रण घडून आलें आहे हें दिसून येईल.

नायर जाती इतका नांबुद्री ब्राह्मणांमध्यें अजून इंग्रजी शिक्षणाचा फैलाव झाला नाहीं. तरी त्या जातीमध्यें सुद्धां अलीकडे **संबंधम्** लग्न-पद्धतीबद्दल विरुद्ध मत होऊं लागलें आहे. तेव्हां कालेंकरून त्यांच्या ब्राह्मण समाजाच्या चालीमधून ही विवाहपद्धति बंद होईल, यांत शंका नाहीं.

केरल प्रांतांत हिंदुस्थानांतील हिंदु समाजाप्रमाणें निरनिराळ्या देव-देवतांचे उत्सव होतात. त्या प्रांतांत विष्णूपेक्षां शिवाच्या भक्तीचा जास्त प्रसार दिसतो.

वामनावताराच्या कथेचा उत्सव जास्त प्रमाणांत होतो. पण त्या प्रांतांत विशेष प्रचलित पूजा म्हणजे नागपूजा होय. तसेंच भुतांची पूजा करण्याचाही फार प्रघात आहे; नव्हे आपल्या इकडल्या पूर्वीच्या हिंदु घरांमध्यें ज्याप्रमाणें एक **देवघर** असलेंच पाहिजे त्याप्रमाणें तिकडे **भूतघर** असलेंच पाहिजे.

केरलामधील सामाजिक चालीरीतींचें व लोकस्थितीचें जास्त सविस्तर, साग्र व संगतवार वर्णन करतां येण्यास तेथें महिनेच्या महिने निवास केला पाहिजे व निरनिराळ्या जातींच्या लोकांमध्यें जाऊन राहिलें पाहिजे. पण केरलांतील माझा दोन हप्त्यांचा प्रवास उडत उडत व ओझरताच झाला. पण या ओझरत्या दर्शनांत जी काय थोडीबहुत माहिती मिळवितां आली ती वाचकांस सादर करीत आहें. या माझ्या केरलवर्णनपर पुस्तकाच्या वाचनानें वाचकांच्या मनाची थोडी फार करमणूक होऊन तो प्रांत प्रत्यक्ष जाऊन पहाण्याची वाचकांमध्यें जिज्ञासा उत्पन्न झाल्यास माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मला वाटेल.

समाप्त.

# सूचीपत्र.


अगस्त्य ( शिखर ) ९०

अगुंबे घाट ५

अरब २

अरबस्थान ४

अर्नाक्युलम् : ४६— क्षार सरोवर ४७, बाजारपेठ ४७— राजवाडा ४८, ५९

अलवाई ५३

अली राजा १४८

अलेप्पे : ६६–सरोवर ६७–कालवा ६८ –शहराचा देखावा ६९ –व्हेनिसशीं तुलना ७१

अशोक १, १११

आदित्यवर्मा १३१

आरबी समुद्र ५६, ७१, ९२, १०८

आर्य १०५

आल्बुकर्क ११७

आल्मीडा, फ्रान्सेस्को ११७

आलवाई १२४

आलवाये १११ ऊर्फ पारूर १३९

आलिया संतान १५२

इंग्रज २३, १२७, १४१

उद्योगधंदे:पहा कौलकारखाना, कॉफी-कारखाना, मिरी, चटया, काजू, कापड रंगविणें

उम्मा अम्मा १३२

एकांबरराव श्री. व मिसेस ११

ओलव्हकोट ४२

कन्याकुमारी ३, १६, समुद्रकुंड १८, देऊळ १००

कॅझेरिना १७, १९, ७३

कॅननोर २७, ३७–किल्ला ३९–बंदर ३९–इतिहास ४०–११४

कॅन्यूट ५७

कॅबेल २३

कॅबल ११६, १४१

काजू २१

कानडा, दक्षिण २

कापड रंगविणें १२८

कामुआचा १२६, १३५, १४१

कारकल ६

कार्लाइल १००

कालदी १५२

कालिकत २९, ११५, १२५

कालिदास १

कावेरी १, ८

काशी, दक्षिण ६

कासरगोडा १०, २६

कॉफी ८, १६

कुद्रेमुख १२, १६

कुर्ग ७

कूट १११

कुटुंबपद्धति: मातृप्रधान १५१
केरळ: व्युत्पत्ति २–स्वाभाविक मर्यादा ३–उत्पत्तिकथा ३, १०६–उत्तरभाग ४– प्रथम वसाहत १०५–महाराष्ट्राशीं तुलना ९५, १०१ –विशिष्ट झाडें २७– पिकें ११, २०, २६, ४८, ७७, ११९, निसर्गाच्या देणग्या ५८
राजकीय विभाग १०५
केरळाधिपति ११०
केरळोत्पत्ति ३, ११२
कोइमतूर ११२
कोंकण ६६, ९०, ९६, १०६
कोचीन संस्थान १३५, १४०
कोचीन शहर ५९ –क्षारसरोवर ६० ज्यू टाऊन ६३– मासे धरण्याची जाळी ६४, ६६, १०९, १२१
कोलत्तिरी राजा ११५
कोलाचेल १२६, १३४
कौलें, मंगलोरी २०
क्रिस्ती १०८, १०९, १४६
क्विलॉन ७२ –सरोवर ७४ –दीपगृह ७५, १०१, १२१, १३३
कँगनूर १०९, १२२
गांधी, महात्मा ५०, ५२
गुरपूर नदी १२,
गुरुवायुर १४, ५०
गोकर्ण–महाबळेश्वर ३
गोमतेश्वर ६,
गोवें ११८
घाट: पहा अगुंबे, चारमडी, संपाजें
चटया, गवती ८८
चन्द्रगिरी नदी १०, २६
चारमडी ५
चेटवाई १२४
चेर २, १३०
चेरामन पेरुमल ३४, ११२, १४०
चोल १, १३०
छत्र ७८
जनार्दनाचें देऊळ ५४
जलकुलुप ५८, ७३
जलमार्ग १२, २९, ५८, ६६, ७३
जिनीव्हा ३७, ४७
जैन संस्कृति ६
ज्यू १०९, १४८
ज्यू टाऊन १०९
झाडें: पहा सिल्व्हर ओक, कॅशेरिना
झामोरिन २४, शीं मुलाखत ३०, ३३–, १०९, ११५, १२४, १२७, १३५, १४०
टिपू २२–, ३४–, १२७
टेम्स ६६, ७३
ट्युटिकोरिन ७७, १०१, १०३, १२८
डच १२१, १३४
डनकॉड १३४
डाल सरोवर ६८
डीलेनॉय १३४
डोंगर व शिखरें: पहा डेली, अगस्त्य कुद्रेमुख.

डॉन मॅन्युअल ११५
तंबाखू ८, २६
तांबडा समुद्र १०८
तापिओका ५५
तामीळ १३९
तारवड ११२
तालीकेतुकल्ल्याणम् १५०
तिनीवेली १०१
तुलु २२
तुलुव २२
तेलीचेरी २७, ३७, १२२
त्रावणकोर ९५, १३१
त्रिचनापल्ली १३२
त्रिचूर ४२–वडकुनाथम् ४३–राजवाडा ४५–पार्क ४५, १२७,१३६
त्रिवेन्द्रम् ७७–दळणवळणाचीं साधनें ८१–प्रेक्षणीय स्थळें ८३–पद्मनाभ देऊळ ८६–पदार्थसंग्रहालय ९०, १०९, १०१
दवणे ११५
देवळें : पहा गुरुवायूर, जनार्दन, पद्मनाभ, मंगलाई, वडकुनाथम्, शंकराचार्य, शारदांबा
देली डोंगर ४, २६
द्रविड १०५, १४५
द्रविड भाषा १२५
धक्के, क्षारसरोवरांतील ६०, ६७
धनुष्कोडी ९६
नद्या : पहा अलवाई, आलवाई, आलवाये, कावेरी, गुरपूर, नेत्रावती, पैसवनी, पोनाई, पोनानी.
नागरकोइल ९५, १००
नांबुद्री ४४, ५४, १०६, १११, १५२
नायर १०७, १११, १२४, १५०
नेत्रावती ३, ११
पद्मनाभ ८६, १३१
पर्वत : पहा पश्चिमघाट, पूर्वघाट, मलय, सह्याद्रि
परशुराम ३
पलियाचा संस्थानिक १२४
पॅरिस ४८
पश्चिमघाट ९०, १०१
पांड्य २
पालनी ३
पालमिरा पाम १०३
पालघाट खिंडार ३, ४१, १२९, १४२
पिकें: पहा कॉफी, तंबाखू, तापिओका, मिरीं.
पुत्तूर ११
पूर्वघाट १, २
पेरुमल १११
पैसवनी १०
पोनाई १४२
पोनानी ४२
पोर्तुगीज २२, ३४, ४०, ११४ ११८
फ्रेजर पेठ ८

फ्रेंच १२८
चनेश्वर १९
चर्न ३७
बंगलोर ७
बंदरें: पहा अर्नाक्युलम्, अलेप्पे, कालिकत, कासरगोडा, कॅननोर, कोचीन, क्विलॉन, तेलीचेरी, मंगलोर, माहे, वायकोम.
बॅडागारा २८, ३६
ब्रायटन ५६, ७०
भरणी थिरूनल १२४
भारतवर्ष २
भाषा: पहा तामीळ, तुलु, मल्याळी, हीब्रू.
भूतघर १५५
मंगलोर ३–रचना ११– सेंट अॅलॉयसीस कॉलेज १३– कॉफीकारखाना १६ –कद्री १८– नवाविस्तार २१– पूर्वपीठिका २२
मंदिरप्रवेश निर्बंध ४४, ५०, ८६
मंगलाई १७
मनीयाची १०३
मरकारा ९
मर्गी १०
मरुमक्कथायम् १५२
मलबार २, १०५. पहा केरळ.
मलय २
मल्याळी भाषा २, १०७, १३९, १४३, १४५
महाड–महाबळेश्वर घाट १०
महामख १११
महाराष्ट्र ९५, १०१
मार्को पोलो ११४
मार्तंड ९३
मार्तंडवर्मा १२६, १३२
माहे २७, ३६, १२२, १२९
मीनाक्षी ४३
मिर्री २८, ३६
मुडबिद्री ६
मुसलमान १०८, ११०, १४६
मोपला ११०
म्हैसूर ७, १२७, १२९, १४१
यहुदी १०८. पहा ज्यू.
रघुवंश १
रविवर्मा ९१
रानटी जाती १४४
रामवर्मा १२७, १३२
रामवर्मा १३८
रामेश्वर ९६
रिक्शा ८१
रोमन कॅथॉलिक १२०
रोहे–रेवदंडा खाडी ६६
लंका ४
लुसर्न ३७
लेसेप्स ५९
लॉक लोमंड ७४
वडकुनाथम् ४३
वाकाला ५४

वरुण ३
वायकोम ६७
वायपिन १२२
वास्को-डि-गामा २२, ३४, ४०, ११०, ११५
विजयानगर २२
विल्सनधक्का ४७
वीर केरलवर्मा १२३, १४०
व्हॅन गोव्हन्स १२१
व्हॅन रीड १२३
व्हेनिस ७१
शंकराचार्य ५२
शारदांबा ५३
शेणकोटा १०१
शोरानूर ४२
श्रीचित्रम् १३८
श्रीमूलम् १३८
श्रीनगर ७१
संपाजे ऊर्फ सोमेश्वर घाट ४०
सरोवरें, क्षार १७, ४७, ५८, ६०, ६६
सह्याद्रि २, ६, १०१
संबंधम् १०७, १५०
सागर ४०
सातारचे राजे २४
सिल्व्हर ओक ९
सिनेगॉग ६३
सीरियन क्रिस्ती ७०, ११०, १२०, १४६
सुएझ ५९, ६८
सुरत २
सुचिन्द्रम् १३६
सेंट टॉमस ११०, १४६
सॉलोमन १०८
स्त्रीशिक्षण १४२
हरेश्वर ९८
हिंदुस्थान दाक्षिण १, २
हीब्रू १०८, १४७
हेनरी ११४
हैदर अली २२, १२७, १२९, १३७

# प्रि. भाटे यांचीं इतर पुस्तकें

| | | रु. आ. |
|---|---|---|
| १ | लंकेचें वर्णन व वृत्तांत | १—८ |
| २ | माझी विलायतची यात्रा | ,, |
| ३ | आमची युरोपची यात्रा | ,, |
| ४ | काश्मीरचें वर्णन व वृत्तांत | १—० |
| 5 | Essays and Speeches | 1—8 |
| 6 | Isle of Nahva | 0—4 |
| ७ | कांट व शंकराचार्य | १—० |
| ८ | ललितकला-मीमांसा (सचित्र) | १—४ |
| ९ | कार्लाईल व हिंदु चालीरीति | १—८ |
| १० | तीन तत्त्वज्ञानी | ०-१२ |
| ११ | माझा म्हैसूरचा प्रवास (सचित्र) | ०-१२ |
| १२ | सर वॉल्टर स्कॉट-चरित्र | ०—८ |
| १३ | प्रेम कीं लौकिक | २—० |
| १४ | अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें | ३—० |

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

डॉ. व. गो. भाटे,
एम्. बी., बी. एस्.,
महाड, जिल्हा कुलाबा.